
मार्च २०१३ । किंमत ₹१०

# लोकराज्य







RABHA

# सामाजिक न्याय विशेषांक

## महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाची विभागीय कार्यालये

# साधा संपर्क : साधा उन्नती

| अ.क्र. | पद | पत्ता | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा व्यवस्थापक, वांद्रा | गृहनिर्माण भवन, रूम नं. ३३, तळमजला, कलानगर, वांद्रा (पूर्व), जिल्हा - मुंबई – ४०० ०५१. | ०२२-२६५९००५६ |
| २ | जिल्हा व्यवस्थापक, ठाणे | जिल्हाधिकारी कार्यालय पाचवा मजला, विभागीय समाज कल्याण कार्यालयाशेजारी, कोर्ट नाका, जिल्हा – ठाणे. | ०२२-२५४२०७२४ |
| ३ | जिल्हा व्यवस्थापक, रायगड | श्री. ए. के. पाटील यांचे घर,बजाज शोरुम, हॉटेल रविकिरणजवळ, रेवस रोड, अलिबाग, जिल्हा–रायगड–४०१२०१ | ०२१४१-६४२४५८ |
| ४ | जिल्हा व्यवस्थापक, रत्नागिरी | डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, रत्नागिरी, जिल्हा – रत्नागिरी – ४१५ ६१२ | ०२३५२-२३००६३ |
| ५ | जिल्हा व्यवस्थापक, सिंधुदुर्ग | नवीन प्रशासकीय इमारत, अ विंग, पोट माळा, ओरस बुद्रूक, जिल्हा – सिंधुदुर्ग – ४१६ ५२०. | ०२३६२-२३२१९६ |
| ६ | जिल्हा व्यवस्थापक, पुणे | अर्जुन बिल्डिंग, ४ था मजला, कोरेगाव रोड, जिल्हा – पुणे – ४११ ००१. | ०२०-२६१२०७७६ |
| ७ | जिल्हा व्यवस्थापक, कोल्हापूर | डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा मजला, रूम. नं. ०२, विचारे माळ (कावळा नाका) ताराराणी चौक, जिल्हा - कोल्हापूर | ०२३१-२६६२३१३ |
| ८ | जिल्हा व्यवस्थापक, सांगली | डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, पहिला मजला, जुना बुधगाव रोड, रेल्वे क्रॉसिंगजवळ, संभाजीनगर, ता. मिरज, जिल्हा – सांगली – ४१६ ४१६. | ०२३३-२३७६३८३ |
| ९ | जिल्हा व्यवस्थापक, सातारा | ६५, पालकर बिल्डिंग, मल्हार पेठ, टेलिफोन एक्सचेंजसमोर, जिल्हा – सातारा – ४१५ ००१ | ०२१६२-२३३४२५ |
| १० | जिल्हा व्यवस्थापक, सोलापूर | डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, दुसरा मजला, सात रस्ता, जिल्हा, सोलापूर, ४१४ ००४. | ०२१७-२७२५४७२ |
| ११ | जिल्हा व्यवस्थापक, नाशिक | डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बी – दुसरा मजला, नासर्डी पुलाजवळ, नाशिक–पुणे रोड, जिल्हा – नाशिक – ४२२१०१ | ०२५३-२२३६०५१ |
| १२ | जिल्हा व्यवस्थापक, धुळे | ॲड दिघे कॉम्प्लेक्स, कोर्टासमोर, स्टेशन रोड, धुळे – ४२४ ००१ | मो. ९७३०८५८१७७ |
| १३ | जिल्हा व्यवस्थापक, जळगाव | डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, मायादेवीनगर, महाबळ रोड, जळगाव–४२५००१. | ०२५७-२२६३४०२ |
| १४ | जिल्हा व्यवस्थापक, अहमदनगर | मार्केट कमिटी बिल्डिंग नं. २, महात्मा फुले चौक, सहकार सभागृह रोड, कमर्शिअल बिल्डींग, मार्केटयार्ड, जिल्हा – अहमदनगर – ४१४ ००१. | ०२४१-६४१६३१३ |
| १५ | जिल्हा व्यवस्थापक, नंदुरबार | डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, टोकरतलाव रोड, जिल्हा– नंदुरबार – ४२८ ४१२. | |
| १६ | जिल्हा व्यवस्थापक, औरंगाबाद | नाथ सुपर मार्केट, २ रा मजला, औरंगापुरा, जिल्हा – औरंगाबाद – ४३१ ००४. | ०२४०-२३५७४५४ |



(उर्वरित यादी मुखपृष्ठ ३ वर)

वर्ष ६४ वे | अंक १२ | मार्च २०१३

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

| | |
|---|---|
| मुख्य संपादक | प्रमोद त्र्यं. नलावडे |
| व्यवस्थापकीय संपादक | प्रल्हाद जाधव |
| संपादक | सुरेश वांदिले |
| कार्यकारी संपादक | प्रभाकर मुराळकर |
| उपसंपादक | किरण केंद्रे |
| प्रशासन व वितरण अधिकारी | दिगंबर पालवे |
| वितरण अधिकारी | विलास बोडके<br>दत्तात्रय कोकरे |
| साहाय्य | विद्या कदम |
| मुखपृष्ठ | राभा |
| मांडणी, सजावट | संदीप पवार, |
| मुद्रण | एच. टी. मीडिया लि.<br>दिघे, नवी मुंबई |

संपादकीय पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, दालन क्र. ३३, तळ मजला, मंत्रालय, मुंबई-३२.

संपादकीय संपर्क : ०२२-२२८८२८८८

e-mail : lokrajya@dgipr.maharashtra.gov.in
lokrajya2011@gmail.com

ई-लोकराज्यसाठी
Website : http://dgipr.maharashtra.gov.in

वर्गणीदार व तक्रार निवारणासाठी संपर्क - ०२२-२२०२१५३०
वितरण संपर्क - ०२२-२२०२३९५७

e-mail : lokvitran@dgipr.maharashtra.gov.in
lokrajyavitaran@gmail.com

# अंतरंग



## दुर्बल घटकांच्या हितरक्षणाची घटनात्मक जबाबदारी

समाजातील दुर्बल घटक, विशेषत: अनुसुचित जाती-जमाती यांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक हितांचे संरक्षण करणे आणि सर्व प्रकारच्या शोषणापासून त्यांचे संरक्षण करणे, ही शासनाची घटनात्मक जबाबदारी आहे.

६

## सक्षम आणि समर्थ



महाराष्ट्र राज्य पुरोगामी विचारधारा घेऊन समाजातील दुर्बल घटकांच्या विकासासाठी कार्यरत आहे. महाराष्ट्राला महात्मा जोतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारांचा वारसा लाभला आहे. या थोर महापुरुषांनी दाखविलेल्या समतेच्या मार्गानेच सामाजिक न्याय विभाग आणि राज्य शासन वाटचाल करीत आहे.

८

## कर्तृत्व-नेतृत्व आणि वक्तृत्व



महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री, आधुनिक महाराष्ट्राचे जनक स्व. यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले. या वर्षाचा सांगता सोहळा २३ मार्च २०१३ रोजी होत आहे. या निमित्ताने यशवंतरावांच्या कर्तृत्वाचे विविध पैलू उलगडून दाखविणारे विशेष लेख...

१३ ते १९

## अपंगांना मदतीचा हात

राज्यातील दृष्टिहीन, कर्णबधिर, अस्थिविकलांग व मनोविकलांग मुलांना शिक्षण, प्रशिक्षणाची संधी शासनामार्फत उपलब्ध करून देण्यात येते. त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील करण्याच्या दृष्टीने समाजिक न्याय विभागाच्या अपंग कल्याण आयुक्तालयामार्फत अपंगांचे शिक्षण व पुनर्वसनविषयक योजना राबविल्या जातात.

४०

| | | |
|---|---|---|
| सामाजिक न्यायाचे नवे पर्व | संपादकीय | ५ |
| हे राज्य सामाजिक न्यायाचे... | उपमुख्यमंत्री | ७ |
| समाजोन्नती | सचिन अहिर | १२ |
| सेवेची संधी | आर. डी. शिंदे | २० |
| सामाजिक न्यायाचे सामर्थ्य | आर. के. गायकवाड | २२ |
| समृद्धी आणि प्रगती | -- | २६ |
| उगवली नवी पहाट | सुरेश पाटील | ३२ |
| संधी आली दारात | रंगनाथ नाईकडे | ३४ |
| पुरस्कार आणि सन्मान | शिवाजी चौरे | ३६ |
| पुनर्वसनाला साहाय्य | बाजीराव जाधव | ३७ |
| रमाई आवास घरकुल योजना | -- | ४४ |
| ई-शिष्यवृत्ती | एम. एम. आत्राम | ४५ |
| शिक्षणाचा आधार | डॉ. वसंत माने | ४६ |
| लष्करी सेवेतील प्रवेश झाला सोपा | मुक्ता पवार | ४७ |
| व्यसनमुक्तीचे नवे पर्व | गणेश खामगळ | ४८ |
| निर्भय महाराष्ट्र -व्यसनमुक्त महाराष्ट्र | -- | ५० |
| अष्टपैलू बाळशास्त्री | रवींद्र बेडकिहाळ | ५२ |
| अमरावती तेव्हा आणि आता | मोहन अटाळकर | ५५ |
| दुष्काळचे दु:ख हलके करण्यासाठी | प्रवीण टाके | ५८ |
| द्रष्टे निर्णय... अभिनव योजना | -- | ६० |
| भक्ती आणि संस्कृती | सुनील सोनटक्के | ६२ |
| असामान्य नेतृत्व | डॉ. सुनीलकुमार लवटे | ६५ |
| रक्तदान व युवक | अमृता पाटील | ६६ |

**उपयुक्त माहिती**

'लोकराज्य – फेब्रुवारी २०१३'च्या मराठी भाषा विशेषांकामध्ये मराठी भाषा विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या विविध संस्थांची विस्तृत माहिती दिलेली आहे; तसेच या अंकातील मान्यवरांचे लेखही खूप चांगले आहेत.

**– चंद्रशेखर व. ओक**, जिल्हाधिकारी, मुंबई शहर




**खुपच सुंदर,ग्रेट**


**– संजय व्हनमाने,** महाराष्ट्र टाइम्स

**अप्रतिम**

**– धर्मेंद्र जोरे,** हिंदुस्थान टाइम्स

**ज्ञानात भर घालणारे**




लोकराज्यचे सर्वच अंक वाचनीय, संग्राह्य असून सर्वांच्या ज्ञानात भर घालणारे आहेत. आपल्या भेटीचे मन:पूर्वक स्वागत व शतश: आभार! नव्याने उभारण्यात आलेल्या आनंदवन वाचनालयात हे अंक ठेवण्यात आले असून आनंदवनातील नागरिकांसमवेत आनंदवनास भेट देणाऱ्या अतिथींनाही ते वाचण्यास उपलब्ध करून देण्यात येतील.

**– डॉ. विकास आमटे,** सचिव, महारोगी सेवा समिती, वरोरा

**उपयुक्त आणि संग्राह्य**

हरितक्रांतीचे प्रणेते, राज्याच्या मुख्यमंत्री पदाची जबाबदारी यशस्वीरीत्या थोडीथोडकी नव्हे, तर सलग ११ वर्षे सांभाळणारे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त लोकराज्यचा डिसेंबर विशेषांक माहितीपूर्ण झाला आहे. याबद्दल मी संपादक मंडळाचे अभिनंदन करते. वसंतराव नाईक यांच्या राजकीय, सामाजिक कार्याबद्दल माहिती, त्यांनी घेतलेले महत्त्वपूर्ण निर्णय यासोबतच त्यांच्या सर्वांगीण कारकीर्दिची ओळख करून देणारा हा विशेषांक वाचनीय आणि दिशादर्शक ठरणारा आहे. एक उपयुक्त संग्राह्य अंक प्रकाशित केल्याबद्दल आपले मन:पूर्वक अभिनंदन आणि पुढील अंकास शुभेच्छा.




**– फौजिया खान,** राज्यमंत्री

**आदिवासी युवकांना लोकराज्य भेट**

अकोले तालुक्यातील राजूर येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाच्या वतीने २,४०८ सुशिक्षित आदिवासी युवकांना लोकराज्य मासिक भेट म्हणून देण्यात येणार आहे. यासाठीचा २,४०,८०० रुपयांचा धनादेश आदिवासी विकास मंत्री तथा अहमदनगर जिल्ह्याचे पालकमंत्री बबनराव पाचपुते यांच्या हस्ते प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी दिलीप गवळी यांना सुपूर्द करण्यात आला. यावेळी आमदार मधूकरराव पिचड, जिल्हा परिषद सदस्य वैभव पिचड, आदिवासी विकास विभागाचे अप्पर आयुक्त सु. भा. हिंगोणीकर , राजूरचे प्रकल्प अधिकारी डॉ. टी. एम पिचड आदी उपस्थित होते.






**अपंगांना लोकराज्य भेट**

संगमनेर येथील डॉ. सुधीर तांबे वेल्फेअर फाऊंडेशनने नुकताच एक स्तुत्य उपक्रम हाती घेतला तो म्हणजे अपंग वधूवरांना महाराष्ट्र शासनाचे मुखपत्र असलेले लोकराज्य मासिक फाऊंडेशनच्या खर्चाने भेट देण्याचा. राज्याचे महसूलमंत्री श्री. बाळासाहेब थोरात यांच्याहस्ते या अंकाचे वाटप करण्यात आले. आमदार डॉ. सुधीर तांबे यांच्यासह महाराष्ट्र राज्य अपंग महासंघाचे अध्यक्ष अशोक भोईर, संस्थापक अध्यक्ष किशोर कोळपकर, मार्गदर्शक किशोर नावंदर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

**प्रेरणास्रोत**




समाजोपयोगी, विविध क्षेत्रांतील घडामोडींची माहिती लोकराज्यच्या वाचकांना मिळत असते. राज्यशास्त्राचे संशोधक, विद्यार्थी यांना लोकराज्य अंकातून प्रकाशित होणारी माहिती, लेख, सरकारी योजना व निर्णय याबाबतची माहिती उपयुक्त व मोलाची आहे. डिसेंबर २०१२ च्या अंकातील स्व.नाईकसाहेब यांच्या जीवन कार्यावरील माहिती राजकीय क्षेत्रात कार्य करणाऱ्या तरुण कार्यकर्त्यांना प्रेरणा देणारी आहे.

**– प्रा. पी. बी. गायकवाड**
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा

**'लोकराज्य'मधील लेखांचे पुनर्मुद्रण केल्यास आम्हाला आनंदच होईल...**

**वार्षिक वर्गणी – वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई–४०००२१ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वटणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००/–)**

*या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.

**लोकराज्यची वर्गणी ऑनलाईन भरण्यासाठी**

http://dgipr.maharashtra.gov.in

# सामाजिक न्यायाचे नवे पर्व



मार्च महिना आपल्या देशाच्या आणि राज्याच्या अर्थसंकल्पाशी निगडीत असतो. जानेवारी महिन्यात जसे आपण व्यक्तिगत बाबींविषयी वर्षभराचे नियोजन करतो, त्याचप्रमाणे मार्च महिन्यात देश आणि राज्य सरकारे त्यांच्याकडील उपलब्ध वित्तीय संसाधने लक्षात घेऊन अर्थसंकल्प सादर करतात. देश आणि राज्याच्या वर्षभराच्या विकास प्रक्रियेला गतिमान करण्यासाठी हा अर्थसंकल्प उपयुक्त ठरतो.

१ मार्च रोजी राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि स्वातंत्र्यसेनानी लोकनेते वसंतदादा पाटील आणि स्वराज्यासाठी हौतात्म्य पत्करणारे छत्रपती संभाजी महाराज यांचा स्मृती दिवस येतो. ग्राहकांच्या हित संरक्षणाच्या दृष्टीने जाणीव जागृती व्हावी यासाठी १५ मार्च रोजी आंतरराष्ट्रीय ग्राहक दिन साजरा केला जातो. महिलांचा आत्मसन्मान आणि प्रतिष्ठा याविषयी जागरूकतेसाठी आणि त्यांच्या सक्षमीकरणाचे विविध पातळीवरील प्रयत्न गतिमान करण्यासाठी ८ मार्च रोजी जागतिक महिला दिन साजरा केला जातो.

१२ मार्च हा महाराष्ट्राचे भाग्यविधाते यशवंतराव चव्हाण यांचा जन्मदिवस. गेले वर्षभर त्यांची जन्मशताब्दी मोठ्या उत्साहाने आणि विविध उपक्रमांनी राज्यात आणि देशातही साजरी करण्यात आली. त्यांच्या जन्मशताब्दीची सांगता या महिन्यात होत आहे.

यशवंतराव चव्हाण यांनी सामाजिक समरसतेला सर्वोच्च प्राधान्य देऊन समाजातील उपेक्षित व दुर्बल घटकांना सर्वांगीण विकास आणि प्रगतीच्या संधी मिळाव्यात म्हणून आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात विविध धोरणे आणि योजना आखल्या आणि त्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी केली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शाहू महाराज, महात्मा जोतिबा फुले या थोर समाज सुधारकांच्या 'सामाजिक ऐक्य, बंधुभाव, शिक्षण, महिलांचे अधिकार, तळागाळातील उपेक्षितांचे उत्थान', या वैचारिक सूत्राला समर्थपणे पुढे नेण्याचे कार्य यशवंतरावजींनी केले. त्यांच्या जन्मशताब्दी सोहळ्याची सांगता होत असताना, लोकराज्यचा मार्च २०१३ चा अंक, ''सामाजिक न्याय'' विभागाच्या विविध योजना, उपक्रम, निर्णय, धोरणे यांच्यावर आधारित असणे ही यशवंतरावजींसाठी लोकराज्यची वेगळी आदरांजली ठरेल.

महाराष्ट्राच्या प्रशासनात समाजकल्याण हा विभाग सर्वाधिक जुन्या विभागांपैकी एक आहे. समाजातील उपेक्षित घटकांचा आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक असा सर्वस्पर्शी विकास व्हावा आणि या घटकांना मुख्य प्रवाहात येणे सुलभ व्हावे यासाठी स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच विविध उपाययोजना राबविल्या जात होत्या. स्वातंत्र्यानंतर या उपाययोजनांच्या अंमलबजावणीला गती प्राप्त झाली.

फुले-शाहू-आंबेडकर यांचा थोर वारसा असलेल्या महाराष्ट्रातील शासनाने आणि राज्यकर्त्यांनी गेल्या पन्नास वर्षात सामाजिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या विकासाकडे प्राधान्याने लक्ष दिले. त्यामुळे महाराष्ट्रात या उपेक्षित घटकांसाठी उत्तम शिक्षणाच्या सोयी उपलब्ध होऊ शकल्या. वसतीगृहे निर्माण झाली. देश-विदेशातील उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्तीची योजना प्रभावीपणे राबविण्यास प्रारंभ झाला. देश व राज्याच्या प्रशासकीय सेवेत या घटकातील तरुण-तरुणींना अधिकाधिक संधी मिळावी म्हणून विशेष प्रशिक्षण केंद्रे सुरू करण्यात आली. त्यामुळे अनेक तरुण-तरुणींना प्रशासनात उच्च पदावर काम करण्याची संधी मिळाली. रोजगार व स्वयंरोजगारासाठी विविध प्रकारचे अर्थसाहाय्य मिळाल्याने अनेक तरूण-तरूणी आर्थिकदृष्ट्या संपन्न होऊन त्यांच्या सामाजिक दर्जामध्ये वाढ झाली. अनुसूचित जातीच्या लोकसंख्येच्या तुलनेत अर्थसंकल्पात तरतूद करण्याचा ऐतिहासिक निर्णय महाराष्ट्रात घेण्यात आला. असा निर्णय घेणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले. सामाजिक न्याय विभागाने घरकुल योजना, दलित वस्ती विकास योजना राबवून या घटकातील नागरिकांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावण्यास साहाय्य केले आहे.

सामाजिक न्याय विभागाअंतर्गत महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ, संत रोहिदास चर्मोद्योग आणि चर्मकार महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती, भटक्या जमाती विकास महामंडळ, अपंग विकास आणि वित्त महामंडळ, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ आणि इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ या महामंडळांची स्थापना करण्यात आली. त्यांना विविध योजना राबविण्यासाठी पुरेसे भाग भांडवल उपलब्ध करून देण्यात आले. या महामंडळांनी दिलेल्या अर्थसाहाय्याचा उत्तम लाभ घेऊन जीवनात यशस्वी झालेल्या व्यक्तींच्या यशकथा इतरांसाठी प्रेरणादायी ठराव्यात. अशा काही यशकथा आम्ही या अंकात समाविष्ट केल्या आहेत.

या विभागाने अपंगांच्या कल्याणासाठी स्वतंत्र आयुक्तालयामार्फत विविध योजना राबवून या घटकांच्या सक्षमीकरणाला नवी दिशा दिली आहे. शासनातील अपंगांच्या नियुक्तीचा अनुशेष भरून काढण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

सामाजिक न्याय विभागाने सर्व जिल्ह्यांच्या मुख्यालयी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन उभारण्याचा महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेतला आहे. या भवनात सामाजिक न्याय विभागाची सर्व कार्यालये एकाच ठिकाणी येतील. त्यामुळे विविध योजनांचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या नागरिकांना वेगवेगळ्या ठिकाणी जावे लागणार नाही. हे भवन प्रत्येक जिल्ह्यातील महत्वाचे सामाजिक-सांस्कृतिक केंद्र ठरणार आहे.

लोकराज्यच्या या अंकात सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजना आणि निर्णयांचा विस्तृतपणे आढावा घेण्यात आला आहे. उपेक्षित घटकांसाठी या योजना प्रभावीपणे राबविण्याची शासनाची कटिबद्धता यातून दिसून येते.

स्व.यशवंतरावजी चव्हाण यांच्या जन्मशताब्दी सोहळ्याच्या सांगता समारोहानिमित्त त्यांच्या कार्यकर्तृत्वाचे विश्लेषण करणारे विशेष लेख आम्ही या अंकात समाविष्ट केले आहेत. हे लेख वाचकांना पुन:प्रत्ययाचा आनंद देतील.

विविध योजनांची माहिती देणारा व प्रेरणादायी ठरावा असा हा अंक लोकराज्यच्या इतर अंकांप्रमाणेच वाचकांना आवडेल याची मला खात्री आहे.


**प्रमोद त्र्यं. नलावडे**

मुख्य संपादक तथा महासंचालक

(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)

संपर्क : ०२२-२२०४१५८५/२२०२७९५६

dg@dgipr.maharashtra.gov.in



**समाजातील दुर्बल घटक, विशेषत: अनुसूचित जाती-जमाती यांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक हितांचे संरक्षण करणे आणि सर्व प्रकारच्या शोषणापासून त्यांचे संरक्षण करणे, ही शासनाची घटनात्मक जबाबदारी आहे. यासाठी विविध प्रकारच्या योजना राबवून त्यांची प्रभावी अंमलबजावणी आणि अर्थातच त्यासाठी पुरेसा निधी दिला जात आहे.महाराष्ट्रात सामाजिक न्यायाची संकल्पना खऱ्या अर्थाने प्रत्यक्षात आली आहे ती यामुळेच... सांगताहेत मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण.**

# दुर्बल घटकांच्या हितरक्षणाची घटनात्मक जबाबदारी

आपल्या देशातील जातीआधारित समाजरचनेने फार मोठे नुकसान केले आहे. सुरुवातीला व्यवसायांवर आधारित अशी ही व्यवस्था कालांतराने जन्मावर आधारित झाली आणि प्रत्येकाला जात चिकटली ती कायमचीच. या व्यवस्थेने समाजात एक उतरंड निर्माण केली, जिची फळे आपण आज भोगत आहोत. जातीप्रथा निर्मूलनाचे प्रयत्न साधूसंत, समाजसुधारकांनी केले. महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज यांनी सामाजिक समतेची चळवळ उभी केली. त्याला काही प्रमाणात यशही आले. या अनिष्ट प्रथेमुळे निर्माण झालेली सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक विषमता दूर करण्याचे प्रयत्न सरकारकडून होत आहेत.

सामाजिक समतेसाठी कार्य करणे, हे केवळ सरकारचेच नव्हे तर प्रत्येक सुजाण नागरिकाचे कर्तव्य आहे. 'लोककल्याणकारी राज्य' अशी बिरुदावली मिरवणाऱ्या सरकारचे तर ते घटनात्मक कर्तव्य आणि जबाबदारी आहे. कारण राज्यघटनेच्या कलम ४६ मधील तरतुदींनुसार, समाजातील दुर्बलेतर वर्ग, विशेषत: अनुसूचित जाती आणि जमाती यांचे विशेष काळजीपूर्वक शैक्षणिक आणि आर्थिक हितसंवर्धन करणे, सामाजिक अन्याय व सर्व प्रकारच्या शोषणापासून संरक्षण करणे, हे प्रत्येक घटक राज्याचे कर्तव्य ठरविण्यात आले आहे. यासाठी विविध प्रकारच्या योजना राबवून त्यांची प्रभावी अंमलबजावणी आणि अर्थातच त्यासाठी पुरेसा निधी दिला जात आहे. महाराष्ट्रात सामाजिक न्यायाची संकल्पना खऱ्या अर्थाने प्रत्यक्षात आली आहे ती यामुळेच. एवढेच काय सामाजिक न्यायाचा अर्थसंकल्प ही संकल्पनाही प्रत्यक्षात आली ती महाराष्ट्रातच.

आजचा सामाजिक न्याय विभाग म्हणजे पूर्वीचा समाज कल्याण विभाग. हा राज्याच्या प्रशाकीय यंत्रणेतील फार जुना विभाग आहे. ५ नोव्हेंबर १९२७ रोजी आय. सी. एस. अधिकारी श्री. ओ. एच. बी. स्टार्ट यांच्या अध्यक्षतेखाली स्टार्ट समितीची स्थापना करण्यात आली. या समितीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह एकूण १० सदस्यांचा समावेश होता. या समितीने १९३० साली आपला अहवाल शासनाला सादर केला. त्यानुसार मागास समाजासाठी १९३२ साली बॅकवर्ड क्लास वेलफेअर डिपार्टमेंटची मुंबई येथे स्थापना करण्यात आली. श्री. स्टार्ट हे खात्याचे पहिले संचालक होते.

१९४७ साली संचालक, बॅकवर्ड क्लास वेल्फेअर यांचे कार्यालय पुणे येथे स्थलांतरित करण्यात आले. तेव्हाचे उद्योग, मत्स्यव्यवसाय आणि मागासवर्गीयांचे कल्याण मंत्री, गणपती देवजी तपासे यांच्या हस्ते ९ ऑगस्ट १९४७ रोजी पुणे येथील संचालनालयाच्या इमारतीची कोनशिला बसविण्यात आली. यानंतर २३ सप्टेंबर १९५७ रोजी मुख्य निरीक्षक, प्रमाणित शाळा आणि संचालक, बॅकवर्ड क्लास वेल्फेअर या दोन कार्यालयांचे एकत्रीकरण करून समाज कल्याण विभागाची स्थापना करण्यात आली. १९८२ साली समाज कल्याणमधून आदिवासी कल्याण विभाग तर १९९१ साली महिला व बाल विकास विभाग वेगळा करण्यात आला. १९९९ मध्ये समाज कल्याण विभागातून अपंग कल्याण विभाग वेगळा करएयात आला. यानंतर २००० मध्ये समाज कल्याण विभागातून विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग वेगळा करुन सामाजिक न्याय आणि विशेष साहाय्य हा स्वतंत्र विभाग सुरु झाला. या विभागातून अन्य खाती बाजुला काढण्याचा उद्देश सर्वांना अधिक न्याय मिळणे, हाच होता.

आज या सर्व विभागांमार्फत समाजातील दुर्लक्षित घटकांच्या कल्याणकारी योजना मोठ्या प्रमाणावर राबविण्यात येतात. जनजागृतीमुळे ही विषमता नष्ट होण्यास मोठी मदत होणार आहे. यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्कार, संत रविदास पुरस्कार, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार, शाहू,फुले,आंबेडकर पारितोषिक, पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार आणि व्यसनमुक्ती पुरस्कार असे विविध पुरस्कार देऊन या क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव केला जातो. अशा कार्यकर्त्यांना पुरस्कार देण्यामागे त्यांच्या कार्याची दखल घेण्याबरोबरच इतरांनी त्यांचा आदर्श घ्यावा, हीच भावना आहे.

सामाजिक न्याय किंवा सामाजिक समता प्रस्थापित करणे, हे केवळ कायदे करुन आणि योजना आखून साध्य होणार नाही. समतेच्या मार्गावरची ती दिशादर्शक साधने आहेत. मात्र समाजातील प्रत्येकाने यामध्ये आपला वाटा उचलला पाहिजे. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता हे मानवतेचे वैश्विक मापदंड आहेत. जन्माने कोणीही लहान किंवा मोठा नसतो, मोठेपणा अगर लहानपणा ठरतो तो व्यक्तीच्या कार्यावर, चारित्र्यावर ही गोष्ट प्रत्येकाने लक्षात घेतली पाहिजे. मी यानिमित्ताने सर्वांना आवाहन करतो की पुरोगामी विचारांच्या महाराष्ट्रात समतेचे, सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेचे युग आणण्यासाठी प्रत्येकाने आपापले योगदान देण्याची प्रतिज्ञा करुया. मला खात्री आहे, फुले-शाहू-आंबेडकर या त्रयीचे स्वप्न साकारण्याच्या सरकारच्या प्रयत्नांना सर्वांचे सक्रीय सहकार्य मिळेल.

**(शब्दांकन : सतीश लळीत,**
मुख्यमंत्र्यांचे मुख्य जनसंपर्क अधिकारी)
संपर्क :९४२२४१३८००

**आजचा सामाजिक न्याय विभाग म्हणजे पूर्वीचा समाज कल्याण विभाग. हा राज्याच्या प्रशाकीय यंत्रणेतील फार जुना विभाग आहे.**

# हे राज्य सामाजिक न्यायाचे...

देशातील सर्वात आघाडीचं आणि प्रगतीशील राज्य म्हणून राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीयस्तरावर आज महाराष्ट्राचा गौरव होतो आहे. कृषी, औद्योगिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक अशा सर्वच क्षेत्रात महाराष्ट्राची प्रगती उल्लेखनीय आहे. आपलं राज्य अनेक आघाड्यांवर नेत्रदीपक कामगिरी करीत असताना आणि यशाची नवनवीन शिखरं गाठत असताना, राज्याचं हे यश सामाजिक समतेच्या मूलभूत तत्त्वावर आणि एकात्मतेच्या भक्कम पायावर आधारलेलं आहे, हे आपण लक्षात ठेवलं पाहिजे. राज्याचा उपमुख्यमंत्री आणि वित्तमंत्री या नात्याने कुठलाही निर्णय घेत असताना समाजातील मागास, दुर्बल, वंचित आणि उपेक्षित घटकांना त्यांचा न्याय्य हक्क मिळालाच पाहिजे, त्यांची कामं सर्वोच्च प्राधान्याने झाली पाहिजेत, अशी माझी भूमिका असते आणि त्यापद्धतीने मी निर्णय घेत असतो. सांगताहेत उपमुख्यमंत्री अजित पवार...

महाराष्ट्राची भूमी ही पुरोगामी आणि प्रगतशील विचारांची भूमी आहे. छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि



यांच्यासारख्या असंख्य महापुरुषांनी समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाचा विचार इथल्या मातीत रुजवण्याचं आणि वाढवण्याचं काम गेली हजारो वर्षे सातत्याने केलं आहे. आपल्या देशात पूर्वापार चालत आलेली जातीव्यवस्था ही समाजाच्या आणि देशाच्या विकासाला मारक असून जातीभेदाच्या भिंती मोडून पडल्याशिवाय आपला समाज, आपलं राज्य आणि आपला देश खऱ्या अर्थानं प्रगती करु शकणार नाही, हा विचार सर्वप्रथम या महाराष्ट्रानं देशाला दिला.

राजर्षी शाहू महाराजांनी शंभर वर्षांपूर्वी पहिल्यांदा राखीव जागांचा विचार मांडला आणि आपल्या कोल्हापूर संस्थानात त्याची अंमलबजावणीही केली. समाजातील मागास, दुर्बल, वंचित आणि उपेक्षित घटकांचा शैक्षणिक विकास झाल्याशिवाय राज्याचा सर्वांगीण विकास अशक्य आहे, हे लक्षात घेऊन शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचं केलं. कुठल्याही जाती, धर्माच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीत अडथळे येऊ नयेत म्हणून त्यांनी वसतीगृहं काढली. महात्मा ज्योतीबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी स्त्रियांना शिक्षणाची दारं खुली करून दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तर राज्यघटनेसारखी महत्वपूर्ण देणगी आपल्या देशाला दिली. समाजातील दुर्बल, वंचित आणि उपेक्षित घटकांना न्याय आणि विकासाची संधी देणाऱ्या या महापुरुषांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा पुढे नेण्याचं काम राज्यातील आघाडी शासन करीत आहे, याचा आम्हाला निश्चितच आनंद आणि अभिमान आहे.

राज्याच्या अर्थसंकल्पात अनूसुचित जाती आणि जमातींसाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात भरीव निधी राखून ठेवण्याचा निर्णय आपण घेतला आहे. त्यामुळे मागास घटकांच्या विकासाला वेग आला आहे. सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून आजमितीस वैयक्तिक आणि सामुहिक लाभाच्या सुमारे सव्वाशे योजनांची अंमलबजावणी सुरु आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्कमाफी, मोफत वसतीगृहांची सोय, उच्च व तंत्र शिक्षणासाठी प्रोत्साहन, खासगी संस्थांमध्ये तसेच परदेशी शिक्षणाची सोय, अशा अनेक माध्यमातून मागास घटकांच्या शैक्षणिक विकासाला गती देण्याचा आपला प्रयत्न आहे. मागासवर्गीय समाजाच्या आर्थिक आणि सामाजिक उन्नतीसाठी कार्य करणाऱ्या विविध महामंडळांच्या भागभांडवलात कोट्यवधी रुपयांची वाढ करण्याचा एक महत्त्वाकांक्षी निर्णय आपण घेतला आहे. यामुळे या घटकांच्या आर्थिक प्रगतीला वेग मिळणार आहे.

दादर येथील चैत्यभूमीजवळील इंदू मिलची जागा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी मिळविण्याचा आपण प्रयत्न केला. केंद्र सरकारनेही सकारात्मक भूमिका घेऊन ती जमीन स्मारकासाठी देण्याचा निर्णय घेतला. राज्यातील लोकप्रतिनिधींच्या एकजुटीमुळेच आपल्याला हे यश मिळालं आहे, हे देखील यानिमित्ताने लक्षात ठेवायला हवे.

डॉ. बाबासाहेबांचे विचार आणि कार्य सर्वांपर्यंत पोहचावं यासाठी त्यांच्या लेखन आणि भाषणाच्या खंडांचे प्रकाशन करण्याचा निर्णय आपण घेतला आहे. अनेक महत्वाच्या निर्णयांच्या बरोबरीनं चर्मोद्योग महामंडळातर्फे लेदर टेक्नॉलॉजी इन्स्टिट्यूटची स्थापना, मागासवर्गीय श्रमिक महिलांसाठी सहा विभागांमध्ये सहा महिला वसतीगृहांची निर्मिती, संत रोहिदास आणि साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या नावाने अनुक्रमे औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ आणि नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ या दोन विद्यापीठांमध्ये अध्यासन केंद्रांची सुरुवात, यूपीएससी आणि एमपीएससी परिक्षेत मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी यशस्वी व्हावे यासाठी ६ नवीन मार्गदर्शन केंद्रे सुरू करणे, एमआयडीसीमध्ये मागासवर्गीय उद्योजकांसाठी १ ते ६ गुंठ्यांचे भूखंड राखीव ठेवणे, अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत खटल्यांसाठी सहा विशेष न्यायालये स्थापन करण्यासारखे अनेक महत्वाचे निर्णय अलिकडच्या काळात आपण घेतले आहेत.

राज्याचं व्यसनमुक्तीचं धोरण जाहिर करण्याचा निर्णय आपण घेतला आहे. यामुळे राज्य व्यसनमुक्त होण्यास मदत होईल. आपली युवा पिढी निरोगी आणि सुदृढ राहण्यास मदत होईल. शासनानं घेतलेल्या गुटखाबंदीच्या निर्णयाला अधिक व्यापक स्वरुप देण्याचा प्रयत्न व्यसनमुक्ती धोरणाच्या रुपानं करण्यात येणार आहे.

**शब्दांकन : संजय देशमुख,**
**(उपमुख्यमंत्र्यांचे जनसंपर्क अधिकारी)**
संपर्क : ९८२१३६८२१०

सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून आजमितीस वैयक्तिक आणि सामुहिक लाभाच्या सुमारे सव्वाशे योजनांची अंमलबजावणी सुरु आहे.


# सक्षम आणि समर्थ



'महाराष्ट्र राज्य पुरोगामी विचारधारा घेऊन समाजातील दुर्बल घटकांच्या विकासासाठी कार्यरत आहे. महाराष्ट्राला छत्रपती शाहू महाराज, महात्मा जोतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारांचा वारसा लाभला आहे. या थोर महापुरुषांनी दाखविलेल्या समतेच्या मार्गानेच सामाजिक न्याय विभाग आणि राज्य शासन वाटचाल करीत आहे. या दुर्बल घटकाचा विकास करायचा असेल तर या समाजातील मुला-मुलींना चांगले शिक्षण मिळाले पाहिजे या दृष्टिकोनातून सामाजिक न्याय विभागामार्फत शैक्षणिक सुविधा, शैक्षणिक योजना राबविण्यात येत आहेत. सामाजिक न्याय विभागामार्फत फक्त शैक्षणिक नव्हे, तर सामाजिक आणि आर्थिक स्तर उंचविण्यासाठीही योजना राबविण्यात येत आहेत. दुर्बल घटक अधिक स्वावलंबी व अधिक स्वाभिमानी व्हावे यादृष्टीने हा प्रयत्न आहे... **सामाजिक न्यायमंत्री शिवाजीराव मोघे** यांची विशेष मुलाखत.

**प्रश्न :** मागासवर्गीय मुला-मुलींची शैक्षणिक प्रगती व्हावी त्यांनी चांगले शिक्षण घ्यावे यासाठी कोणत्या योजना राबविण्यात येत आहेत?

**उत्तर :** समाजातील मागास दुर्बल घटकाचा




विकास साधण्यासाठी शिक्षण महत्त्वाचे आहे; म्हणून या घटकातील मुला-मुलींना शिक्षण घेता यावे यासाठी मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती देण्यात येते. माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी सावित्रीबाई शिष्यवृत्ती देण्यात येते. गुणवंत विद्यार्थ्यांसाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती, त्याचप्रमाणे सफाई कामगारांच्या मुलांसाठी दोन पब्लिक स्कूल सुरू करण्यात आलेल्या आहेत. वि.जा.भ.ज.च्या विद्यार्थ्यांसाठी प्राथमिक, माध्यमिक, ज्यु. कॉलेज, आश्रमशाळा व अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांकरिता आश्रमशाळा सुरू करण्यात आल्या आहेत तसेच मोठ्या प्रमाणात शासकीय वसतिगृह सुरू आहेत.

**प्रश्न :** मॅट्रीकोत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ई-शिष्यवृत्ती शासनाने सुरू केली आहे. या शिष्यवृत्तीबद्दल माहिती द्या.


**उत्तर :** मॅट्रीकोत्तर शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना केंद्र शासन पुरस्कृत शिष्यवृत्ती देण्यात येते. हीच शिष्यवृत्ती पूर्वी संबंधित महाविद्यालयाकडे देण्यात येत असे. या पद्धतीमध्ये विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्यास विलंब होत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे ही शिष्यवृत्ती आता ऑनलाइन म्हणजे संगणकीय प्रणालीचा वापर करून शिष्यवृत्ती संबंधित विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा होते. या योजनेमुळे विद्यार्थ्यांना थेट शिष्यवृत्ती मिळाल्याने विलंब टाळला जातो. यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने आपले बँक खाते उघडणे आवश्यक आहे. झीरो बॅलन्स हे बँक खाते कुठल्याही राष्ट्रीयीकृत बँकेत उघडता येते. या योजनेमुळे शिष्यवृत्ती वाटपात एक प्रकारची पारदर्शकता आली आहे. मागच्या वर्षी जवळपास १५ लाख विद्यार्थ्यांनी आपले बँक खाते राष्ट्रीयीकृत बँकेत उघडले आहे. तसेच मागच्या वर्षाची विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती नोव्हेंबर -डिसेंबरमध्ये देण्यात आली आहे. या योजनेला केंद्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाचे पारितोषिक मिळाले आहे.

**प्रश्न :** विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिल्यामुळे त्यांचा आर्थिक भार हलका होत आहे. परंतु चांगले शिक्षण घ्यायचे असेल तर ग्रामीण, दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना तालुका, जिल्हा स्तरावर किंवा शहरामध्ये जावे लागते अशा वेळेला त्यांच्या निवासाचा प्रश्न निर्माण होतो त्यासाठी वसतिगृहाची कशा प्रकारे सोय करण्यात येते? या वसतिगृहांची सध्या काय स्थिती आहे?

**उत्तर :** ग्रामीण तसेच दुर्गम भागातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना तालुका, जिल्हा किंवा शहरामध्ये जावे लागते. या ठिकाणी त्यांच्या निवासाची सोय व्हावी म्हणून राज्य शासनाने राज्यात ठिकठिकाणी वसतिगृहे बांधली आहेत. जिल्हास्तरावर २७१ शासकीय वसतिगृहे होती. त्यामध्ये १०० नवीन वसतिगृहे सुरू करण्यात आली आहेत. वसतिगृहे सुरू करण्यासाठी जमीन उपलब्ध झाली नाही, तर भाड्याच्या जागेत वसतिगृह सुरू करण्यात येत आहे. याचप्रमाणे विभागीय स्तरावर एक हजार विद्यार्थी क्षमतेची सर्व सोयी-सुविधायुक्त वसतिगृहे बांधण्यात येत आहेत. यामध्ये ५०० मुलांसाठी व ५०० मुलींच्या राहण्याची व्यवस्था होणार आहे.

**प्रश्न :** परदेश शिष्यवृत्ती योजना काय आहे?

**उत्तर :** आज आपण पाहिले की मागास, दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे म्हणून आपण शिष्यवृत्ती, वसतिगृह यासारख्या योजना राबवितो. मागासवर्गातील होतकरू हुशार विद्यार्थी आर्थिक अडचणीमुळे उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये, त्याला परदेशात जाऊन शिक्षण घेता यावे यासाठी परदेश शिष्यवृत्ती देण्यात येते. यामध्ये परदेशातील विद्यापीठात पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षण घेता येते. विद्यार्थ्याला लागणारा सर्व शैक्षणिक खर्च




या योजनेंतर्गत देण्यात येतो. आतापर्यंत १५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. सुरुवातीला या योजनेमध्ये २५ विद्यार्थ्यांना याचा लाभ घेता येत होता. यामध्ये आम्ही वाढ करून ही संख्या दुप्पट म्हणजे ५०

**मॅट्रीकोत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी गेल्या वर्षी जवळपास १८०० कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले आहे.**




**प्रश्न :** राज्य शासनाने व्यसनमुक्ती धोरण जाहीर केले. या धोरणामागची आपली भूमिका काय आहे?

**उत्तर :** व्यसनामुळे माणसाचे व्यक्तिगत नुकसान होते. त्याचबरोबर सामाजिक स्वास्थ्य बिघडते. व्यसनामुळे सर्वांत जास्त नुकसान गरीब आणि मागास असलेल्या माणसाचे होते. यातही व्यसनाची मोठ्या प्रमाणावर घरातील पहिली शिकार महिला व मुले होतात. समाजातील व्यसनाधिनता कमी व्हावी यासाठी व्यसनमुक्ती धोरण जाहीर केले. या धोरणात दारू पिण्याचे वय २५ वर्षे इतके करण्यात आले. यावर बरीच चर्चा झाली. व्यसनमुक्ती कार्यक्रम फक्त कायदा करून होणार नाही. यासाठी आवश्यक आहे लोकसहभाग आणि जनजागृती. याचसाठी नुकतेच पुणे येथे देशातील पहिले व्यसनमुक्ती साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. दोन दिवस हे संमेलन झाले. व्यसनमुक्ती कार्यक्रम लोकचळवळ झाली पाहिजे. म्हणूनच या संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. शालेय अभ्यासक्रमात व्यसनाचे दृश्य परिणाम सांगणारे धडे घेण्यात आले आहेत. व्यसनमुक्ती कार्यक्रमासाठी अशासकीय संस्था, ग्रामपंचायत, अंगणवाडी अशा घटकांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे.

इतकी वाढविली आहे. या विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घेऊन आपली प्रगती करावी व त्यानंतर आपल्या समाजाची, राष्ट्राची सेवा करावी, आपले योगदान द्यावे हा योजनेचा उद्देश आहे.

**प्रश्न :** व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना कशाप्रकारे मदत करण्यात येते?

**उत्तर :** राज्यातील शासनमान्य खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग या वर्गातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती शासन करते; अशाप्रकारे शैक्षणिक प्रगतीसाठी काम करणारे महाराष्ट्र नंबर एकचे राज्य आहे. आपल्या राज्यात राबविण्यात येणाऱ्या योजनांचा इतर राज्ये अभ्यास करीत आहेत. सर्व कल्याणकारी योजना राबविण्यासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात अनु. जातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात तरतूद करण्यात येते. अशा प्रकारे तरतूद करणारे महाराष्ट्र प्रथम राज्य ठरले आहे.

**प्रश्न :** मागासवर्गातील तरुणांना रोजगार, स्वयंरोजगार करायचा असेल तर त्यांना कशा प्रकारे मदत करता येते?

**उत्तर :** सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारीत एकूण सहा महामंडळे कार्यरत आहेत. चर्मोद्योगाचा विकास तसेच या क्षेत्रातील कारागिरांना रोजगार मिळावा यासाठी संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, इतर मागासवर्गीयांना रोजगार करता यावा यासाठी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, अपंगाच्या कल्याणासाठी अपंग आर्थिक विकास महामंडळ, मातंग समाजासाठी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ, अनुसूचित जातीसाठी महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ, विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी वसंतराव नाईक वित्त आणि विकास महामंडळ कार्यरत आहेत. या महामंडळांमार्फत संबंधित घटकाला स्वयंरोजगार करण्यासाठी कर्जपुरवठा करण्यात येतो. या महामंडळांना त्यांचे काम अधिक चांगल्याप्रकारे करता यावे यासाठी या महामंडळांचे भागभांडवल वाढविण्यासाठी या महामंडळांना मागच्या वर्षी रु. ३३० कोटी एवढा निधी देण्यात आला आहे. आर्थिकदृष्ट्या ही महामंडळे सक्षम व्हावी यासाठी महामंडळामार्फत देण्यात आलेले एकूण ४२१.१० कोटी थकीत कर्ज व्याजासह माफ करण्यात आले आहे. महामंडळामार्फत थेट कर्ज वाटपात पारदर्शकता यावी यासाठी पात्र कर्जदारांना सोडत काढून लॉटरी पद्धतीने कर्जवाटप करण्याची पद्धत सुरू केली आहे. कर्ज घेण्यासाठी लागणारी उत्पन्न मर्यादा १ लाख इतकी वाढविण्यात आली आहे. तरुणांना स्वत: पायावर उभे राहण्यासाठी, त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

**प्रश्न :** अनुसूचित जाती/ जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत राज्यात कशा प्रकारे कार्यवाही होत आहे.

**उत्तर :** अनुसूचित जाती/ जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत राज्यात योग्यप्रकारे कार्यवाही सुरू आहे. नुकतेच राज्याच्या दौऱ्यावर केंद्रीय अनुसूचित जाती आयोगाचे सदस्य आले होते. त्यांनी राज्यात जनसुनावणी घेतली. राज्यातील कार्यवाही संदर्भीय वरिष्ठ शासकीय अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन कार्यवाही जाणून घेतली. या कायद्यांतर्गत खटल्याची प्रकरणे जलदगतीने व्हावीत यासाठी त्यांनी सूचना दिल्या. त्याचबरोबर राज्यात अनुसूचित जातीच्या कल्याणासाठी सुरू असलेल्या योजना उत्तम

**राज्याच्या अर्थसंकल्पात अनुसूचित जातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात तरतूद करण्यात येते. अशी तरतूद करणारे महाराष्ट्र पहिले राज्य ठरले आहे.**

प्रकारे सुरू असल्याने समाधान व्यक्त केले. या कायद्यांतर्गत दावे निकाली लागून दोषी व्यक्तींवर कारवाई व्हावी यासाठी प्रत्येक विभागीय स्तरावर या खटल्यांसाठी सहा नवीन न्यायालये लवकरच सुरू होणार आहेत. या न्यायालयासाठी आवश्यक असलेल्या पदांना मंजुरी देण्यात आली आहे. या न्यायालयात खटले सुरू झाल्यास खटले निकाली लागण्याचे प्रमाण वाढेल. दाव्यांची झीरो पेंन्डसी राहील. पर्यायाने अत्याचाराला आळा बसेल असा मला विश्वास वाटतो.

**प्रश्न :** व्यसनमुक्तीसाठी कार्य करणाऱ्या व्यक्ती/ संस्थांना पुरस्कार देण्यासाठी काही निकष आहेत का?

**उत्तर :** व्यसनमुक्ती कार्यक्रमात सक्रिय योगदान देणाऱ्या व्यक्ती व संस्था यांना पुरस्कार देण्यात येतात. यामध्ये वयाची अट नाही. शासकीय अधिकारी/ कर्मचारी, लोकप्रतिनिधी, प्रसारमाध्यमातील प्रतिनिधी ज्यांनी व्यसनमुक्तीसाठी काम केले असेल त्याला पारितोषिक देण्यात येते. व्यसनमुक्ती क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींचा राष्ट्रीय पातळीवर सन्मान व्हावा यासाठी राष्ट्रपती, पंतप्रधान यांना विनंती केली आहे.

**प्रश्न :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे संवर्धन व्हावे यासाठी काही उपाययोजना केली आहे का?

**उत्तर :** विदर्भात चिंचोली गाव आहे तेथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे साहित्य व्यवस्थित ठेवले आहे. ते अधिक चांगल्या परिस्थितीत ठेवण्यासाठी निधी देण्यात आला आहे. नागपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावे कनव्हेंक्शन सेंटरसाठीसुद्धा काम करण्यात येत आहे, त्यासाठी २२ कोटी रुपये निधी दिला आहे. दीक्षा भूमी येथे ई-लायब्ररी सुरू करण्यात येत आहे. यात्रा भवनसाठीही प्रयत्न सुरू आहेत.

**प्रश्न :** लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे स्मारक व्हावे अशी मागणी होत आहे. यासाठी शासनाची काय कार्यवाही होत आहे?

**उत्तर :** मुंबईत लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे स्मारक होण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. परंतु, येथे जमीन मिळविण्याबाबत अडचण होत आहे. जेवढी जमीन उपलब्ध होईल त्याप्रमाणे अण्णा भाऊ साठेंचे स्मारक करण्यात येईल. नागपूर येथील एक ट्रस्ट पुढे आला होता त्यांना सरकारी जमीन उपलब्ध करून दिली तसेच निधीही दिला. मुंबईतील जिजामाता उद्यानात नाट्यगृह उभारण्याचे काम सुरू आहे.

**प्रश्न :** मागासवर्गीय विद्यार्थ्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्याची काय योजना आहे?

**उत्तर :** स्पर्धा परीक्षेसाठी ग्रामीण भागातील मागासवर्गीय विद्यार्थी पुढे येत नाहीत. १४ जिल्ह्यांत मॅट्रीक पास झालेल्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. तसेच विविध स्पर्धा परीक्षांचे या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. यामुळे हे विद्यार्थी स्पर्धा परीक्षेत यशस्वी होतील. यशदामध्ये प्रशिक्षण देण्यात येते तेथे ५० विद्यार्थ्यांसाठी आम्ही पैसे देतो. यूपीएससी परीक्षेचे प्रशिक्षण देण्यात येते; यातील २० विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. याशिवाय आयआयटी परीक्षेसाठी पेस संस्थेत प्रशिक्षण देण्यात येते.

**प्रश्न :** सामाजिक न्याय विभागामार्फत चालविलेल्या वसतिगृह व आश्रमशाळेत विद्यार्थ्यांना महागाईमुळे अडसर होऊ नये यासाठी परिपोषण आहारासाठी काय नियोजन करण्यात येते?

**उत्तर :** परिपोषणासाठी विद्यार्थ्यांना निधी देण्यात येतो. पूर्वी ६३० रुपये देण्यात येत होते; त्यात वाढ करून आता ९०० रुपये प्रत्येक विद्यार्थ्याला १ जानेवारी २०१२ पासून देण्यात येतात. विभागीय स्तरावरील शासकीय वसतिगृहातील मुला-मुलींसाठी निर्वाह भत्ता रु. २२५ वरून ८०० रुपये, जिल्हास्तरावर ५० रुपयांवरून ६०० रुपये, तालुका स्तरावर ५० वरून ५०० रुपये अशी निर्वाह भत्त्यात प्रतिमहा वाढ करण्यात आली. मुलींसाठी यामध्ये अतिरिक्त १०० रुपये देण्यात येत आहेत.

**प्रश्न :** भटका विमुक्त समाज नेहमी स्थलांतर करतो. यांच्यासाठी काय योजना आहेत?

**उत्तर :** भटक्या विमुक्त समाजाची लोकसंख्या जवळपास १ कोटीच्या आसपास आहे. हा

**प्रश्न :** सामाजिक न्याय विभागामार्फत घरकुल योजना राबविण्यात येते याविषयी काय सांगाल?

**उत्तर :** प्रत्येक माणसाला घर मिळाले पाहिजे. आपले घर असल्याने वेगळे समाधान मिळते. घर नसलेल्या दारिद्र्यरेषेखालील प्रत्येकाला घर देण्याचा निर्णय झाला आहे. दोन वर्षांत १ लाखापेक्षा जास्त घरे बांधून पूर्ण झाली आहेत. पुढील काळात अधिक घरे बांधली जातील. पहिल्या टप्प्याच्या कार्यक्रमात सातारा येथे मुख्यमंत्री यांच्या हस्ते घरकुलांचे वाटप करण्यात आले आहे. या योजनेला **'रमाई आवास योजना'** हे नाव दिले आहे.



अपंगांना स्वत:च्या पायावर उभे राहावे यासाठी अपंग कल्याण विकास महामंडळामार्फत १ लाखाचे कर्ज दिले जाते. त्यामध्ये ३० % सबसिडीचा समावेश आहे.

समाज लहान वस्त्यांमध्ये राहतो. या समाजाच्या वस्त्यांनासुद्धा तांडा वस्तीप्रमाणे लाभ देण्यात येणार आहे. जे भटक्या विमुक्त जातीचे लोक पालामध्ये राहतात त्यांना कायमस्वरूपी २६९ चौ. फुटांचे घर बांधून देण्यात येते. तसेच त्यांना पाच गुंठे जागा फळबाग तसेच जोडधंदा करू शकेल यासाठी देण्याची नवीन योजना सुरू करण्यात येणार आहे. या योजनेला स्व. यशवंतराव चव्हाण यांचे नाव देण्यात येणार आहे. शिक्षणाच्या अधिकारानुसार या गरीब बांधवांना शिक्षणाचा लाभ मिळणार आहे.

**प्रश्न :** जात पडताळणी पद्धत सोपी व्हावी यासाठी काय करण्यात येते?

**उत्तर :** जात पडताळणी कामाची व्याप्ती खूप मोठी आहे. विद्यार्थी, राजकीय निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना तसेच नोकरीसाठी उमेदवारांना जात पडताळणी करून घ्यावी लागते. जातीच्या आधारावर असलेले शैक्षणिक, नोकरीविषयक तसेच राजकीय लाभ संबंधित व्यक्तीला मिळावेत यासाठी जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यात येते. पूर्वी जात प्रमाणपत्र पडताळणीच्या १५ समित्या होत्या. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी आता ३५ जिल्ह्यांत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जात प्रमाणपत्र पडताळणी सुरू केल्या आहेत. ज्यांच्या जात प्रमाणपत्र पडताळणीत कोणतीही शंका नाही अशा प्रकरणांत जात प्रमाणपत्राची पडताळणी दोन महिन्यांत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. एखाद्या व्यक्तीला जात प्रमाणपत्र चुकीचे गेले तर ती व्यक्ती सर्व स्तरावर मागासवर्गीयांचा हक्क घेते. हे बरोबर नाही म्हणून जातप्रमाणपत्र चुकीचे होता कामा नये यासाठी दक्षता घेण्यात येते. पात्र असलेल्या उमेदवारांना विहित कालावधीत लवकरात लवकर प्रमाणपत्र देण्यात यावे अशा सूचना देण्यात आल्या आहेत. जात प्रमाणपत्र पडताळणी ऑनलाइन करण्यात येणार आहे.

**प्रश्न :** जमीन वाटप करण्याची काय योजना आहे. याबाबत सद्य:स्थिती काय आहे?

**उत्तर :** कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्वाभिमान व सबळीकरण या योजनेनुसार अनुसूचित जातीतील भूमिहीन शेतमजुरांना जमीन देण्याची योजना आहे. या योजनेत अनेकांना जमीन देण्यात आली आहे. परंतु आता जमीन मिळत नसल्याने अडचणी येतात.



**प्रश्न :** अपंगांच्या कल्याणासाठी काय योजना आहेत?

**उत्तर :** अपंगांच्या कल्याणासाठी महाराष्ट्र शासन चांगले काम करीत आहे. अपंगांच्या कल्याणासाठी १०० टक्के अनुदान शिक्षण संस्थांना देण्यात येते. ६३७ विशेष शाळा सुरू आहेत. अशासकीय संस्थांमार्फतही अशा प्रकारच्या शाळा चालविण्यात येत आहेत. अपंगांना स्वत:च्या पायावर उभे राहावे यासाठी अपंग कल्याण विकास महामंडळामार्फत पूर्वी २५ हजार कर्ज मिळत होते ते आम्ही १ लाख इतके केले आहे. या कर्जामध्ये रुपये ३० % इतकी सबसिडी देण्यात येते. भरतीसाठी विशेष कार्यक्रम राबविला जातो. पूर्वी कर्जासाठी दोन नोकरदारांची हमीपत्रे लागत होती. त्यामुळे कर्ज घेताना अपंगांना अडचणी येत होत्या ही बाब लक्षात घेऊन कुठल्याही दोन साक्षीदारांच्या हमीपत्रावर कर्ज मंजूर करण्यात येते. अपंगांच्या कल्याणासाठी काम करणाऱ्या व्यक्ती / संस्थांना दरवर्षी नियमित पारितोषिक देण्यात येत आहे. अपंगांचा नोकरीमध्ये असलेला अनुशेष भरून काढण्यासाठी विशेष मोहीम राबवून जवळपास १० हजार पदे भरली आहेत.

म्हणून आता पात्र व्यक्तींनी जमीन पसंत करून रेडीरेकनर विचारात घेऊन खाजगी जमीन प्रति एकर रु. ३ लाख इतक्या दराने विकत घेऊन देण्यात येते. तसेच शेतीसाठी पॉवर टिलर देण्यात येत होता. यामध्ये बदल करून शासनाने मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने देण्याचा निर्णय घेतला असून तो व्यक्तीऐवजी स्वयंसहाय्यता बचत गटाला देण्यात येणार आहे. विमुक्त भटक्या जमातीलासुद्धा याच धर्तीवर जमीन देण्याचा मानस आहे.

**प्रश्न :** दलित वस्ती सुधारणा योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी कोणते निर्णय घेतले आहेत?

**उत्तर :** दलित वस्ती योजनेअंतर्गत दलित वस्त्यांमध्ये अंतर्गत रस्ते, पिण्याचे पाणी, वीज अशा मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. या योजनेअंतर्गत लोकसंख्येच्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात येतो. ५० पेक्षा कमी असलेल्या लोकसंख्येच्या वस्तीसाठी अशा प्रकारची तरतूद होत नसल्याचे निर्दशनास आले असल्याने १० ते २५ इतकी लोकसंख्या असलेल्या वस्तीसाठी २ लाख, २६ ते ५० लोकसंख्या असलेल्या वस्तीला ५ लाख, ५१ ते १०० साठी ८ लाख, १०१ ते १५० लोकसंख्या असलेल्या वस्तीला १२ लाख, १५१ ते ३०० पर्यंतच्या लोकसंख्येसाठी १५ लाख आणि ३०१ च्या पुढील लोकसंख्या असलेल्या वस्तीकरिता २० लाख रुपये इतकी तरतूद करण्यात आली आहे. या योजनेचे नाव आता अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे असे करण्यात आले आहे. मागासवर्गीय व्यक्तींच्या कल्याणासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींना डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्कार देण्यात येतो. आता या पुरस्काराचे नाव बदलून त्याचे नाव डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार असे करण्यात आले आहे.

**प्रश्न :** यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना काय आहे?

**उत्तर :** विमुक्त जाती व भटक्या जमाती या घटकास मूळ प्रवाहात आणणे गरजेचे आहे. त्यांचे राहणीमान व जीवनमान उंचवण्यासाठी व त्यांना स्थिरता येण्यासाठी शासनाने यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये ग्रामपंचायत, पंचायत समिती क्षेत्रातील विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या द्रारिद्र्यरेषेखालील व्यक्तींना जमीन उपलब्ध करून त्यावर २६९ चौ. फू. क्षेत्रफळाची पक्की घरे बांधून देण्यात येणार आहेत. या वस्त्यांमधील लाभार्थ्यांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

**प्रश्न :** सामाजिक न्याय विभागामार्फत विविध कल्याणकारी योजनांसाठी निधीची तरतूद कशी करण्यात येते?

**उत्तर :** राज्याच्या अर्थसंकल्पात अनुसूचित जातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात तरतूद करण्यात येते. अशा प्रकारे तरतूद करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे.

**(शब्दांकन : विष्णू काकडे)**

**संपर्क : ९३२२५१५३१८** ❑ ❑

**यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींना जमीन उपलब्ध करून त्यावर २६९ चौ.फू. क्षेत्रफळाची पक्की घरे बांधून देण्यात येतील.**

# समाजोन्नती



**महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर समाजातील उपेक्षित घटकांसाठी शासनाच्या वतीने विविध योजना आखण्यात आल्या. याचा मूळ उद्देश समाजातील वंचित, उपेक्षित, मागास घटक समाजाच्या मुख्य प्रवाहात यावा असा होता. या घटकासाठी सामाजिक न्याय विभाग हा विविध कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबवित आहे. दुर्लक्षित, उपेक्षित घटकाला विशेष न्याय देण्याच्या शासनाच्या प्रयत्नाला यशही मिळते आहे. सांगताहेत सामाजिक न्याय राज्यमंत्री सचिन अहिर...**

समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व मागास घटकांपर्यंत शासनाच्या योजना पोहचवून त्यांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने सामाजिक न्याय विभाग काम करीत आहे. शासनाच्या बहुविध योजनांमुळे या घटकांना शिक्षणाची व रोजगाराची संधी उपलब्ध होत आहे. लोकाभिमुख योजनांमुळे या घटकांचा आर्थिक स्तर उंचावण्यासही मदत होत आहे. राज्याच्या सामाजिक विकासात सामाजिक न्याय विभागाचे योगदान मोठे आहे.

समाजातील उपेक्षित, दुर्बल घटकांचा सर्वांगीण विकास करायचा असेल तर या घटकांमध्ये तळागाळापर्यंत शिक्षणाचा प्रसार होणे अत्यंत आवश्यक आहे. शासनाने ही निकड ओळखून या घटकाच्या सामाजिक, आर्थिक उन्नतीसाठी योजना राबविण्याबरोबरच शैक्षणिक योजनांना विशेष प्राधान्य दिले आहे.

**ई-स्कॉलरशिप**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मागास आणि वंचित घटकांना शिका, संघटित व्हा, असा विचार दिला होता. शिक्षणाशिवाय हा घटक मूळ प्रवाहात येणार नाही याची त्यांना जाणीव होती. डॉ. आंबेडकरांच्या या विचारांना शासनानेही आदर्श मानले व या घटकांसाठी विविध शैक्षणिक योजना आखल्या. त्यापैकी ही योजना अत्यंत उपयुक्त ठरते आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी केंद्र शासनाची मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना आहे. यामध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक फीबरोबरच परीक्षा फी, निर्वाह भत्ता या आवश्यक बाबींचाही समावेश आहे. ई-स्कॉलरशिप योजनेमुळे शिष्यवृत्तीची रक्कम थेट मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात तर परीक्षा फी, शिक्षण फी व इतर आनुषंगिक फी संबंधित महाविद्यालयाच्या खात्यात जमा होणार आहे. यामुळे शिष्यवृत्ती मिळण्यातील विलंब दूर होण्यास मदत झाली आहे. या योजनेंतर्गत १८०० कोटी रुपये विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात आले आहेत.

**परदेश शिष्यवृत्ती**

परदेश शिष्यवृत्ती ही योजना विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयोगी ठरते आहे. ज्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडे प्रचंड गुणवत्ता व इच्छाशक्ती आहे, मात्र आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना परदेशात उच्च शिक्षण घेता येत नाही, असे विद्यार्थी या योजनेमुळे परदेशातही उच्च शिक्षण घेत आहेत. अनेक गुणवान विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणाची संधी मिळते आहे.



अनुसूचित जाती / नवबौद्ध युवकांमध्ये सध्या उच्च शिक्षण घेण्याचे प्रमाण वाढले आहे. स्वाभाविकपणे उच्च शैक्षणिक संस्थांची संख्याही त्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे सध्याच्या शासकीय वसतिगृहांची संख्या अपुरी पडते आहे. ही बाब विचारात घेता विभागीय स्तरावर १ हजार विद्यार्थी क्षमतेची म्हणजेच राज्यातील प्रत्येक विभागात एक याप्रमाणे सात वसतिगृहे बांधण्याचा, तसेच जिल्हा/तालुकास्तरावर एकूण १०० वसतिगृहे सुरू करण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय घेण्यात आला. यामुळे मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृहाच्या प्रवेशापासून वंचित राहणार नाही.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमध्ये प्रवेश मिळावा; याबरोबरच विद्यार्थीदशेतच सैन्य दलात भरती होण्याचे आकर्षण निर्माण व्हावे यासाठी सैनिक शाळेतील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देण्याची योजना राबविण्यात येत आहे. अनुसूचित जाती व नवबौद्ध युवकांना सैन्य व पोलीस भरतीची संधी उपलब्ध करून देण्याकरिता भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्रेही सुरू करण्यात आली आहेत.

सामाजिक न्याय विभागांतर्गत मागासवर्गीय आणि दुर्बल घटकांच्या आर्थिक उन्नतीसाठी विविध आर्थिक विकास महामंडळे कार्यरत आहेत. या मंडळामार्फत बीज भांडवल योजना, थेट कर्ज योजना इ. आर्थिक विकासाच्या योजना राबविण्यात येतात. या माध्यमातून दुर्बल घटकांचे आर्थिकदृष्ट्या सक्षमीकरण गतीने करण्याबरोबरच युवकांमध्ये स्वयंरोजगार निर्माण करण्यास मदत होते आहे. जिल्ह्यांच्या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आजपर्यंत १९ जिल्ह्यांच्या ठिकाणी सामाजिक न्याय भवनाच्या सुसज्ज वास्तू उभारल्या गेल्या आहेत.

**(शब्दांकन : शांताराम शेरवाडे)**

**संपर्क : ९८६९०७००५३**

ज्येष्ठ नागरिकांचा वृद्धापकाळ चांगल्या प्रकारे व्यतीत व्हावा, यासाठी ज्येष्ठ नागरिक धोरण आणण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे.



# कर्तृत्व-नेतृत्व आणि वक्तृत्व

स्वतंत्र महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांना महाराष्ट्राच्या विकासाची तळमळ होती. विकासासाठी वेगवेगळ्या क्षेत्रातील तज्ज्ञ, उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते यांना त्यांनी विश्वासात घेतले. एवढेच नव्हे, तर विरोधी राजकीय पक्षांनाही त्यांनी सोबत घेतले. महाराष्ट्राच्या कृषी व औद्योगिक क्षेत्राचा पाया त्यांनी १९६० साली घातला. शेती आणि उद्योग परस्परांना पूरक ठरले पाहिजेत ही त्यांची यामागे दृष्टी होती. धनंजयराव गाडगीळांसारख्या अर्थतज्ज्ञाला सोबत घेऊन ग्रामीण क्षेत्रात सहकारी तत्त्वावर विकासाचा आराखडा तयार केला. ग्रामीण क्षेत्राला आर्थिकदृष्ट्या ऊर्जितावस्था प्राप्त करून दिली. उद्योगाबद्दलची नवी धोरणे, नव्या गोष्टी तज्ज्ञ, विद्वान लोकांशी चर्चा करून ते ठरवीत असत. ते स्वत: शेतकरी कुटुंबातून आले असल्याने, शेतकऱ्यांच्या अडचणी, त्यांना होणारा त्रास या गोष्टींची त्यांना जाणीव होती.

**प्रा. नवनीत देशमुख**

देवराष्ट्रात जन्म घेऊन यशवंतरावांना दैवीगुण प्राप्त झाले होते. सातवाहनाच्या राज्यानंतर महाराष्ट्रात जी अनेक लहानमोठी राज्ये उदयास आली त्यापैकी एक देवराष्ट्र होय. या राज्याची राजधानी कौडिण्यपूर ज्याला आज कुंडल या नावाने ओळखतात. देवराष्ट्राच्या राजाचे नाव कुबेर. कुबेरेश्वराचे मंदिरही येथे आहे. कुबेराने यशवंतरावांवर मुक्त हस्ताने उधळण केली. ही उधळण माणुसकीच्या विविध गुणांची होती. त्यामुळेच यशवंतरावांमध्ये असलेले गुण हे कायमस्वरूपी राहिलेले आणि उत्तरोत्तर वृद्धिंगत झालेले



दिसतात.

तसं पाहिलं तर एका सामान्य शेतकऱ्याच्या कुटुंबात यशवंतरावांचा जन्म झाला. 'कृष्णाकाठ' या आत्मचरित्रात कौटुंबिक पार्श्वभूमी सांगताना ते म्हणतात, माझ्या आजोबांना दोन मुलगे होते. एक रामचंद्र चव्हाण व दुसरे बळवंतराव चव्हाण. थोरले चार पुस्तके शिकले असल्यामुळे शेती सोडून बेलीफ म्हणून सरकारी नोकरी करू लागले. पुढे काही दिवसांनी शेतीवरती भागत नाही, म्हणून त्यांनी आपल्या धाकट्या भावासाठी म्हणजे माझ्या वडिलांसाठी खटपट केली आणि त्यांनाही बेलिफाची नोकरी मिळवून दिली. सामान्य छोट्या शेतकऱ्याच्या वाट्याला येणाऱ्या ज्या गोष्टी असतात त्या सर्व आमच्याही वाट्याला आल्या होत्या, असे यशवंतराव सांगतात.

पिढीजात खूप ऐश्वर्य, समृद्धी यशवंतरावांच्या वाट्याला नव्हती. म्हणूनच यशवंतराव घडत गेले. यशवंतरावांची जडणघडण ही संघर्षगाथाच होय. शालेय जीवनापासूनच यशवंतराव स्वातंत्र्य चळवळीशी जोडले गेले. वयाच्या सोळाव्या वर्षी अठरा महिन्यांचा तुरुंगवास भोगला. तुरुंगातला प्रत्येक क्षण वाचनासाठी खर्च करीत राहिले. हे वाचनही विविधांगी.. कालिदास, शेक्सपियर, महात्मा गांधी, मार्क्स लेनिन यांची मिळतील तेवढी पुस्तके अधाशासारखी वाचून काढली. वाचनाचे संस्कार फार मोठे असतात. विचारा आचारात प्रगल्भता आणणारे असतात. वाचन ही ज्ञानार्जनाची प्रक्रिया आहे. खरा माणूस इथे घडतो. देवराष्ट्र-कराडसारख्या गावातून निघालेले यशवंतराव थेट दिल्लीत पोहोचतात. पंडित जवाहरलाल नेहरूंच्या विश्वासातले बनतात. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, देशाचे संरक्षणमंत्री, उपपंतप्रधान यांसारखी सर्वोच्च पदे यशवंतरावांच्या पायाशी लोळण घेतात ही बाब मात्र थक्क करणारी आहे. पदाचा मोह यशवंतरावांना कधीच नव्हता. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या आग्रहाने त्यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद सोडून दिल्लीचे संरक्षणमंत्र्याचे पद स्वीकारले. स्वातंत्र्यानंतरचे पहिले आक्रमण चीनने भारतावर केले. दिल्लीला जाण्याअगोदर महाराष्ट्राच्या जनतेला त्यांनी स्पष्ट सांगितले, ''संरक्षणमंत्री म्हणून मला पद मिळते आहे म्हणून मी जातो आहे अशातला भाग नाही. भारत देश आज पुन्हा संकटात आहे. एक सैनिक म्हणून या भारतमातेची सेवा करायला मी निघालो आहे. हिमालयाच्या संरक्षणासाठी सह्याद्री जात आहे.''

स्वतंत्र महाराष्ट्र राज्याचे ते मुख्यमंत्री झाले तेव्हा त्यांच्या मनात महाराष्ट्राच्या विकासाचीच तळमळ होती. विकासासाठी वेगवेगळ्या क्षेत्रातील तज्ज्ञ, उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते यांना त्यांनी विश्वासात घेतले. एवढेच नव्हे, तर विरोधी राजकीय पक्षांनाही त्यांनी सोबत घेतले. महाराष्ट्राच्या कृषी व औद्योगिक क्षेत्राचा पाया त्यांनी १९६० साली घातला. शेती आणि उद्योग परस्परांना पूरक ठरले पाहिजेत ही त्यांची यामागे दृष्टी होती. धनंजयराव गाडगीळांसारख्या अर्थतज्ज्ञाला सोबत घेऊन ग्रामीण क्षेत्रात सहकारी तत्त्वावर विकासाचा आराखडा तयार केला. ग्रामीण क्षेत्राला आर्थिकदृष्ट्या ऊर्जितावस्था प्राप्त करून दिली. उद्योगाबद्दलची नवी धोरणे, नव्या गोष्टी तज्ज्ञ, विद्वान लोकांशी चर्चा करून ते ठरवीत असत. ते स्वत: शेतकरी कुटुंबातून आले असल्याने, शेतकऱ्यांच्या अडचणी, त्यांना होणारा त्रास या गोष्टींची त्यांना जाणीव होती. ग्रामीण क्षेत्राच्या विकासासाठी नवी धरणे तयार होत होती. एखाद्या वेळी एखादे गावच्या गाव धरणासाठी

**नेता आणि नेतृत्व कसे असावे याचा आदर्श वस्तुपाठ म्हणजे यशवंतराव चव्हाण.**

उठवावे लागे. पंढरपूरच्या परिसरात धरणाचे काम सुरू होते. हजारो शेतकऱ्यांचा यासाठी विरोध होत होता. यशवंतरावांची व्याख्यानं या परिसरात सुरू होती. अशाच एका जाहीर सभेत शेतकऱ्यांनी काळे झेंडे दाखवून धरणाच्या कामाला विरोध दर्शवला. त्यावेळी यशवंतराव म्हणाले, ''या धरणामुळे तुम्हाला गाव सोडावे लागणार आहे. ज्या गावावर आपल्या पिढ्यान्‌पिढ्या प्रेमाच्या निष्ठा एकवटल्या आहेत, त्या गावाला सोडून जाताना तुम्हाला काय वाटत असेल, याची मला कल्पना आहे. पण त्याच वेळी एक लक्षात ठेवा, या धरणामुळे पंढरपूरचा विठोबा तुमच्या शेतात पाण्याच्या रूपानं तुम्हाला भेटायला येणार आहे.''

निषेधाचे काळे झेंडे दाखवायला आलेल्या शेतकऱ्यांनी झेंडे फेकून दिले. आणि प्रचंड टाळ्यांनी परिसर दुमदुमून गेला. विरोध करणाऱ्यांनाही आपलंसं करून घेण्याची अजब किमया यशवंतरावांमधे होती. यशवंतरावांसारखा मनसंपन्न माणूस होणे नाही. महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाच्या दिशा स्पष्ट करताना ते आपल्या भाषणात सांगतात, ''अगोदरच्या योजनांत हाती घेण्यात आलेल्या काही मोठ्या प्रकल्पांचे फळ आपल्याला तिसऱ्या योजनेच्या काळात मिळेल. पोलादाचा धंदा, वीज आणि वाहतूक यांचा आपण जो विकास करू शकलो त्यामुळे औद्योगिकीकरणाचा वेग वाढविण्याची गुरुकिल्ली आपल्या हाती आली आहे. आपण जी साधनसामुग्री निर्माण केली आहे तिचा पूर्ण व काटकसरीने उपयोग करून घेणे आणि त्याचबरोबर उत्पादनाची जी ताकद आज आपल्या अंगी आली आहे, ती रिकामी पडून वाया जाऊ नये म्हणून ही खबरदारी घेणे या गोष्टींना फार महत्त्व आहे. यासाठी कामातील कसब व तंत्र ज्यांच्याजवळ आहे अशा माणसांचा आपणास योग्यप्रकारे उपयोग करून घेता आला पाहिजे. त्याचप्रमाणे लोकांमध्ये आपण कामाची निकड व जबाबदारी यांची जाणीव निर्माण केली पाहिजे.''

उद्योग व्यवसायात काम करणाऱ्या कामागारांविषयी यशवंतरावांना एक वेगळा जिव्हाळा होता. कामगार हा पहिल्यांदा एक माणूस आहे याचे भान ठेवले पाहिजे यासंदर्भात यशवंतराव सांगतात, ''मोठ्या



एका निवांतक्षणी वसंतराव आणि यशवंतराव

प्रमाणावर आर्थिक नियोजन करीत असताना औद्योगिक उत्पादनातील सर्वांत महत्त्वाचा जो मानवी घटक त्याकडे आपल्याला केव्हाही दुर्लक्ष करता येणार नाही. मानवी घटक म्हणजे अर्थातच कामगार आपल्या या प्रयत्नात जर आपल्याला यश मिळवायचे असेल तर कामगारांना योग्य तो न्याय आपण दिलाच पाहिजे. उद्योगधंद्याच्या कारभारात कामगारांना

> नवमहाराष्ट्राची निर्मिती करताना सामाजिक व आर्थिकदृष्ट्या जे दुर्बल आहेत त्यांना साहाय्य करण्याचे धोरण तर आखलेच त्याबरोबरच दलित, भटक्या जमाती यांनाही नवमहाराष्ट्राच्या निर्मिती प्रवाहात सोबत घेतले. शेतकरी, कष्टकरी-श्रमिक यांच्याही स्वप्नांचे दीप प्रज्वलित केले. महाराष्ट्राला एकजिनसी, एक संघ घडविण्यासाठी विविध धोरणे आखली आणि अंमलात आणली.

भागीदार करून घ्यावे या कल्पनेने आता मूळ धरले असून उत्पादन क्षमता वाढविण्याची नवी प्रेरणा तिने कामगारांमध्ये निर्माण केली आहे.''

शिक्षण हे आर्थिक विकासाचे साधन आहे, असे यशवंतरावांचे स्पष्ट मत होते. महाबळेश्वर येथे ७ ऑक्टोबर १९६० रोजी काँग्रेस कार्यकर्त्यांच्या शिबिरात ते म्हणाले, ''शिक्षणाकडे निव्वळ सामाजिक गरजेच्या दृष्टीने मी पाहत नाही. माझ्या मते शिक्षण हे आर्थिक विकासाचे एक मूलभूत साधन आहे. खेड्यात बिजली नेऊन पोहोचविल्याशिवाय ज्याप्रमाणे शेतीचा विकास होणार नाही,




त्याचप्रमाणे आमचा नापीक पडलेला मनुष्यबळाचा हा जो मोठा थोरला साधन संपत्तीचा भाग आहे त्यात शिक्षणाची बिजली नेल्याशिवाय नवसामर्थ्य निर्माण होणार नाही. शिक्षणाकडे पाहण्याचा माझा स्वत:चा हा असा दृष्टिकोन आहे. महाराष्ट्राची औद्योगिक प्रगती करण्याचा कार्यक्रम जितका महत्त्वाचा आहे, शेतीचे औद्योगिकीकरण करण्याचा कार्यक्रम जितका महत्त्वाचा आहे, तितकाच शिक्षणाचा हा कार्यक्रम महाराष्ट्रात महत्त्वाचा आहे. मग, हे शिक्षण कोणत्या प्रकारचे असावे हा विचार ओघानेच येतो. हे शिक्षण म्हणजे निव्वळ आपल्या शाळा उघडल्या आहेत आणि मुले शाळेत जात आहेत, परंतु मुले शाळेत काय करतात हे आपल्याला माहीत नाही, अशी परिस्थिती नव्हे. तर या देशातील किंवा या राज्यातील समाजोपयोगी साधनांचा वापर करण्याइतकी शक्ती मुलांमध्ये येईल अशा तऱ्हेने मुलगा शिक्षण घेतो की नाही हे पाहण्याचे काम आता तुम्हा आम्हाला केले पाहिजे. मी या प्रश्नाला फक्त येथे स्पर्श करतो आणि तो सोडून देतो. परंतु शिक्षणाचा प्रश्न हा महाराष्ट्राच्या आताच्या संदर्भात अत्यंत क्रांतिकारक प्रश्न आहे असे मी मानतो.''

शिक्षणक्षेत्राकडे बघण्याची यशवंतरावांची दृष्टी ही किती व्यापक आणि अर्थपूर्ण होती हे वरील त्यांच्या विधानांवरून लक्षात येते. अलिगढ विद्यापीठाच्या पदवीदान समारंभा प्रसंगी केलेल्या दीक्षान्त भाषणात ते म्हणतात, ''शिक्षण प्रसार ही प्रौढ मतदान पद्धतीबरोबर येणारी गोष्ट असून प्रौढ मतदानपद्धती लोकशाही राज्य कारभाराचा पाया आहे. म्हणून आपल्या नवजात लोकशाहीची मुळे खोलवर रुजविण्याच्या दृष्टीने प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारास साहजिकच राजकीय महत्त्व आहे. त्याचप्रमाणे आपल्या प्रचंड मनुष्यबळाची कार्यक्षमता वाढविण्यासही त्याची पुष्कळच मदत होऊ शकेल. तसे झाल्यास आर्थिक क्षेत्रातही त्याचे इष्ट असे परिणाम घडून येतील. '' शिक्षणाला राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक महत्त्व असते. शिक्षण हे राजकीय अधिकारांचे, आर्थिक विकासाचे आणि

> “ आमच्यामधे शक्ती निर्माण करण्याकरिता आमच्याजवळील मनुष्यबळाशिवाय दुसरे काही साधन नसल्यामुळे आम्हाला या धनाचा विकास करण्यासाठी त्याला शिक्षणाची जोड द्यावी लागेल. - **यशवंतराव चव्हाण** ”

सांस्कृतिक संपन्नतेचे द्योतक असते. यशवंतराव चव्हाणांच्या या दृष्टिकोनातून बघितल्यास महाराष्ट्रातील आजची शिक्षण व्यवस्था कशी भरकटली आहे याचा प्रत्यय येईल. आज महाराष्ट्रात ठायी ठायी शिक्षण संस्थाचे पेव फुटले आहे. तालुक्याच्या ठिकाणी, खेड्यापाड्यातूनही शाळा-महाविद्यालये उभी झाली आहेत. शाळा-महाविद्यालयांना परवानगी देतो आहोत. अशा शाळा-महाविद्यालयांतून यशवंतरावांना अभिप्रेत असलेला मूळ गाभाच हरवून गेला आहे. यशवंतरावांच्या दिशा दिग्दर्शनाला आम्ही विसरलो. यशवंतराव केवळ समाजासाठी जगले. समाजोन्नतीसाठी अहोरात्र संघर्षरत राहिले. ऊठसूट लोकांनी शैक्षणिक संस्था स्थापन केल्या. यशवंतरावांनी सुरू केलेल्या ई.बी.सी. स्कॉलरशिपचे पैसेही या लोकांनी गिळंकृत केले. आज शैक्षणिक संस्था म्हणजे व्यवसाय बनला आहे. शिक्षणातून शाळा-महाविद्यालयातून राष्ट्रीय भक्तीचा माणूस घडला पाहिजे, असे यशवंतरावांना अभिप्रेत होते. शाळा-महाविद्यालयातून शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ असा समाजोपयोगी माणूस घडला पाहिजे. शिक्षण ही एकांगी प्रक्रिया नाही याचे भान यशवंतरावांना होते. यशवंरावांच्या मते शिक्षण म्हणजे देशाचा राष्ट्राचा विकास. शिक्षणाच्या या प्रक्रियेसोबत राष्ट्रातील आर्थिकता, तंत्रज्ञान, औद्योगिकीकरण, राष्ट्र सबलीकरण या प्रकियांचा समावेश असतो. शिक्षणाच्या संदर्भात त्यांचे खोलवर व्यापक असे चिंतन होते. समाजातील-राष्ट्रातील सर्व



वर्ग, सर्व घटक एकत्र केल्याशिवाय राष्ट्रोन्नती साध्य होऊ शकत नाही यासाठी शिक्षण हे फार मोठे साधन आहे. या संदर्भात 'सह्याद्रीचे सुपुत्र यशवंतराव चव्हाण' या लेखात लेखक कवी बा. ह. कल्याणकर लिहितात, 'घनघोर अशा दारिद्र्यातून यशवंतराव आपल्या जीवनात उभे राहिले. एक सुसंस्कृत कर्तृत्व, ओघवतं आणि सहज सुंदर असं वक्तृत्व आणि सुजाण असं नेतृत्व याचा सुरेख असा संगम यशवंतराव चव्हाण यांच्या ठायी झाला होता. आणि याच अर्थाने ते सह्याद्रीचे थोर सुपुत्र ठरतात. यशवंतराव चव्हाणांनी गरिबाच्या हिताचा बळी होऊ दिला नाही.

> १९५१ साली यशवंतराव चव्हाण यांनी आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी ट्युशन फी माफ करण्याचा निर्णय घेतला तो एक क्रांतिकारी निर्णय आहे. लाखो गरिबांच्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाचे शिक्षण मिळाले. यशवंतराव चव्हाण यांचे हे द्रष्टेपण होते.



महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीशी यशवंतरावांचे एक आंतरिक नाते होते, असे बा. ह. कल्याणकर म्हणतात. यशवंतरावांना कुठल्याही विषयाचं वावडं नव्हतं. समाजकारण, राजकारण, अर्थकारण, औद्योगिकीकरण, परराष्ट्रीय धोरणे, साहित्यकारण या साऱ्या विषयांचा त्यांचा सखोल अभ्यास होता. सखोल चिंतन होते. शेतीचे प्रश्न, उद्योगधंद्याचे प्रश्न, दलितांचे प्रश्न, शेतमजूर व शेतकऱ्यांचे प्रश्न, विविध जातीजमातीचे प्रश्न या साऱ्यांविषयी त्यांचे प्रामाणिक चिंतन होते. तशी धोरणे ते आखीत होते. बुद्धीची आणि प्रतिभेची ही गहनीयता थक्क करणारी आहे. त्यांच्या बुद्धीची आणि प्रतिभेची झेप सर्वव्यापी होती. म्हणूनच प्रतिभावंत, कलावंत, लेखक, चित्रकार, शास्त्रज्ञ, संगीतकार, नाटककार यांच्याशी ते सन्मानाने वागत. देशाची ओळख पटते, राष्ट्राची प्रगती होते ती याच कलावंतामुळे. म्हणून त्यांच्या वागण्या बोलण्यात कधी नाटकीयता मिसळली नाही. वरवरचा वेळकाढूपणा कधी त्यांना साधला नाही. एक सच्चा माणूस, सच्चा नेता, सच्चा साहित्यिक म्हणूनच ते वावरले. देवराष्ट्रे ते दिल्लीपर्यंतचा यशवंतरावांचा प्रवास म्हणजे त्यांच्या व्यक्तिमत्त्वात साकळलेल्या गुणांचा प्रवास होय. ज्यांना ज्यांना म्हणून राजकारणात समाजकारणात यायचे आहे त्या प्रत्येकाने यशवंतरावांचा अभ्यास केला पाहिजे. त्यांचा आदर्श समोर ठेवला पाहिजे.


**संपर्क - ८६००६७६५५६**

## कलाप्रेमी यशवंतराव

कलाकारांच्या भावनांना यशवंतराव फार जपत असत.संगीत आणि नाटक त्यांना खूप आवडत. दिल्लीत होणारे कार्यक्रम ते सहसा सोडत नसत. नाटक किंवा संगीताच्या कार्यक्रमांना शेवटपर्यंत बसणं शक्य असल्यासच ते या कार्यक्रमांना जात. एखाद्या कार्यक्रमाच्या मधून उठून जाणं कलेचा आणि कलावंतांचा अपमान अशी त्यांची भूमिका होती. त्यांना इतर कोणत्या गोष्टीपेक्षा पुस्तकांची भेट फार आवडत असे. मात्र एखाद्याने पुस्तक दिलेच ते आधीच त्यांनी विकत घेतलेले असायचे. इंग्रजी आणि मराठी नियतिकालिकातील पुस्तक परिक्षणाचा स्तंभ त्यांचा आवडता होता. त्यात येणाऱ्या पुस्तकांची खरेदी ते तात्काळ करत.दिल्लीला ते पुस्तक मिळाले नाही तर मुंबईवरुन मागवून घेत. त्यांचं वाचन हे वैशिष्ट्यपूर्ण होतं. एकाचवेळी ते पाच सहा पुस्तक वाचत असत. **– राम खांडेकर**

> "शिक्षणाच्या प्रसारात संस्कृतीच्या प्रसाराची बीजे साठलेली असून त्यामुळे मानवी मूल्ये व ध्येये आम जनतेच्या आवाक्यात आणणे शक्य होणार आहे. - **यशवंतराव चव्हाण**"

# महाराष्ट्राचे भाग्यविधाते




महाराष्ट्राच्या स्थापनेला पन्नास वर्ष होऊन गेलीत. या पन्नास वर्षातील महाराष्ट्राच्या जडणघडणीचा, महाराष्ट्राच्या उभारणीचा, महाराष्ट्र बांधणीचा, महाराष्ट्राच्या सर्वसमावेशकतेचा, महाराष्ट्राच्या बलस्थानाचा महाराष्ट्राची भाषा, साहित्य आणि संस्कृतीचा उल्लेख यशवंतरावजींच्या उल्लेखाशिवाय पूर्ण होत नाही. त्यांना महाराष्ट्राचे भाग्यविधाते का म्हटल जातं त्याचं रहस्य यात दडलेलं आहे.

एखाद्या नव्या राज्याला सक्षम, समर्थ आणि संपन्न बनविण्याची महत्त्वाकांक्षा राज्यकर्त्याला असते. पायाभूत सुविधा, आरोग्य, पाणी, सिंचन, शेती, दळणवळण, उद्योग, शिक्षण या क्षेत्रांवर राज्यकर्त्यांचा भर असतो. या क्षेत्रांवर लक्ष केंद्रित केलं जातं. १ मे, १९६० ला संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश आणलेल्या यशवंतरावजींनीसुध्दा या क्षेत्रांना सर्वोच्च प्राधान्य दिलं. पण महाराष्ट्राची संपन्नता यापलिकडे यशवंतरावजींना अपेक्षित होती. त्यामुळेच त्यांनी १९ नोव्हेंबर १९६० रोजी म्हणजेच अवघ्या ५ महिन्यांच्या कालावधित राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना केली. साहित्य, संस्कृती, भाषा यांच्या संवर्धनासाठी स्थापन करण्यात आलेलं हे देशातलं पहिलं मंडळ ठरलं. यातच यशवंतरावजींची दूरदृष्टी दिसून येते.

यशवंतरावजींचा असा दृष्टिकोन होता की, विचारवंत, कलावंत, लेखक, शास्त्रज्ञ यांच्या प्रयत्नानं निर्माण होणारे विचारधन हेच समाजाचं मोठं धन असतं. एखाद्या देशाची, प्रांताची खरी ओळख यामुळे प्रस्थापित होते. साहित्य संस्कृती मंडळाच्या स्थापनेनंतरच्या पहिल्याच भाषणात यशवंतरावजी म्हणाले होते, एखादा समाज जिवंत राहतो, तो त्याच्याजवळ असलेल्या भौतिक सामर्थ्याने नव्हे तर त्याच्याजवळ असलेल्या सांस्कृतिक मूल्यांवर आणि विचारधनांवर.

पायाभूत सोईसुविधा आणि सांस्कृतिक साहित्यिक संवर्धनाचा विचार एकाचवेळी एकसमयावच्छेद करणारे यशवंतरावजी हे दूरदृष्टीचे नेते होते.

महाराष्ट्राची भाषा, संस्कृती आणि इतिहासाच्या संशोधनाकडे लक्ष देणं हे महाराष्ट्राचं विचारधन जतन करण्यासाठी



आवश्यक असल्याचं यशवंतरावजींचं मत होतं. साहित्य आणि संस्कृती हे विषय अत्यंत महत्त्वाचे असल्याचे राज्य स्थापनेच्या समयी जाहिर करण्यात आलेल्या धोरणात नमूद होतं. विधिमंडळाच्या पहिल्या अधिवेशनात राज्यपाल श्रीप्रकाश यांनी त्याचं सुतोवाच केलं. त्या धोरणाचं मूर्त रूप म्हणजे राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना! भाषिक राज्याच्या निर्मितीनंतर वैचारिक व सांस्कृतिक पुनरुज्जीवन करण्यासाठी हे मंडळ उपयुक्त ठरेल अशी यशवंतरावांची अपेक्षा होती. त्यांनी मंडळाच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमाचे वर्णन महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतरची अत्यंत महत्त्वाची घटना असे केले होते.

> एखादा समाज जिवंत राहतो, तो त्याच्याजवळ असलेल्या भौतिक सामर्थ्याने नव्हे तर त्याच्याजवळ असलेल्या सांस्कृतिक मूल्यांवर आणि विचारधनांवर.

यशवंतरावजींच्या साहित्यविषयक जाणिवा अतिशय श्रेष्ठ दर्जाच्या होत्या. अभिरुची उच्चश्रेणीची होती. ज्या साहित्यिक आणि सांस्कृतिक पुनरुज्जीवनाचं विचारमंथन त्यांच्या मनात सुरू होतं ते याच दृष्टीने महत्त्वाचं ठरतं. त्यांना देश-विदेशातील भाषांमधील उत्तमोत्तम ग्रंथ मराठीत प्रसिध्द व्हावेत ही अपेक्षा होती. इतिहास, वाङ्मय निरनिराळ्या संस्कृतींचे संशोधन अपेक्षित होते. या अपेक्षा त्यांनी मंडळाच्या पहिल्या बैठकीत व्यक्त केल्या.

सामान्य जनतेला सहज आणि सुलभतेनं उपलब्ध होतील असे ज्ञानकोश व शब्दकोशाचं स्वरुप झालं पाहिजे. महाराष्ट्राचे जीवन व्यापक, विस्तृत व क्रियाशील करण्यासाठी मंडळाने माध्यम बनावे, अशी अपेक्षा यशवंतरावांनी व्यक्त केली होती. त्यांनी व्यक्त केलेल्या अपेक्षेनुसार मंडळाचे पहिले अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी मंडळाच्या कामकाजाची दिशा ठरवली. विश्वकोश निर्मितीची पायाभरणी केली. आज विश्वकोशाचे १९ खंड हे मराठी संस्कृतीचे लेणे ठरले आहे. याचे सारे श्रेय यशवंतरावजींच्या आणि तर्कतीर्थांच्या दूरदृष्टीला जाते. यशवंतरावजींना अभिप्रेत असल्यानुसार पुढील काळात मराठीच शब्दकोश नव्हे तर उर्दू-मराठी शब्दकोश, तमीळ-मराठी शब्दकोश, कन्नड-मराठी शब्दकोश, आयुर्वेद कोश,विज्ञान तंत्रज्ञान कोश, वाड्‌मय कोश, अशा अनेक कोशांची निर्मिती झाली.वेगवेगळया थोर विभुतींच्या समग्र वाड्‌मयाचे खंड प्रकाशित झाले. असंख्य दर्जेदार इंग्रजी ग्रंथ मराठीत भाषांतरीत झाले. इतिहास, भूगोल, समाजशास्त्र, मानसशास्त्र, विज्ञान यांसारख्या विषयातील मूलभूत ग्रंथांची निर्मिती झाली. हा मराठी भाषेचा फार मोठा ठेवा ठरला आहे. यशवंतरावजींनी भाषा संचालनालयाची स्थापना केली. मराठी ज्ञानभाषा व्हावी यासाठी या संचालनालयाने अनेक विषयांचे कोश तयार केले. यशवंतरावजींनी लोककलेच्या संवर्धनाला प्रोत्साहन दिले. मराठी रंगभूमी करमुक्त केली. साहित्यिक, कलाकार, गायक, नट-तमासगीर, कुस्तिगीर, शाहीर या सर्वांसाठी अनुदाने त्यांनी सुरू केली.

भाषा, साहित्य, संस्कृती याविषयी इतका मूलगामी विचार करणारे यशवंतराव म्हणूनच महाराष्ट्राचे भाग्यविधाते ठरतात.

– टीम लोकराज्य ❑ ❑

**मराठी भाषेला राज्यभाषा करण्याचा पुरस्कार यशवंतराव चव्हाण यांनी केला. सर्वसामान्यांचे जीवन संपन्न व समृध्द होण्यासाठी मराठी भाषेत कारभार केला पाहिजे. महत्त्वाच्या सर्व शास्त्रांतील ज्ञान आपल्या भाषेत येण्याइतपत मराठी सक्षम व्हायला हवी.**

# लोकोत्तर नेता आणि प्रशासक



**स्व.** यशवंतरावजी चव्हाण यांच्याबद्दल अनेक थोर मान्यवर कौतुकानं लिहितात की ते शिवाजी महाराज आणि लोकमान्यांच्या नंतरचे महाराष्ट्राचे सर्वमान्य असलेले लोकोत्तर पुरुष होत.शिवाजी महाराज आणि लोकमान्यांबद्दल आमच्या पिढीला केवळ वाचूनच माहिती आहे. पण यशवंतरावजींना या पिढीला बघता आलं. ऐकता आलं. त्यांचं कार्यकर्तृत्व जवळून निरखता आलं. त्यामुळे लोकोत्तर पुरुष कसा असतो हे आमच्या पिढीला जाणून घेता आले. यादृष्टीनं आमची पिढी ही भाग्यवान ठरते..

यशवंतराव हे चतुरस्र प्रतिभेचे धनी होते. ही चतुरस्रता त्यांनी अत्यंत परिश्रमानं वृध्दिंगत केली होती. आपल्यावर राज्य चालविण्याची जबाबदारी येऊ शकते हे ते ओळखून होते.ही जबाबदारी समर्थ आणि सक्षमपणे पार पाडण्यासाठी आवश्यक असणारी सारी आयुधं आपल्या भात्यात असायला हवी हे त्यांनी चाणाक्षपणे ओळखलं होत. त्यामुळे त्यांनी अफाट वाचन केलं. वक्तृत्वकला प्रभावी केली. त्यांनी उत्तम लेखनशैली विकसित केली.

त्यांचा राज्यकारभार हा उतम प्रशासनाचं उत्कृष्ट उदाहरण ठरतं. त्यांच्यासोबत कार्य केलेल्या अनेक अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यशैलीबद्दल गौरवपूर्ण नोंदी करुन ठेवल्या आहेत. यशवंतरावजींचे खाजगी सचिव म्हणून काम केलेले एस. एम केळकर सांगतात की, यशवतंरावजींनी त्यांच्या ३० ते ३५ वर्षांच्या प्रशासकीय कारकीर्दित आधुनिक व्यवस्थापन तत्त्वांचा प्रभावीपणे उपयोग केला. त्यामुळेच ज्या मंत्रालयाचं काम त्यांच्याकडे सोपवलं जाई, त्या ठिकाणी उच्च नैतिक मूल्य जोपासणारी, परिश्रमी आणि कार्यक्षम अशी चमू तयार होत असे.

प्रत्येक व्यक्तिमधील नेतृत्वाचे गुण हेरण्याची त्यांची हातोटी विलक्षण होती. त्यांच्यासोबत काम करणं म्हणजे एखाद्या शिक्षकाकडून ज्ञानार्जन करण्यासाखं होतं. अनेक कठीण समस्यामंध्ये ते कधी विचलित होत नसत. परस्परविरोधी मतांच्या गलबल्यात समन्वयानं तोडगा काढण्याची त्यांची हातोटी होती. पारदर्शकता, राष्ट्रीय उद्दिष्टांबद्दलची स्वयंस्पष्टता आणि सामान्य माणसाची नस अचूक ओळखण्याची क्षमता या तीन गुणांमुळे ते सुयोग्य निर्णय सक्षमतेनं घेत.

यशवतंरावजी त्यांच्या हाताखालील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांशी तत्काळ स्नेह स्थापित करू शकत असत. आपल्या खात्याचे प्रश्न ते सखोल आणि विस्तृतपणे समजून घेत. अधिकाऱ्यांना त्यांची मते व्यक्त करण्याची पूर्ण मूभा देत. मात्र आपल्या सद्सद्विवेक बुध्दिला पटेल असाच निर्णय ते घेत.एकदा निर्णय घेतला की त्याची जबाबदारीसुध्दा ते स्वीकारत असत.

ते आपल्या कार्यपध्दतीबाबत फार काटेकोर होते. दररोज विशिष्ट वेळेवरच त्यांचे शासकीय कामकाज सुरू होत असे. बैठकांमधील सर्व महत्त्वाच्या बाबींची नोंदी ते स्वत: करत. दुसऱ्या दिवशी त्यातील किती बाबींची पूर्तता झाली हे तपासून बघत.त्यामुळे अधिकाऱ्यांना चर्चेला येताना संपूर्ण तयारी करुन यावी लागे. अधिकाऱ्यांसोबत सकाळी बैठक आटोपल्यानंतर ते पुन्हा अधिकाऱ्यांना त्या दिवसात सहसा बोलावत नसत. त्यामुळे अधिकाऱ्यांना आपल्या कामावर संपूर्ण लक्ष केंद्रित करणं शक्य होत असे. आपल्याकडे उपलब्ध मनुष्यबळाचा अचूक वापर करण्याचं त्यांचं कौशल्य अफलातून होतं.प्रत्येक व्यक्तिमधील सक्षम बाजू ते पटकन ओळखत. त्याप्रमाणे ते त्याच्याकडून काम करुन घेत. त्याला ते आत्मविश्वास देत असत. केळकराचं निरीक्षण असं आहे की, हेच अधिकारी आणि कर्मचारी इतर नेत्यांच्या हाताखाली इतक्या सक्षमपणे काम करू शकत नसत.

कृष्णाकाठच्या निसर्गाचा यशवंतरावजींच्या मनावर खोलवर परिणाम झाला होता. नदीकाठचं गावं हा ठसा हदयात पक्का उमटल्यानं देश विदेशात फिरताना नदी काठावरचं एखादं गावं दिसलं की त्यांचं कवी मन भारुन जात असे. परराष्ट्रमंत्री असताना रशिया दौऱ्यावर गेले होते. तेव्हा वोल्गा नदीच्या काठावर असलेल्या शहराने त्यांना मोहीत केले. भोजनासाठी एका रेस्टारेंट मध्ये ते गेले असता तेथील वादकांनी गायलेल्या गीताच्या सुरांनी प्रभावित झाले.रशियन भाषेतील ते गाणं त्यांना कळलं नाही.पण भोजनानंतर त्यांनी गायकाला बोलावून घेतलं आणि गाण्याचा आशय इंग्रजीतून समजून घेतला. ते सारं आपल्या डायरीत टिपून ठेवलं. नदीकाठच्या गावाचं ते वर्णन यशवंतरावजी अनेकदा वाचत.त्यामुळे तो प्रत्यक्ष पाहिलेला परिसर माझ्या डोळ्यासमोर पुन्हा पुन्हा येतो असं त्यांनी नमूद करुन ठेवलय.



राष्ट्रीय आतंरराष्ट्रीय राजकारण, अर्थकारण, समाजकारण,कृषी साहित्य आदी विषयांची असंख्य ग्रंथसपंदा यशवंतराव चव्हाण यांनी वाचली आणि आपल्या ज्ञानाच्या कक्षा विशाल केल्या. त्यांनी इंग्रजी आणि हिंदी भाषेवर प्रभुत्व मिळवलं.

यशवंतरावजी हे कोणत्याही बिकट प्रसंगी अतिशय शांत आणि रिलॅक्स असत. तशी त्यांनी स्वत:च्या मनाला सवय लावून घेतली होती. ते अतिशय दूरदृष्टीने निर्णय घेत. कोणत्याही प्रसंगात ते मनाचा समतोलपणा ढळू देत नसत. ते त्यांच्या अधिकाऱ्यांवर पूर्ण विश्वास ठेवत. त्यांच्याशी सौजन्याने वागत. त्यामुळे ते निर्णयांची तत्काळ आणि प्रभावीपणे अंमलबजावणी करत असत.

त्यांच्याकडे आलेल्या सर्व फाइल्स ते त्याच दिवशी वाचून काढून त्यावर निर्णय देत असत. दुसऱ्या दिवशी फाइल्स, पत्र संबंधितांकडे जात असे. त्यामुळे अधिकाऱ्यांनासुध्दा पुढील प्रशासकीय कार्यवाही तातडीने करावी लागत असे. त्यांची ही क्षमता चिंतामणराव देशमुख किंवा ब्रिटनचे मंत्री सर जॉन अँडरसनसारखी श्रेष्ठ दर्जाची असल्याचं निरीक्षण एल.पी सिंग यांनी नोंदवून ठेवलय.ते यशवंतरावजी गृहमंत्री असताना गृहसचिव होते.

यशवंतरावजी हे आपल्या अधिकाऱ्यांबाबत अपवादानेसुध्दा वाईट बोलत नसत.त्यांनी कधीही नियमबाह्य वा नियमांना मोडतोड करणारे आदेश दिले नाहीत. माजी संरक्षण सचिव पी.व्ही.आर राव यांनी असं निरीक्षण नोंदवलय की यशवंतरावजी मितभाषी, काटेकोर वेळ पाळणारे आणि प्रगल्भ निर्णयक्षमता घेणारे होते. निश्चित कार्य करुन दाखवीन ही जिद्द आणि समजूतदारपणा यशवंतरावजींमध्ये होता. ते कमी वेळात अचूक निर्णय घेत. आपल्या निर्णयाचा जाब विचारणारी भारतीय जनता असल्याचं भान ठेऊनच ते कार्यरत असत. स्वतंत्र बुध्दिमत्ता आणि तिचा व्यावहारिक वापर करणाऱ्या थोडक्या मंत्र्यांमध्ये यशवंतरावजींचा समावेश



आचार्य अत्रे आणि यशवंतराव

१९७२ साली जालन्यातील एका जाहीर सभेत एक शाहीर सुंदर गाणं गात होता. यशवंतराव यायचे होते. त्यामुळे त्याचं गाणं सुरु होते. यशवंतराव येताच, आयोजकांनी शाहिराला थांबवलं. तेव्हा ते म्हणाले की भाषण नंतर होईल. जे मला सांगायचच तेच हा शाहीर किती प्रभावीपणे सांगत आहे. त्यांना गाऊ द्या. हे ऐकून शाहीर धन्य झाला. यशवंतरावांनी त्याला फेटा बांधला. भाषणात त्याचं जाहीर कौतुक केलं.

असल्याचंही श्री. राव यांचं निरीक्षण आहे.

बोलण्यात मृदू असलेले यशवंरावजी निर्णय मात्र कठोरपणे घेत. कोणत्याही बिकट परिस्थितीचा ताबा घेताना त्यांची जिद्द आणि प्रसंगावधान वैशिष्ट्यपूर्ण असायचं. अशा प्रसंगी ते कधीच अस्वस्थ होत नसत. त्यांच्या व्यक्तिमत्वात सच्चील प्रामाकिणपणाचा गुणात्मक संगम झाला होता. ते परस्परांत उत्तम संवाद साधत. अधिकाऱ्यांशी मित्रत्वाच्या नात्याने वागत असल्याने अधिकारीही कोणत्याही विषयावर मनमोकळी चर्चा करीत असत.

कायदा व सुव्यवस्था राखण्यासंबंधीचे निर्णय यशवंतरावजी निर्भयपणे व खंबीरपणे घेत. पोलिसांना त्यांचे कार्य करणे सुलभ व्हावे म्हणून ते आपल्या पक्षाला न पटणारे निर्णयही घेत. पोलिसांचे नीतीधैर्य खचणार नाही याची दक्षता ते घेत. टीकेच्या आहारी जावून घाईघाईने कोणतेही आश्वासन देत नसत. मात्र पोलिसांचे वा इतर अधिकाऱ्यांचे चुकत असल्यास ते खाजगीरित्या त्याला चांगलीच तंबी देऊन त्याची चूक निदर्शनास आणत. त्यांच्या संपूर्ण कारकीर्दित त्यांनी शासकीय प्रशासनाचं पावित्र्य मानलं. सनदी अधिकाऱ्यांपुढे कारभाराच्या एकूण पध्दतीबद्दल ते सतत आपली मते व विचार मांडत असत. नवीन धोरणाबद्दल आग्रह धरीत.काही प्रसंगी अधिकाऱ्यांची मते ते नाकारित.

शासकीय अधिकाऱ्यांना हे करू का ते करू असा संभ्रम निर्माण होईल तेव्हा त्यांनी निर्णयापाठीमागच्या मूळ तत्त्वांचा आणि त्यासाठी स्वत:च्या भूमिकेचा विचार करावा म्हणजे संभ्रम नाहिसा होईल व त्यांना त्यांचे कर्तव्य स्पष्ट दिसू लागेल, असं यशवंतरावजी अधिकाऱ्यांना सांगत असत. प्रशासनासंबंधी नवी नवी पुस्तके ते सतत वाचत असत. यशंवतरावजींकडे क्षमाशील वृत्ती असल्याने शासनातील लहान मोठे अधिकारी स्वत:च्या जबाबदारीवर मोठमोठी कामे करत. सर्वसामान्यांचे कल्याण आणि सुख म्हणजेच प्रशासनातील गुणवत्ता असे ते मानत. त्यांनी प्रशासनात सामाजिक जाणीव निर्माण केली.



राजभाषेत प्रशासनकार्य चालत असले तरी त्यामागे संवेदनशील हदयाची भाषा असायला हवी असा त्यांचा आग्रह असे. प्रशासकीय यंत्रणेच्या पाठिमागे असलेल्या मानवी हदयात इष्ट बदल होणे आवश्यक असल्याचे ते सांगत. त्यांच्यामुळेच प्रशासनयंत्रणेतील व्यक्तींना लोकाभिमूख धोरण अंगिकारावे लागले, याकडे माजी जेष्ठ अधिकारी विनोदरावांनी लक्ष वेधलं आहे.

उक्ती आणि कृती यांचा त्यांनी कायम प्रत्यक्षात मेळ घातला. विकासाचे निर्णय जेव्हा महाराष्ट्रात राबवायला सुरुवात झाली तेव्हा ते सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनाला स्पर्शून जाणारे ,त्यांचा वाजवी लाभ करुन देणारे, त्यांचे जीवन सुसह्य करणारे ठरले ते यामुळेच, असं निरीक्षण श्री रामभाऊ जोशी यांचं आहे. यशवंतरावजी त्यांच्या मंत्रीमंडळातील सहकाऱ्यांना स्वतंत्रपणे, मोकळ्या मनाने काम करायला वाव देत. कोणाच्या कामात हस्तक्षेप करीत नसत. प्रत्येकाला आपले विचार निर्भयपणे मांडता येत असत. त्यांची एककल्ली वृत्ती नव्हती. तत्त्व आणि धोरण यास बाधा येऊ न देता सर्वांशी ते जुळवून घेत. चर्चेनंतर घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी प्रामाणिकपणे व एकदिलाने झाली पाहिजे यावर त्यांचा कटाक्ष असे असं माजी मुख्यमंत्री दादासाहेब कन्नमवार यांनी नमूद केलय.

अशा अनेकविध गुण वैशिष्ट्यांमुळे यशवंतरावजी महाराष्ट्राचे भाग्यविधाते होऊ शकले.

– टीम लोकराज्य

**बोलण्यात मृदू असलेले यशवंराव निर्णय मात्र कठोरपणे घेत.कोणत्याही बिकट परिस्थितीचा ताबा घेताना त्यांची जिद्द आणि प्रसंगावधान वैशिष्ट्यपूर्ण असायचं.अशा प्रसंगी ते कधीच अस्वस्थ होत नसत.**

# जन्मशताब्दी निमित्त...



**संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्त त्यांनी केलेले कार्य, त्यांचे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व याची माहिती व्हावी याष्टीने राज्यभर विविध स्तरांवर वेगवेगळे कार्यक्रम गेले वर्षभर आयोजित करण्यात आले. तसेच काही उपक्रम राबविण्यात आले. यापैकी निवडक कार्यक्रम व उपक्रमांचा आढावा...**

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षाचा उद्‌घाटन सोहळा १२ मार्च २०१२ रोजी तत्कालिन राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते संपन्न झाला. गेटवे ऑफ इंडियाच्या प्रांगणात पार पडलेल्या या सोहळ्यात सुमारे ६०० कलावंत व तंत्रज्ञ यांनी 'मी यशवंत' या महानाट्याच्या प्रयोगाद्वारे यशवंतरावजींच्या जन्मापासून ते संरक्षणमंत्रीपदापर्यंतचा प्रवास सादर केला.

सोहळ्यास राज्यपाल के. शंकरनारायणन, केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार, तत्कालीन विज्ञान व तंत्रज्ञान मंत्री स्व. विलासराव देशमुख, तत्कालीन ऊर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे, मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय मंत्री प्रफुल्ल पटेल, मुकुल वासनिक, विधानपरिषद सभापती शिवाजीराव देशमुख, विधानसभा अध्यक्ष दिलीप वळसे पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.



स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनचरित्राची माहिती देणाऱ्या विशेष प्रदर्शनाचे आयोजन मनोरा आमदार निवास, (मुंबई) येथे केले गेले. या प्रदर्शनाचे उद्‌घाटन राज्यपाल के. शंकरनारायणन् यांच्या आणि मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधान परिषद विरोधी पक्षनेते विनोद तावडे, विधानसभा विरोधी पक्षनेते एकनाथ खडसे यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी इतर मान्यवर उपस्थित होते. स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या आयुष्यातील प्रमुख प्रसंग, राजकीय व सामाजिक वाटचालीतील ठळक घटना, राजकारण, समाजकारण, साहित्य, संस्कृती-कला, उद्योगजगताशी निगडित त्यांच्या सर्वस्पर्शी व्यक्तिमत्त्व वैशिष्ट्यांवर या प्रदर्शनातून प्रकाश टाकला गेला. प्रदर्शनादरम्यान १० मिनिटांचा विशेष माहितीपटही दाखविण्यात आला. या प्रदर्शनाचे विभागीय स्तरावरही आयोजन करण्यात आले आहे.

'महाराष्ट्र: काल आज आणि उद्या' या विषयावर १७ व १८ मार्च २०१२ रोजी विधान भवनात परिसंवाद आयोजित करण्यात आला. या परिसंवादात राज्यपाल के. शंकरनारायणन्, केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार, तत्कालीन विज्ञान, तंत्रज्ञान, भूविज्ञान मंत्री स्व. विलासराव देशमुख, तत्कालीन केंद्रीय ऊर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे, मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, उपमुख्यमंत्री अजित पवार इत्यादी मान्यवरांनी आपले विचार मांडले.

ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे लिखित 'महाराष्ट्र : काल आज आणि उद्या' या पुस्तकाचे प्रकाशन विधानपरिषदेचे सभापती शिवाजीराव देशमुख आणि विधानसभेचे अध्यक्ष दिलीप वळसे-पाटील यांच्या हस्ते ३ एप्रिल २०१२ रोजी विधानभवनात झाले. यावेळी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, विधानपरिषद उपसभापती, विधानसभेचे उपाध्यक्ष, विरोधी पक्षनेते व इतर मान्यवर उपस्थित होते. 'यशवंतराव महाराष्ट्रातले; यशवंतराव दिल्लीतले' या विषयावर विधानभवनात ४ व ५ मे २०१२ रोजी दोन दिवसाचे परिसंवादाचे आयोजन केले होते. या परिसंवादाचे राज्यपालांच्या हस्ते उद्‌घाटन झाले.

महाराष्ट्र विधानमंडळ तसेच राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे 'शिक्षणाचा अधिकार' या विषयावर २० जुलै २०१२ रोजी विधानभवनात परिसंवाद आयोजित केला गेला.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या वतीने प्रसिद्ध होणाऱ्या लोकराज्यचा 'यशवंत-कीर्तिवंत' हा विशेषांक काढण्यात आला.

महाराष्ट्र विधानमंडळाचे अमृत महोत्सवी वर्ष आणि स्व. यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी वर्षानिमित्त ''महाराष्ट्राची औद्योगिक वाटचाल : सिंहावलोकन व भविष्यातील धोरणे'' आणि पुणे महसुली विभागातील स्थानिक समस्या या दोन विषयांवर ९ नोव्हेंबर २०१२ रोजी पुणे येथील विधानभवनात परिसंवाद आयोजित केले गेले. या दोन परिसंवादामध्ये वक्ते म्हणून त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञांना निमंत्रित करण्यात आले होते. यावेळी यशवंतराव चव्हाण यांच्या जीवन कार्यावरील छायाचित्रांचे प्रदर्शन आयोजित केले गेले. प्रदर्शनस्थळी शंकर वाटवे दिग्दर्शित स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या जीवन कार्याचा आढावा घेणारा माहितीपट दाखविण्यात आला.

स्व. यशवंतराव चव्हाण यांची जन्मशताब्दी आणि आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या निमित्ताने महाराष्ट्रातील २७ सर्वोत्कृष्ट सहकारी संस्था आणि व्यक्तींना 'सहकार महर्षी, सहकार भूषण व सहकार निष्ठ म्हणून पुणे येथे २ डिसेंबर २०१२ रोजी आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

सातारा येथे जिल्हा परिषदेतर्फे १२०० क्षमतेचे सभागृह बांधण्यासाठी १० कोटी रुपये, सातारा जिल्ह्यातील कराड येथील शैक्षणिक संकुलाच्या आवारात १२०० क्षमतेचे सभागृह बांधण्यासाठी रु.१० कोटी रुपये सातारा येथील सैनिक स्कूल येथे एनडीए ब्लॉक बांधण्यासाठी ५ कोटी रुपये, कराड येथील टिळक हायस्कूलच्या नूतनीकरण व विस्तारीकरणासाठी २ कोटी रुपये, सांगली जिल्ह्यातील कडेगाव तालुक्यातील देवराष्ट्र येथील यशवंतराव चव्हाण स्मारकाचे सुशोभिकरण व रस्त्यांचे नूतनीकरण करण्यासाठी ८.३ कोटी रुपये, कोल्हापूर येथील राजाराम महाविद्यालय येथे शैक्षणिक सुविधेसाठी ५ कोटी रुपये आणि सातारा जिल्ह्यातील कराड एस.टी. बसस्थानकाचे विस्तारीकरण व आधुनिकीकरणासाठी ११ कोटी रुपये असे एकूण ७५.३१ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहे.

– टीम लोकराज्य ❑ ❑

**नागपूर, नाशिक, औरंगाबाद आणि कराड येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बळ घटकातील मुलींसाठी २०० प्रवेश क्षमतेचे प्रत्येकी एक वसतीगृह बांधण्यासाठी प्रत्येकी ६ कोटी रुपये याप्रमाणे रु.२४ कोटी रुपये मंजूर करण्यात आले.**

# सेवेची संधी

महात्मा फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या समाजसुधारकांच्या पुरोगामी विचारांचा वारसा महाराष्ट्राला






सामाजिक न्याय विभागाच्या योजनांचे लाभार्थी

लाभला आहे. अनुसूचित जाती आणि मागासवर्गीय जनतेच्या कल्याणासाठी विविध योजना राबवून राज्य शासन पुरोगामी विचारसरणीचा वारसा पुढे नेत आहे.

वंचित घटकांसाठी असलेल्या सामाजिक न्याय विभागाच्या लोककल्याणकारी योजना तळागाळातील दीन-दलित, गरीब, गरजू लोकांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत यावर माझा रुजू झाल्याच्या पहिल्या दिवसापासून भर राहिला आहे. यापूर्वीही सामाजिक कार्यात सहभाग घेतलेला आहे. प्रशासकीय अधिकारी म्हणून समाजाप्रति असलेल्या उत्तरदायित्वाची भूमिका निभावलेली आहे. जालना येथे जिल्हाधिकारी असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केलेल्या संविधानाच्या उद्देशपत्रिकेच्या जाहीर वाचनांचे उपक्रम राबवून संविधानाचे महत्त्व तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला. भिवंडी, मीरा-भाईंदर, कल्याण-डोंबिवली या महानगरपालिकांमध्ये - आयुक्त, मुंबई महानगरपालिका - सह आयुक्त, जालना जिल्हाधिकारी, दुग्धविकास विभाग - आयुक्त या पदांवर काम करताना वंचित, दुर्बल घटकांसाठी उपयोगी ठरतील असे अनेक निर्णय घेतले.

टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स, मुंबईसारख्या संस्थेत मला मिळालेले समाजकार्याचे धडे या विभागात काम करताना मला निश्चितच उपयोगी पडत आहेत. कमी कालावधीत राज्यातील प्रत्येक विभागातील जिल्ह्यांमध्ये प्रत्यक्ष भेटी देऊन तळागाळातील वंचित, दुर्बल घटकांच्या समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न केला. मंत्रालयातील दालनात बसून पेपरवर्क करणे आणि प्रत्यक्ष तळागाळात जाऊन लोकांच्या समस्या समजून घेणे यात खूप फरक आहे. पुणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद या शहरांतील सामाजिक न्याय विभागांच्या कामांचे प्रत्यक्ष जाऊन पाहणी/अवलोकन केले. लाभार्थी घटकांची भेट घेऊन सामाजिक न्याय विभागाकडून असलेल्या अपेक्षा जाणून घेतल्या. वसतिगृहातील मुला-मुलींच्या समस्या प्रत्यक्ष भेटीतून जाणून घेतल्या. यासंदर्भात नाशिक येथील वसतिगृहांमधील मुलींच्या घेतलेल्या भेटीचा उल्लेख करता येईल. निर्वाह भत्ता, वसतिगृहातील सुरक्षेचे वातावरण, अन्नाचा दर्जा, स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासासाठी ग्रंथालयात अद्ययावत पुस्तके यांसारख्या प्रश्नांच्या माध्यमातून वसतिगृहातील

> अनुसूचित जाती व मागासवर्गीय समाजाच्या वंचित घटकांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी असलेल्या सामाजिक न्याय विभागाच्या सचिवपदी २ ऑगस्ट २०१२ रोजी रुजू झालो. यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या सर्वोच्च प्रशासकीयपदी झालेली पदस्थापना मला निश्चितच एक सामाजिक सेवेची पर्वणी/संधी वाटते. गरीब व गरजू लोकांसाठी कल्याणकारी निर्णय घेणाऱ्या मुख्य प्रवाहातील सामाजिक न्याय विभागात मिळालेल्या पदस्थापनेने कामात एक नवा हुरूप आला आहे.

सर्वसामान्य मुलींच्या भावविश्वाचा कानोसा घेता आला. यात मला जाणवलेली एक गोष्ट म्हणजे, तळागाळातील दुर्बल, वंचित घटकांतील ज्या मुली पिढ्यान्‌पिढ्या गावाची वेशीही ओलांडून जात नव्हत्या, समाजातील बुरसटलेल्या विचारसरणीच्या शिकार होत

**आर. डी. शिंदे**
सचिव : सामाजिक न्याय

होत्या त्या घटकांतील सर्वसामान्य मुलींना आज सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृहांमुळे शिक्षणाचे एक नवे दालन निर्माण झाले आहे. अत्यंत आत्मविश्वासपूर्वक त्या समोरच्या माणसांशी संवाद साधत आहेत. शिक्षण घेत आहेत. शैक्षणिक सक्षमतेच्या दिशेने त्यांचे पडणारे खंबीर पाऊल निश्चितच अभिमानास्पद आहे. हे सर्व शासनाच्या कल्याणकारी योजनांमुळे शक्य झाले आहे.

सामाजिक न्याय विभाग राज्यात प्रथम टप्प्यात १०० शासकीय वसतिगृहे व १०० निवासी शाळा सुरू करीत आहे. त्यात काही वसतिगृहे व निवासी शाळांचे बांधकाम पूर्ण

**शासकीय नोकरीमध्ये १० हजार अपंगांचा अनुशेष आतापर्यंत भरून झाला आहे.**

होऊन त्या विभागाच्या स्वत:च्या इमारतीत सुरू झाल्या आहेत. उर्वरित वसतिगृहे निवासी भाड्याच्या जागेत सुरू करण्याबाबत मंत्रालयीन स्तरावरून प्रादेशिक उपायुक्त व जिल्हा कार्यालयांना निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे मागासवर्गीय मुलांच्या प्रवेशाचा प्रश्न मार्गी लागण्यास मदत झाली.

**ई-स्कॉलरशिप**

व्यावसायिक पाठ्यक्रमात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम थेट बँकेमार्फत ई-स्कॉलरशिप योजनेच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात येते. या विद्यार्थ्यांवर पैशाअभावी शिक्षणापासून वंचित राहण्याची वेळ येऊ नये यासाठी सामाजिक न्याय मंत्र्यांनी केंद्र सरकारकडे शिष्यवृत्ती रकमेसाठी वेळोवेळी पाठपुरावा केला. त्यातील १५ लाख विद्यार्थ्यांना आम्ही १ हजार ८०० कोटी रुपयांचे वाटप करू शकलो. यासाठी प्रत्येक जिल्हास्तरावर अधिकाऱ्यांच्या बैठका घेतल्या, त्यातून अधिकाऱ्यांच्या या योजनेच्या बाबतीत काही समस्या/ अडचणी असतील त्या मार्गी लावण्याचा प्रयत्न केला.

समाजातील उपेक्षित, वंचित घटकांना न्याय देण्याची शासनाची भूमिका आहे. राज्यातील अपंगांचा अनुशेष भरून काढण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. उर्वरित अनुशेष भरण्यासंदर्भात प्रशासकीय पातळीवर प्रयत्न करण्यात येत आहेत.

अनुसूचित व नवबौद्ध घटकांच्या उन्नतीसाठी जीवन समर्पित केलेल्या महापुरुषांच्या विचारांचे, स्थळांचे, स्मारकांचे जतन व संवर्धन व्हावे यासाठी सामाजिक न्याय विभाग अनेक स्मारकांना अर्थसाहाय्य रूपाने मदत पुरवित आहे. अशा काही स्मारकांचा अर्थसाहाय्याचा प्रश्न तत्काळ मार्गी लावण्यासाठी मंत्रालयीन स्तरावर प्रलंबित असलेल्या फाइल्सचा निपटारा केला. प्रशासकीय मंजुऱ्या देण्यात आल्या. यासाठी काही स्थळे व स्मारकांचे काम प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन पाहिले. सामाजिक कार्यकर्ते, बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांच्या बैठका घेण्यात आल्या. येवला येथील भव्यदिव्य, अत्यंत सुसज्ज असलेल्या मुक्तिभूमीच्या कामाची प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली. निधीअभावी मुक्तिभूमीचे काम प्रलंबित राहू नये यासाठी निधी उपलब्ध करून दिला. येथील ७० टक्के बांधकाम पूर्ण झाले आहे. राज्यातील इतर स्थळे, स्मारकांचे जतन व संवर्धनाच्या कामांबाबत शासनपातळीवर काही प्रलंबित राहणार नाही यावर आमचा भर राहिला आहे.



मुलांचे वसतिगृह

सामाजिक न्याय विभाग हा शाश्वत मूल्य व समतेच्या विचारांवर काम करणारा विभाग आहे. येथे येणारी प्रत्येक व्यक्ती कोणत्या तरी आर्थिक विवंचनेने ग्रासलेली आहे. तेव्हा मंत्रालयात आपली समस्या, अडचण घेऊन येणाऱ्या महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील प्रत्येक व्यक्तीच्या समस्या जाणून घेणाचा प्रयत्न केला. त्यासाठी वेळ दिला. आपण कोणाच्या तरी उपयोगी पडतो. यात मिळणारे प्रशासकीय सेवेचे समाधान अमूल्य आहे. लालफितीचा कारभार आणि उदासीनता यामुळे सर्वसामान्य लाभार्थी मंत्रालयाच्या पायऱ्या किंवा शासनाच्या कार्यालयात जाताना खूप वेळा विचार करतो. तेव्हा आपल्याकडे येणाऱ्या लाभार्थ्याला या गोष्टींचा अनुभव येऊ नये, त्याला शासनाबाबत उदासीनता येऊ नये यासाठी व्यस्त कामातून लाभार्थ्यांना वेळ देण्याचा प्रयत्न करतो.

शासनाच्या सर्व विभागांच्या नोकरभरतीवर बंदी असताना सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृह व निवासी शाळेसाठी लागणाऱ्या गृहपाल, कनिष्ठ लिपिक, शिक्षक व ग्रंथपाल या पदांची भरती प्रक्रिया मुख्यमंत्र्यांची परवानगी घेऊन राबविण्यात आली. अत्यावश्यक गरज म्हणून करण्यात आलेल्या या भरतीप्रक्रियेत विभागाने पारदर्शकपणे काम करीत भरतीप्रक्रिया राबविली.

**मनुष्यबळाचे सुयोग्य व्यवस्थापन**

विभागाचा आकृतीबंध तयार करण्यावर माझा भर राहिला आहे. विभागात अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांचा आढावा घेतला. आवश्यक रिक्त पदे भरण्याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांना कळवून ही रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. प्रशासनाचे बळकटीकरण व सक्षमीकरण झाले तर योजनांची अंमलबजावणी अचूक व जलदपणे होणार आहे. त्यासाठी पुण्याच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण व संशोधन संस्था, यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी (यशदा) यांच्या सहयोगाने विभागातील अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यावर भर राहिला आहे. कर्मचारी व अधिकारी यांना माहिती अधिकार कायद्याविषयी विस्तृत माहिती मिळावी यावर भर राहिला आहे. अशा प्रकारे प्रशासन बळकट करून मनुष्यबळाच्या सुयोग्य व्यवस्थापनावर आमचा भर आहे.

सामाजिक न्याय विभागाद्वारे समाजातील कमकुवत दुर्बल घटकांच्या वर्गाकडे विशेष लक्ष देऊन त्यांना शिक्षण, दारिद्र्य, आरोग्य, व्यवसाय यांसारख्या अनेक घटकांमुळे निर्माण झालेला दुरावा नष्ट करणे व या घटकांना मूळ प्रवाहामध्ये आणणे व त्यांना सक्षम करणे यासाठी सामाजिक न्याय विभाग काम करीत आहे. विभागाच्या या सामाजिक सेवेचा मी एक पाईक झालो यातच माझ्या आयुष्याचे मोठे संचित आहे असे मी मानतो.

❐ ❐

**येवला येथील मुक्तिभूमीचे ७० टक्के बांधकाम पूर्ण झाले आहे.**

# सामाजिक न्यायाचे सामर्थ्य

महाराष्ट्राने देशाला महान समाजसुधारक आणि कल्याणकारी राज्यकर्ते दिलेत. त्यामध्ये छ. शिवाजी महाराज, म. जोतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज यांनी असमान दर्जा, असमान संधी या व्यवस्थेला छेद देण्यासाठी आरक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेद्वारे आरक्षणाची तरतूद केली तेव्हापासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक आरक्षण धोरणाचे जनक ठरले. भारतात घटनेच्या अनुच्छेद ४६ अन्वये सामाजिक न्यायाच्या अंमलबजावणीची सुरुवात झाली.

सामाजिक न्याय हे उद्दिष्ट संविधानाच्या प्रतिज्ञापत्रकात तसेच मूलभूत अधिकार व मार्गदर्शक तत्त्वे ह्यात समाविष्ट आहे. नवीन समाज हा सामाजिक, आर्थिक व भौतिक न्यायावर आधारित असावा, ही जाणीव स्वातंत्र्य चळवळीपासून भारतीय जनतेत दृढमूल झाली. मालमत्तेचे वाटप न्याय्य पद्धतीने व्हावे, उत्पादनाची साधने फक्त थोड्या लोकांच्या हाती राहू नयेत, सर्वांना समान वेतन मिळावे, स्त्रिया व मुले ह्यांचे हितसंबंध सुरक्षित राहावेत व समाजाच्या तळागाळातील दुर्बल घटकांना वर येण्याची संधी मिळावी ही तत्त्वे/धोरणे त्यात समाविष्ट आहेत. सामाजिक व आर्थिक विषमता कमी व्हावी, ही त्यामागची प्रमुख प्रेरणा होय.

सामाजिक न्यायाच्या दिशेने देशाने आणि राज्याने केलेली वाटचाल, त्याची पार्श्वभूमी, विकास व शेवटी सामाजिक न्यायाची झालेली मुहूर्तमेढ समजून घेताना त्याचा इतिहास समजून घेणे गरजेचे आहे. द गव्हर्नमेंट ऑफ बॉम्बेच्या शासन निर्णय क्रमांक ४३७०, ५ नोव्हेंबर १९२८ अन्वये राज्यातील शैक्षणिक, आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागासवर्गाची माहिती गोळा करण्यासाठी व त्यांचे जीवनमान उंचावे म्हणून उपाययोजना सुचविण्यासाठी स्टार्ट समितीची स्थापना करण्यात आली. या समितीमध्ये दहा सदस्यांचा समावेश होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे या समितीचे सदस्य होते; तर ओ.एच.बी. स्टार्ट हे अधिकारी अध्यक्ष होते. या समितीने आपला अहवाल १९३० साली सादर केला. यानंतर मागास समाजासाठी १९३२ साली बॅकवर्ड क्लास वेल्फेअर डिपार्टमेंटची मुंबई येथे स्थापना करण्यात आली. ओ.एच.बी. स्टार्ट हे या खात्याचे पहिले संचालक होते. (१५-१०-१९३२ ते १७-४-१९३४).

> स्वातंत्र्योत्तर कालखंडानंतर सामाजिक न्याय विभागाचा विस्तार व विकास झाला. सुरुवातीला समाजकल्याण विभाग या नावाने ओळखला जाणारा हा विभाग व्यापक समाजगटाचे प्रतिनिधित्व करत होता. कालांतराने विभागाचा विस्तार, अर्थसंकल्प वाढत गेला तसा एक एक विभाग वेगळा झाला. अनुसूचित जमाती समाजघटकांच्या योजना राबविण्यासाठी आदिवासी विकास विभाग, दलित व मागासवर्गीय महिलांच्या विकास योजनांसाठी महिला व बाल विकास विभाग, तसेच मागासवर्गीयामधील अपंग गटासाठी अपंग आयुक्तालय असे विभाग निर्माण करण्यात आले. अपंगकल्याण आयुक्तालय व विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास वर्ग, विशेष मागास प्रवर्ग हे विभाग जरी स्वतंत्र असले तरी ते सामाजिक न्याय विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत आहेत.


**आर. के. गायकवाड**

आयुक्त, समाजकल्याण


१९४७ साली संचालक, बॅकवर्ड यांचे कार्यालय पुणे येथे स्थलांतरित झाले. तत्कालीन उद्योग, मत्स्यव्यवसाय आणि मागासवर्गीयांचे कल्याण मंत्री गणपती देवजी तपासे यांच्या हस्ते ९ ऑगस्ट १९४७ रोजी पुणे येथील संचालनालयाच्या इमारतीची कोनशिला बसविण्यात आली. त्यानंतर २३ सप्टेंबर १९५७ अन्वये मुख्य निरीक्षक, प्रमाणित शाळा आणि संचालक, बॅकवर्ड क्लास वेल्फेअर या दोन विभागांची स्थापना करण्यात आली, त्यावेळेस सचिवालय पातळीवर समाजकल्याण आणि शिक्षण विभाग एकत्रित होते. तर संचालक, समाजकल्याण यांच्या पातळीवर दोन विंग कार्यरत होत्या.

१) बॅकवर्ड क्लास वेल्फेअर :- संचालनालयातील ही विंग खालील तीन समाजांतील व्यक्तींसाठी विविध शैक्षणिक व आर्थिक विकासाच्या योजना राबवित असे. अ) अनुसूचित जाती, ब) अनुसूचित जमाती किंवा आदिवासी, क) आर्थिक व




**१९९५-२००० मध्ये ५०० कोटी बजेट असणाऱ्या सामाजिक न्याय विभागाचे बजेट आज ३००० कोटींच्या घरात पोहोचले आहे.**

शैक्षणिकदृष्ट्या बॅकवर्ड (शासन निर्णय १८-०५-१९५९ मधील जाती).

२) करेक्शन विंग (सुधार प्रशासन) :- संचालनालयातील या विंगमार्फत महिलाकल्याण, बालकल्याण, अपंगकल्याण, भिक्षेकरी गृह, रिमांड होम्स व शासकीय प्रमाणित शाळा यांचे कामकाज चालत असे.

१ मे १९६० साली राज्याची स्थापना झाल्यानंतर समाजकल्याण विभागाची जिल्हास्तरावर यंत्रणा निर्माण झाली. त्यावेळेच्या जिल्हा स्तरावरील समाजकल्याण अधिकारी यांचा दर्जा हा दुसऱ्या श्रेणीच्या मामलेदार यांच्या बरोबरीचा होता. पुणे, मुंबई, औरंगाबाद व नागपूर या चार ठिकाणी विभागीय समाजकल्याण अधिकारी कार्यरत होते. विशेष घटक योजनेंतर्गत सन १९८२-८३ मध्ये नाशिक व अमरावती या दोन विभागांसाठी विभागीय समाजकल्याण अधिकारी यांची पदे निर्माण झाली. तसेच जिल्हा समाजकल्याण अधिकारी वर्ग-१ पदे निर्माण झाली. १५ ऑक्टोबर १९३२ ते ३०-११-२००८ पर्यंत संचालक, समाजकल्याण या पदाचा कार्यभार ८७ आय.सी.एस./ आय.ए.एस. अधिकाऱ्यांनी स्वीकारला आहे.

### स्थित्यंतरे

१९३२ - बॅकवर्ड क्लास वेल्फेअर डिपार्टमेंटची स्थापना.

१९५७ - २३ सप्टेंबर १९५७ रोजी पुणे येथे समाजकल्याण विभागाची स्थापना.

१९८२ - समाजकल्याण विभागातून आदिवासी कल्याण विभाग वेगळा.

१९९१ - समाजकल्याण विभागातून महिला व बालविकास विभाग वेगळा.

१९९९ - समाजकल्याण विभागातून अपंग कल्याण विभाग वेगळा.


२००० - समाजकल्याण विभागातून विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग वेगळा.

२००१ - २००१ पासून सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग म्हणून हा विभाग कार्यरत आहे.

सद्य:स्थितीत सामाजिक न्याय विभागाच्या प्रशासकीय यंत्रणेचे सर्वोच्च प्रमुख सचिव, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग हे आहेत. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांच्या नियंत्रणाखाली मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर व लातूर हे ७ प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग तसेच ३५ साहाय्यक आयुक्त व ३४ जिल्हा समाजकल्याण अधिकारी (जिल्हा परिषद) कार्यरत आहेत.

### विविध योजना

सामाजिक न्याय विभागात वैयक्तिक व सामूहिक लाभाच्या ११७ योजना कार्यान्वित आहेत. मागासवर्गीयांसाठी २७१ वसतिगृहे कार्यरत आहेत. १००० क्षमतेची विभागीय स्तरावर, प्रत्येकी १ या प्रमाणे एकूण ७ वसतिगृहे सुरू करण्याचा निर्णय २००७ मध्ये घेतला गेला. त्यानुसार ही वसतिगृहे कार्यरत झाली आहेत. वसतिगृहांच्या क्षमतेअभावी मागासवर्गीय विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहणार नाहीत. ते आपले उच्च शिक्षण पूर्ण करू शकतील यासाठी प्रत्येकी १०० विद्यार्थी क्षमतेची एकूण १०० शासकीय वसतिगृहे सुरू करण्यात आली आहेत. सामाजिक न्याय विभागाच्या अनुदानावर कार्यरत असलेली २,३८८ वसतिगृहे आहेत. २६ जुलै २०११ च्या निर्णयान्वये शासनाने मुला-मुलींच्या शासकीय वसतिगृहाच्या सोयी-सुविधांमध्ये वाढ केली आहे. त्यानुसार ३२ प्रकारच्या सोयी-सुविधा विद्यार्थ्यांना देण्यात येत आहेत.




### निवासी शाळा

साफसफाई कामगारांच्या मुलांसाठी पुणे व नागपूर येथे २ निवासी शाळा कार्यरत आहेत. स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुसूचित जातीच्या १६ प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा कार्यरत आहेत. अनुदानित ९७३ विजाभज आश्रमशाळा राज्यात कार्यरत आहेत. यात ऊसतोड कामगारांच्या २ आश्रमशाळा आहेत तर १ विद्यानिकेतन आश्रमशाळा आहे. सामाजिक कार्याचे प्रशिक्षण देणारी ५२ समाजकार्य महाविद्यालये ही सामाजिक न्याय विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत आहेत. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी १ या प्रमाणे ३५३ ठिकाणी शासकीय निवासी शाळा सरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

पहिल्या टप्प्यात १०० शासकीय निवासी शाळा सुरू करण्यात येणार असून त्यातील ६० निवासी शाळा कार्यरत झाल्या आहेत. निवासी शाळेमध्ये ५ वी ते ७ वी पर्यंतच्या अनुसूचित जाती व नवबौद्ध मुला-मुलींना प्रवेश दिला जाणार असून मोफत भोजन, निवास व इतर आवश्यक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. इयत्ता ७ वी नंतर नैसर्गिक वाढीने इयत्ता १० वीपर्यंत प्रवेश देण्यात येणार आहे. सामाजिक न्याय विभाग एवढ्या मोठ्या प्रमाणात उपलब्ध करून देत असलेल्या पायाभूत शैक्षणिक सुविधांमुळे मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे सोयीस्कर झाले आहे.

### सामाजिक न्याय भवन

मागासवर्गीय समाजघटकांच्या विकासासाठी एकाच छताखाली सर्व सोईसुविधा देण्याच्या उद्देशाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनाच्या भव्य, सुसज्ज आणि बहुमजली इमारती ३४ जिल्ह्यांत बांधण्यात येत आहेत. यातील निम्म्यापेक्षा जास्त कार्यरत झाली आहेत. मागासवर्गीयांच्या कल्याणाच्या बहुविध योजना राबविणारी महामंडळाची व शासकीय कार्यालये एकाच छताखाली आली आहेत. समता आणि सामाजिक न्यायाच्या दृष्टीने देशात अग्रेसर असणाऱ्या महाराष्ट्राने सामाजिक न्याय भवनाच्या उभारणीतून विकासाचा नवा मानबिंदू निर्माण केला आहे.

### स्मारकांना साहाय्य

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या



ई-स्कॉलरशिप योजनेस केंद्र सरकारच्या माहिती-तंत्रज्ञान विभागाचा २०११-१२ या वर्षाचा ई-इंडिया पुरस्कार प्राप्त झाला आहे.

उन्नतीसाठी जीवन समर्पित केलेल्या महापुरुषांच्या विचारांचे, स्थळांचे जतन व संवर्धन व्हावे यासाठी सामाजिक न्याय विभाग अनेक स्मारकांना अर्थसाहाय्याच्या रूपाने मदत पुरवित आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चैत्यभूमी स्मारक, राष्ट्रीय स्मारक, (महाड, जि. रायगड), तसेच आंबवडे जि. रत्नागिरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक, येवला येथील सत्याग्रह स्मारक, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे स्मारक, घाटकोपर (मुंबई) व नागपूर, कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांचे मुखेड (जि. नाशिक) येथील स्मारक, भीमा कोरेगाव येथील महार बटालीयन शौर्याचे स्मारक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे संवर्धन करण्यासाठी नागपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेशन सेंटर बांधण्यासाठी २२ कोटी रुपये खर्चाच्या कामास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. या व इतर स्मारकांचे जतन व संवर्धनाचे काम सामाजिक न्याय विभाग करीत आहे. यातील काही स्मारकांचे काम अंतिम टप्प्यात आहे तर काहींचे बांधकाम पूर्ण होऊन ते अनुयायांसाठी खुले करण्यात आली आहेत.

### शिष्यवृत्ती

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी शालान्त परीक्षोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण, परीक्षा फीच्या शुल्काची रक्कम देणारी भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेत २०११ पासून विद्यार्थ्यांना थेट बँकेच्या माध्यमातून वैयक्तिक खात्यावर शिष्यवृत्तीची रक्कम जमा करण्यात येत आहे.

ही योजना ई-स्कॉलरशिप म्हणून नावारूपाला आली आहे. ई-स्कॉलरशिप योजना ही क्रांतिकारी ठरली असून त्यामुळे दुबार शिष्यवृत्ती येण्याच्या प्रकाराला आळा बसून शासनाच्या लाखो रुपयांची बचत झाली आहे. शिष्यवृत्ती वाटपात पारदर्शकता, अचूकता व वेग प्राप्त झाला आहे. राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना ही २०१२ पासून ऑनलाइन करण्यात आली आहे.

### कालानुरूप बदल

कल्याणकारी योजना, उपक्रम राबविण्यासाठी सामाजिक न्याय विभागाने आपल्या योजनांमध्ये कालानुरुप बदल केले. २०१०-११ पासून भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेच्या निर्वाहभत्त्यात वाढ व पालकांच्या उत्पन्न मर्यादेत १ लाखावरून २ लाखांपर्यंत वाढ करण्यात आली. आंतरजातीय विवाह केलेल्या मागासवर्गीय दाम्पत्यास पूर्वी २५ हजार प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येत होते, त्यात वाढ करून ते ५० हजार करण्यात आले. परदेशात शिक्षणासाठी दरवर्षी २५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येत होती. त्यात वाढ करून ती ५० विद्यार्थ्यांना देण्यात येत आहे.

### स्वाभिमान योजना

दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजनेच्या लाभार्थ्यांना पॉवर टिलर देण्याच्या योजनेत मागासवर्गीय समाजघटकांच्या मागणीनुसार बदल करण्यात आला असून आता पॉवर टिलरऐवजी मिनी ट्रॅक्टर व त्याच्या उपसाधनांचा पुरवठा केला जाणार आहे. दादासाहेब गायकवाड सबळीकरण योजनेत ४,८७२ हजार भूमिहिनांना जमिनी उपलब्ध करून दिल्या आहेत. मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी काम करीत असलेल्या व्यक्ती व संस्थांना दलित मित्र पुरस्काराने सन्मानित करण्यात येत होते. या पुरस्काराच्या नावात बदल करून या पुरस्काराचे नाव डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार करण्यात आले आहे.

मागासवर्गीय व अपंग विद्यार्थ्यांचे परिपोषण अनुदान रु. ६३० वरून रु. ९०० करण्यात आले आहे. दलित वस्ती सुधारणा योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या निधित लोकसंख्येच्या प्रमाणात वाढ करण्यात आली आहे. कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्वाभिमान व सबळीकरण व योजनेंतर्गत खासगी जमीन शासनाच्या रेडी रेकनर दराच्या दुप्पट व कमाल ३ लाख प्रति एकर या दराप्रमाणे खरेदी करून लाभार्थ्यांना वाटप करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.

### रमाई घरकुल योजना

अनुसूचित जातीसाठी स्वतंत्र घरकूल योजना राबविण्यात येत आहे. या योजनेचा शुभारंभ यवतमाळ जिल्ह्यातील अर्णी येथे २०१० मध्ये करण्यात आला. या योजनेस रमाई आवास योजना असे नाव देण्यात आले आहे. या योजनेत अंदाजे १,२८,००० इतकी घरे बांधून पूर्ण झाली आहेत.

अनुसूचित जाती व नवबौद्ध मुला /मुलींसाठी विभागीय स्तरावर औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नाशिक, अमरावती, नागपूर, औरंगाबाद व लातूर येथील प्रशिक्षण संस्थेचे बांधकाम पूर्ण झाले आहे.

पुणे येथील यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी या संस्थेमध्ये ५० मागासवर्गीय विद्यार्थ्यांना राष्ट्रीय तसेच राज्यस्तरावरील स्पर्धा परीक्षेसाठी प्रशिक्षण देण्यात येते. आयआयटी परीक्षेच्या तयारीसाठी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मुंबईच्या आयआयटी एन्स-पेस (पीएसीई) संस्थेत प्रशिक्षण देण्यात येते.




### अपंग कल्याण

अपंगांच्या कल्याणासाठी विविध कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. अपंगांसाठी सुरू करण्यात आलेल्या शिक्षण संस्थांना १०० टक्के अनुदान देण्यात येते. अपंगांना स्वयंरोजगार करता यावा यासाठी अपंग वित्त व आर्थिक विकास महामंडळामार्फत कर्ज देण्यात येते. या कर्जासाठी लागणारी उत्पन्न मर्यादा रुपये १ लाख इतकी करण्यात आली. कर्जाची मर्यादा

पालात राहणाऱ्या विमुक्त जाती व भटक्या जमातींना मूळ प्रवाहात आणून त्यांचे राहणीमान उंचावण्यासाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना २०१२ पासून राबविण्यात येत आहे.

२५ हजारांवरून दीड लाख रुपये करण्यात आली असून त्यात ३० टक्के सबसिडीचा अंतर्भाव आहे. समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहात एकूण जागांच्या १५ टक्के जागा सामाजिक न्याय मंत्र्यांसाठी राखीव असतात. त्यातील ५ टक्के जागा आता अपंगांसाठी राखीव ठेवण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय मंत्री शिवाजीराव मोघे यांनी घेतला.

अत्याधुनिक वसतिगृहांची स्थापना करून अपंग विद्यार्थ्यांना सक्षम करण्यात करण्यात येणार आहे. समाजातील उपेक्षित व वंचित घटकांना न्याय देण्याची सरकारची भूमिका आहे. राज्यातील अपंगांचा अनुशेष भरून काढण्यासाठी प्रयत्न करण्यात येते. १० हजार अपंगांचा अनुशेष भरून काढण्यात आला.

सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारीतील महामंडळामार्फत अधिकाधिक युवकांना स्वयंरोजगारासाठी कर्जवाटप करण्यात येते. शासनाने महामंडळाचे भागभांडवल वाढविण्यासाठी या महामंडळाला ३३० कोटी एवढा निधी दिला आहे. महामंडळामार्फत होणाऱ्या कर्जवाटपात पारदर्शकता यावी यासाठी सोडत पद्धत (लॉटरी) अवलंबविण्यात येत आहे. महामंडळामार्फत देण्यात आलेले ४२१.१७ कोटींचे कर्ज व्याजासह माफ करण्याचा क्रांतिकारी निर्णय घेण्यात आला.

**ऑनलाइन जातपडताळणी**

पुणे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थे (बार्टी) मार्फत राज्यात ऑनलाइन जातपडताळणीचा प्रयोग राबविण्यात येत आहे. त्यासाठी संकेतस्थळाची निर्मिती करण्यात आली आहे. ऑनलाइन जातपडताळणी उपक्रमाची सुरुवात पुणे व मुंबई या ठिकाणाहून करण्यात आली आहे.

**व्यसनमुक्ती साहित्य संमेलन**

देशातील पहिले व्यसनमुक्ती साहित्य संमेलन पुणे येथे घेऊन सामाजिक न्याय विभागाने व्यसनमुक्त समाज निर्माण करण्याच्या दिशेने पाऊल टाकले आहे. युवकांनी व्यसनापासून दूर राहावे आणि देशात सशक्त तरुणपिढी तयार व्हावी, कौटुंबिक स्वास्थ्य टिकावे यासाठी शासनाने २०११ या वर्षी व्यसनमुक्ती धोरण जाहिर करून आपले पुरोगामित्व सिद्ध केले आहे.

**ई-गव्हर्नन्स**

शासनाच्या ई-गव्हर्नंस प्रकल्पाला बळकटी देण्यासाठी सामाजिक न्याय विभागाने पेपरलेस ऑफिस संकल्पनेचा अवलंब केला. विभागीय कार्यालयांपासून ते जिल्हा कार्यालयांना ई-मेलमार्फत पत्रव्यवहार करण्याची सक्ती करण्यात आली. प्रत्येक कार्यालयांचे ई-मेल आयडी निर्माण करण्यात आले. प्रत्येक कार्यालयाला इंटरनेट कनेक्शनसह सुसज्ज संगणक संच देण्यात आले.

माहिती-तंत्रज्ञानाच्या युगात सामाजिक न्याय विभाग इतर विभागांपेक्षा दोन पावले पुढे असणार आहे. वैयक्तिक लाभाच्या सर्व योजनांचे लाभ बँकेमार्फत दिले जातील. आधार कार्डाशी या योजना जोडल्या जाणार असून त्यामुळे बोगस लाभार्थ्यांकडून लाभ लाटण्याचे प्रकार बंद होतील.

**स्वतंत्र न्यायालये**

राज्याच्या व्यसनमुक्ती धोरणास भविष्यात बळकटी प्राप्त होणार असून शैक्षणिक संस्था, शासकीय महाविद्यालयांच्या माध्यमातून व्यसनमुक्ती जनजागृती करण्यावर भर राहणार आहे. व्यसनमुक्ती समुपदेशनासाठी संस्थांना अनुदान देण्यात येईल.

अनुसूचित जाती/जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत खटल्यांचा निकाल तातडीने लागावा याकरिता महसूल विभागस्तरावर सहा स्वतंत्र न्यायालयांची स्थापना करण्यात येणार आहे. त्यामुळे दलित अत्याचारांची प्रकरणे लवकरात लवकर मार्गी लागण्यास मदत होईल.

आर्थिक अडचणीत सापडलेल्या मागासवर्गीय गृहबांधणी योजनांना कर्जमुक्त करण्यासाठी भविष्यात धोरणात्मक निर्णय घेणार आहे.

**भविष्यातील धोरण**

१) **वैयक्तीक सक्षमीकरण :** सामाजिक घटकांतील प्रत्येक लाभार्थ्याच्या शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक व वैचारिक/मानसिक वैयक्तीक सक्षमीकरणावर भर.

२) **अनुसूचित जातीच्या महिलांचे सक्षमीकरण :** महिलांच्या उन्नतीसाठी सामाजिक उपक्रम राबविण्यास या विभागाचा पुढाकार असेल.

३) **युवकांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी**




**करणे :** मागासवर्गीय युवकांना उद्योग, व्यवसाय किंवा नोकरीच्या रूपाने आर्थिक स्वावलंबन करणाऱ्या योजना बंद पडल्या आहेत. या योजनांचे पुनरुज्जीवन करून आर्थिक स्वावलंबन योजनांवर भर देण्यात येईल.

४) **प्रशासनात युवक/युवतींचा वाढता सहभाग :** मागासवर्गीय युवक/युवतींना केंद्रीय व राज्य प्रशासनात अधिकार पदावर काम करण्याची संधी मिळावी यासाठी तात्पुरते दोन महिन्यांचे प्रशिक्षण वर्ग न घेता प्रशासनात नोकरी लागेपर्यंत स्थायी प्रशिक्षण वर्ग घेण्यात येतील.

५) **सामाजिक अंकेक्षण ( social audit):** सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांचे सामाजिक अंकेक्षण करण्यात येईल.

६) **सूक्ष्म नियोजन :** (micro planing) : सामाजिक न्याय विभागाने लाभ दिलेल्या लाभार्थ्यांचे सर्वेक्षण, लाभार्थीच्या सामाजिक परिस्थितीवर या योजनांचा झालेला परिणाम याचे मूल्यमापन केले जाईल. त्यानुसार सध्या दिल्या जाणाऱ्या योजनांमध्ये आवश्यक बदल केले जातील.

७) **सक्षम व बळकट प्रशासन :-** प्रशासन हे शासन निर्णयाची अंमलबजावणी करीत असते. अंमलबजावणी प्रभावी व पारदर्शक आणि गतिमान होणे आवश्यक आहे. सामाजिक न्याय विभाग हा समाजातील ५२ टक्के लोकसंख्येशी प्रत्यक्ष निगडित असल्याने, प्रशासकीय यंत्रणा संवेदनशीलसुद्धा असणे गरजेचे आहे. यामुळेच प्रशासकीय यंत्रणा प्रभावी, पारदर्शक, गतिमान आणि संवेदनशील तसेच तांत्रिकदृष्ट्या सबळ होण्याच्या दृष्टीने कालबद्ध प्रशिक्षण शिबिरे आयोजित केली जातील.

संपर्क : ९४२२५२३३९२

सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृहांचा प्रवेश यापुढे ऑनलाइन होणार आहे.
भविष्यात अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांना राज्यात १० लाख घरे उपलब्ध होतील.

# समृद्धी आणि प्रगती




**सामाजिक न्याय विभागाच्या अंतर्गत संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ ही महामंडळे कार्यरत आहेत. त्यांच्यामार्फत समाजातील उपेक्षित, दुर्बल घटकांच्या आर्थिक उन्नतीसाठी विविध प्रकारच्या अर्थसाहाय्य करणाऱ्या कर्ज योजना राबविण्यात येतात. या योजनांचा लाभ घेऊन अनेक व्यक्ती स्वत:च्या पायावर उभ्या राहिल्या आहेत आणि त्यांचा सामाजिक दर्जाही वाढला आहे.**

## संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ

चर्मकार समाजाच्या विकासासाठी संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाची स्थापना १ मे १९७४ रोजी करण्यात आली. अनुसूचित जातीतील चर्मकार समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व दारिद्र्यरेषेखाली जीवन जगणाऱ्या व्यक्तींना त्यांचे जीवनमान उंचाविण्यासाठी, समाज प्रवाहात त्यांना मानाचे स्थान मिळण्यासाठी महामंडळामार्फत विविध योजना राबविण्यात येतात.

महामंडळ स्थापनेच्या वेळी महामंडळाचे अधिकृत भागभांडवल रु. ५ कोटी मंजूर करण्यात आले. सध्या महामंडळाचे अधिकृत भागभांडवल ७३.२१ कोटींपर्यंत वाढविण्यात आले आहे.

राज्यात महामंडळाची चार केंद्रे असून उत्पादित चर्मवस्तूंचा पुरवठा शासकीय विभागास करण्यात येतो.

**महामंडळाच्या योजना**

१) ५० टक्के अनुदान
२) बीजभांडवल
३) प्रशिक्षण

**राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ, (एन.एस.एफ.डी.सी.) नवी दिल्ली यांच्या योजना**

१) मुदती कर्ज
२) सूक्ष्म पतपुरवठा
३) महिला समृद्धी
४) महिला किसान

**संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळामार्फत आतापर्यंत एकूण ५२,११३ लाभार्थ्यांना कर्जवाटप करण्यात आले आहे. प्रशिक्षण संस्थांमार्फत स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी दरवर्षी विविध व्यवसायांसाठी महामंडळामार्फत प्रशिक्षण देण्यात येते.**

५) शैक्षणिक कर्ज

**योजनांसाठी निकष**

१. अर्जदार हा अनुसूचित जातीतील चर्मकार समाजाचा असावा.

२. अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

३. अर्जदाराचे वय १८ वर्षे असावे.

४. अर्जदाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न राज्य शासनाच्या योजनेसाठी- ग्रामीण व शहरी भाग रु. १ लाख आणि एनएसएफडीसी योजनेसाठी ग्रामीण भाग रु. ८१,०००/- व शहरी भाग रु.१,०३,०००/- पर्यंत असावे.

५. जातीचा व उत्पन्नाचा दाखला तहसीलदार किंवा तत्सम सक्षम प्राधिकाऱ्याने दिला असावा.

६. अर्जदाराने या महामंडळाकडून अथवा इतर कोणताही शासकीय उपक्रमाकडून आर्थिक लाभ घेतलेला नसावा.

**गटई स्टॉल योजना**

गटई कारागिरांना पत्र्याचे स्टॉल देण्याची योजना १०० टक्के अनुदान तत्त्वावर समाज कल्याण पुणे व लिडकॉम यांच्यामार्फत संयुक्तरित्या राबवण्यात येते.

आतापर्यंत १२,७६५ गटई कारागिरांना मोफत स्टॉलचे वाटप करण्यात आले आहे.

महामंडळाचे संपूर्ण कामकाज ऑनलाइन करण्यासाठी संगणकीकरण प्रगतिपथावर आहे. या महामंडळाची सर्व जिल्हा स्तरावर जिल्हा कार्यालये सुरू करण्यात आली आहेत.

**महामंडळाने मागील तीन वर्षांत घेतलेले निर्णय**

१. शैक्षणिक कर्ज योजना लागू करण्यात आली.

२. उत्पन्नाची मर्यादा वाढवण्यात आली.

३. ३१ मार्च २००८ अखेर थकीत कर्ज माफ करण्यात आले.

४. जामीनदाराच्या कार्यालयाचे हमीपत्र घेण्याची अट शिथील करण्यात आली.

## महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ

अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल तसेच सफाई कामगार व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांचा सर्वांगिण विकास करून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाची १० जुलै, १९७८ रोजी स्थापना करण्यात आली. महामंडळाचे सध्याचे अधिकृत भागभांडवल रु. ५०० कोटींचे आहे.

या महामंडळाच्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी विभागीय स्तरावर प्रादेशिक कार्यालये असून जिल्हा स्तरावर जिल्हा कार्यालये आहेत.

**विविध योजना**

दारिद्र्यरेषेखालील अनुसूचित जातीच्या सदस्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी स्वयंरोजगाराच्या योजना या महामंडळामार्फत राबविण्यात येतात. त्यात लहान उद्योगधंदे सुरू करण्यासाठी ५०% अनुदान योजना असून सूक्ष्म पतपुरवठा योजना अंतर्गत रु. ५,०००/- ते ५०,०००/- पर्यंत अत्यल्प दराने आर्थिक साहाय्य उपलब्ध करून देण्यात येते.

मध्यम स्वरूपातील उद्योगधंद्यासाठी बीज भांडवल मुदती कर्ज तसेच ब्रीज लोन योजनेचा समावेश आहे. या अंतर्गत रु. ५०,०००/- ते रु. ५ लाखांपर्यंतचे आर्थिक साहाय्य उपलब्ध करून दिले जाते; तसेच काही मोठे व्यवसाय सुरू करण्यासाठी High Cost Project अंतर्गत रु. ३० लाखांपर्यंतचे कर्ज उपलब्ध करून दिले जाते.

**महिला सक्षमीकरण**

विधवा, परित्यक्ता तसेच देवदासींचे पुनर्वसन करण्यासाठी काही विशेष योजना राबविण्यात येत आहेत. यामध्ये 'महिला समृद्धी योजना' आणि 'महिला किसान योजना' यांचा समावेश आहे.

**व्यवसायाभिमुख प्रशिक्षण**

स्वयंरोजगारासाठी आवश्यक ज्ञान तसेच

## संधी आणि साध्य

### चप्पल कारागिरास साहाय्य

या महामंडळाने दिलेल्या १ लाख कर्जाच्या आर्थिक साहाय्यामुळे दत्तात्रेय मारुती पोवार (मु.पो. कळे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर) यांना कोल्हापुरी चप्पल बनवण्याच्या घरगुती व्यवसायाची वाढ आणि विस्तार उत्तम प्रकारे करता येणे शक्य झाले आहे. या व्यवसायाशी संबंधित साहित्य, व्यवसाय करण्यासाठी जागा व विशेष प्रशिक्षण घेणे त्यांना महामंडळाच्या कर्जामुळे घेता आले. यापूर्वी त्यांची रोजची मिळकत रु. २०० ते २५० होती, ती आता दिवसाला ५०० ते १ हजारपर्यंत होत आहे.



### गटई कारागिराला स्टॉल

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळामुळे अंजनाबाई नारायण साठे (रा. ताजनगर, गल्ली नं. ३, तुकडोजी पुतळा, नागपूर) यांना ३० सप्टेंबर २०१२ रोजी पत्र्याचा स्टॉल मिळाला. त्यामुळे त्या या स्टॉलमध्ये चामड्याच्या विविध वस्तू बनवून विक्रीसाठी ठेवतात. त्यांच्या मालाचा खप व विक्रीत वाढ होऊन त्या स्वावलंबी झाल्या आहेत.

**महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या विविध स्वयंरोजगाराच्या योजनांतर्गत ९,०३,९४९ लाभार्थींना एकूण रु. ४१७३३.२६ लक्षाचे कर्ज देण्यात आले आहे.**

तांत्रिक कौशल्यसुद्धा असणे आवश्यक असते. त्या अनुषंगाने हे महामंडळ व्यवसायाभिमुख प्रशिक्षण उपलब्ध करून देते.

हे महामंडळ राष्ट्रीय अनुसूचित जाती आर्थिक विकास महामंडळ आणि राष्ट्रीय सफाई कर्मचारी आर्थिक विकास महामंडळ यांची वाहिनीकृत यंत्रणा म्हणून काम करते. हे राष्ट्रीय महामंडळ दारिद्र्यरेषेखालील अनुसूचित जातीच्या आणि सफाई कर्मचारी वर्गाच्या पात्र व्यक्तींना स्वयंरोजगार / प्रशिक्षण/ उच्च शिक्षणासाठी अत्यल्प दराने कर्ज स्वरूपात अर्थसाहाय्य उपलब्ध करून देते. हे कार्य महामंडळामार्फत राज्यात पार पाडण्यात येत आहे.

प्रशिक्षण योजनेंतर्गत ८४,१२४ लोकांवर रु. ३०५६.६८ लाख अनुदान स्वरूपात खर्च करण्यात आले आहेत. उच्चशिक्षणासाठी ६८ विद्यार्थ्यांवर रु. ५१.२१ लक्ष अर्थसाहाय्य उपलब्ध करून देण्यात येत आहे.

महामंडळाच्या अनेक योजनांचा लाभ येऊन अनेक व्यक्ती व्यावसायिक झाले. उद्योग क्षेत्रात नव्यानेच प्रवेश केल्यामुळे, अनुभव नसल्यामुळे अनेक लाभार्थ्यांनी धडाडीने उद्योग क्षेत्रात प्रवेश केला; परंतु धंद्यात नफ्याऐवजी नुकसान होत गेले. त्यामुळे शेवटी त्यांचे उद्योगधंदे बंद पडले, ते कर्जबाजारी झाले. अशा सर्व लोकांना पुन्हा एकदा नव्याने संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने ३१ मार्च, २००८ पर्यंत थकीत कर्ज माफ करण्याचा निर्णय घेतला आहे.

आतापर्यंत कर्ज घेतलेल्या लाभधारकांनी कर्जाची परतफेड न केल्यामुळे बँकांकडून तसेच केंद्रीय महामंडळांकडून नवीन लाभार्थ्यांना कर्ज नाकारण्यात येत आहे. त्यामुळे सर्व लाभार्थ्यांनी कर्जाची परतफेड वेळेवर करण्याचे आवाहन महामंडळामार्फत वेळोवेळी करण्यात येत आहे. या आवाहनाला लाभार्थ्यांनी प्रतिसाद देणे गरजेचे आहे. वेळे-वर कर्जाची परतफेड केल्याने अर्जदारांना नवीन कर्ज मंजूर करण्याबाबत बँका तसेच केंद्रीय महामंडळाच्या धोरणात बदल होऊ शकतो.

### सर्वांगीण विकास करणारी यंत्रणा

केवळ कर्ज वाटणारी नव्हे, तर सर्वांगीण विकास करणारी यंत्रणा होण्याचा महामंडळाचा मानस आहे. त्यासाठी लाभार्थ्यांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना बाजारपेठ मिळवून देणे, बाजारपेठेबद्दल आवश्यक मार्गदर्शन, शिबीरे/ मेळावे आयोजित करण्यात येतात.

प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करून महामंडळाची सर्व जिल्हा कार्यालये व प्रादेशिक कार्यालये मुख्य कार्यालयाशी वेबसाइटच्या माध्यमातून जोडणे आणि संपूर्ण कामकाजाची प्रक्रिया ऑनलाइन करणे यासाठी कारवाई करण्यात येत आहे.

## महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ

२३ एप्रिल, १९९९ रोजी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली.

इतर मागासवर्गीयांचे सर्वांगीण कल्याण व विकासासाठी विविध योजना राबविण्यासाठी वित्त पुरवठा करणे हे या महामंडळाचे उद्दिष्ट आहे. स्वयंरोजगाराला चालना देऊन त्यांची आर्थिक स्थिती उंचावणे, त्यांच्या उत्पादन निर्मितीला बाजारपेठ उपलब्ध करून देणे याबाबी महामंडळाच्या उद्दिष्टांमध्ये अंतर्भूत आहे. सध्या या महामंडळाचे अधिकृत भागभांडवल २५० कोटी रुपये आहे.

उत्पन्न मर्यादा - ग्रामीण भाग रु. ८१,०००/- व शहरी भाग रु. १,०३,०००/-

### महामंडळाच्या योजना

### २०% बीजभांडवल

या योजनेंतर्गतचा निधी राज्य शासनाकडून उपलब्ध होत असून त्याअंतर्गत एकूण ८६४४ लाभार्थीना रु. १९.८ कोटी इतक्या कर्ज रकमेचा लाभ राष्ट्रीयीकृत बँकांमार्फत करून देण्यात आला आहे.

### राष्ट्रीय महामंडळाच्या योजना

सूक्ष्म पतपुरवठा, महिला समृद्धी, स्वर्णिमा, मुदती कर्ज, ४५% मार्जिन मनी, शैक्षणिक कर्ज.

वरील योजनेंतर्गतचा निधी राष्ट्रीय मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळ, नवी दिल्ली यांच्यामार्फत प्राप्त होत असून एकूण १८,९८६ लाभार्थीना रु. १२१.५५ कोटी इतक्या कर्ज रकमेचा लाभ देण्यात आला आहे. (पत्ता : ४था मजला, प्रशासकीय इमारत, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई ४०० ०७१ दूरध्वनी : ०२२ - २५२९ ९६८५ व २५२७ ५३७४.)

## संधी आणि साध्य

### गॅस एजन्सीचा मालक

मदन राजाराम बोरकर, (रा. रामेश्वरनगर, भुसावळ, जिल्हा जळगाव) यांनी तीन वर्षांपूर्वी स्वत:चा व्यवसाय उभा करण्यासाठी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे कर्ज मिळावे म्हणून अर्ज केला. जिल्हा कार्यालय जळगाव येथे गॅस एजंसीसाठी कर्ज प्रकरण सादर केले. त्यानुसार त्यांना एनएसएफडीसी योजनेंतर्गत रक्कम २,५०,००० रुपये मंजूर करण्यात आले. सध्या त्यांचा गॅस एजंसीचा व्यवसाय भरभराटीस आला असून त्यांच्याकडे १८ पुरुष व २ महिला कर्मचारी कार्यरत आहेत.

### सायकल दुकानदार

बिभीषण मारोती ढाले (जिल्हा लातूर येथील मन्नाथपूर) हे सन २००४ पूर्वी मजुरीने काम करीत होते. स्वत:चा व्यवसाय असावा, हे त्यांचे स्वप्न होते. त्यामुळे महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या लातूर येथील कार्यालयात त्यांनी सायकल दुकानासाठी कर्ज मिळावे म्हणून बीजभांडवल योजनेंतर्गत अर्ज सादर केला. बीजभांडवल योजना बँकेच्या सहकार्याने राबविण्यात येते. त्यांना सन २००४ मध्ये या योजनेंतर्गत रु. १,००,०००/- कर्ज मंजूर झाले. या भांडवलासह ढाले यांनी आपला व्यवसाय सुरू केला. ढाले यांनी महामंडळाचे सर्व कर्ज फेडले आहे. त्यांच्या व्यवसायात वाढसुद्धा झाली आहे. सध्या त्यांच्याकडे सात ते आठ कामगार कार्यरत आहेत. सायकल दुरुस्तीबरोबर सायकलसाठी लागणाऱ्या छोटेमोठ्या पार्टस्‌चा विक्री व्यवसायसुद्धा ते करीत आहेत.

दलित आणि दुर्बल घटकांतील विद्यार्थी यांची आर्थिक स्थिती कमकुवत असल्यामुळे महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळामार्फत उच्च शिक्षणासाठी रु. २० लाखांपर्यंतचे कर्ज अत्यल्प दराने उपलब्ध करून देण्यात येते.




**लाभार्थींची अर्हता**

- लाभार्थी इतर मागासवर्गीय असावा व महाराष्ट्राचा सर्वसाधारण रहिवासी असावा.
- त्याचे वय १८ ते ५० वर्षे असावे. (स्वयं-सक्षम योजना वगळून)
- लाभार्थी कोणत्याही बँकेचा, महामंडळाचा किंवा वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा.
- कुटुंबातील एकाच व्यक्तीस एकाच योजनेचा लाभ घेता येईल.

महामंडळाने यापूर्वी ग्रामीण भागातील स्वयंरोजगाराला चालना देण्यासाठी महिलांना स्वयंरोजगार उपलब्ध करून सक्षम करण्यासाठी, अल्पसंख्याक धोरणांतर्गत अल्पसंख्याक लाभार्थींना स्वयंरोजगार उपलब्ध करून त्यांचा आर्थिक विकास करण्यासाठी आणि इतर मागासवर्गातील अल्प उत्पन्न असलेल्या कुटुंबातील व्यक्तींच्या मुलांनी उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी कर्जपुरवठा करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

ज्या लाभार्थींना कर्जपुरवठा करावयाचा त्यांच्यासाठी कौशल्य आधारित प्रशिक्षण तसेच त्यांनी उत्पादित केलेल्या मालाला बाजारपेठ उपलब्ध व्हावी, या हेतूने राष्ट्रीय, राज्य व जिल्हा पातळीवरील मेळावे व प्रदर्शने यांत लाभार्थींना महामंडळामार्फत स्टॉल उपलब्ध करून दिले जातात.

इतर मागासवर्गीयांच्या कल्याणाच्या दृष्टीने व महाराष्ट्राची शहरांतर्गत वाढत असलेली लोकसंख्या, ग्रामीण भागात उपलब्ध होणारे अल्प रोजगार तसेच कृषी क्षेत्रावर मिळणारे तुटपुंजे उत्पन्न व त्यातून ग्रामीण भागातून शहराकडे होत असलेले इतर मागासवर्गीयांचे स्थलांतर लक्षात घेऊन महामंडळ पुढील पाच वर्षांत अल्प उत्पन्न गटातील इतर मागासवर्गीयांचे सक्षमीकरण व्हावे यासाठी कार्यरत राहणार आहे.

**राष्ट्रीय महामंडळाच्या प्रस्तावित योजना**

सक्षम योजना, शिल्प संपदा, कृषी संपदा.

**- शरद बी. लोंढे**

संपर्क : ९६१९५०००१५

## वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ

गावगाड्याबाहेर आजवर बहुतांश जीवन व्यतीत करणाऱ्या तसेच पिढ्यांपिढ्या पाठीवर आपले बिऱ्हाड घेऊन भटकंती करणाऱ्या समाजाचा आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकास करण्याकरिता वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाची स्थापना ८ फेब्रुवारी, १९८४ रोजी करण्यात आली.

शासनाने महामंडळाचे अधिकृत भागभांडवल रु. २०० कोटी मंजूर करून दिले असून त्यापैकी १६१.२९ रु. कोटी भागभांडवल विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विकासाकरिता उपलब्ध करून दिले आहे.

आर्थिक उन्नतीकरिता ४% व्याजदराने व्यवसायाकरिता आर्थिक साहाय्य उपलब्ध करून देऊन भटक्या विमुक्तांना स्थिर होण्याकरिता, व्यवसाय करण्याकरिता बीजभांडवल निधी उपलब्ध करून दिला जातो.

**योजना -**

अ) बीजभांडवल कर्ज - या योजनेंतर्गत रु. ५,००,०००/- लाख प्रकल्प मर्यादेच्या २५% रक्कम बीजभांडवल रूपाने, ४% व्याजदराने २५% रक्कम महामंडळाकडून दिली जाते व ७५% रक्कम राष्ट्रीयीकृत बँकेकडून दिली जाते. महामंडळाचे कर्ज ६० हप्त्यांमध्ये वसूल केले जाते. किराणा दुकान, कापड दुकान, दुग्ध व्यवसाय, शेळी मेंढी पालन, डॉक्टर, वकील, कृषी व्यवसाय, ट्रक, टेम्पो, टॅक्सी, रिक्षा इत्यादी व्यवसायांकरिता कर्ज उपलब्ध करून दिले जाते.

**ब) थेट कर्ज योजना**

या योजनेंतर्गत छोट्या व्यवसायाकरिता रु. २५,०००/- महामंडळाकडून कर्ज दिले जाते. यामध्ये कर्ज वसुलीचा तीन वर्षांचा कालावधी असतो व २ टक्के वार्षिक व्याजदर आकारला जातो.

**अटी -**

लाभधारक हा राज्याचा रहिवासी असावा.

## संधी आणि साध्य

### आशेचा किरण

नागपूरच्या हनुमाननगर येथील सतीश गोपाळ रुईकर याला झेरॉक्स मशिन चालविण्याचा व त्या व्यवसायाचा थोडा पूर्वानुभव होता. त्याला सुदैवाने जागाही उपलब्ध झाली आणि महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळाने कर्ज दिले. या कर्जातून सतीशने नवीन झेरॉक्स मशिन घेतली. त्यामुळे छायाप्रतीचा दर्जा वाढला. यामुळे त्याच्याकडे गिऱ्हाईकांची वर्दळ आणि उत्पन्नही वाढले. पूर्वी झेरॉक्सच्या दुकानात तासाच्या हिशोबाने सतीश काम करायचा तेव्हा त्याला महिना रु. २९००/- इतके उत्पन्न मिळायचे, परंतु आज त्यास महिना रु. १०,०००/- इतके उत्पन्न मिळत आहे.



### छंदाचे रूपांतर व्यवसायात

नंदुरबार जिल्ह्यातील शहादा तालुक्याच्या ग्रामीण भागातील कल्पना सुनील पाटील ही ब्युटी पार्लरचा व्यवसाय छंद म्हणून करायची. परंतु या छंदाला व्यावसायिक स्वरूप देता येईल याची जाणीव तिला झाली. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळाने कर्ज रूपाने दिलेल्या आर्थिक साहाय्यामुळे कल्पना उत्तम दर्जाचे ब्युटी पार्लर उभारू शकली. त्यामुळे तिच्याकडे येणाऱ्या महिलांचा ओघ वाढला आहे. आज कल्पनाच्या मदतीला चार मुली असून त्याही स्वत: अर्थार्जन करीत आहेत.

**राष्ट्रीय मागासवर्ग वित्तीय व विकास महामंडळाच्या योजनेंतर्गत १७२४४ लाभधारकांना एकूण ६१.७४ रु. कोटी कर्जवाटप करण्यात आले.**



## रिक्षा मालक

बालकृष्ण गणपती भोकरे, (जिल्हा लातूर) यांचे वार्षिक उत्पन्न रु. ३९,०००/- रुपये होते. महामंडळाच्या बीजभांडवल कर्ज योजनेंतर्गत ऑटोरिक्षा खरेदी करण्याकरिता महामंडळाचे १८,७८२/- रुपये व बँकेचे ५६,३४६/- रुपये कर्ज स्वरूपात मिळाले. स्वत:च्या रिक्षाचा व्यवसाय सुरू झाल्याने त्यांच्या वार्षिक उत्पन्नात वाढ होऊन ते १ लाख रुपये झाले आहे.

## रेडीमेड कपड्यांचा व्यवसाय

विजया विजय भोईर, (पो. चोंढी, ता. अलिबाग, जिल्हा रायगड) यांना वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाकडून बीजभांडवल योजनेंतर्गत रु. ५० हजार व राष्ट्रीयीकृत बँकेकडून रु. १ लाख ५० हजार असे एकूण रु. २ लाख रुपयांचे कर्ज रेडीमेड कापड विक्री या व्यवसायाकरिता देण्यात आले. हा व्यवसाय सुरू केल्यानंतर भोईर यांच्या वार्षिक उत्पन्नात वाढ होऊन ते १,५०,०००/- रुपये एवढे झाले आहे.



## पॅकिंग बॉक्स/ ऑफिस फाईल व्यवसाय

नाशिक जिल्ह्यातील कुंडलिक रावजी दातीर यांना वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळामार्फत राष्ट्रीय मागासवर्ग वित्तीय व विकास महामंडळ, नवी दिल्ली यांचे पॅकिंग बॉक्स/ ऑफिस फाईल या व्यवसायाकरिता रु. ४७,५००/- कर्ज मिळवून देण्यात आले. हा व्यवसाय सुरू करण्यापूर्वी कुंडलिक यांचे वार्षिक उत्पन्न रु. २० हजार होते; त्यानंतर त्यांच्या वार्षिक उत्पन्नात वाढ होऊन ते रु. ७० हजार एवढे झाले आहे.

सक्षम अधिकाऱ्याने दिलेला विमुक्त जाती किंवा भटक्या जमातीचा जातीचा दाखला व वार्षिक उत्पन्न रु. १.०० लाख एवढे असावे. तांत्रिक शिक्षण, प्रशिक्षण घेतल्यास प्राधान्य देण्यात येईल, तसे प्रमाणपत्र जोडावे. ज्या ठिकाणी व्यवसाय करावयाचा आहे त्या जागेच्या मालकीचे करारपत्र अथवा पुरावा असावा, रेशनकार्ड असावे. टेम्पो, रिक्षा व टॅक्सीकरिता आर.टी.ओ.कडील परवाना व वाहन चालक परवाना तसेच एक जामीनदार, सातबारा उतारा व एक जामीन समक्ष असणे आवश्यक आहे. अर्जदार हा १८ ते ४५ वयाचा असावा.

**राष्ट्रीय मागासवर्ग वित्तीय व विकास महामंडळ, नवी दिल्ली यांच्या योजना**

१) **मुदती कर्ज** - या कर्ज योजनेची प्रकल्प मर्यादा रु. १० लाख असून ६% व्याजदराने कर्ज दिले जाते.

२) **मार्जिन मनी कर्ज** - या कर्ज योजनेची प्रकल्प मर्यादा रु. १० लाख असून ५ टक्के दराने कर्ज दिले जाते.

३) **शैक्षणिक कर्ज** - या कर्ज योजनेची प्रकल्प मर्यादा रु. ५ लाख असून प्रतिवर्ष रु. १.२५ लाख याप्रमाणे कर्ज दिले जाते. या योजनेंतर्गत उच्च शिक्षणाकरिता तसेच वैद्यकीय शिक्षणाकरिता कर्ज उपलब्ध करून देण्यात येते.

४) **सक्षम कर्ज** - या योजनेची प्रकल्प मर्यादा रु. १० लाख आहे. व्याजदर रु. ५.०० लाखांपर्यंत ६% व त्यावरील कर्जाकरिता ८% आहे. कर्ज परतफेडीचा कालावधी ५ वर्षे आहे.

५) **शिल्प संपदा कर्ज** - या योजनेची प्रकल्प मर्यादा रु. १० लाख असून व्याजदर रु. ५.०० लाखांपर्यंत ६% व त्यावरील कर्जाकरिता ८ टक्के आहे.

६) **स्वर्णिमा कर्ज** - या कर्ज योजनेची प्रकल्प मर्यादा रु. ७५,०००/- असून या योजनेंतर्गत महिलांना विशेष प्राधान्य देण्यात येते. ५ टक्के व्याजदराने कर्ज दिले जाते.

७) **मायक्रो कर्ज** - या कर्ज योजनेची प्रकल्प मर्यादा रु. ५०,०००/- असून ५% व्याजदराने कर्ज दिले जाते.

८) **महिला समृद्धी कर्ज** - या कर्ज योजनेची प्रकल्प मर्यादा रु. ५०,०००/- असून ४ टक्के व्याजदराने कर्ज दिले जाते.

९) **कृषी संपदा** - या योजनेची प्रकल्प मर्यादा रु. ५०,०००/- आहे. व्याजाचा दर ४% आहे. कर्ज परत फेडीचा कालावधी ५ वर्षे असा आहे.

१०) **प्रशिक्षण योजना** - या योजनेंतर्गत ऑडीओ/व्हिडीओ रिपेअरिंग, प्लंबर, कृत्रिम

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळामार्फत आतापावेतो ७३,६२५ भटक्या विमुक्तांना १७२.६६ कोटी रुपयांचे अर्थसाहाय्य करण्यात आले आहे.

रेतन, दूध उत्पादन इत्यादी प्रशिक्षण योजना राबविण्याकरिता राष्ट्रीय मागासवर्ग वित्तीय व विकास महामंडळाकडून अनुदान मिळते. त्यामधून प्रशिक्षण दिले जाते.

**मागील ३ वर्षांतील यश**

महामंडळाचे अधिकृत भागभांडवल रु. १०० कोटींवरून रु. २०० कोटी केले आहे.

विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लोकांना महामंडळाच्या योजनेचा लाभ घेण्यासाठी ग्रामीण भागातील लोकांकरिता रु. ३९,३०८/- व शहरी भागाकरिता रु. ५४,४९४/- ही उत्पन्न मर्यादा होती, यामध्ये वाढ करून रु. १ लाख उत्पन्न मर्यादा करण्यात आली आहे. त्यामुळे ग्रामीण व शहरी असा भेदभाव न करता ज्या व्यक्तीचे वार्षिक उत्पन्न रु. १ लाखपर्यंत आहे अशा व्यक्तींना स्वत:च्या पायावर उभे राहण्याची व विकासाची संधी निर्माण करून दिली आहे. शासनाने २०१२-२०१३ या वर्षाकरिता रु. १५ कोटी महामंडळाकरिता तरतूद केली होती, त्यामध्ये वाढ करून रु. ४० कोटी दिले आहे.

विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या कर्जाचा भार कमी व्हावा म्हणून ४७१६८ लोकांचे ६३.३५ रु. कोटी कर्ज माफ केले आहे. मागील ३ वर्षांमध्ये महामंडळाने बीजभांडवल योजनेंतर्गत एकूण ५२,१७७ लाभधारकांना ९२.१७ रु. कोटी बीजभांडवल कर्ज व २७६.५१ रु. कोटी विविध बँकेचे कर्ज असे एकूण ३६८.६८ रु. कोटी अर्थसाहाय्य दिले आहे.

(पत्ता : महामंडळाच्या योजनांचा लाभ घेण्याकरिता जिल्हा व्यवस्थापक यांच्याशी संपर्क साधावा.)

## लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ

११ जुलै, १९८५ रोजी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाची स्थापना केली.

मातंग समाजातील १२ पोट जातींच्या आर्थिक , शैक्षणिक व सामाजिक विकास करण्यासाठी विविध योजनांमार्फत वित्त पुरवठा करणे हे महामंडळाचे मुख्य उद्दिष्ट आहे. विविध व्यवसायांसाठी वित्त पुरवठा करून स्वयंरोजगार मिळवून देणे व आर्थिक व सामाजिक उन्नती करणे दारिद्र्यरेषेवर आणणे या बाबींचा महामंडळाच्या कामकाजात अंतर्भाव आहे. महामंडळाचे भागभांडवल ७५ कोटी रुपये आहे.

महामंडळाचा लाभ घेण्यासाठी उत्पन्नाची मर्यादा ग्रामीण व शहरीभागासाठी रु.१०००००/- करण्यात आली आहे.

**महामंडळाच्या योजना**

**बीजभांडवल**

या योजनेमध्ये महामंडळामार्फत ११,५५१ लाभार्थ्यांना रू. ३३.९६ कोटी कर्ज रक्कमेचा लाभ देण्यात आला आहे.

**राष्ट्रीय महामंडळाच्या योजना**

या योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक वार्षिक उत्पन्न मर्यादा. ग्रामीण भागासाठी रू. ८१०००/- व शहरी भागासाठी रू. १०३०००/-

१. मुदत कर्ज (टर्मलोन), २ . लघुऋण वित्त, ३. महिला समृध्दी (MSY), ४.महिला किसान, ५. शैक्षणिक कर्ज , ६. वैयक्तिक कर्ज. राष्ट्रीय मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळ, दिल्ली यांच्याकडून वरील योजनांसाठी निधी प्राप्त होतो. महामंडळाने या योजनें अंतर्गत १२,४४५ लाभार्थ्यांना रू. ७१.५० कोटी कर्ज रक्कमेचा लाभ दिला आहे.

**अर्जदारांची पात्रता**

१. महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा., २. वय १८ वर्षे पूर्ण असावे व ५० वर्षापेक्षा जास्त नसावे., ३. जो व्यवसाय निवडला असेल त्या व्यवसायाचे त्याला ज्ञान असावे. अनुभव असावा, प्रशिक्षण घेतलेले असावे., ४. इतर कोणत्याही शासकीय योजनांचा किंवा महामंडळाच्या योजनांचा लाभ घेतलेला नसावा.

**(पत्ता: बी-२२ कल्याणी केन्द्र, अशोकवन, हनुमान टेकडी, बोरीवली(पू) मुंबई-६६, दूरध्वनी : ०२२-२८९७७२७३ /२८९६९११४)**

## संधी आणि साध्य

### नोकर झाला मालक



मुंबई येथील बांद्रास्थित विठ्ठल गुणाजी उकांडे फळविक्रीचा फिरता व्यवसाय करतात. दिवसभर फिरुन फळे विकून त्यांना पाहिजे तेवढा नफा मिळत नव्हता. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळामार्फत व्यवसायासाठी कर्ज दिले जाते याची जेव्हा माहिती मिळाली तेव्हा त्यांनी महामंडळाच्या जिल्हा कार्यालय येथे जाऊन कर्ज योजनेसाठी अर्ज केला. महामंडळाकडून कर्ज मिळाल्यानंतर उकांडे यांनी फळ विकण्यासाठी गाडी घेतली. एके ठिकाणी ही गाडी उभी करुन फळविक्रीचा व्यवसाय सुरु केला. आता त्यांना चांगला नफा मिळत आहे.

### मालकीची इंडिका




मुंबई येथील गोरेगावस्थित राजेन्द्र बोबाटे हे ड्रायव्हर म्हणून नोकरी करत होते. महामंडळाच्या कर्जाची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी त्यासाठी अर्ज केला. महामंडळाने त्यांना बॅकेकडून लवकरात लवकर कर्ज मिळवून देण्यास मदत केली. या कर्जातून त्यांनी इंडिका गाडी घेतली. स्वत:च्या वाहनामुळे त्यांची उन्नती झालीच व सामाजिक दर्जा उंचावला.

### वडापाव विक्री केंद्र

मुंबई येथील विक्रोळीस्थित कविता विठ्ठल उमप, यांना महामंडळाच्या योजनांची माहिती मिळाल्यावर त्यांनी बीजभांडवल कर्ज योजनेतून वडा-पाव विक्रीचा व्यवसाय करण्यासाठी अर्ज केला. महामंडळाकडून मिळालेल्या आर्थिक साहाय्यामुळे आज त्या वडापावविक्री केंद्राच्या मालक झाल्या आहेत.

**लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाच्या विशेष केंद्रीय अर्थसाहाय्य या योजनेंतर्गत १,६४,७८० लाभार्थींना ११८.७२ कोटी रूपये निधी अनुदान म्हणून वितरित करण्यात आला आहे.**

# उगवली नवी पहाट

## दीपालीची उंच भरारी



धुळे जिल्ह्यात विक्रीकर विभागात लिपिकाचे काम करणाऱ्या सुभाष बागुल यांची मुलगी दीपाली बागूल हिने सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्या शिष्यवृत्तीतून अमेरिकेतील साउथ कॅरोलिना राज्यातील क्लेमसन विद्यापीठात सिव्हिल इंजिनीअरिंगमध्ये विशेष प्रावीण्यासह उच्च शिक्षण पूर्ण केले आहे.

आई-वडिलांच्या पाठिंब्याबरोबरच मुलांचीही शिक्षणासाठी ऊर्मी व जिद्द असावी लागते. तीच ऊर्मी व जिद्द बाळगून दीपाली आतापर्यंत उच्च शिक्षण घेतले. दीपाली मार्च २००० मध्ये धुळ्यात इयत्ता १० वीत इंग्रजी माध्यमातून ८६ टक्के गूण मिळवून उत्तीर्ण झाली. दीपालीचा ओढा वैद्यकीय शिक्षणाकडे होता. पण आई-वडिलांच्या इच्छेखातर तिने इंजिनीअरिंग या क्षेत्राची निवड केली. इयत्ता १० वी नंतर स्थापत्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमासाठी शासकीय तंत्रनिकेतन, धुळे येथे प्रवेश घेतला. तेथे विशेष प्रावीण्यासह पदविका प्राप्त केली. त्यानंतर स्थापत्य अभियांत्रिकी पदवी, एम.एस.व्ही.पी.एस. इंजिनीअरिंग कॉलेज, धुळे येथून ८० टक्क्यांच्या विशेष प्रावीण्यासह प्राप्त केली.

पदवी शिक्षणानंतर दीपालीने वडिलांवरील आर्थिक बोजा कमी करण्याच्या उद्देशाने पुणे येथील पटनी कॉम्प्युटर्स या सॉफ्टवेअर कंपनीत स्थापत्य अभियंता म्हणून नोकरी मिळविली. या कंपनीत काही महिने नोकरी केल्यानंतर सामाजिक न्याय विभागाच्या परदेशातील उच्च शिक्षणासाठी असलेल्या शिष्यवृत्तीची माहिती दीपालीला झाली. त्यानंतर तिने पुणे येथे संचालक कार्यालय गाठले. या कार्यालयातून तिला शिष्यवृत्तीविषयी सविस्तर माहिती मिळाली. सर्व पात्रता व अटींची पूर्तता करून दीपालीने शिष्यवृत्तीसाठी अर्ज केला. तिला सामाजिक न्याय विभागाची ही शिष्यवृत्ती मंजूर झाली त्यामुळे अमेरिकेत उच्चशिक्षण घेण्याचे दीपालीचे स्वप्न साकार झाले आहे.

या विद्यापीठात शिष्यवृत्तीवर शिक्षण घेणाऱ्या भारतातील अर्थात महाराष्ट्र राज्यातील पहिल्या विद्यार्थिनीचा मान दीपालीला मिळाला आहे. न्यूयॉर्कमधील एका कॉर्पोरेट कंपनीत नुकतीच तिला नोकरीची ऑफर प्राप्त झाली आहे.

## रोजंदारी कामगार ते गटई स्टॉलमालक

जळगावमधील रामेश्वर कॉलनीतील पत्र्याच्या शेडमधील घरात राहणारा सुनील सावकारे याला गटई स्टॉल वाटप योजनेतून लोखंडी गटई स्टॉल मिळाल्यावर व्यवसायाचे नवे साधन प्राप्त झाले. त्यातून त्याला दर

**सुरेश पाटील**

महिन्याला साडेचार-पाच हजारांचे बसल्या-बसल्या उत्पन्न मिळत आहे. त्यामुळे त्याची रोजंदारी कामातूनही सुटका झाली असून त्याच्या जीवनातील अस्थिरता संपली आहे.

माझ्या जीवनातील ही पहाट सर्वस्वी सामाजिक न्याय विभागाच्या गटई स्टॉल योजनेमुळे उगवली असल्याची भावना सुनील सावकारे याने व्यक्त केली. गटई स्टॉल मिळण्यापूर्वी तो जळगाव एमआयडीसीतील एका कंपनीत हंगामी रोजंदारी कर्मचारी म्हणून कार्यरत होता. त्यावेळेस त्यातून मिळणाऱ्या तुटपुंज्या उत्पन्नातून कुटुंबाचा चरितार्थ चालविणे शक्य नव्हते. घरात पत्नी, दोन मुली व एक मुलगा असा परिवार असताना खाणारी तोंडे जास्त व कमविणारे हात मात्र दोनच त्यामुळे संसाराचे रहाटगाडे हाकताना सावकारे यांची ओढताण होत होती. त्यांचे इतर भाऊ नोकरीस आहेत. पण त्यांच्यावर अवलंबून न राहता त्यांनी स्वतंत्र व्यवसाय करण्याचा पर्याय निवडला. गटई व्यवसायासंदर्भात माहिती गोळा केली. या योजनेसाठी विशेष जिल्हा समाजकल्याण जळगाव या कार्यालयाकडे अर्ज केला. त्यानुसार विशेष जिल्हा समाजकल्याण कार्यालयाकडून त्यांना ५०० रुपये अनुदान व स्टॉल प्राप्त झाला.

सुनील सावकारे हे गेल्या ३ ते ४ वर्षांपासून गटई व्यवसाय करीत आहेत. महिन्याकाठी मिळणाऱ्या साडेचार-पाच हजार रुपयांच्या कमाईवर कुटुंबाची व्यवस्थित गुजराण होत आहे.

## आधार आणि स्थैर्य

जळगाव जिल्ह्यातील एरंडोल या तालुक्याच्या ठिकाणी आई, वडील व मोठ्या भावासह हलाखीचे दिवस काढणाऱ्या सुनील रामलाल झांबरे या युवकापुढे १२ वी नापास झाल्यानंतर रोजगाराचा प्रश्न होता. वडील वीटभट्टी हंगामी मजूर, आई गृहिणी. घरकाम हाच व्यवसाय, मोठा भाऊ अशिक्षित त्यालाही रोजगार नाही. त्यामुळे सुनीलच्या कुटुंबापुढे उदरनिर्वाहाचा गहन प्रश्न होता.

रोजगार व व्यवसायाच्या शोधात असलेल्या सुनीलला जवळच्या नातेवाइकांकडून समाजकल्याण विभागाच्या गटई स्टॉल योजनेबाबत माहिती मिळाली. तेव्हा सुनीलने योजनेचा अर्ज भरला. गटई स्टॉल मिळाल्यावर सुनीलला रोजगार मिळाला व जीवनात स्थैर्य प्राप्त झाले.

हा गटईस्टॉल जळगांव-धुळे महामार्गावरील बस स्टँडच्या जवळ आहे.त्यामुळे या ठिकाणी सतत गिऱ्हाईकांची वर्दळ असते. दररोज २०० रुपयेपर्यंत व्यवसाय होत आहे. त्यातून त्यांच्या आई-वडिलांनाही आधार मिळाला आहे. ❑ ❑

कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण योजनेअंतर्गत १३०० भूमिहीन व शेतमजुरांना हक्काच्या जमिनी मिळाल्या असून, या योजनेचा लाभ घेणाऱ्यांमध्ये नाशिक विभाग राज्यात आघाडीवर आहे.

# सक्षम आणि सबळ



हातभट्टीच्या दारूच्या अवैध व्यवसायात असलेल्या पोपट सीताराम शिंदे यांनी सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्या कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्वाभिमान व सबलीकरण या योजनेचा लाभ घेऊन आपल्या आयुष्याला नवी दिशा दिली आहे. पोपट शिंदे हे अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील पिरसोरेखांड येथील रहिवासी आहेत.

कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजनेत शिंदे यांना जमीन मिळण्यापूर्वी त्यांचे आयुष्य अंधकारमय होते. ग्रहणाच्या काळात फिरून थोडेफार धान्य, जुने कपडे, अन्न गोळा करणाऱ्या शिंदेंची गरिबीने पाठ सोडली नव्हती. त्यात कुटुंबात मंडळी अधिक होती. तीन मुले व पाच मुली असा मोठा परिवार असताना कुटुंबाचे पालन-पोषण करणे शिदे यांना अतिशय कठीण जात होते. त्यामुळे त्यांनी अवैध व्यवसाय पत्करला होता.

अशा परिस्थितीत जिल्हा समाज कल्याण विभागातील कर्मचारी देव्हारे यांनी शिंदेंना सबळीकरण योजनेची माहिती दिली. तत्कालीन विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी आर. एम. मुन्शी यांनी शिंदे यांस कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण योजनेखाली २००५-०६ मध्ये दोन एकर बागायती जमीन मिळवून दिली.

दोन एकर बागायती जमीन कसण्यासाठी मिळाल्यामुळे शिंदेंनी अवैध व्यवसाय करणे सोडून दिले. जमिनीचा ताबा मिळताच त्यांनी शेत जमिनीत प्रथम बाजरीचे पीक घेतले. १५ ते २० हजार रुपयांचे उत्पन्न मिळविले. बाजरीचे पीक निघाल्यानंतर एक एकरात उसाची लागवड केली. बाकीच्या शेतात कलिंगड, काकडी, मका आदी पिके घेतली. नगदी पीक कांदा घेऊन ३० हजारांचे उत्पन्न मिळविले.

शिंदे कुटुंबाला कृषी विभागाने बी-बियाणे, शेती अवजारे, विशेष घटक योजनेतून ऑईल इंजिन, बैलगाड्या इतर साहित्य उपलब्ध करून दिले.

या योजनेमुळे नवे जीवन सुरू करणारे शिंदे म्हणाले, ''हातभट्टीची दारू अवैधपणे विकून दिवसाला ८० ते १०० रुपये मिळायचे. दारूचा व्यवसाय करताना अनेकवेळा पोलिसांच्या तावडीत सापडलो. अटक झाली. केसेस झाल्या. आता जोमाने शेतात कष्ट करतो. त्यामुळे वर्षाकाठी ५० ते ६० हजारांचे उत्पन्न मिळत आहे.''

## कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण योजना

१ एप्रिल २००४ पासून अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील दारिद्र्यरेषेखालील भूमिहीन शेतमजुरांसाठी दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत नाशिक जिल्ह्यात आतापर्यंत २३६ लाभार्थींना लाभ मिळाला आहे. अनुसूचित जाती व नवबौद्धांमधील दारिद्र्यरेषेखालील भूमिहीन शेतमजुरांच्या कुटुंबासाठी उदरनिर्वाहाचे साधन नसल्याने त्यांना रोजगार हमी योजना अथवा खासगी व्यक्तीकडे मजुरी करावी लागते. त्यामुळे अशा शेतमजुरांच्या राहणीमानावर प्रतिकूल परिणाम होत असतो. अशा कुटुंबाच्या उत्पन्नाचे स्रोत वाढून त्यांच्या राहणीमानात बदल व्हावा, अशा कुटुंबाचे मजुरीवर असलेले अवलंबित्व कमी होऊन त्यांना कायमस्वरूपी उत्पन्नाचे साधन उपलब्ध व्हावे व त्यांना स्वाभिमानाने जगता यावे या उद्देशाने ही योजना राबविण्यात येते.

शेतमजुरांना त्यांचे आर्थिक जीवनमान उंचविण्यासाठी मदत होणार असून या योजनेअंतर्गत नाशिक विभागाने खरेदी केलेल्या जमिनीपैकी सर्व जमीन लाभार्थींना देण्यात आली आहे. गेल्या पाच वर्षांत विभागात १,३०० लाभार्थ्यांना योजनेचा लाभ घेता आला आहे. त्यात नाशिक जिल्ह्यातील २३६, धुळे - ३२०, नंदुरबार - १८४, जळगाव - ३२७ व अहमदनगर जिल्ह्यातील २९४ लाभार्थींनी लाभ घेतला. या लाभार्थींना ३,५०० एकर जमिनीचे वाटप करण्यात आले आहे.

## योजनेच्या अटी

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकामधील दारिद्र्यरेषेखालील भूमिहीन शेतमजुरांसाठी ही योजना आहे. या योजनेकरिता निवडण्यात येणाऱ्या लाभार्थ्यांमध्ये भूमिहीन शेतमजूर परित्यक्ता स्त्रिया आणि भूमिहीन शेतमजूर, विधवा स्त्रिया यांना प्राधान्य दिले जाते. या योजनेतील लाभार्थ्यांसाठी १५ वर्षे वास्तव्य दाखल्याची अट असून भूमिहीन शेतमजूर आणि ऊसतोड कामगार ज्यांची नावे दारिद्र्यरेषेखाली आहेत त्यांनी दारिद्र्यरेषेखालचे कार्ड मिळविणे संयुक्तिक ठरणार आहे. त्यांची मिळकत दारिद्र्यरेषेखाली पाहिजे. महसूल आणि वन विभागाने ज्यांना गायराण व सिलिंगच्या जमिनीचे वाटप केले आहे अशा कुटुंबांना या योजनेचा लाभ मिळणार नाही. अनुसूचित जाती व नवबौद्ध भूमिहीन शेतमजूर कुटुंबाला देण्यात येणारे कर्ज हे बिनव्याजी आणि १० वर्षे मुदतीकरिता असते. कर्जफेडीची सुरुवात कर्ज मंजुरीनंतर दोन वर्षांनी सुरू केली जाते.

**लाभार्थी निवड**

लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे.

कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण योजनेंतर्गत लाभार्थींना चार एकर जिरायती (कोरडवाहू) अथवा दोन एकर बागायती जमिनीचे वाटप करण्यात येते. या योजनेअंतर्गत राज्यभरात १५,८१० एकर जमीन खरेदी करून ४,८७२ लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले आहे.

सामाजिक न्यायमंत्री, ॲड. शिवाजीराव मोघे यांनी मागासवर्गीय विद्यार्थी व 'स्पर्धा परीक्षा' या विषयाचे महत्त्व ओळखले व केंद्रीय लोकसेवा आयोग व राज्य लोकसेवा आयोगामार्फत निवड होणाऱ्या अधिकाऱ्यांव्यतिरिक्त इयत्ता १० वी व १२ वी या पात्रतेच्या विद्यार्थ्यांकरिता रेल्वे, एल.आय.सी., बँक, ग्रामसेवक, तलाठी, शिक्षण सेवक, लिपिक, पोलीस, स्टेनो, टंकलेखक, सीमा सुरक्षा दल, एन.डी.ए. या व अशा अनेक क्षेत्रांत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना नोकरी मिळावी यासाठी संपूर्ण राज्यात सामाजिक न्याय विभागामार्फत भरतीपूर्व प्रशिक्षण सुरू केले.

# संधी आली दारात

**रंगनाथ नाईकडे**

घटनेचे शिल्पकार म्हणून ज्यांना ओळखले जाते त्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या दिशादर्शक तत्त्वांना अनुसरून घटनेच्या ३१५ व्या कलमानुसार केंद्रासाठी एक केंद्रीय लोकसेवा आयोग व प्रत्येक राज्यासाठी एक, राज्य लोकसेवा आयोग अशी तरतूद करण्यात आली आहे. त्याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेत अस्पृश्यता नष्ट करणारे कलम जसे अंतर्भूत केले तसेच १४, १५, १६ या कलमान्वये दलित, आदिवासी आदी मागासवर्गीयांना विकासाच्या संधी देण्यात आल्या, त्यानुसार मागासवर्गास शिक्षणाची संधी मिळाली आणि या समाजात थोडीफार आर्थिक सुस्थिती असलेला मध्यमवर्गही तयार झाला. परंतु प्रशासनातील पोलादी चौकटीत अखिल भारतीय प्रशासकीय सेवेत मात्र महाराष्ट्रीय मागासवर्गीयांचे प्रमाण आजही अत्यल्प आहे.

खऱ्या अर्थाने प्रशासकीय सेवा म्हणजे एक समजसेवेची पर्वणी आहे. त्यामुळे अलीकडच्या काळात अनेक डॉक्टर्स, इंजिनीअर्स, पदव्युत्तर, डॉक्टरेट असे उच्च विभूषित विद्यार्थी या प्रशासकीय सेवेकडे आकर्षित होतात. परंतु



या सर्वांमध्ये ज्यांना खऱ्या अर्थाने समाजाची जाण आहे, समाजाविषयी तळमळ आहे व समाजसेवा करावयाची आवड आहे अशा पात्र उमेदवारांनी प्रशासकीय सेवेत येणे अत्यंत गरजेचे आहे.

शासकीय सेवांमध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे प्रमाण जास्तीतजास्त असावे. यू.पी.एस.सी.मार्फत व एम.पी.एस.सी.मार्फत केंद्रात व राज्यात प्रत्येक विभागात जास्तीतजास्त मागासवर्गीय विद्यार्थ्यांची निवड व्हावी व प्रत्यक्षात लोकसेवक म्हणून त्यांना समाजाची सेवा करण्याची संधी मिळावी अशा प्रकारचा उदात्त हेतू एम.पी.एस.सी., यू.पी.एस.सी. व इतर भरती पूर्व प्रशिक्षण देण्यापाठीमागे आहे.

यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी पुणे, पुणे विद्यापीठ, नागपूर विद्यापीठ अशा विविध ठिकाणी सामाजिक न्याय विभागामार्फत चालू करण्यात आलेल्या या प्रशिक्षणाच्या प्रयत्नांना यश येत आहे. या सर्व केंद्रांमार्फत दुर्बल घटकातील उमेदवारांना केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवांसाठीच्या परीक्षांसाठी मार्गदर्शन व आवश्यक साहाय्य देण्यात येते. या योजनेंतर्गत सामूहिक चाचणी परीक्षेमधून निवड झालेल्या उमेदवारांना वर्षभर मोफत निवास, कोचिंग, ग्रंथालय, अभ्यासिका, सराव चाचण्या, समुपदेशन, संगणक, इंटरनेट तसेच तज्ज्ञांचे मार्गदर्शन व मॉक इंटरव्ह्यू इत्यादी सुविधा पुरविण्यात येतात. या केंद्रामार्फत भारतीय प्रशासन सेवेत आय.ए.एस., आय.एफ.एस., आय.पी.एस. या सेवामध्ये आतापर्यंत २०० पेक्षा जास्त मागासवर्गीय विद्यार्थ्यांची निवड झालेली आहे. याव्यतिरिक्त १५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी फक्त मुलाखतीकरिता यशदा या संस्थेत अर्धवेळ प्रशिक्षण पूर्ण केले व त्यातून २३ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

यशदा या केंद्रासोबतच पुणे विद्यापीठामध्ये जे स्पर्धा परीक्षा केंद्र चालविण्यात येते या स्पर्धा परीक्षा केंद्रामध्येदेखील यश आलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. यामध्ये आय.ए.एस. असिस्टंट कमिशनर ऑफ पोलीस, बँक सेवा, कृषी विकास अधिकारी, पोलीस सब इन्स्पेक्टर, फॉरेस्ट सर्व्हिस, विस्तार अधिकारी, तलाठी, सी.बी.आय., वित्त व लेखा अधिकारी वर्ग १ व २ या अशा अनेक पदांवर एकूण १२५ पेक्षा जास्त मागासवर्गीय विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाअंतर्गत देखील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांच्या अनुषंगाने जे प्रशिक्षण दिले जाते त्याद्वारे आतापर्यंत ८५५ पेक्षा जास्त विद्यार्थ्यांची शासन सेवेतील वेगवेगळ्या पदांवर निवड झाली आहे. याव्यतिरिक्त शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, सोलापूर विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, अमरावती विद्यापीठ, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव या सर्व विद्यापीठांमधून ४०० पेक्षा जास्त मागासवर्गीय विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

**राज्यातील ग्रामीण भागातील व 'क' वर्ग नगर परिषदेच्या कार्यक्षेत्रातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता 'भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्रे' चालू करण्याचा निर्णय सामाजिक न्याय विभागाने घेतला आहे**

एम.पी.एस.सी., यू.पी.एस.सी., या स्पर्धा परीक्षांच्या प्रशिक्षणाव्यतिरिक्त सिडॅक व इतर नामवंत संस्थांमार्फत 1) Preparatory Course for DAC (Pre-DAC), 2) Post Graduate Diploma in Advance Computing, 3) Pre-xamination Coaching Center (for Weaker Section ) for SC & OBC, 4) UGC Scheme for entry in Services for SC, VJNT & OBC, 5) Pre Examination Coaching Center for SC Students 6) Advance Computer Course for Graduates व मिटकॉन कन्स्ल्टींग अँड इंजिनीअरिंग सर्व्हिस लि. या संस्थेमार्फतदेखील १००० पेक्षा जास्त मागासवर्गीय विद्यार्थ्यांना बँक, रेल्वे, एल.आय.सी. इत्यादीकरिता प्रशिक्षण देण्यात आले आहे.

ग्रामीण भागातील प्रत्येक जिल्ह्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांमधील हुशार व सक्षम असलेल्या विद्यार्थ्यांना मुंबई येथे आयआयटीयन्स पेस या संस्थेमध्ये प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेतला. त्यांच्याकरिता राहण्याचा, भोजनाचा खर्च सामाजिक न्याय विभागाने स्वीकारला असून अभियांत्रिकी व वैद्यकीय शाखांच्या प्रवेशाकरिता पेस या संस्थेमार्फत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी विनामूल्य प्रशिक्षण देण्यात येते. या सर्व प्रशिक्षणाचा धागा धरून दोन वर्षांपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्यामार्फत राज्यातील २८ जिल्ह्यांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी, विजाभज व विशेष मागासवर्ग या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी बँक, रेल्वे, एल.आय.सी. लिपिक पदाच्या परीक्षांचे मार्गदर्शन वर्ग ४४ वेगवेगळ्या संस्थांमार्फत चालविण्यात येतात व यामध्ये जवळपास २०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना भरतीपूर्व प्रशिक्षण दिले जाते. या सर्वांचा परिणाम म्हणजे प्रशासनात निवड तर होतेच परंतु मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात मोठ्या प्रमाणात बदल होऊन त्यांना फायदा झाला आहे. एकंदरीत प्रशासकीय सेवेतील वर्ग - ४ च्या कर्मचाऱ्यांपासून वर्ग - १ च्या अधिकाऱ्यांपर्यंत सेवेत संधी मिळण्याकरिता अशा प्रकारच्या प्रशिक्षणाच्या माध्यमातून जे दालन सामाजिक न्याय विभागामार्फत सुरू करण्यात आलेले आहे, त्याचे हे यश आहे.

या क्षेत्रातील अनुभव विचारात घेता व अखिल भारतीय पातळीवरील आकडेवारीवर नजर टाकता स्पर्धा परीक्षांमध्ये मागासवर्गीय, आदिवासी विद्यार्थ्यांचा सहभाग व यशस्वीतेचे प्रमाण अल्प असून हीच परिस्थिती कायम राहिल्यास नि:स्वार्थी, प्रभावी, सक्षम समाजसेवेची जाण असणारे व सामाजिक बांधिलकी जोपासणारे मागासवर्गीय समाजातील अधिकारी निर्माण होणे कठीण आहे. त्यापूर्वीच त्यासाठी एक वेगळे असे शैक्षणिक धोरण ठरविणे गरजेचे आहे. पायाभूत असे प्रशिक्षण खात्रीशीर अचूक असे संदर्भ साहित्य व त्याचबरोबर आस्थेने शिकविणारे शिक्षक अशी त्रिसूत्री गुंफणे गरजेचे आहे. आजमितीस जे पर्याय आहेत ते अत्यंत खर्चीक आहेत. घरच्या कौटुंबिक व सामाजिक परिस्थितीमुळे मागसवर्गीय विद्यार्थी तेथे पोहोचू शकत नाहीत. ग्रामीण व त्यामध्ये पुन्हा मागासवर्गीय यामुळे स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये मोठी पोकळी आहे.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांची भूमिकादेखील अतिशय महत्त्वाची आहे, कारण विद्यार्थी या शब्दात दोन पदे आहेत. 'विद्या' हे एक पद आणि 'अर्थी' हे दुसरे पद आहे. 'अर्थी' म्हणजे गरज, आवड, आस्था किंवा प्राप्त करून घेण्याची निकड याचा अर्थ 'विद्ये'ची ज्याला जास्त गरज आहे, आवड आहे तो विद्यार्थी, ज्याला विद्येची उत्कट अशी तहानभूक लागलेली आहे आणि कितीही विद्या मिळविली तरी ती अजून मिळवावी असे ज्याला सतत वाटते तोच खरा विद्यार्थी, असेच मागासवर्गीय समाजातील विद्यार्थी स्पर्धा परीक्षांसाठी हवे आहेत. स्पर्धा परीक्षांचा राज्य लोकसेवा आयोग व केंद्रीय लोकसेवा आयोग यांचा अभ्यासक्रम पूर्णपणे बदलला आहे. आजच्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांपुढे आज हे क्षणाक्षणाला बदलणारे अभ्यासक्रम टाळता न येणारे आव्हान आहे.

प्रशासनाच्या पोलादी चौकटीत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेश द्यायचा असेल तर त्यांना अचूक व योग्य मार्गदर्शनाची अत्यंत आवश्यकता आहे. कारण मागासवर्गीय विद्यार्थ्यांना करीअर म्हणून, व्यवसाय म्हणून किंवा उद्याच्या कामाचे महत्त्वाचे क्षेत्र म्हणून हा रस्ता माहीतच नाही. या सर्व राज्यांमधील विद्यापीठांचे अभ्यासक्रम यू.पी.एस.सी. परीक्षांशी मिळतेजुळते आखलेले आहेत. म्हणून अखिल भारतीय स्पर्धा परीक्षेमध्ये महाराष्ट्रातील मागासर्गीय विद्यार्थ्यांचे प्रमाण इतर राज्यांतील मागासवर्गीय अधिकाऱ्यांच्या संख्येपेक्षा कमी आहे.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रशासनाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्नांची गरज आहे. त्यातही नेमक्या अचूक मार्गदर्शनाचे महत्त्व उघड आहे. मुळातच राज्यातील मागासवर्गीय तरुणापाशी आय.ए.एस. व्हायला लागणारी बुद्धिमत्ता आहे; परंतु ती नुसती असून चालत नाही, तर ती आय.ए.एस. होण्याकरिता नेमकी वळवायची कशी याचे मार्गदर्शन करणे जरुरीचे आहे. अनेक महाविद्यालये व विद्यापीठांमध्ये प्रभुत्व गाजविणारे मागासवर्गीय विद्यार्थी स्पर्धा परीक्षांचा अभ्यास कसा करायचा आणि तो परिणामकारकपणे म्हणजे जास्तीतजास्त गुण मिळविण्यासाठी उत्तर पत्रिकेत किंवा इंटरव्ह्यू बोर्डासमोर कसा मांडायचा याचा सराव राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मिळणे आवश्यक आहे. त्यामुळेच स्पर्धा परीक्षा केंद्रांची सुरुवात प्रथमत: या राज्यात करण्याचे ठरविण्यात आले. या सर्व प्रयत्नांमुळे यश वाढते आहे. पण अजूनही ते पुरेसे नाही. सामाजिक न्याय विभागाच्या प्रयत्नांमधून स्पर्धा परीक्षांच्या नव्या यंत्रणा उभ्या करण्याचा विचार आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमातून मार्गदर्शनाची पद्धतशीर यंत्रणा उभी राहू शकते. स्पर्धा परीक्षा क्षेत्रात योगदान देणाऱ्या संस्थांनी स्वत:च्या संस्थेच्या हितापेक्षा राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे हित जोपासावे व सामाजिक जाणिवेची वेगळी परंपरा निर्माण व्हायला हवी.

संपर्क : ९८२११०७५७४

**सामाजिक न्याय विभागाच्या साहाय्याने सुरू असलेल्या स्पर्धा परीक्षा केंद्रांमार्फत अखिल भारतीय नागरी सेवा परीक्षेत आतापर्यंत २०० पेक्षा जास्त मागासवर्गीय विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.**

# पुरस्कार आणि सन्मान



## डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीय जाती, शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या अपंग, कुष्ठरोगी वगैरेंसाठी सामाजिक क्षेत्रात मौलिक कार्य करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांचा गौरव व्हावा व समाजसेवक यांच्या कामाची दाद घ्यावी यासाठी १९७१-७२ पासून हा पुरस्कार देण्यात येतो.

हा पुरस्कार दरवर्षी १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी देण्यात येतो.

## शाहू - फुले - आंबेडकर दलित वस्ती सुधारणा व स्वच्छता अभियान

शिवाजी चौरे

मागासवर्गीय वस्त्यांमध्ये राहणाऱ्या अनुसूचित जातीच्या लोकांचे राहणीमान उंचावण्यासाठी तसेच वस्त्यांमध्ये स्वच्छता राहण्यासाठी तेथील रहिवाशांचा सहभाग वाढावा व सामाजिक विषमता नष्ट व्हावी म्हणून शाहू - फुले - आंबेडकर दलित वस्ती सुधारणा व स्वच्छतायोजना कार्यान्वित आहेत. याअंतर्गत पंचायत समिती स्तरावरील पहिल्या ३ ग्रामपंचायतींना, जिल्हास्तरावरील, महसूल स्तरावरील १ ग्रामपंचायतीस व संपूर्ण राज्यातील उत्कृष्ट ठरणाऱ्या ग्रामपंचायतींना रोख स्वरूपात बक्षिसे देण्यात येतात. पंचायत समिती स्तरावरील प्रथम ग्रामपंचायतीस २५ हजार रुपये, द्वितीय ग्रामपंचायतीस १५ हजार रुपये आणि तृतीय ग्रामपंचायतीस १० हजार रुपये. जिल्हास्तरावरील प्रथम ग्रामपंचायतीस ५ लाख रुपये, द्वितीय ग्रामपंचायतीस ३ लाख रुपये आणि तृतीय ग्रामपंचायतीस २ लाख रुपये. विभागीय स्तरावर प्रथम येणाऱ्या एका ग्रामपंचायतीस १० लाख रुपये, राज्यस्तरावरील प्रथम ग्रामपंचायतीस २५ लाख रुपये, द्वितीय ग्रामपंचायतीस १५ लाख रुपये, आणि तृतीय ग्रामपंचायतीस १२ लाख ५० हजार रुपये फक्त याप्रमाणे पारितोषिके देण्यात येतात.

## शाहू - फुले - आंबेडकर पुरस्कार

सामाजिक न्यायाच्या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या संस्थांना महाराष्ट्रातील सर्वोच्च प्रतिष्ठेचा शाहू - फुले - आंबेडकर पुरस्कार देण्याचे शासनाने जाहीर केले. हा पुरस्कार एकूण ६ विभागांतील प्रत्येकी १ याप्रमाणे ६ संस्थांना प्रत्येकी रु. १५ लाख याप्रमाणे पुरस्काराची रक्कम देण्यात येते.

हा पुरस्कार २००५-२००६ पासून देण्यात येत असून २६ जून (सामाजिक न्यायदिनी) रोजी या पुरस्काराचे वितरण केले जाते.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्रावीण्य पुरस्कार

उत्कृष्ट शासकीय /अनुदानित संस्थासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्रावीण्य पुरस्कार देण्याचे १३ ऑक्टोबर २००३ पासून निश्चित करण्यात आले. मागसवर्गीय मुलामुलींना शिक्षणासाठी अधिकाधिक सोयी, सवलती उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने शासकीय वसतिगृह, अनुदानित वसतिगृह व आश्रमशाळा सुरू केल्या आहेत. या संस्थेचा दर्जा वाढविण्याच्या दृष्टीने व अधिक जोमाने काम करण्यासाठी राज्यस्तरावर ३ व विभागीय स्तरावर १ पुरस्कार देण्यात येतात. पुरस्काराची रक्कम विभागीय स्तरावर रु. १ लाख व राज्य स्तरावर प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकासाठी अनुक्रमे रु. ५ लाख, रु. ३ लाख व रु. २ लाख इतकी आहे.

## कर्मवीर पदमश्री दादासाहेब गायकवाड पुरस्कार



या अंतर्गत एक व्यक्ती व एक संस्था यांना प्रत्येकी ५१ हजार रुपयांचा पुरस्कार देण्यात येतो. हा पुरस्कार १५ ऑक्टोबर २००२ पासून सुरू करण्यात आला.

## संत रविदास पुरस्कार



हा पुरस्कार २००४ पासून देण्यात येतो. राज्यातील चर्मकार समाज व इतर दलित समाजाच्या उद्धारासाठी कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना संत रविदास यांच्या जयंतीदिनी ६ फेब्रुवारी रोजी देण्यात येतो. हा पुरस्कार १ व्यक्ती व १ संस्था यांना दिला जातो. व्यक्तीस रु. २१ हजार व संस्थेस रु. ३०,००१/- असे पुरस्काराचे स्वरूप आहे.



## लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार

राज्यातील मातंग समाजातील कलावंत, साहित्यिक व समाजसेवक यांना लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या नावाने पुरस्कार देण्याची योजना १९९७-९८ पासून सुरू करण्यात आली आहे. समाजसेवक, कलावंत व साहित्यिक यांच्यासाठी रु. १५ हजार रोख व सामाजिक संस्थासाठी रु. २५ हजार रोख रक्कम देण्यात येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार ५१ व्यक्ती व १० संस्थांना देण्यात येतो. पुरस्काराची रक्कम प्रति व्यक्ती रु. १५ हजार व प्रति संस्था रु. २५ हजार अशी निश्चित केली आहे.



संपर्क :९८९२६५०१३१

# पुनर्वसनाला साहाय्य

**महाराष्ट्रात अपंगांचे शारीरिक, शैक्षणिक व आर्थिक पुनर्वसन यासाठी स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात संस्थात्मक जाळे उभारण्यात आले आहे. शासनाच्या विविध प्रवर्गातील एकूण २० संस्था मागील ४० ते ५० वर्षांपासून कार्यरत आहेत. अपंग कल्याणाच्या कार्यक्रमात महाराष्ट्र हे नेहमीच अग्रेसर असलेले राज्य आहे.**

हेलन केलर व त्यांच्या शिक्षिका ॲना या दोघींनी अथक परिश्रमातून अनोख्या सामर्थ्याचा इतिहास उभा केला आहे. या प्रेरणेतून अलीकडच्या काळातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील समाज सुधारकांनी अपंगत्व पुनर्वसन विषय उल्लेखनीयरीत्या हाताळला आहे.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर दुर्बल घटकांत अपंगांचा समावेश करण्यात आला. भारतीय राज्य घटनेच्या कलम ४६ नुसार The State shall



take care of Education, Economic and Social Development of Scheduled Cast and Scheduled Tribe in particular and other weaker sections of the Society in general यानुसार अपंगांचे शिक्षण, पुनर्वसन यासाठी विविध योजना केंद्र व राज्य स्तरावर सुरू करण्यात आल्या.

१९८०-८१ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाने आंतराष्ट्रीय अपंग वर्ष घोषित केले. ८०-९० या दशकास आशिया-पॅसिफिक दशक म्हणून संबोधण्यात आले. याचाच परिणाम म्हणून देशामध्ये शासनाने पुढील केंद्रीय कायदे अंमलात आणले.

✡ भारतीय पुनर्वास अधिनियम, १९९२ (Rehabilitation Council of India Act 1992)

✡ अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ Persons with Disability (equal opportunity, protection of Right and full participation) Act 1995.

✡ द नॅशनल ट्रस्ट ॲक्ट १९९९ (The National Trust for welfare of persons with Autism, Cerebral palsy, Mental Retardation and Multiple Disabilities) Act 1999.

✡ मानसिक आरोग्य कायदा १९८७.

वरील कायद्यांमुळे अपंग कल्याणाच्या क्षेत्रात स्वतंत्र भूमिका निश्चित झाली. त्यानुसार अपंग कल्याण आयुक्तालयाची स्थापना करण्यात आली. या कायद्यातील तरतुदीनुसार अपंगांच्या कल्याणासाठी शासनाने विविध खात्यांमार्फत योजना राबविण्यास सुरुवात केली.

राज्य शासन, स्थानिक संस्था, अनुदानित संस्था इत्यादीमध्ये अपंगांसाठी ३ टक्के आरक्षणाची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यामुळे शिक्षित अपंगांना रोजगार मिळणाऱ्या अनेक संस्था उपलब्ध होत आहेत.


**बाजीराव जाधव**
**आयुक्त, अपंग कल्याण**


**राज्य शासनाच्या योजना**

✡ **शासकीय संस्थातून शिक्षण व प्रशिक्षण** : २१ शासकीय संस्थांमधून तसेच स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या अपंगांच्या अनुदानित / विना अनुदानित / कायमस्वरूपी विनाअनुदानित शाळा / कार्यशाळांतून अपंगांना शिक्षण / प्रशिक्षण देण्यात येते. शासनाने नुकतीच परिपोषण अनुदानात वाढ केली आहे.

✡ **शिष्यवृत्ती :** अपंग शाळेतील विद्यार्थी तसेच सामान्य शाळेतील १ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना उत्पन्नाची अट न लावता शालान्तपूर्व शिक्षणासाठी शिष्यवृत्ती प्रदान केली जाते. १० वीनंतर महाविद्यालयीन, तांत्रिक, व्यावसायिक व अभियांत्रिकी शिक्षण येण्याऱ्या विद्यार्थ्यांनासुद्धा शिष्यवृत्ती दिली जाते. अंध विद्यार्थ्यांना वाचक भत्ता, सर्व अपंग विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क, अभ्यास दौरा इत्यादी खर्चाची रक्कम दिली जाते. अपंग विद्यार्थ्यांना लवकर शिष्यवृत्ती मिळावी म्हणून बँकेत त्यांचे खाते उघडून या खात्यावर शिष्यवृत्तीच्या रकमा जमा करण्यात येत आहेत.

**स्वयंरोजगारासाठी बीज भांडवल :** १८ ते ५० वयोगटातील दृष्टिहीन, कर्णबधिरांच्या स्वयंरोजगारासाठी रुपये १.५० लाखपर्यंत



**अपंग व्यक्तींचा कायदा येण्यापूर्वी महाराष्ट्राने देशात सर्वप्रथम १९८५ ला अपंगांच्या विशेष शाळांसाठी स्वतंत्र शाळा संहिता व अनुदानाची सूत्रे स्वीकारली.**

मर्यादा आहे. व्यवसायाकरिता ८० टक्के बँकेमार्फत व २० टक्के (कमाल रुपये ३०,०००/- पर्यंत) सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागामार्फत अनुदान देण्यात येते. त्यामुळे अपंगांना स्वावलंबी होण्याची संधी उपलब्ध झाली आहे.



✡ **राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा :** शासकीय खर्चाने अपंगांच्या दरवर्षी क्रीडा स्पर्धांचे जिल्हा व राज्य स्तरावर आयोजन करण्यात येते. पुणे, औरंगाबाद, तसेच इतर ठिकाणी अंध विद्यार्थी आर्केस्ट्राच्या माध्यमातून लौकिक कमवित असून नाट्य, कला क्षेत्रात पुढे येण्याची संधी त्यांना मिळत आहे.

✡ **गुणवत्ता पारितोषिक :** माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत इयत्ता १० वी व १२ वीच्या परीक्षेमध्ये प्रथम तीन क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांना रुपये १०००/- रोख, प्रमाणपत्र, शाल, श्रीफळ देऊन गौरविण्यात येते.

✡ **कृत्रिम अवयव व साधने पुरविणे** : शारीरिक पुनर्वसनाच्या दृष्टीने अस्थिविकलांग अपंगांकरिता कॅलीपर, कृत्रिम अवयव, तीन चाकी सायकल; कर्णबधिरांकरिता श्रवणयंत्र; अंध विद्यार्थ्यांकरिता टेपरेकॉर्डर व कॅसेट्स इत्यादी साधनांसाठी रुपये ३ हजारपर्यंतचे अर्थसाहाय्य देण्यात येते.

✡ **व्यवसायासाठी अर्थसाहाय्य** : शासकीय तसेच शासनमान्य संस्थेमधून प्रशिक्षण पूर्ण केलेल्या १८ ते ५० वयोगटातील अपंग व्यक्तीस प्रशिक्षण पूर्ण केलेला व्यवसाय सुरू करण्यासाठी लागणाऱ्या साधनांकरिता रुपये १ हजार अर्थसाहाय्य देण्यात येते.

✡ **अपंग कल्याण राज्य पुरस्कार :** उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अपंग कर्मचारी / स्वयंउद्योजक, अपंगांचे नियुक्तक यांना राज्य पुरस्कार प्रदान केले जातात. यामध्ये प्रति वर्षी १२ उत्कृष्ट अपंग कर्मचारी व संयोजक यांना प्रत्येकी रुपये १० हजार रोख, शाल, श्रीफळ, प्रशस्तिपत्रक प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येते. तसेच दोन अपंगांचे नियुक्तक यांना रुपये २५ हजार रोख, शाल, श्रीफळ, प्रशस्तिपत्रक प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येते.

✡ **जागतिक अपंग दिन :** अपंगत्वाविषयी जनजागृती निर्माण व्हावी व त्यांच्या समस्याचे निराकरण होण्याच्या दृष्टीने विविध उपक्रमांचे आयोजन करून प्रत्येक वर्षी ३ डिसेंबर रोजी अपंग दिन साजरा केला जातो. यामधून जनजागृतीसाठी अपंगविषयक कायदे व अपंगांविषयी जनजागृती करण्यात येते.

✡ **अपंग मार्गदर्शन व सल्ला केंद्र :** अपंग व्यक्तींना अपंगांसाठी असलेल्या विविध सोयीसुविधांची माहिती व मार्गदर्शन करणे तसेच त्यांना या सुविधा मिळवून देण्यासाठी जिल्हा समाज कल्याण अधिकारी, कार्यालयात अपंग मार्गदर्शन व सल्ला केंद्र कार्यरत आहेत.

**केंद्र शासनाच्या योजना**

✡ **दीनदयाळ अपंग पुनर्वसन योजना :** या योजनेखाली अपंग क्षेत्रात कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना केंद्र शासनाकडून अनुदान देण्यात येते.

✡ **कृत्रिम अवयव व साधने पुरविणे :** या योजनेखाली अपंग व्यक्तींना स्वयंसेवी संस्थेमार्फत रुपये ६ हजारपर्यंतची साधने, कृत्रिम अवयव, तीन चाकी सायकल, कॅलिपर्स, श्रवणयंत्रे, गतिमंद व अंधांसाठी आवश्यक उपकरणे पुरवली जातात.

✡ **राष्ट्रीय अपंग पुनर्वसन कार्यक्रम :** ही योजना लातूर, नाशिक व चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये राबविली जात आहे. या योजनेखाली अपंगत्वाच्या प्रवर्गनिहाय कर्णबधिरांसाठी नागपूर, अस्थिव्यंगासाठी, विरार, अंधांसाठी, मुंबई येथे गतिमंदासाठी श्रीमती नथीबाई ठाकरसी रिसर्च इन्स्टिट्यूट आणि शिवडी हिल मुंबई येथे राज्य संसाधन केंद्र कार्यान्वित करण्यात आले आहे.

✡ **ग्रामीण अपंग पुनर्वसन योजना :** या योजनेखाली जिल्हास्तरावर जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. या केंद्रामार्फत अपंग व्यक्तींना त्यांच्या गरजेप्रमाणे कृत्रिम अवयव व इतर साधने पुरविण्यात येतात. ही साधने केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या नोडल एजन्सीमार्फत पुरविली जातात. ही योजना सिंधुदुर्ग, कोल्हापूर, लातूर, औरंगाबाद, बुलडाणा व वर्धा जिल्ह्यात कार्यरत आहे.

✡ **अपंगांना राष्ट्रीय पुरस्कार :** केंद्र शासनामार्फत अपंग कर्मचारी, स्वयंउद्योजक त्यांचे नियुक्त, सेवायोजन अधिकारी तसेच अपंगांसाठी कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना राष्ट्रीय पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते.

✡ **स्किम फॉर इम्प्लीमेंटेशन ऑफ पर्सन्स विथ डिसॅबिलीटी ॲक्ट १९९५ :** सर्व प्रकारच्या अपंगांना शासकीय इमारतीमध्ये सहज प्रवेश करता यावा, यासाठी अडथळा विरहित वातावरण निर्माण करणे व अपंग व्यक्तींना संगणक प्रणालीद्वारे अपंगांचे शासन निर्णय, परिपत्रके, अपंगांच्या विविध योजना, अपंगांचा कायदा याची माहिती सहजपणे उपलब्ध व्हावी, यासाठी वेबसाइट तयार करणे, अशा योजना यामध्ये येता येतात. राज्यातील सर्व शासकीय कार्यालये, महाविद्यालये, दवाखाने अडथळा विरहित करण्याच्या दृष्टीने पावले उचलली जात आहेत.

राज्यातील कार्यरत सर्व अपंग कर्मचाऱ्यांना त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ होण्यास्तव रुपये ५० हजारपर्यंत उपकरणे देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

अपंगांना रोजगार व व्यवसायाची संधी मिळावी म्हणून राज्य शासनाने अपंग वित्त व आर्थिक विकास महामंडळाची स्थापना केली आहे. केंद्र शासनाच्या राष्ट्रीय अपंग आर्थिक विकास महामंडळाच्या सहकार्याने व्यावसायिक स्वरूपाच्या अनेक योजना राबविण्यात येतात.

✡ **आधार कार्ड :** अपंग व्यक्तींना आधार कार्ड विनासायास मिळावे यासाठी वेळोवेळी लक्ष देऊन उपाययोजना केली आहे, एवढेच नव्हे, तर मोबाइल व्हॅनसुद्धा वापरण्यात येत आहे.

✡ **बायोमेट्रीक प्रणाली :** विशेष शाळेतील विद्यार्थ्यांची उपस्थिती अचूक असावी म्हणून

**अपंग व्यक्तींसाठी शासकीय नोकरीमध्ये अपंगांचा ३ टक्के कोटा असून गेल्या वर्षापासून विशेष मोहीम राबवून सर्व अनुशेष भरण्याचे काम राज्यात सुरू आहे. राज्यात आतापर्यंत ६० टक्के भरती प्रक्रिया पूर्ण झाली आहे.**

बायोमेट्रीक प्रणाली सुरू करण्यात आली आहे.

✡ **संगणकीकृत अपंगत्व प्रमाणपत्र :** चुकीचे, बोगस अपंग प्रमाणपत्राद्वारे शासनाच्या विविध सवलतींचा गैरफायदा घेतला जाऊ नये व खऱ्या अपंगांनाच लाभ मिळावा म्हणून राज्यात संगणकीय प्रणालीद्वारे अपंगत्वाचे प्रमाणपत्र देण्यात येत आहे. असे प्रमाणपत्र देण्यासाठी शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत वैद्यकीय मंडळे स्थापन करण्यात आली आहेत. राज्याने यासाठी SADM (Software for Assessment of Disability in Maharashtra) हे सॉफ्टवेअर विकसित केले असून राज्यातील ३५ जिल्ह्यांमध्ये या संगणकीय प्रणालीद्वारे अपंग व्यक्तींना प्रमाणपत्र देण्याची कार्यपद्धती सुरू केली आहे.

राज्यातील काही जिल्ह्यांत अपंगांच्या विशेष शाळा, कार्यशाळा, फक्त कागदोपत्री मुलांची संख्या वाढवून दाखविण्याच्या तक्रारींची गंभीर दखल घेतली असून अशा शाळांची तपासणी करून कारवाई करण्यात येत आहे. जवळपास ५५-६० शाळांची मान्यता रद्द केली आहे. अपंगांच्या नावाखाली अशी फसवणूक यापुढे खपवून घेतली जाणार नाही, जी मुले सामान्य शाळेत जाऊ शकतात त्यांना सामान्य शाळेतच पाठविले पाहिजे व त्यांच्या मनातील न्यूनगंड दूर केला पाहिजे.

✡ **प्रतिबंधात्मक उपाययोजना :** अपंगत्व आल्यानंतर त्या व्यक्तींचा सर्वांगीण विकास ही राज्याची भूमिका आहेच, परंतु कायद्यातील तरतुदीनुसार प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. शासनाने विविध उपक्रम व आरोग्य सेवा देऊन प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या आहेत. पल्स पोलिओ मोहिमेमुळे राज्यात अस्थिव्यंगाचे प्रमाण शून्यावर आणण्यात यश आले आहे. त्याचप्रमाणे मूकबधिर, गतिमंदत्व बालके जन्माला येऊ नयेत, म्हणून जर्मन गोवर प्रतिबंधात्मक 'रुबेला लस' किशोरवयीन मुलींना दिल्यास हे प्रमाण कमी करता येईल. पुणे जिल्हा परिषदेने यासाठी रुपये १ कोटीचा निधी राखीव ठेवला असून, आतापर्यंत १५ हजारच्या वर किशोरवयीन मुलींना रुबेला लस दिली आहे.

✡ **अपंगांचे सर्व्हेक्षण :** सन २००१ च्या जनगणनेनुसार राज्यात १५.६९ लाख अपंग असून सन २०११ ची जनगणनेची आकडेवारी अद्याप उपलब्ध झाली नाही. परंतु पुणे जिल्हा परिषद, रायगड जिल्हा परिषद व नवी मुंबई महानगरपालिका यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील अपंगांचे सर्व्हेक्षण केले आहे. त्याच धर्तीवर राज्यातील सर्व जिल्हा परिषद, सर्व महानगरपालिकांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील बहुतेक जिल्हा परिषदांनी या कामास सुरुवात केली आहे. या सर्व्हेक्षणातून शिक्षण घेणारी मुले / मुली किती, उच्च शिक्षण घेणारे किती, तंत्र शिक्षणात किती, नोकरीत किती / खाजगी नोकरी किती, नोकरीची / उद्योग व्यवसायाची आवश्यकता असणारे किती अपंग यांची आकडेवारी उपलब्ध होईल व जिल्हानिहाय करणे सोयीचे होईल, जिल्हा परिषदा, महानगरपालिका / नगरपालिका यांच्या कार्यक्षेत्रात अपंगांचे प्रशिक्षण व पुनर्वसन करणे सुलभ होईल. जिल्हा परिषदा / महानगरपालिका / नगरपालिका यांनी अपंग विकासासाठी अर्थसंकल्पातील ३ टक्के निधी राखीव ठेवून या क्षेत्रावरच खर्च करावयाचा आहे. ❑ ❑

### अपंग कल्याण निधी

अपंगांना शासनाच्या योजनांव्यतिरिक्त उच्च शिक्षण, संशोधन, पुनर्वसन व आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात, म्हणून महाराष्ट्र अपंग कल्याण निधी येत्या सहा महिन्यात कार्यान्वित करण्यात येईल. राज्यातील उद्योजक, दानशूर व्यक्ती या कल्याणनिधीला मदत करू शकतील.



## स्मारकांचे संवर्धन

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे संवर्धन :**

१) नागपूर येथील दीक्षाभूमीवर मध्यवर्ती स्मारकाच्या अनुषंगाने यात्रीनिवास, सभागृह व संग्रहालय इत्यादी बांधकामाच्या रुपये ७ कोटी इतक्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली आहे.

२) मौजे चिंचोली, (जिल्हा- नागपूर) येथे वस्तुसंग्रहालयाचे आधुनिकीकरण, ट्रेनिंग सेंटर, संरक्षण भित इत्यादी कामाकरिता रुपये ५ कोटी एवढया खर्चाच्या कामांना प्रशासकिय मान्यता देण्यात आली आहे.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे महाड येथे राष्ट्रीय स्मारक :**

महाड, जिल्हा रायगड येथे झालेल्या चवदार तळे सत्याग्रहाच्या पार्श्वभूमीवर महाड येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकाची भव्य इमारत शासनाने रु.१३ कोटी खर्च करुन उभी केली आहे.

**अण्णा भाऊ साठे यांचे स्मारक :**

साहित्य भूषण अण्णा भाऊ साठे स्मारक ट्रस्ट नागपूर यांना अण्णाभाऊ साठे स्मारक इमारती बांधकामाच्या रुपये २.६० कोटी एवढया खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन**

प्रत्येक जिल्हयात १ याप्रमाणे ३४ जिल्हयांच्या ठिकाणी सामाजिक न्याय भवन बांधण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. २० ठिकाणी सामाजिक न्याय भवनाचे बांधकाम पूर्ण झाले असून ८ठिकाणी बांधकाम प्रगतीपथावर आहे.



**अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी सांस्कृतिकदृष्टया महत्त्वाच्या स्थळांचा विकास करण्यासाठी ३४.३७ कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला.**

# अपंगांना मदतीचा हात

अपंग कल्याणार्थ शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा / शासन सेवेत आरक्षणाचा फायदा मिळविण्यासाठी व्यक्तींचे अपंगत्व, अपंग व्यक्ती अधिनियम, १९९५ च्या कायद्यातील तरतुदीनुसार पुढीलप्रमाणे निर्धारित करण्यात आले आहे.

**१. अंधत्व :** याचा अर्थ जेव्हा खालीलपैकी कोणत्याही परिस्थितीमुळे एखादी व्यक्ती व्याधिग्रस्त असते तेव्हा त्या परिस्थितीचा निर्देश असा आहे.

अ) पूर्णपणे दृष्टी नसणे किंवा

ब) दोहोपैकी चांगल्या डोळ्यातील दृष्टीत दोष सुधारक लेन्ससह तीक्ष्णता ६/६० किंवा २०/२०० (स्नेलन) पेक्षा अधिक नसणे.

क) दृष्टीक्षेत्राची मर्यादा २० अंशाच्या कोनापर्यंतच असणे किंवा त्याहून अधिक वाईट असणे.

२. क्षीणदृष्टी :- ज्या व्यक्तीच्या दृष्टीला झालेली इजा उपचारानंतर किंवा मानक अपवर्तनीच्या सुधारणेनंतरही राहिलेली आहे, परंतु जी व्यक्ती नेमून दिलेल्या कामाच्या नियोजनासाठी किंवा ते पार पाडण्यासाठी आपल्या दृष्टीचा योग्य त्या साहाय्यक साधनाच्या मदतीने वापर करू शकते अशी व्यक्ती.

३. बरा झालेला कुष्ठरोग :- कुष्ठरोग बरा झालेली परंतु पुढील व्याधीग्रस्त असलेली कोणतीही व्यक्ती.

अ) हातापायांची संवेदन क्षमता गमाविणे तसेच डोळ्यांची पापण्यांची संवेदन क्षमता गमाविणे व त्वचेचा आंशिक पक्षाघात होणे. परंतु प्रत्यक्षात विद्रुपता न दिसणे.

ब) प्रत्यक्ष दिसून येणारी विद्रुपता आणि त्वचेचा आंशिक पक्षाघात होणे परंतु सामान्यत: नित्याचे व्यवहार करणे इतपत त्याच्या हातापायांत पुरेशी चलनशीलता असणे.

क) अत्यंत शारीरिक विद्रुपता तसेच वाढते वय यामुळे त्याला कोणताहि लाभदायक व्यवसाय करता न येणे.

४. श्रवण शक्तीतील दोष :- वारंवार होणाऱ्या संभाषणाच्या अंतरातील ध्वनिलहरींच्या बाबतीत चांगल्या कानाने ऐकताना ६० डेसिबल्स किंवा त्याहून अधिक प्रमाणात श्रवण शक्तीत दोष असणे.

५. चलनवलन विषयक विकलांगता :- हाडे, सांधे किंवा स्नायू यांची अशा प्रकारची विकलांगता ज्यामुळे अवयवांच्या हालचालींवर मोठ्या प्रमाणात निर्बंध होणे किंवा कोणत्याही प्रकारचा मेंदुचा अर्धांग वायू होणे.

६. गतिमंदता :- एखाद्या व्यक्तीच्या मनाचा विकास खुंटलेला किंवा अपूर्ण विकास झालेल्याची स्थिती.

७. मानसिक आजारपण :- मानसिक मंदपणाव्यतिरिक्त इतर कोणताही मानसिक विकार असा आहे.



राज्यातील दृष्टिहीन, कर्णबधिर, अस्थिविकलांग व मनोविकलांग मुलांना शिक्षण, प्रशिक्षणाची संधी शासनामार्फत उपलब्ध करून देण्यात येते. त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील करण्याच्या दृष्टीने समाजिक न्याय विभागाच्या अपंग कल्याण आयुक्तालयामार्फत अपंगांचे शिक्षण व पुनर्वसनविषयक योजना राबविल्या जातात. त्याचप्रमाणे अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ या कायद्याच्या अंमलबजावणीचे कामकाज अपंग कल्याण आयुक्तालयामार्फत केले जाते. आयुक्त, अपंग कल्याण कार्यालयाची निर्मिती २००० मध्ये करण्यात आली.

| अपंगत्वाचा प्रकार | अपंग व्यक्तींची संख्या | पुरुष | स्त्रिया |
|---|---|---|---|
| अंध | ३२०४६६ | २६०४६४ | ६०,००२ |
| मुके | ६३८०२ | ४९२४१ | १४,५६१ |
| बहिरे | ५१७८९ | ४०६०१ | ११,१८८ |
| अस्थिव्यंग | ३७४६७१ | १९५२७४ | १,७९,३९७ |
| गतिमंद | १२३१३९ | ९०१३५ | ३३,००४ |
| एकूण | ९,३३,८६७ | ६,३५,७१५ | २,९८,१५२ |

स्वयंरोजगारासाठी बीज भांडवल योजनेंतर्गत १८ ते ५० वयोगटातील अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी प्रकल्प खर्च मर्यादा आणि अनुदान मर्यादा रुपये **१.५०** हजारपर्यंत वाढविली आहे. अपंग लाभार्थ्यांची उत्पन्न मर्यादा रुपये १,००,०००/- एवढी करण्यात आली आहे.

## अपंगांसाठीच्या योजना

अपंगांसाठीच्या योजना जिल्हा स्तरावर मुंबई शहर व उपनगर या जिल्ह्यामध्ये सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग व इतर जिल्ह्यामध्ये जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या कार्यालयामार्फत राबविल्या जातात. यामध्ये प्रामुख्याने पुढील योजनांचा समावेश आहे.

१. शासकीय अंध शाळा चालविणे.

२. अपंगांना कृत्रिम अवयव, कर्णयंत्र, वैद्यकीय उपकरणे यांचा आर्थिक साहाय्याद्वारे पुरवठा.

३. अंध, कर्णबधिर आणि विकलांग यांच्याकरिता शासकीय संस्था.

४. अपंगांकरिता बहुउद्देशीय संमिश्र केंद्र.

५. अंध, मूकबधिर, मंदबुद्धी मुलांचे शासकीय व निमशासकीय शाळांमधून शिक्षण / प्रशिक्षण योजना.

६. शासकीय / शासनमान्य अपंग संस्थेतील अप्रशिक्षित शिक्षकांसाठी प्रशिक्षण योजना.

७. शासकीय मूकबधिर विद्यालय.

८. महाराष्ट्र शासन, अपंग, अंध, मूकबधिर व गतिमंद शिष्यवृत्ती.

९. भारत सरकार अपंग, अंध, मूकबधिर, गतिमंद शिष्यवृत्ती योजना.

१०. जिल्हा स्तरावर अपंगांकरिता मार्गदर्शन व सल्ला केंद्र उघडणे.

११. गुणवंत अपंग कर्मचारी व त्यांचे नियुक्तक यांना राज्य पुरस्कार योजना.

१२. अपंगांना स्वयंरोजगारासाठी बीज भांडवल योजना.

१३. अपंगांसाठी राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा.

१४. साहाय्यक तंत्रज्ञान व उपकरणे पुरविणे.

## योजनांमध्ये केलेल्या सुधारणा

मागील वर्षापासून ग्राहक मूल्य निर्देशांक मध्ये झालेली वाढ तसेच महागाई लक्षात घेऊन निवासी प्रवेशितांसाठी रुपये ६३०/- वरून दरमहा प्रति विद्यार्थी रुपये ९००/- आणि गतिमंद निवासी विद्यार्थ्यांसाठी रुपये ६३०/- वरून दरमहा रुपये ९९०/- प्रति विद्यार्थी इतके परिपोषण अनुदान दिनांक १ जानेवारी २०१२ पासून लागू केले आहे.

**३) अपंग कल्याण राज्य पुरस्कार :** सन १९८२ पासून राज्य शासनामार्फत अपंग क्षेत्रात कार्य करणाऱ्या व अपंगांना नोकऱ्या देऊन




त्यांच्या पुनर्वसनामध्ये लक्षणीय कामगिरी बजाविणाऱ्या व्यक्ती आणि स्वयंउद्योजक अपंग व्यक्तींना उल्लेखनीय कामाबद्दल राज्य शासनाच्या वतीने पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. या पुरस्काराच्या रकमेमध्ये १०,०००/- एवढी वाढ केलेली आहे. अपंग क्षेत्रामध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्यांना नियोक्ता व सेवा योजन अधिकारी कार्यालयास दरवर्षी मानचिन्ह, प्रशस्तिपत्रक, शाल व श्रीफळ देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात येत होता. मात्र कोणतीही पुरस्काराची रोख रक्कम देण्यात येत नव्हती. या सुधारित शासन निर्णयान्वये शासनाने आता अपंग क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या दोन नियोक्तकांना प्रत्येकी रुपये २५,०००/- पुरस्काराची रोख रक्कम, मानचिन्ह, प्रमाणपत्र, शाल व श्रीफळ देऊन गौरविण्याचा सुधारित निर्णय लागू केला आहे.

## विकास व पुनर्वसन

**१) शासकीय / निमशासकीय सेवेमध्ये आरक्षण देऊन विशेष मोहिमेद्वारे पदभरती :** अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ मधील कलम ३३ नुसार केंद्र व राज्य शासनाच्या आस्थापनेवरील अपंग व्यक्तींसाठी ३ टक्के एवढी पदे सुनिश्चित करून ती भरणे आवश्यक आहे. अशी पदे सुनिश्चित करण्यासाठी शासनाने तज्ज्ञ समिती गठीत केली आहे. सद्यःस्थितीत अपंगांसाठी आरक्षित पदावर योग्यरीत्या व पात्र अपंग उमेदवारांची नियुक्ती करण्यात येत नाही. अशा व अन्य मुद्यांबाबत उच्च न्यायालयामध्ये जनहित याचिका आणि रिट याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. या जनहित यचिकेवर न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासनाच्या विविध विभागांमार्फत वेळोवेळी पदाची सुनिश्चिती करून अपंगांसाठी आरक्षित पदे भरण्यासाठी विशेष भरती मोहीम राबवून अपंग व्यक्तीसाठी आरक्षित असलेली सर्व पदे भरण्याबाबत कालबद्ध कार्यक्रम राबविण्याच्या सूचना शासनाकडून देण्यात आल्या.

त्या अनुषंगाने अपंगांच्या आरक्षणानुसार भरण्यात येणाऱ्या पदांचा तसेच अनुशेषाचा आढावा मागील दोन वर्षापासून घेण्यात येत आहे. ३१ डिसेंबर २०१० पर्यंत राज्यामध्ये एकूण ५,६३९ एवढ्या सरळ सेवा पदांचा व पदोन्नतीच्या १३३२ पदांचा अनुशेष असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर अपंगांच्या विशेष भरती मोहिमेअंतर्गत एकूण १७१६ एवढी पदे सरळ सेवा भरती प्रक्रियेअंतर्गत भरलेली असून सद्यःस्थितीत ९९३ पदांसाठी शासनाच्या वेगवेगळ्या विभागांनी भरतीसाठी जाहिराती प्रसिद्ध केल्या आहेत. त्याचप्रमाणे पदोन्नतीच्या ३३२ पदांचा अनुशेष भरलेला असून ४३ पदोन्नतीच्या पदांचा अनुशेष भरण्यासाठी प्रक्रिया सुरू आहे. उर्वरित १ हजार पदांचा अनुशेष भरण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम ठरविण्यात आला आहे.

**स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या सामाजिक न्याय विभागाच्या नियंत्रणाखालील अपंगांच्या विशेष शाळा / कर्मशाळामधील प्रवेशितांना देण्यात येणाऱ्या परिपोषण अनुदानामध्ये वाढ करण्यात आली आहे.**

**२. अपंगांच्या रोजगार मेळाव्याचे (Job Fair) आयोजन :-** राज्य शासनाच्या आस्थापनेवर ३ टक्के एवढी पदे आरक्षित ठेवण्याच्या तरतुदीनुसार पदे भरण्याची कार्यवाही सुरू असून त्याबरोबरच खाजगी क्षेत्रामध्ये अपंग व्यक्तींना नोकरी मिळवून देण्यासाठी अपंग कल्याण आयुक्तालयाने स्वयंसेवी संस्थाच्या मदतीने 'जॉब फेअर'सारख्या उपक्रमाद्वारे विशेष प्रयत्न सुरू केले आहेत. अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे व सार्थक एज्युकेशनल ट्रस्ट, नवी दिल्ली या स्वयंसेवी संस्थेच्या संयुक्तिक प्रयत्नाने पुणे येथे २० व २१ सप्टेंबर २०१२ रोजी रोजगार (नोकरी) मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. यामध्ये पुणे व पिंपरी शहरातील एकूण १८ कंपन्यांनी सहभाग घेतला. या मेळाव्यामध्ये संपूर्ण महाराष्ट्रातून ४०५ अपंग उमेदवारांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी १०४ अपंग उमेदवारांना खाजगी क्षेत्रामध्ये नोकरी उपलब्ध झाली.

**३. अपंग कर्मचारी / अधिकारी यांना साहाय्यक तंत्रज्ञान व उपकरणे उपलब्ध करून देणे :** राज्य शासनाच्या अखत्यारीतील शासकीय, निमशासकीय सेवेत नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना त्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी अनेक अडचणी येतात. विशेषत: पूर्णत: अंध व क्षीणदृष्टी असलेल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या जबाबदाऱ्या आणि काम पार पाडण्यासाठी साहाय्यक तंत्रज्ञान व उपकरणे उपलब्ध करून दिल्यास त्यांना



सुसह्य पद्धतीने काम पार पाडणे शक्य होते. या अनुषंगाने उच्च न्यायालयात दाखल झालेली जनहित याचिका / रिट याचिकांवर न्यायालयाने दिलेले निर्देश लक्षात घेऊन शासनाने अशा कर्मचाऱ्यांना त्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी आवश्यक असणारे साहाय्यक तंत्रज्ञान आणि उपकरणे यांची माहिती आणि प्रशिक्षण देऊन अशी उपकरणे उपलब्ध करून देण्याचा निर्णय २७ एप्रिल २०११ रोजी घेतला आहे. या निर्णयानुसार शासकीय व निमशासकीय सेवेतील पूर्णत: अंध व क्षीणदृष्टी अस्थिव्यंग आणि कर्णबधिर कर्मचाऱ्यांसाठी तसेच भविष्यात नियुक्त होणाऱ्या अशा कर्मचाऱ्यांसाठी साहाय्यक तंत्रज्ञान आणि उपकरणे रुपये ५०,०००/- मर्यादेपर्यंत उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**४. अपंगांच्या विशेष शाळा / कार्यशाळांमध्ये बायोमॅट्रीक प्रणाली बसविण्यात आली :** सामाजिक न्याय विभागाअंतर्गत शासकीय व अनुदानित संस्थांद्वारे चालविण्यात येणाऱ्या शाळा / कार्यशाळांमधील कर्मचारी / अधिकारी तसेच विद्यार्थी यांची उपस्थिती बायोमेट्रीक प्रणालीद्वारे लागू करण्याचा निर्णय सामान्य न्याय विभागाने दिनांक ३१ मार्च २०११ नुसार घेतला आहे. महाराष्ट्रात कार्यरत सामाजिक न्याय विभागाअंतर्गत विशेष शाळा / कार्यशाळांमध्ये बायोमेट्रीक प्रणाली लागू केली. या तंत्रज्ञानाचा उपयोग शालेय कर्मचारी / विद्यार्थ्यांच्या नियमित हजेरीवर नियंत्रण ठेवणे तसेच बोगस पटसंख्येला आळा घालण्यासाठी होणार आहे.

### संगणकीय प्रणालीद्वारे प्रमाणपत्र

शाळेमध्ये विशेष शिक्षक, अपंग शिष्यवृत्ती, स्वयंरोजगारासाठी अर्थसाहाय्य, संजय गांधी निराधार योजनेतून अनुदान, कृत्रिम अवयव साधने पुरविणे, बस प्रवास सवलत, नोकऱ्यामध्ये आरक्षण इ. या सोयीसुविधांचा लाभ घेण्यासाठी अपंग व्यक्तीकडे अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ मधील तरतुदीप्रमाणे सक्षम प्राधिकारी यांच्या अपंगत्वाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक असते. असे प्रमाणपत्र देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत वैद्यकीय मंडळे स्थापन करण्यात आली आहेत.

या अपंग व्यक्तींना प्रमाणपत्र देण्यासाठी स्थापन केलेल्या मंडळामार्फत अपंग व्यक्तींना अपंगत्वाच्या टक्केवारीसह प्रमाणपत्र देण्यात येते. हे प्रमाणपत्र संबंधित अपंगत्वाच्या प्रवर्गातील तज्ज्ञामार्फत तपासणी करून देण्यात येत असले तरी त्यांना देण्यात आलेल्या प्रमाणपत्रातील अपंगत्वाची टक्केवारी राज्यात सर्वच ठिकाणी बिनचूक व विश्वासहार्य देण्यात येत नव्हती; तसेच अपंग व्यक्ती वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन अपंगत्वाचे प्रमाणपत्र प्राप्त करून घेऊन अपंगासाठी असलेल्या सोयीसुविधांचा लाभ बोगस प्रमाणपत्राच्या आधारे घेत असल्याचेही निदर्शनास आले. त्यामुळे खऱ्या अपंग व्यक्ती लाभापासून वंचित राहत होत्या.

शासकीय योजना व सोयीसुविधांचा लाभ योग्य त्या व्यक्तीस मिळावा, शासकीय निधीमध्ये होणारी अनियमितता व अपहार होऊ नये या हेतूने अलीकडील काळात लाभार्थ्यांना देण्यात येणारे आधार कार्ड त्यांच्या बँक खात्याशी संलग्न करून थेट त्यांच्या खात्यामध्ये अनुदानाची रक्कम जमा करण्याची कार्यपद्धती केंद्र शासनामार्फत तसेच राज्य शासनामार्फत सुरू केली आहे. खऱ्या व गरजू अपंग व्यक्तींना असलेला लाभ त्यांना मिळावा यासाठी विश्वासाने व बिनचूकपणे राज्यात अपंग व्यक्तीस एकदाच अपंगत्वाचे प्रमाणपत्र संगणकीय प्रणालीप्रमाणे देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. आंध्र प्रदेशमध्ये अपंग व्यक्तींना अपंगत्वाचे प्रमाणपत्र देण्यासाठी SADAREM (Software for Assessment of Disabled for Access Rehabilitation and Empowerment) हे सॉफ्टवेअर विकसित करण्यात आले आहे. या संगणकीय प्रणालीद्वारे अपंग व्यक्तींना देण्यात आलेले प्रमाणपत्र हे बिनचूक असून त्या व्यक्ती दुसरे प्रमाणपत्र इतर ठिकाणी घेऊ शकत नाहीत. त्यामुळे खऱ्या व योग्य अशा अपंग व्यक्तींना शासकीय योजनांचा लाभ देण्यात येतो. या प्रणालीचा अभ्यास करून तसेच त्यामधील त्रुटी दूर करून वरील संगणकीय प्रणालीप्रमाणेच महाराष्ट्र शासनाने SADM Software for Assessment of Disabilty in Maharashtra हे संगणकीय सॉफ्टवेअर विकसित केले आहे. राज्यातील ३५ जिल्ह्यांमध्ये या संगणकीय प्रणालीद्वारे अपंग व्यक्तींना प्रमाणपत्र देण्याची कार्यपद्धती सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत ३ डिसेंबर २०१२ पासून लागू केली आहे. या कार्यपद्धतीमध्ये अपंग व्यक्तींना बिनचूक टक्केवारी नमूद केलेले प्रमाणपत्र मिळणार आहे. तसेच एका व्यक्तीस दुसऱ्या जिल्ह्यात जाऊन

**राज्यामध्ये SADM (Software for Assessment of Disablity in Maharashtra) या संगणकीय प्रणालीद्वारे अपंगत्वाचे प्रमाणपत्र दिले जाते.**

दुसरे प्रमाणपत्र काढता येणार नाही. यामुळे खोट्या व बोगस प्रमाणपत्राच्या आधारे सोयी - सोविधा घेणाऱ्यांना प्रतिबंध बसून योग्य व खऱ्या अपंग व्यक्तींना सोयी-सुविधांचा लाभ मिळणार आहे.

**व्यंगमुक्त महाराष्ट्र अभियान**

पुणे जिल्हा परिषदेने यासाठी आणखी एक पाऊल उचलले असून जिल्ह्यामध्ये अपंगत्व प्रतिबंधासाठी रुबेला लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे.

रुबेला हा रोग विषाणूमुळे होत असून या आजारामुळे कर्णबधिरत्व तसेच गतिमंदत्वासारखे अपंगत्व येऊ शकते. हे टाळण्यासाठी रुबेला प्रतिबंधात्मक लसीकरण मोहीम हाती घेण्यात आली आहे. राज्याच्या इतर सर्व जिल्ह्यांमध्ये ही मोहीम राबविण्याची महत्त्वाकांक्षी योजना कार्यान्वित करण्यात येत आहे.



**प्राथमिक माहिती** : - रुबेला हा रोग विषाणूमुळे होतो. या रोगात अंगावर लालसर ठिपके दिसू लागतात. अंगावर पुरळ उठल्याप्रमाणे दिसते. रोग्याला सौम्य ताप येतो व पुरळ चेहऱ्यावरून खाली पसरत जातात. हे चट्टे ३ दिवसांपेक्षा अधिक राहत नाहीत यालाच जर्मन मिझल्स म्हणून ओळखले जाते.

**रुबेला कोणाला होतो?:** हा रोग कोणत्याही वयाच्या स्त्री/पुरुषाला होऊ शकतो. याचा प्रसार हवेमार्फत तसेच घसा व शिंकेच्या फवाऱ्यातून होतो. तसेच लागण झाल्यापासून दोन ते तीन आठवडे त्याची लक्षणे दिसावयास लागतात. पण आजारी माणसापासून प्रसार किंवा दुसऱ्याला लागण पुरळ उठल्यानंतर चार दिवसांत होते.

**गर्भवती स्त्रीला संभवणारे धोके** : गर्भवती महिलेला तिच्या पहिल्या तीन महिन्यांच्या गर्भावस्थेत रुबेलाची लागण झाल्यास गर्भावर वाईट परिणाम होतो. त्यांच्यात जन्मत: दोष निर्माण होऊ शकतात. त्यात जन्मत: बाळाला मोतिबिंदू, गतिमंदपणा, बहिरेपणा, हृदयदोष इ. अनेक दोष असू शकतात. तीन महिन्यानंतर लागण झाल्यास वरीलपैकी एखादा दोष जरूर असतो. काही स्त्रियांमध्ये वारंवार गर्भपात होण्यास हा आजार कारणीभूत असतो म्हणून स्त्रियांनी गर्भधारणा होण्यापूर्वी ही लस टोचून घेणे आवश्यक असते.

**लस टोचणे :** मुख्यत: लग्नाच्या अगोदर ९ ते १८ वयोगटातील किशोरवयीन मुलींनी ही लस टोचून घेणे आवश्यक असते. मुले होण्याचे वय असलेल्या सर्व महिलांनी लग्नापूर्वी व मासिक पाळी सुरू झाल्यानंतर पहिल्या आठवड्यात लस टोचल्यावर १ महिना गर्भधारणा होऊ देऊ नये. या लसीचा परिणाम २५ वर्षांपर्यंत टिकून राहतो. या लसीकरणामुळे गतिमंदपणा व बहिरेपणा यासारखे जन्मत: बाळांना होणारे अपंगत्वाचे धोके टाळता येतात.

**७. अपंगांसाठी धोरण :** अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे) संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ दि नॅशनल असोसिएशन फॉर वेल्फेअर ऑफ पर्सन्स विथ ऑटिझम, सेरेब्रल पाल्सी, मेंटल रिटार्डेशन ॲण्ड मल्टीपल डिसॅबिलिटीज, ॲक्ट १९९९ अंमलात आले आहे. अपंग कायदा १९९५ च्या तरतुदीनुसार या अधिनियमाची अंमलबजावणी करण्याकरिता केंद्र व राज्य स्तरावर यंत्रणा उभारण्यात यावी. प्रामुख्याने मुळातच अपंगत्व येऊ नये यासाठी उपाययोजना, त्याचप्रमाणे अपंगत्वाचा लवकरात लवकर शोध घेण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे, याकरिता आवश्यक ते प्रशिक्षण संबंधितांना देणे व लवकरात लवकर उपचार करणे, अपंग व्यक्तींना रोजगार उपलब्ध होण्याकरिता शासकीय व निमशासकीय आस्थापनांमध्ये विहीत आरक्षण ठेवण्यात यावे. स्वयंरोजगाराच्या जास्तीत संधी उपलब्ध करून देणे इत्यादी बाबी अपेक्षित आहेत. त्याचबरोबर अपंग व्यक्तींकरिता सकारात्मक उपाययोजना करणे, अडथळा विरहित मुक्त संचार व्यवस्था उपलब्ध करणे. (Barrier free Environnent) केंद्र व राज्य स्तरावर तक्रार निवारण यंत्रणा उभारणे, इत्यादी बाबी या अधिनियमामध्ये नमूद करण्यात आलेल्या आहेत व त्या अनुषंगाने अपंगांच्या कल्याणकारी योजना अंमलात आणणे या कायद्यानुसार अभिप्रेत आहे.

अपंग प्रवर्गातील गतिमंद, बहुविकलांग या प्रवर्गाकरिता नॅशनल ट्रस्ट ॲक्ट १९९९ अंमलात आला आहे. या अधिनियमाद्वारे या प्रवर्गातील व्यक्तींच्या कल्याणाकरिता विश्वस्त यंत्रणेची स्थापना, त्याचप्रमाणे जिल्हा स्तरावर समितीची स्थापना व अशा व्यक्तींच्या पालकत्वाची व्यवस्था करणे या कायद्यानुसार अपेक्षित आहे. उपरोक्त दोन्ही अधिनियमांच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याकरिता शासनाच्या विविध विभागांमार्फत उपाययोजना करणे, तसेच या सर्व विभागासाठी समन्वय साधून अपंग व्यक्तींच्या कल्याणासाठी उपलब्ध साधनसामग्रीचा समुचित वापर करून कालबद्ध कार्यक्रम तयार करणे, आवश्यक आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्याचे धोरण व अपंग कल्याण कृती आराखडा तयार करण्याचे ठरविण्यात आले आहे.

अपंग कल्याण आयुक्तालयाने २२ फेब्रुवारी २०१२ च्या आदेशान्वये अपंगांसाठीचे धोरण व

व्यंगमुक्त महाराष्ट्र अभियान हाती घेण्यात आले असून मुळातच अपंगत्व येऊ नये म्हणून प्रतिबंधात्मक लसीकरणाची मोहीम राज्यामध्ये राबविली जात आहे.

कृती आराखडा अंतिम करण्यासाठी कोअर ग्रुपची स्थापना केली आहे. या कोअर ग्रुपने व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्याकडील तज्ज्ञ व्यक्ती व प्रतिनिधी यांनी पुणे येथे संयुक्तपणे बैठका घेऊन अपंग कल्याण धोरणाचा अंतिम मसुदा तयार केला आहे. हा मसुदा नुकताच शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला. त्याचप्रमाणे अपंग कल्याण कृती आराखडा बनविण्याचे काम आता अंतिम टप्प्यामध्ये आहे.

**८. अपंग व्यक्तींना कृत्रिम अवयव व साधने पुरविणे :** अपंग व्यक्तींनी सामाजिक / आर्थिक आणि व्यावसायीक पुनर्वसनाच्या दृष्टीने साहाय्यभूत साधनांची (कृत्रिम अवयवांची) गरज भासते. अशा कृत्रिम अवयवांचे अस्थिव्यंग व्यक्तींना तीन चाकी सायकल, व्हीलचेअर, कुबड्या, जयपूर फूट, कॅलिपर्स इ. साधने तर अंध व्यक्तींना ब्रेल साहित्य, टेपरेकॉर्डर, अंधाच्या सफेद काठ्या, कर्णबधिर व्यक्तीकरिता वैयक्तिक श्रवणयंत्रे, शैक्षणिक साहित्य व श्रवणविषयक इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे, गतिमंदासाठी पुनर्वसन तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार आवश्यक ती साधने पुरविली जातात. त्या अनुषंगाने केंद्र शासन तसेच राज्य शासनाकडून अपंग व्यक्तींना कृत्रिम अवयव पुरविणे / Scheme of Assistance to Disabled Persons for Purchase / Fitting of Aids and Appliance या योजना राबविण्यात येत आहेत. महाराष्ट्रामध्ये सर्व जिल्ह्यांत स्वयंसेवी संस्था तसेच जिल्हा परिषदा यांच्यामार्फत या योजना राबविण्यात येत आहेत. या योजने अंतर्गत प्रत्येक जिल्ह्यातून अपंग व्यक्तींना विशेष शिबिरांचे आयोजन करून कृत्रिम अवयव व साधने उपलब्ध करून दिली जातात. २०१२ मध्ये हिंगोली, बीड, नंदुरबार या जिल्ह्यांमध्ये अपंगांची विशेष शिबिरे आयोजित करण्यात आली.

**अपंगांसाठी न्यायाधीकरण**

२००० मध्ये आयुक्त, अपंग कल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयाची निर्मिती करण्यात आली. आयुक्त अपंग कल्याण, पुणे यांना अपंग व्यक्तीचे अधिकार डावलल्याबाबतच्या तक्रारीमध्ये लक्ष घालण्यासाठी अधिनियमाच्या कलम ३२ व ६३ अन्वये दिवाणी न्यायालयाचे अधिकार देण्यात आले आहेत. राज्यभरातून २००० पासून या न्यायाधीकरणाकडे तक्रारी दाखल झालेल्या आहेत. ❐ ❐

मार्च महिन्यातील लोकराज्यच्या अंकात पृष्ठ क्रमांक १९ वर 'उत्कृष्ट मराठी वाङ्मय निर्मितीसाठी लेखकांना उत्तेजन देण्यासाठी उत्कृष्ट मराठी वाङ्मय निर्मितीस राज्य पुरस्कार- रु.२,००,०००/-' असे मुद्रणदोषामुळे छापले गेले आहे. ही रक्कम रु.२९,००,०००/- अशी वाचण्यात यावी.

# रमाई आवास घरकुल योजना

ग्रामपंचायत, नगरपालिका क्षेत्र व महानगरपालिका क्षेत्रातील अनुसूचित जाती व नवबौद्ध लोकांना पक्के घरे बांधून देण्यात येईल. तसेच शासकीय अभिकरणामार्फत घर खरेदीस शासन निर्णय १५ नोव्हेंबर, २००८ व ९ मार्च, २०१० च्या शासन निर्णयान्वये विहित घर किंवा मर्यादेत अनुदान उपलब्ध करून देण्यात येईल.

**घराची किंमत मर्यादा व लाभार्थी हिस्सा**

घराच्या बांधकामासाठी क्षेत्रनिहाय कमाल खर्चाची मर्यादा, लाभार्थी हिस्सा पुढीलप्रमाणे.

| क्षेत्र | मंजूर अनुदान | लाभार्थी हिस्सा |
|---|---|---|
| ग्रामीण क्षेत्र | ७०,००० रु. | निरंक |
| नगरपालिका क्षेत्र | १,५०,००० रु. | ७.५% |
| महानगरपालिका क्षेत्र | २,००,००० रु. | १०% |

**घराचे क्षेत्रफळ**

घराच्या बांधकामाचे क्षेत्रफळ २६९ चौ.मी. राहील.

पात्रता :- १) लाभार्थी अनुसूचित जातीचा असावा., २) लाभार्थ्याचे महाराष्ट्रातील वास्तव्य किमान १५ वर्षे असावे., ३)अर्जदाराच्या कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा पुढील प्रमाणे राहील.

ग्रामीण क्षेत्र- १ लाख, नगर परिषद क्षेत्र- १.५० लाख, मनपा- २ लाख., ४) लाभार्थ्याची स्वत:ची जागा असावी अथवा त्यांचे स्वत:चे कच्चे घर असलेल्या ठिकाणी घर बांधण्यात येईल., ५) या योजनेचा लाभ कुटुंबातील एकाच व्यक्तीस देण्यात येईल. अर्जदाराने शासनाच्या इतर गृहनिर्माण योजनेचा लाभ घेतलेला नसावा.




**प्राधान्य क्षेत्र :**

घरे बांधताना खालील प्रमाणे प्राधान्यक्रम देण्यात येईल.

अ) जातीय दंगलीमध्ये घराचे नुकसान (आगीमुळे व इतर तोडफोड) झालेली व्यक्ती.

ब) ॲट्रासिटी ॲक्टनुसार पीडित झालेल्या अनुसूचित जातीच्या पात्र व्यक्ती. क) पूरग्रस्त क्षेत्र., ड) विधवा महिला., इ) उर्वरित सर्व क्षेत्र. ❐ ❐

अनुसूचित जातीच्या लोकांचे राहणीमान उंचावे व त्यांच्या निवाऱ्याचा प्रश्न सुटावा म्हणून ग्रामीण व शहरी भागामध्ये त्यांच्या स्वत:च्या जागेवर अथवा कच्च्या घराच्या ठिकाणी पक्के घर बांधून देण्याबाबत रमाई घरकूल योजना राबविण्यात येत आहे.



# ई-शिष्यवृत्ती रक्कम थेट बँक खात्यात

महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक समतेचे स्वप्न पाहिले होते. जात आणि वर्गाच्या आधारावर होणारा भेदभाव केवळ चांगल्या व दर्जेदार शिक्षणाच्या माध्यमातूनच दूर होऊ शकेल असा त्यांना विश्वास होता.

ही बाब विचारात घेऊन केंद्र शासनाने १९४५ पासून भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना सुरू केली. १९६० साली ही योजना राज्याकडे हस्तांतरित झाली. या योजनेमध्ये वेळोवेळी अनेक बदल करण्यात आले. या योजनेमध्ये शेवटचा बदल ३१ डिसेंबर २०१० रोजी करण्यात आला. यानुसार या योजनेचा लाभ मिळण्यासाठी अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांच्या पालकांच्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा २ लाख रुपये तर इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या पालकांची वार्षिक मर्यादा १ लाख रुपये अशी करण्यात आली. काही नवीन अभ्यासक्रमांचा समावेश करण्यात आला आणि निर्वाह भत्त्याच्या दरामध्येही वाढ करण्यात आली.

या योजनेमध्ये पूर्वी मागासवर्गीय विद्यार्थी अर्ज महाविद्यालयांकडे भरून देत. यानंतर महाविद्यालयांचे प्राचार्य हे अर्ज संबंधित जिल्ह्याचे समाज कल्याण अधिकारी यांच्याकडे पाठवित. समाज कल्याण अधिकारी देयक तयार करून कोषागारात सादर करीत. कोषागारातून धनादेश आल्यावर महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या नावावर ही रक्कम जमा केली जाई. महाविद्यालयांचे प्राचार्य त्यांच्या सोयीनुसार ही रक्कम मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देत. ही प्रक्रिया खूपच कंटाळवाणी आणि विलंब लावणारी होती.

त्यावेळी राज्यात / जिल्ह्यात एकूण महाविद्यालये किती, त्यांच्यामार्फत कोणते अभ्यासक्रम राबविले जातात, त्यामध्ये शिकणारे मागासवर्गीय विद्यार्थी किती, यातील किती विद्यार्थी वसतिगृहात राहतात याबाबतची कोणतीही सांख्यिकी माहिती राज्याकडे / जिल्ह्याकडे उपलब्ध नव्हती. अनेक महाविद्यालयांचे प्राचार्य, वेळेत प्रस्ताव, जिल्ह्याचे समाज कल्याण अधिकारी यांच्याकडे पाठवित नसत. जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्याकडून शिष्यवृत्तीची रक्कम मंजूर केल्यावरही ती त्वरित विद्यार्थ्यांना देत नसत. यामुळे अनेक विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहत.

या समस्यांवर मात करण्यासाठी राज्य शासनाने सन २०१०-११ साली ई-स्कॉलरशिप ही योजना कार्यान्वित करण्याचा निर्णय घेतला. यासाठी राज्यातील अंदाजे १३ हजार महाविद्यालये आणि त्यामध्ये शिकणारे १६ लाख मागासवर्गीय विद्यार्थी यांना प्रथम राष्ट्रीयीकृत बँकेमध्ये झीरो बॅलन्सवर खाते उघडण्यास प्रवृत्त करण्यात आले. ही योजना मॅट्रीकोत्तर

**एम. एम. आत्राम,**
**सह आयुक्त (शिक्षण)**

असल्यामुळे २००१ पासून इयत्ता १० वीची परीक्षा पास झालेल्या ७० लाख मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा डाटा राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक बोर्डाकडून उपलब्ध करून घेतला. त्यानंतर यासाठी विशेष सॉफ्टवेअर तयार करण्यात आले.

या योजनेच्या प्रसिद्धीसाठी समाज कल्याण आयुक्तालयातील सह आयुक्त (शिक्षण) यांनी राज्यातील ३५ जिल्ह्यांमध्ये संबंधित जिल्ह्यातील महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या बैठका घेतल्या. याव्यतिरिक्त साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांच्या कार्यालयातील संबंधित कर्मचारी यांना ऑनलाइन अर्ज कसा भरावा, त्याला मान्यता कशी द्यावी, त्याचे देयक कसे तयार करावे, याबाबतचे सखोल प्रशिक्षण संबंधितांना देण्यात आले.

ही योजना प्रथमतः गडचिरोली या जिल्ह्यामध्ये १५ ऑगस्ट २०११ पासून कार्यान्वित झाली. त्यानंतर एक महिन्याच्या आत संपूर्ण राज्यात लागू झाली. या योजनेमुळे शिष्यवृत्तीची रक्कम थेट मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात तर शिक्षण फी व परीक्षा फीची रक्कम थेट संबंधित महाविद्यालयांच्या बँक खात्यात जमा होऊ लागली आहे. या योजनेसाठी लागणारा अर्ज तसेच आनुषंगिक माहिती व वेगवेगळे अहवाल www.mahaeschol.maharashtra.gov.in या वेबसाइटवर उपलब्ध आहेत.

ही योजना अधिक प्रभावी करण्यासाठी २०१२-१३ पासून प्रायोगिक तत्त्वावर पुणे, मुंबई शहर, मुंबई उपनगर, अमरावती, वर्धा आणि नंदुरबार या सहा जिल्ह्यांत राबविण्यात येत आहे. या योजनेसाठी आधार कार्ड क्रमांक सक्तीचा करण्यात आला आहे. या जिल्ह्यात ही योजना यशस्वी ठरल्यास ती संपूर्ण राज्यात राबविण्याचा शासनाचा मानस आहे.

२०१३-१४ पासून सामाजिक न्याय विभागाने इयत्ता ५ वी ते १० वी मधील मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती, व्यावसायिक पाठ्यक्रमातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता, सैनिक शाळेतील विद्यार्थ्यांना विद्यावेतन तसेच शासकीय वसतिगृहातील प्रवेश प्रक्रिया या सर्व योजना ऑनलाइन करण्याचे निश्चित केले आहे.

संपर्क : ९७६७६५९०८४ ❑ ❑

जे विद्यार्थी राष्ट्रीयीकृत बँकेमध्ये खाते उघडतील व ऑनलाइन अर्ज भरतील, त्या विद्यार्थ्यांनाच भारत सरकार शिष्यवृत्ती या योजनेचा लाभ देण्यात येईल, असा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला.



# शिक्षणाचा आधार

**डॉ. वसंत माने**

**मागासवर्गीय मुला-मुलींची शिक्षणाची सोय व्हावी, त्यांना उच्च शिक्षण घेता यावे, त्याचप्रमाणे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलींना विद्यालयीन व महाविद्यालयीन शिक्षण घेता यावे, यासाठी शासकीय वसतिगृहे सुरू करण्यात आलेली आहेत. सध्या शासकीय वसतिगृहांत एकूण २३,०६८ इतके विद्यार्थी आहेत. या वसतिगृहांमध्ये राहून आतापर्यंत अनेक सनदी अधिकारी झाले आहेत.**

२००७-०८ या वर्षामध्ये विभागीय स्तरावर १ हजार विद्यार्थी क्षमतेचे प्रत्येकी १ याप्रमाणे एकूण ७ वसतिगृहे सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. त्यापैकी ३ विभागीय स्तरावरील वसतिगृहे शासकीय इमारतींमध्ये २०११ पासून सुरू करण्यात आली आहेत. इतर ठिकाणी भाड्याने इमारती उपलब्ध करून घेऊन वसतिगृहे सुरू करण्यात येत आहेत. २००७-०८ या वर्षामध्ये राज्यात प्रत्येक तालुका स्तरावर १०० क्षमतेची ३५३ वसतिगृहे सुरू करण्याचा निर्णय घेतला असून त्यापैकी प्रथम टप्प्यात १०० शासकीय वसतिगृहे सुरू करण्यात येतील. जून २०११ पासून १०० विद्यार्थी क्षमतेची १०० शासकीय वसतिगृहे सुरू करण्यात आली आहेत. त्यापैकी ५३ वसतिगृहांच्या शासकीय इमारतींचे बांधकाम पूर्ण झाले असून त्या ठिकाणी जून २०११ पासून प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. उर्वरित वसतिगृहे भाड्याच्या इमारतीत सुरू करण्यात आली आहेत. ११ जुलै २०१२ च्या शासन निर्णयान्वये या वसतिगृहातील प्रवेशासाठी मागासवर्गीय प्रवर्गाची आरक्षणाची टक्केवारी विहित करण्यात आली आहे.

वरील सर्व शासकीय वसतिगृहांमधील विद्यार्थ्यांना निवास, भोजन व्यवस्था, शैक्षणिक साहित्य दैनंदिन खर्चासाठी निर्वाह भत्ता दिला जातो; तसेच २६ जुलै, २०११ च्या आदेशान्वये देण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांमध्ये वाढ करण्यात आली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने विद्यार्थ्यांसाठी पोटभर अन्न, निर्वाह भत्ता, स्वच्छता प्रसाधनासाठी मुलींना अतिरिक्त भत्ता, स्नेहसंमेलनासाठी निधी, क्रीडा वस्तू, कलर टीव्ही, ॲक्वागार्ड, वॉटर कूलर, फायर फायटींग, १० विद्यार्थ्यांमागे एक संगणक प्रिंटर व इंटरनेट सुविधेसह इत्यादी सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

### शासकीय निवासी शाळा

आर्थिक परिस्थितीमुळे अनुसूचित जाती मुला-मुलींना प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेता येत नाही, अशा मुला-मुलींच्या विद्यालयीन शिक्षणाची सोय व्हावी याकरिता सन २००७-०८ या वर्षामध्ये एकूण १०० नवीन शासकीय निवासी शाळा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यापैकी प्रत्यक्षात ज्या शासकीय निवासी शाळांचे बांधकाम पूर्ण झाले आहे अशा ६४ शासकीय निवासी शाळा जून २०१२ पासून चालू करण्यात आल्या आहेत. या सर्व शाळा तालुका स्तरावर आहेत. त्यामध्ये ६,४०६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

### अनुदानित वसतिगृह व आश्रमशाळा

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना त्यांचा शिक्षणक्रम पूर्ण करता यावा, ग्रामीण भागामध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांमधील शाळा गळतीचे प्रमाण कमी व्हावे, आर्थिक दुरवस्थेमुळे मागासवर्गीय पालकांना त्यांच्या मुलांच्या शिक्षणात अडचणी येऊ नयेत आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास व्हावा या उद्देशाने सामाजिक न्याय विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थांच्या वतीने अनुदानित वसतिगृहे चालविण्यात येतात. सध्या राज्यामध्ये एकूण २३८८ अनुदानित वसतिगृहे असून त्यामध्ये मुलींसाठी ५६८ व मुलांसाठी १,८२० अनुदानित वसतिगृहे आहेत. या वसतिगृहांमध्ये ९९,२५२ इतके विद्यार्थी आहेत. १६ मार्च १९९८ च्या शासन निर्णयान्वये स्वेच्छा संघटनांमार्फत मागासवर्गीयांची अनुदानित वसतिगृह चालविली जातात. या वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी परिपोषण अनुदान २७ मे २००८ पासून ६३० रुपये देण्यात येत होते. त्यामध्ये ९०० रुपये इतकी वाढ १ जानेवारी २०१२ पासून करण्यात आली आहे.

अनुसूचित जातीच्या अनुदानित आश्रमशाळा ही योजना १९९६ पासून कार्यरत आहे. सद्य:स्थितीत स्वयंसेवी संस्थांमार्फत सामाजिक न्याय विभागाच्या नियंत्रणाखालील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी एकूण १० प्राथमिक व ६ माध्यमिक आश्रमशाळा कार्यरत आहेत. सदर प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळांमध्ये २१२० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

संपर्क : ०२२-२२८२०६७५ ❐ ❐

**सध्या राज्यात १४९ मुलांची, १२२ मुलींची अशी एकूण २७१ जुनी मागासवर्गीय शासकीय वसतिगृहे आहेत.**

# लष्करी सेवेतील प्रवेश झाला सोपा

मागासवर्गीय युवक व युवतींना पोलीस व सैन्यदलात भरतीसाठी संधी मिळावी यासाठी त्यांना भरतीपूर्व प्रशिक्षण योजना राबविण्यात येते.

राज्याच्या एकूण लोकसंख्येपैकी अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या लोकसंख्येमध्ये सुमारे १५ ते २० लाख अनुसूचित जाती आणि नवबौद्ध घटकांतील सुशिक्षित बेरोजगार लोकांची संख्या आहे. अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील युवकांमध्ये प्रशिक्षणाचा अभाव असल्यामुळे बऱ्याचवेळा हे युवक सक्षम असतानादेखील त्यांना सैन्य व पोलीसदलात भरतीसाठी संधी मिळत नाही. ही उणीव भरून काढण्यासाठी या युवकांना राज्य पोलीस व सैन्य दलातील अनुशेषांतर्गत संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सेवापूर्वप्रशिक्षण केंद्रे सुरू करण्यात आली आहेत.

या योजनेमध्ये प्रशिक्षण सत्राचा कालावधी तीन महिन्यांचा असून राज्यातील सर्व प्रमुख सैन्य व पोलीस भरती प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांमार्फत हे प्रशिक्षण देण्यात येते. या प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांची निवड समाजकल्याण संचालक, पुणे यांच्यामार्फत करण्यात येते. प्रशिक्षणाच्या तीन महिन्यांच्या कालावधीत उमेदवाराची राहण्याची सोय प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेमार्फत करण्यात येते. एका प्रशिक्षण सत्रात १०० युवक व युवतींना प्रशिक्षण दिले जाते. प्रत्येक जिल्ह्यात प्रशिक्षणासाठी उमेदवारांची निवड करताना पात्र उमेदवारांची यादी जिल्हा सेवायोजन कार्यालयाकडून मागविण्यात येते. त्यातील उमेदवारांची निवड विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्यामार्फत करून त्यांना प्रशिक्षण देण्यात येते. या योजनेंतर्गत प्रशिक्षण येणाऱ्या युवक, युवतींना जेवण, राहणे, खेळाचे साहित्य, बूट, मोजे, अंथरूण इ. सुविधा मोफत पुरविल्या जातात.



### अटी आणि शर्ती

उमेदवार हा अनुसूचित जातीं व नवबौद्ध घटकातील असणे आवश्यक आहे. उमेदवाराचे वय १८ ते जास्तीतजास्त २५ वर्षे, शैक्षणिक पात्रता इयत्ता १२ वी उत्तीर्ण; शारीरिक पात्रता - युवकाची उंची १६५ सें.मी., छाती ७९ सें.मी. - फुगवून ८४ सें.मी.; युवतीची उंची १५५ सें.मी. आवश्यक आहे. जातीचे प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, सेवायोजन कार्यालयांतर्गत नावनोंदणी दाखला व ओळखपत्राची सत्यप्रत देणे आवश्यक आहे. तसेच उमेदवार शारीरिकदृष्ट्या निरोगी व सक्षम असणे आवश्यक आहे.





### प्रशिक्षणाचे स्वरूप

प्रशिक्षण कालावधीत धावणे, उंच व लांब उडी, गोळाफेक, पुल अप्स, अडथळा शर्यत, दोरीवरून चढणे, मंकी रोप, बैठका, चीनअप, पद कवायत, रायफल फायरिंग, गिर्यारोहण इ. मैदानी चाचणीचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देण्यात येते. याव्यतिरिक्त सामान्य ज्ञान, मानचित्र अध्ययन, अग्निशमन, वाहतूक नियंत्रण प्रशिक्षण, प्रथमोपचार, स्वास्थ्य शिक्षा, वायरलेस कम्युनिकेशन, व्यक्तिमत्त्व विकास, आपत्ती निवारण व्यवस्थापन, मुलाखत कौशल्य याबाबत प्रशिक्षण दिले जाते.

**- मुक्ता पवार** ❐ ❐

## अधिक माहितीसाठी

**विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांचे दूरध्वनी क्रमांक**

मुंबई (०२२)२५२७५०७३, मुंबई उपनगर (०२२) २५२२२०२३, ठाणे (०२२) २५३४१३५९, रायगड (०२१४१) २२२२८८, रत्नागिरी (०२३५२)२३०९५७, सिंधुदुर्ग (०२३६२) २२८८८२, नाशिक (०२५३)२४१२२०३, धुळे (०२५६४), नंदुरबार (०२५६४)२२६३१०, जळगाव (०२५७) २२६३३२८, अहमदनगर (०२४१) २३२९३७८, पुणे (०२०) २४४५६३३६, सातारा (०२१६२) २३४२४६, सांगली (०२३३)२३७४७३९, सोलापूर (०२१७)२७३४९५०, कोल्हापूर (०२३१)२६५१३१८, औरंगाबाद (०२४०) २३३१९९३, जालना (०२४८२) २२५१७२, परभणी (०२४५२)२२०५९५, हिंगोली (०२४५६)२२३७०२, बीड (०२४४२)२२२६७२, नांदेड (०२४६२) २२४४७७, उस्मानाबाद (०२४७२) २२२०१४, लातूर (०२३८२) २५८४८५, बुलढाणा (०७२६२) २४२२४५, अकोला (०७२४) २४२६४३८, वाशिम (०७२५२) २३५३९९, अमरावती (०७२१)२६६१२६१, यवतमाळ (०७२३२) २४२०३५, वर्धा (०१७५२) २४३३३१, नागपूर (०७१२) २५५५१७८, भंडारा (०७१८४) २५२६०८, गोंदिया (०७१८२) २३४११७, चंद्रपूर (०७१७२) २५३१९८, गडचिरोली (०७१३२) २२२३२९.

**सामाजिक न्याय विभागातर्फे सैन्य व पोलीस दलात भरती सेवापूर्व प्रशिक्षण केंद्रे २००६ पासून सुरू करण्यात आली आहेत.**

# व्यसनमुक्तीचे नवे पर्व

समाजामध्ये वाढणारी व्यसनाधीनता व त्यामुळे युवकांच्या मानसिकतेवर व शरीरावर होणारे परिणाम चिंताजनक असल्याचे दिसून येत आहे. युवकांना व व्यसनाधीन लोकांना व्यसनमुक्तीच्या मार्गाने घेऊन जाण्यासाठी व सुदृढ, सशक्त समाज निर्माण करण्यासाठी व्यसनमुक्तीचा प्रचार व प्रसार करण्याच्या दृष्टीने सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्यमंत्री ॲड. शिवाजीराव मोघे यांनी सामाजिक न्याय विभागाच्या वतीने व्यसनमुक्ती साहित्य संमेलनाचे आयोजन केले होते.

व्यसनमुक्ती साहित्य संमेलन भरविणे हा देशातील पहिलाच प्रयोग आहे. त्याला राज्यातील युवक-युवतींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. त्यामुळे व्यसनमुक्ती विषयावर काम करण्याची व समाजात व्यसनमुक्तीबाबत प्रचार व प्रसार करण्याची आवश्यकता असल्याचे दिसून आले.

१ जून २०११ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्याचे व्यसनमुक्ती धोरण संपूर्ण राज्यात लागू करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली होती.

राज्यघटनेतील अनुच्छेद ४७ मध्ये सार्वजनिक आरोग्य व जनतेच्या आरोग्य रक्षणासाठी (औषधे प्रयोजनाव्यतिरिक्त) मादक पदार्थांवरील बंदीचे मार्गदर्शक तत्त्व समाविष्ट करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने राज्यात व्यसनमुक्तीचा प्रचार व प्रसार करण्याच्या उद्देशाने या संमेलनाचे पुणे येथे आयोजन करण्यात आले होते.

दोन दिवसीय व्यसनमुक्ती साहित्य संमेलनामध्ये व्यसनमुक्ती दिंडी, व्यसनमुक्तीवर आधारित विविध तज्ज्ञ व्यक्तींद्वारा चर्चासत्रे, परिसंवाद, प्रकट मुलाखती, व्यसनमुक्तीवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम, संमोहनातून

**गणेश खामगळ**

व्यसनमुक्ती, व्यसनमुक्ती साहित्य व चित्रांचे प्रदर्शन, व्यसनमुक्ती क्षेत्रात कार्य केलेल्या व्यक्तींचा राष्ट्रपिता महात्मा गांधी व्यसनमुक्ती सेवा पुरस्काराने शासनातर्फे गौरव अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

२ ऑक्टोबर २०१२ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंतीच्या निमित्ताने आयोजित या व्यसनमुक्ती साहित्य संमेलनाची सुरुवात व्यसनमुक्ती दिंडीच्या आयोजनाने करण्यात आली. ऐतिहासिक शनिवारवाडा ते बालगंधर्व रंगमंदिर दरम्यान व्यसनमुक्ती दिंडीचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये आळंदी येथील वारकरी सांप्रदाय, व्यसनमुक्त युवक संघ, महाराष्ट्र, नशाबंदी मंडळ, कर्वे समाज सेवा संस्था, भारती विद्यापीठ, पुणे विद्यापीठ, आचार्य विनोबा लोकसेवक संघ, पुणे, मुक्तांगण तसेच या क्षेत्रात कार्य करणाऱ्या विविध स्वयंसेवी संस्था व व्यक्ती यांचा सहभाग होता. व्यसनमुक्तीवर आधारित भारुडे, लोकगीते, पोवाडे, पथनाट्य, आदिवासी नृत्य इत्यादी लोककलांचा दिंडीमध्ये समावेश होता.

या व्यसनमुक्ती साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन राज्यपाल के. शंकरनारायणन् यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी राज्यपाल आपल्या भाषणात म्हणाले की, ''व्यसनामुळे केवळ एका व्यक्तीचेच नुकसान होत नाही, तर त्याचे कुटुंब, समाज, आणि पर्यायाने राष्ट्राचे नुकसान होते. तसेच व्यसन हे साक्षर, निरक्षर, खेडी, शहरे असे सर्वव्यापी असते. सामाजिक न्याय व विशेष




१७ ऑगस्ट २०११ रोजी राज्याचे व्यसनमुक्ती धोरण जाहीर केले गेले. असे धोरण जाहीर करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले.

साहाय्य विभागाच्या वतीने आयोजित केलेले हे व्यसनमुक्ती साहित्य संमेलन हा एक स्तुत्य उपक्रम असून देशातील युवकांना व्यसनमुक्तीचा संदेश देण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल. महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त व्यसनमुक्ती साहित्य संमेलनाचे सामाजिक न्याय विभागाने केलेले आयोजन कौतुकास्पद आहे.''

समारंभाचे अध्यक्ष ॲड. शिवाजीराव मोघे म्हणाले, ''पुणे हे सांस्कृतिक केंद्र आहे. याच शहरातून महात्मा फुले, आगरकर, टिळक यांनी आपले कार्य सुरू केले व ते देशभर विस्तारले. पुण्यात सुरुवात केली की त्याचा प्रसार सर्वदूर होतो. देशातील अनेक सुधारणा, चळवळी या पुण्यातच सुरू झाल्या. म्हणूनच व्यसनमुक्तीचे पहिले साहित्य संमेलन पुण्यात आयोजित करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितल्याप्रमाणे देशाचे आरोग्य चांगले असेल तर देश सुदृढ होईल. व्यसनांच्या दुष्परिणामांवर साहित्य निर्माण झाले पाहिजे व त्याद्वारे नव्या पिढीला व्यसन वाईट असते हे समजले पाहिजे.''

संमेलनाध्यक्ष अनिल अवचट म्हणाले, ''स्वत:च्या पैशाने आपण व्यसनांच्या माध्यमातून मृत्यूला जवळ करतो व अनमोल जीवन संपवतो. सध्याच्या काळात अशा व्यसनमुक्ती साहित्य संमेलनांची खऱ्या अर्थाने गरज आहे.''

संमेलनाचे स्वागताध्यक्ष राज्यमंत्री सचिन अहिर म्हणाले, ''युवापिढीने व्यसनांपासून दूर राहिले पाहिजे व आपले आरोग्य सांभाळले पाहिजे. आपल्या सर्व यशांचा पाया आरोग्य असतो, त्यामुळे व्यसनांच्या आहारी जाऊन आपले आरोग्य धोक्यात घालणे योग्य नाही.''

साहित्य संमेलनामध्ये सहभागी झालेल्या व्यक्तींना मनोरंजनातून व्यसनमुक्ती व प्रबोधन करण्याच्या अनुषंगाने राज्यातील व्यसनमुक्तीच्या क्षेत्रात लोककलेद्वारे प्रबोधन करणाऱ्या कलावंतांच्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

३ ऑक्टोबर २०१२ रोजी व्यसनमुक्ती क्षेत्रात सातत्याने राज्य पातळीवर लौकिकात्मक कार्य करणाऱ्या संस्था व व्यक्ती यांचा राष्ट्रपिता महात्मा गांधी व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

व्यसनमुक्ती साहित्य संमेलन समारोप व राष्ट्रपिता महात्मा गांधी व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार वितरण सोहळ्याप्रसंगी सहकार व



## संमेलनात मांडण्यात आलेले ठराव

१. देशात प्रथमच व्यसनमुक्तीचे धोरण जाहीर करून महाराष्ट्रात त्याची अंमलबजावणी सुरू झाली आहे. मात्र व्यसनमुक्तीचा हा विचार राज्यापुरता मर्यादित न रहाता देश पातळीवर विचार व्हावा.

२. व्यसनमुक्तीचे कार्य या चळवळीतील कार्यकर्ते लोकशिक्षणाच्या माध्यमातून करीत असतात. म्हणून या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना राष्ट्रपती पुरस्कार देण्यात यावा व याबाबत केंद्र सरकारला विनंती करावी.

३. प्रत्येक ग्रंथालयात व्यसनमुक्तीचे साहित्य असणे बंधनकारक करावे.

४. चित्रपट, नाटके, टी.व्ही. च्या मालिका या माध्यमांनी व्यसनमुक्तीच्या कार्यात आपला सहभाग द्यावा.

५. व्यसनी वस्तुंच्या प्रचारासाठी असलेल्या जाहिरातीसाठी सेलेब्रिटींनी काम करण्याचे टाळावे.

६. व्यसनमुक्तीचा प्रचार व प्रसार करण्यासाठी महाविद्यालयीन विद्यार्थी शक्तीचा उपयोग करण्यासाठी विशेष लक्ष द्यावे.

७. व्यसनमुक्तीचा प्रचार व प्रसार होण्यासाठी राज्य स्तरावर व्यसनमुक्ती विषयावर एकांकिका स्पर्धा घेण्यात याव्यात.

८. व्यसनमुक्तीचा प्रचार व प्रसार प्रभावी होण्यासाठी शासकीय स्तरावर लोककलेच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात यावे.

संसदीय कार्यमंत्री हर्षवर्धन पाटील म्हणाले की, ''समाजातील व्यसनाधीनता कमी करण्यासाठी व्यसनमुक्तीची लोकचळवळ होणे आवश्यक आहे. कायदा करून व्यसनाधीनता कमी होणार नाही. व्यसनाधीनता कमी होण्यासाठी कायद्याला लोकचळवळीचा पाठिंबा मिळायला हवा.''

यावेळी न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी म्हणाले की, ''व्यक्तीला सरकारी नोकरीत घेतानाच तो मनुष्य व्यसनाधीन आहे की नाही याची तपासणी करण्यात यावी. कायद्याला जोपर्यंत लोकांचा प्रतिसाद योग्यरीत्या मिळत नाही तोपर्यंत काहीच उपयोग नाही. समाजामध्ये कायदा चळवळीच्या माध्यमातून रुजवणे आवश्यक आहे.''

व्यसनमुक्ती कार्याच्या ब्रँड ॲबेसेडर श्रीमती सिंधुताई सपकाळ म्हणाल्या की, ''तरुणांनी अशी नशा करायला हवी, की जी कायमस्वरूपी टिकेल आणि कधीच आपला यात करणार नाही. ती नशा चांगल्या कामाची, देशकार्याची, समाजकार्याची व व्यसनमुक्तीची असायला हवी. एखाद्या पुरुषाच्या नशेमुळे त्याच्या कुटुंबाला अनेक यातना सहन कराव्या लागतात व परिणामी कुटुंबाला व समाजाला अधोगतीस सामोरे जावे लागते.''

देशातील पहिल्या व्यसनमुक्ती साहित्य संमेलनाची देशपातळीवरदेखील दखल घेण्यात आली.

देशातील पहिले व्यसनमुक्ती साहित्य संमेलन २ व ३ ऑक्टोबर २०१२ रोजी बालगंधर्व रंगमंदिर, पुणे येथे आयोजित करण्यात आले.

# निर्भय महाराष्ट्र–व्यसनमुक्त महाराष्ट्र

महाराष्ट्र राज्य आपल्या स्थापनेचे सुवर्णमहोत्सवी वर्ष व महाराष्ट्र राज्याचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे करत आहे. शाहू-फुले-आंबेडकर यांच्या विचारांवर वाटचाल करत सामाजिक सुधारणा राबविणारे पुरोगामी राज्य म्हणून महाराष्ट्र राज्य ओळखले जाते. या पुरोगामीत्वाला साजेसे असे व्यसनमुक्ती धोरण राज्याच्या सामाजिक न्याय विभागाने नुकतेच जाहीर केले आहे.

व्यसनमुक्त निर्भय महाराष्ट्र घडविण्याच्या दिशेने राज्याचे दमदार पाऊल पडत आहे. व्यसनमुक्ती धोरणाच्या अंमलबजावणीसाठी सामाजिक न्याय विभाग सज्ज झाला असून धोरणाच्या अनुषंगाने होणाऱ्या अंमलबजावणीचा आढावा सामाजिक न्यायमंत्री शिवाजीराव मोघे घेत आहेत. यासाठी वेगवेगळ्या विभागांतील प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बैठका घेतल्या असून, या धोरणाची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी राज्यस्तरीय नियामक मंडळ व राज्यस्तरीय जिल्हा व तालुकास्तरीय समित्या स्थापन करण्याचा निर्णय विभागाने घेतला आहे.

राज्यात सन १९५० पासून दारूबंदीचा कार्यक्रम अंमलात आणण्यात आला आहे. दारूबंदी प्रचार कार्य व शिक्षण हा विषय पूर्वी विभागाकडे कार्यरत होता. १९९० पासून हा विषय सामाजिक न्याय विभागाकडे सुपूर्द करण्यात आला. जिल्हा परिषद अंतर्गत हा विभाग काम करत होता. पण सन २००० नंतर या विभागातील अनेक पदे व्यपगत झाली तर काही पदे अतिरिक्त ठरवून इतरत्र समायोजित करण्यात आली. त्यामुळे हा विभाग जवळजवळ बंद पडतो की काय? अशी स्थिती निर्माण झाली होती; पण सामाजिक न्यायमंत्री शिवाजीराव मोघे यांनी दारूबंदी व प्रचार कार्य पुन्हा पुनरुज्जीवन केले आहे. मंत्री महोदयांनी २०११ मध्ये स्वतंत्र व्यसनमुक्ती धोरण तयार केले.

या धोरणात पहिल्याच वर्षी २ ऑक्टोबर २०११ हा दिवस व्यसनमुक्ती दिन म्हणून साजरा केला. २ ते ७ ऑक्टोबर दरम्यान व्यसनमुक्ती सप्ताहाचे आयोजन केले. नुसते दिवस व सप्ताह साजरा करण्यापर्यंत हे धोरण सीमित राहू नये व या धोरणाची परिणामकारक अंमलबजावणी व्हावी यासाठी शासनाने गेल्या सहा महिन्यांत सकारात्मक पावले उचलली आहेत.

### व्यसनमुक्ती धोरण

हे व्यसनमुक्ती धोरण फक्त दारूबंदीपुरतेच सीमित नसून यात तंबाखू, गुटखा, अफीम व समाज जीवनावर, सामाजिक स्वास्थ्यावर दुष्परिणाम करणाऱ्या सर्व व्यसनांचा समावेश करण्यात आला आहे. यात पुढील कायदे व नियम करण्यात आले आहेत.

**उत्पादनविषयक :** अवैध व्यवसायाचे उत्पादन व विक्रीला पूर्णपणे आळा घालणे यासाठी संबंधित पोलीस ठाण्याचे वरिष्ठ अधिकारी राज्य उत्पादन शुल्क विभागाने संबंधित अधिकारी, अन्न व औषधी प्रशासन विभागाचे अधिकारी व




ग्रामपंचायत दारूबंदी समिती किंवा ग्रामरक्षक दल, तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेतील व्यसनमुक्ती कार्य करणारे व बचत गटातील महिला सदस्या यांनी अवैध दारूची माहिती राज्य उत्पादन शुल्क किंवा पोलीस विभागाला दिल्यास त्याची तत्काळ दखल घेऊन कायदेशीर कार्यवाही करेल.

इतर संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यात येईल.

**मद्यसेवन परवाना मद्यविक्रीबाबत :** अ) मुंबई विदेशी मद्यनियम, १९५३ च्या नियम ७० (३) १(१) मध्ये शासन अधिसूचना दिनांक १३ नोव्हेंबर २००९ प्रमाणे दारू पिण्याच्या परवान्यावर एका व्यक्तीस आठवड्यातून दोनपेक्षा जास्त बाटल्यांची (प्रत्येकी ७५० मि.ली.) विक्री केली जाणार नाही. (ब) दारू पिण्याचा परवाना मिळविण्यासाठी मुंबई विदेशी मद्यनियम,१९५३ च्या नियम, ७०(डी) नुसार सौम्य बीअरसाठी २१ वर्षे व इतर देशी विदेशी मद्य यासाठी किमान २५ वर्षांची वयोमर्यादा राहील.

**दारूसेवनविषयक** : (अ) दारू पिऊन सार्वजनिक ठिकाणी गोंधळ घालणाऱ्यांवर मुंबई मद्यनिषेध कायदा, १९४९ च्या कलम ८५ (१)(ए)(बी) व (२) तसेच अस्तित्वात असलेल्या इतर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**वैध मद्य विक्री परवानाविषयक :** (अ) शैक्षणिक व सामाजिक संस्था, शासकीय कार्यालय, उद्याने, दवाखाने, ग्रंथालय, धार्मिक स्थळे, राष्ट्रीय व राज्य महामार्ग यांच्यापासून आंतरनिर्बंध परवाना कक्षासाठी ७५ मीटर व देशी दारूसाठीचा महानगरपालिका क्षेत्रासाठी ५० मीटर व इतर ठिकाणी १०० मीटरच्या आत दारू दुकानांना परवाना देण्यात येणार नाही. (ब) दारू विक्रीची कोणतीही अनुज्ञप्ती स्थलांतरित करताना/देताना, ग्रामसभेचा ठराव घेऊन, ना-हरकत परवाना घेणे, त्याचप्रमाणे नगर परिषद /नगरपालिका/ महानगरपालिका या क्षेत्राखालील त्या प्रभाग सभेचे ना हरकत परवाना घेणे. सदर ठराव ग्रामपंचायत क्षेत्र /महानगरपालिका/ नगर परिषदा/ नगरपंचायतीच्या त्या प्रभागातील एकूण मतदारांच्या ५० टक्के अथवा महिला मतदारांच्या ५० टक्के इतक्या बहुसंख्येने असावा.

**जनतेचे अधिकार :** (अ) ग्रामपंचायत क्षेत्र/ महानगरपालिका /नगरपंचायती / नगर परिषदेच्या त्या प्रभागातील एकूण २५ टक्के मतदार व महिला मतदारांच्या २५ टक्के महिला मतदार यांना त्यांच्या हद्दीतील दारू दुकान बंद करण्यासाठी संबंधित तहसीलदार किंवा जिल्हाधिकारी यांच्याकडे लेखी मागणी करता येईल.

**प्रशासकीय जबाबदाऱ्या :** (अ) वैध दारूचे दुकान बंद करण्याबाबत मागणीपत्रक मिळाल्यापासून १ महिन्याच्या आत गुप्त मतदान घेण्याची व तीन महिन्यांत ग्रामसभेच्या/ नगरपंचायती/ नगर परिषदा/ महानगरपालिका वॉर्डच्या ठरावानुसार अनुज्ञप्ती बंद करण्याची कार्यवाही संबंधित जिल्हाधिकारी पूर्ण करतील. (ब) अवैध दारू उत्पादन, विक्री, साठा अथवा वाहतूक करणाऱ्याविरुद्ध मुंबई मद्य निषेध अधिनियम १९४९ नुसार हे गुन्हे सिद्धपराध ठरविल्यास आयुक्त/ जिल्हा दंडाधिकारी किंवा उपविभागीय जिल्हा दंडाधिकारी या व्यक्तीवर जिल्हा हद्दवाढीची कार्यवाही करतील. (क) व्यसनमुक्ती समितीचे सदस्य/ ग्रामस्थ/ ग्रामरक्षक दल यांना दारूबंदीबाबत सहकार्य न करणाऱ्या संबंधित पोलिसावर नियमानुसार कार्यवाही केली जाईल. (ड) राज्यात एकूण नऊ ड्राय डे (दिवस) राहतील. त्याव्यतिरिक्त स्थानिक पातळीवर जिल्हाधिकाऱ्यांना तीन अतिरिक्त ड्राय डे (दिवस) घोषित करता येतील.

**ग्रामसभेचे कर्तव्य :** मुंबई ग्रामपंचायत अधिनियमातील कलम ५४ नुसार केलेल्या परिशिष्ट १ मधील सूची १५ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे ग्रामपंचायतीने दारूबंदीसह व्यसनमुक्ती प्रचाराचे काम करण्यासाठी दारूबंदीसह व्यसनमुक्ती समिती स्थापन करणे.

**प्रचार व प्रसार :** (अ) सर्व शैक्षणिक संस्था, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात दारू सहकार्य दुष्परिणामांची माहिती समाविष्ट करतील. (ब) अमलीपदार्थविरोधी दिन, तंबाखूविरोधी दिन, धूम्रपानविरोधी दिन, नशाबंदी दिवस तसेच सप्ताह पाळण्यात यावेत व अशा दिवशी शैक्षणिक संस्थांमधून प्रचारफेरी काढणे. (क) मद्यपानासह सर्व व्यसनांच्या दुष्परिणामांची चित्रफीत/चलचित्र तयार करून शाळा-महाविद्यालये, यात्रा, गणेशोत्सव, महिला मंडळे अशा सार्वजनिक उत्सवांच्या ठिकाणी दाखविणे. (ड) कीर्तने तथा लोककलांच्या माध्यमातून दारूबंदी व व्यसनमुक्तीचा प्रचार करणे.




**व्यसनमुक्तीसाठी प्रशिक्षण** - (अ) समाजकार्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना व्यसनमुक्ती प्रचारकार्य या विषयाचा कार्यानुभव अनिवार्य करून त्यांना प्रचारकार्यात सहभागी करणे तसेच ऑक्झीलरी नर्स, मिडवाईफ व बहुउद्देशीय आरोग्यसेवक यांच्या अभ्यासक्रमातदेखील व्यसनमुक्तीचे प्रशिक्षण देणे.

(ब) अल्कोहोलीक ॲनॉनिमसच्या व असे कार्य करणाऱ्या इतर कार्यकर्त्यांचा व्यसनमुक्ती व दारूबंदी प्रचारात सहभाग करणे.

**व्यसनमुक्तीसाठी उपचार :-** (अ) व्यसनाधीन शासकीय कर्मचाऱ्यांना व्यसनमुक्तीसाठी कौन्सिलिंगची सुविधा. (ब) मानसोपचार तज्ज्ञ व समाजकार्यात प्रशिक्षित असलेल्यांना दारूबंदी व व्यसनमुक्तीसाठी सल्लागार म्हणून नेमणे. महाराष्ट्रातील चारही मनोरुग्णालयांत व्यसनमुक्तीचे उपचार केले जातील.

वरील व्यसनमुक्ती धोरणांच्या बाबींवर नियंत्रण व अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती नियंत्रण व अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती नियामक मंडळ व राज्य/ जिल्हा/ तालुकास्तरीय समित्यांची स्थापना करण्यात येत आहे. राज्यस्तरीय नियामक मंडळ मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत असेल, त्यात उपमुख्यमंत्री, मंत्री सामाजिक न्याय (व्यसनमुक्ती कार्य), राज्य उत्पादन शुल्क मंत्री या विभागाचे राज्यमंत्री व व्यसनमुक्ती विषयाशी निगडित सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या दोन प्रतिष्ठित व्यक्ती यांचा समावेश असेल .

❐❐

**प्रत्येक जिल्हा रुग्णालयातील १० खाटांच्या मनोविकार कक्षात व्यसनमुक्तीसाठी रुग्णांना भरती करण्यात येईल. व्यसनाधीन व्यक्तींवर उपचाराची सोय तसेच त्याला सल्ला (counselling) देण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध केल्या जातील.**

# अष्टपैलू बाळशास्त्री



'दर्पण'कार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्म २० फेब्रुवारी १८१२ रोजी पोंभुर्ले ता. देवगड जि. सिंधुदुर्ग येथे झाला. (असे अनेक संशोधकांच्या उपलब्ध नोंदींवरून दिसून येते). सुरुवातीचे शिक्षण पोंभुर्ले येथे घरीच झाले. वडील गंगाधर शास्त्री व मातोश्री सौ. सगुणाबाई यांसारख्या धार्मिक व सदाचार संपन्न पुराणिकांच्या सान्निध्यात त्यांचे शिक्षण झाले. त्यामुळे मराठी लेखन, वाचन, व्यावहारिक गणित, तोंडी हिशोब, रामदास-तुकाराम इत्यादी चरित्र, वामन, मोरोपंत आदी प्रसिद्ध कवींच्या कविता व अमरकोश, पंचमहाकाव्यामध्ये ते आठव्या वर्षी पारंगत झाले.

### शिक्षण व शैक्षणिक कार्य

बाळशास्त्री जांभेकर वयाच्या १२ व्या वर्षी मुंबईमध्ये पुढील शिक्षणासाठी आले. एल्फिन्स्टन यांनी २१ ऑगस्ट १८२२ रोजी मुंबई येथे दि बॉम्बे नेटीव्ह स्कूल, बुक अँड स्कूल सोसायटी नावाची शिक्षण संस्था काढली. या संस्थेच्याच शाळेत बाळशास्त्रींनी प्रवेश घेतला. अल्पवयी बाळा अत्यंत बुद्धिमान, व्यासंगी असल्याने सर्व विद्यार्थ्यांमध्ये तो अग्रगण्य होता व शिक्षकांचा आवडताही झाला. बाळशास्त्रींचे मुंबईला प्रयाण होण्याआधीचा काळ म्हणजे १८१८ चा काळ. हा पेशवाईच्या अस्ताचा होता. पेशवाई अस्ताला गेल्याने मुंबई इलाख्यामधील हा काळ अत्यंत धामधुमीचा होता. मुंबई इलाख्याची सर्व प्रशासकीय सूत्रे पहिला ब्रिटिश गव्हर्नर माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन याच्याकडे आली होती. हा गव्हर्नर आपल्या दूरदर्शीपणाबद्दल प्रसिद्ध होता व स्वत:च्या धोरणाने ब्रिटिशांचे राज्य वाढावे व आपल्या प्रजेचेही हित व्हावे याबद्दल दक्ष होता. पेशवाईच्या अस्तामुळे पुण्यातील अनेक बुद्धिवंत, विद्वान तरुण मुंबईकडे प्रयाण करू लागले होते. इंग्रजांनी आणलेले ज्ञान-विज्ञान, त्यांनी केलेला शिक्षणप्रसार ही एक प्रकारे देणगी जरी असली तरी तरुणांमध्ये निर्माण झालेली इंग्रजानुकूल वृत्ती व स्वदेश हित विषयीची एक प्रकारची उदासीनता हा

> मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक 'दर्पण'कार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची द्विजन्मशताब्दी नुकतीच संपली. महाराष्ट्राच्या सामाजिक प्रबोधनाच्या इतिहासात त्यांचा आदराने उल्लेख केला जातो. द्विजन्मशताब्दिनिमित्त त्यांच्या चरित्रकार्याचा हा संक्षिप्त आढावा.

अतिशय चिंतेचा भाग होता. शिक्षणाशिवाय, विशेषत: पाश्चात्त्य देशातील आधुनिक ज्ञानाशिवाय तरणोपाय नाही ही बाळशास्त्र्यांची

**रवींद्र बेडकिहाळ**

भूमिका होती. इंग्रज देत असलेले शिक्षण हे खरे ज्ञान नसून केवळ कंपनी सरकारला आपली कंपनी चालविण्याकरिता कारकून हवे आहेत हेसुद्धा बाळशास्त्रींनी ओळखले होते. १८२७ मध्ये गव्हर्नर लॉर्ड माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन सेवानिवृत्त होऊन विलायतेला परत गेल्यानंतर त्यांच्या स्मरणार्थ मुंबई शिक्षण मंडळी यांनी त्यांच्या नावाने एल्फिन्स्टन स्कूल सुरू केले. प्रौढ विद्यार्थ्यांना पाश्चात्त्यशास्त्रे आणि वाङ्मय यांचे शिक्षण देण्याकरिता विलायतेतून प्राध्यापक मागविले होते. त्यांच्या समवेत त्यांना 'असिस्टंट प्रोफेसर' म्हणून दोन हुशार साहाय्यकांची आवश्यकता होती. त्यावेळी जांभेकरांचा नावलौकिक विलायतेत पोहोचला होता. बाळशास्त्री जांभेकर मुळातच हुशार व कुशाग्र बुद्धिमत्तेचे असल्याने त्यांची नोव्हेंबर १८३४ मध्ये पहिले 'असिस्टंट प्रोफेसर' म्हणून नेमणूक करण्यात आली. अशी नेमणूक होण्याचा मान मिळविणारे ते पहिले भारतीय ठरले.

बाळशास्त्रींनी ३ वर्षे अध्यापनात स्वत:चे अप्रतिम कौशल्य दाखविले. पाश्चात्त्य विद्या, गणित, ज्योतिषशास्त्र यात त्यांनी प्रावीण्य मिळविले. पुढे याच संस्थेने मुंबईतच स्वतंत्र ज्युनिअर स्कूल सुरू केले व बाळशास्त्रींनाच त्याचे प्रमुख नेमले.

याच काळात मुंबईबाहेर सरकारी इंग्रजी व मराठी शाळा फार थोड्या होत्या. सन १८४४ पर्यंत पुणे, ठाणे, सुरत या तीन ठिकाणीच इंग्रजी शाळा होत्या. प्रत्येक विभागात जेमतेम ४०-५० प्राथमिक शाळा होत्या. सरकारचे शिक्षण खाते १८५५ मध्ये अस्तित्वात आले. तत्पूर्वी १८४४ ते १८५५ या काळात बोर्ड ऑफ एज्युकेशन ही निमसरकारी संस्थाच प्रशासनाचे काम पाहत होती. उपरोक्त प्रत्येक विभागासाठी मुख्य शाळा तपासणीस ज्यांना सुपरिंडेटंट संबोधित असत असे नेमण्यात आले. या पदावर बाळशास्त्री जांभेकर यांनीही दक्षिण विभागातील मराठी व कानडी शाळा तपासणीचे काम, वाहतुकींची साधने उपलब्ध नसताना देखील चार वर्षे केले म्हणूनच ते पहिले मराठी शिक्षण अधिकारी होत.

'बोर्ड ऑफ एज्युकेशन'ने चांगले प्रशिक्षित अध्यापक तयार करावेत अशी बाळशास्त्रींची कल्पना होती. युरोपियन अधिकाऱ्यांनी ही कल्पना स्वीकारली आणि आचार्य बाळशास्त्रींच्या शिफारसीने १८४५ मध्ये 'अध्यापक वर्ग' (डी.एड., बी.एड. कॉलेज) सुरू केले; त्याचे पहिले संचालक म्हणून आचार्यांनीच काम पाहिले.

### विद्यार्थी वसतिगृहाचा प्रारंभ

मुंबईसारख्या दाट वस्तीत मोहनगरीत शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळावे, त्यांचे शील संवर्धन व्हावे या उद्देशाने आचार्यांनी मुंबईतच आपल्या घराशेजारी एक

बाळशास्त्री जांभेकरांनी दि बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीचे १८३२ पासून पूर्णवेळ नेटिव्ह सेक्रेटरी म्हणून काम पाहिले.

वाडा भाड्याने घेऊन पहिले विद्यार्थी वसतिगृह सुरू केले. तिथे ते विद्यार्थ्यांच्या शिस्त, आरोग्य, संस्कार व शिक्षण याकडे जातीने लक्ष देत.

दर्पण वृत्तपत्र सुरू झाले तेव्हा ब्रिटिशांचे शासन होते आणि वृत्तपत्र नियंत्रण कडक होते. १८३५ नंतर हे नियंत्रण थोडे शिथिल झाले. त्यावेळी साक्षर वर्ग कमी होता. त्यामुळे वाचकांची संख्याही कमी होती. तरीही 'दर्पण'चे त्या काळात ३०० वर्गणीदार होते. त्या काळात ब्रिटिशांच्या नोकरीत असूनसुद्धा बाळशास्त्रींनी सरकारला रुचो वा न रुचो, नि:स्पृहपणे विविध सामाजिक विषयांवर 'दर्पण'मधून लेख, अग्रलेख लिहिले ते आजही मार्गदर्शक ठरावेत अशा दूरदृष्टीचे आहेत. पुढे या दर्पणचा २६ जून १८४० रोजी शेवटचा अंक प्रसिद्ध झाला व ते बंद करण्यात आले. दरम्यान, बाळशास्त्रींनी दर्पण बंद होण्यापूर्वी 'दिग्दर्शन' नावाचे मासिक काढण्याचा संकल्प जाहीर केला होता. या मासिकाचा पहिला अंक १ मे १८४० रोजी प्रसिद्ध झाला म्हणजे मराठी वृत्तपत्राप्रमाणे पहिल्या मराठी मासिकाचे जनकही बाळशास्त्री जांभेकर होते. मासिकासंबंधी जे माहितीपत्रक प्रसिद्ध करण्यात आले त्यावरून त्याचा उद्देश, बातमीचे सार, भूगोल-इतिहास, पदार्थ विज्ञान, रसायनशास्त्र इत्यादींचे ज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविणे हा होता. हे मासिक ४ वर्षे चालले.

### 'दर्पण' आणि सामाजिक सुधारणा

बाळशास्त्री उच्चविद्याविभूषित झाले तरी त्यांच्या शिक्षणाचा मूळ पिंड वैचारिक होता. त्या काळातील हिंदू धर्मकांडाचा त्यांनी बारकाईने अभ्यास केला होता. त्यामुळे काही कर्मठ कर्मकांडाविरुद्ध त्यांनी आवाज उठवला तेव्हा त्यांना स्वकीय हिंदूंकडूनच संघर्ष स्वीकारावा लागला.

समाजाच्या जीवन-मरणाशी निगडित असलेल्या प्रश्नांची चिकित्सा करायला त्यांनी सुरुवात केली. ज्या विद्येचे संस्कार आजपर्यंत झाले ती विद्या सदोष आहे काय, घाण्याच्या बैलाला बांधलेल्या झापडासारखी एकमार्गी आहे काय, सनातन पुराण धर्मातील एकांतिक संन्यास प्रवृत्ती, अंधगुरूभक्ती, कर्मठ कर्मकांडे, चातुर्वर्ण्य, जन्मनिष्ठ उच्चनीचता, जातीभेद, धर्माचा अतिरेक इत्यादीबाबत विचारमंथन सुरू करायला लावण्याची 'दर्पण'ची त्या काळात भूमिका होती आणि ती निश्चितपणे धाडसाची होती. वरील सर्व विचार, स्त्रियांवर लादलेली बंधने, बालविवाह, विधवाविवाह, विधवांना



### 'दर्पण' वृत्तपत्राची सुरुवात

''स्वदेशीय लोकांमध्ये विलायतेतील विद्यांचा अभ्यास अधिक व्हावा आणि या देशाची समृद्धी, येथील लोकांचे कल्याण याविषयी स्वतंत्रपणे व उघडरीतीने विचार करावयास स्थल व्हावे...''

'दर्पण' प्रकाशित करण्यामागील आपली ही भूमिका बाळशास्त्री यांनी १२ नोव्हेंबर १८३१ रोजी प्रॉस्पेक्ट किंवा प्रस्ताव या नावाने वरीलप्रमाणे प्रकाशित केली व प्रत्यक्षात दर्पणचा पहिला अंक दिनांक ६ जानेवारी १८३२ रोजी प्रसिद्ध झाला. त्यात त्यांनी संपादकीयमध्ये आपले धोरण मांडले ते खालीलप्रमाणे-

''मनोरंजन करणे, चालते काळाची वर्तमाने कळविणे आणि योग्यतेस येण्याचे मार्ग दाखविणे या गोष्टींचा दर्पण छापणारांस मोठी उत्कंठा आहे. म्हणोन या गोष्टी साध्य होण्यासाठी जितका प्रयत्न करवेल तितका ते करतील, कोण एकाचा पक्षपात किंवा नीचपणा या दोषांचा मळ दर्पणास लागणार नाही. कारण की दर्पण छापणारांचे लक्ष्य निष्कृत्रिम आहे. म्हणोन हे वर्तमानपत्र ज्या रीतीने भले आणि गुणी पुरुषास मान्य होईल त्या रीतीने करण्यास ते दृढ निश्चयाने उद्योग करतील.''

पारतंत्र्य, केशवपन यांसारख्या गोष्टींमुळे आपली समाजरचना चुकीच्या पायांवर उभी आहे. ह्यातील दोष काढले नाहीत तर पिढ्यान्‌पिढ्या हे सर्वांना भोगावे लागेल. ह्यातून समाजाचा, धर्माचा, राष्ट्राचा विकास तर होणारच नाही, पण ह्या शृंखलेमुळे अवनतीच होणार आहे आणि त्याला पारतंत्र्याचे, गुलामीचेच कायम स्वरूप येणार हे जांभेकरांनी त्या काळात 'दर्पण'मधून सांगितले. नवयुगाची निर्मिती करायची असेल तर भौतिक दृष्टिकोन, भौतिक विद्यांचे अध्ययन स्वीकारले पाहिजे. आपल्या पौर्वात्य शिक्षण संस्कृतीबद्दल त्यांना निश्चित अभिमान होता. ''ही गोष्ट निर्विवाद आहे की विद्येचा मूळ प्रकाश पूर्व देशातून पश्चिम देशावर पडला आणि असेच नि:संशय प्रमाणावरून सिद्ध होते की, पृथ्वीचे या भागातील लोकांमध्ये विद्येची मूळ रूपे हजारो वर्षांपूर्वी ठाऊक होती,'' असे ते म्हणत असत. (जांभेकर शताब्दी ग्रंथ २, ५१) आपल्या विद्येतील, संस्कृतीतील चांगल्याचा अभिमान धरून पाश्चिमात्य विद्येचा ते आग्रहाने पुरस्कार करीत असत. यामागे भारतीयांच्या विद्येचे बळ वाढावे हा उद्देश होता. धार्मिक सुधारणा व्हाव्यात ह्या त्यांच्या विचारातसुद्धा हीच दूरदृष्टी होती. शेषाद्रि धर्मांतर प्रकरण त्यांनी धसास लावले व त्याला पुन्हा धर्मात घ्यायला लावले. या प्रकरणी त्यांना प्रायश्चित्तही नाइलाजाने घ्यायला लागले. पण तरीही त्यांनी सामाजिक, धार्मिक सुधारणेची कास सोडली नाही.

### अनेक क्षेत्रांत पहिले

बाळशास्त्री जांभेकर हे मराठीतील पहिले वृत्तपत्र 'दर्पण'चे संस्थापक (६ जानेवारी १८३२) होतेच. तसेच मराठीतील पहिले मासिक 'दिग्दर्शन'चे संस्थापक संपादक (१ मे १८४०) देखील होते. त्याचबरोबर पहिले मराठी असिस्टंट प्रोफेसर (नोव्हेंबर १८३४), 'बॉम्बे नेटिव्ह लायब्ररी' या मुंबईतील पहिल्या सार्वजनिक वाचनालयाचे संस्थापक (सन १८४५), नेटिव्ह इंप्रुव्हमेंट सोसायटी या 'लोकसुधारणा' व्यासपीठाचे संस्थापक, पहिले मराठी शाळा तपासणीस (सन १८४४ ते १८५५), पहिल्या विद्यार्थी वसतिगृहाचे संस्थापक (१८४५), पहिल्या अध्यापक वर्गाचे संचालक (यावरून आजच्या डी.एड. व बी.एड. कॉलेजची संकल्पना त्या काळात आचार्यांनी मांडल्याचे लक्षात येते) (सन १८४५). कुलाबा वेधशाळेचे पहिले मराठी संचालक (१८४५). ज्ञानेश्वरीची पहिली शिळाप्रतही त्यांनीच केली. याशिवाय पहिले दूरदृष्टीचे समाजसुधारक, महाराष्ट्राचे आद्यशिक्षण तज्ज्ञ, इतिहास संशोधक म्हणूनही त्यांचा उल्लेख अभिमानाने केला जातो. त्यांच्या फ्रेंच भाषेतील प्रावीण्याबद्दल फ्रान्सच्या बादशहाकडून त्यांचा गौरव करण्यात आला होता.

### स्त्री शिक्षणाचे अग्रदूत

'तस्मात स्त्रियांनी विद्याभ्यास न करावा, हे शुद्ध अज्ञान आहे. यास शास्त्रीय किंवा लौकिक आधार काही नाही. यास्तव सर्वांनी आपापल्या मुलींकरवी विद्याभ्यास करावा, असा आमचा मनोदय आहे. पुरुषांपेक्षा स्त्रियांस व्यापार करण्याची बुद्धी सहापट अधिक आहे.'

स्त्री शिक्षणाबद्दल आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी १७८ वर्षांपूर्वी वरील संकल्पना

बाळशास्त्री जांभेकरांच्या कर्तृत्वामुळे, विद्या-व्यासंगामुळे आणि तेरा भाषांच्या ज्ञानामुळे त्यांची मुंबईतील प्रमुख विद्वान मंडळींत गणना होत असे.

मांडली होती. त्यावरून स्त्री शिक्षण हाच समाज सुधारणेचा खरा पाया आहे हे त्यांनी ओळखले होते. त्या काळात स्त्रियांवर खूपच बंधने होती. हिंदू समाज कर्मकांड, कर्मठपणा आणि परंपरानुगतिकता यांनी बांधला गेला होता. स्त्री शिक्षण व पुनर्विवाह, विधवा विवाह यांसारखे विषय चर्चिणेही धर्म भ्रष्टतेचे लक्षण मानले जाई. अशा परिस्थितीत त्यांनी 'दर्पण'मधून स्त्रियांच्या या प्रश्नाबाबत मांडलेले विचार किती धाडसाचे व दूरदृष्टीचे होते हे दिसून येईल.



स्त्री शिक्षणाची दिशा, स्त्रियांचा वेदाभ्यास व विद्याभ्यास, स्त्री-पुरुषांना समान हक्क, स्त्री शिक्षणाबद्दल दृष्टान्त, मुलींची मुंज का नाही? यांसारख्या निबंधातून जांभेकरांनी शास्त्राधार देऊन 'दर्पण'मधून लिखाण केलेले आढळते. जांभेकर ज्या काळात हे कार्य करत होते, त्या काळात सनातनी हिंदू पंडितांची (म्हणजे ब्राह्मणांची) कडवी भूमिका होती. त्यामुळे या पार्श्वभूमीवर स्त्री शिक्षण, धार्मिक व सामाजिक सुधारणांबाबतचे जांभेकरांचे विचार निश्चितच धाडसी होते. काळानुसार चालीरिती रूढी बदलल्या पाहिजेत हा ठोस विचार त्यात होता.

**सामाजिक सुधारणांची पहिली दिशा**

बाळशास्त्री यांचा जन्म जरी ब्राह्मण कुटुंबात झाला असला व ते स्वधर्मावर प्रेम करणारे असले तरी ते धर्मवेडे नव्हते. धार्मिकदृष्ट्या ते आस्तिक आणि सदाचारसंपन्न हिंदुधर्माभिमानी होते. मात्र, असे असूनही धार्मिक आणि सामाजिक सुधारणांप्रकरणी ते सुधारक व व्यवहारवादी वृत्तीचे होते. निष्ठावंत सुधारक असेच त्यांचे वर्णन करावे लागेल. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात सतीसारखी अमानवी प्रथा सुरू होती. १८३० साली या मानवतेला काळिमा लावणाऱ्या प्रथेचे कायद्याने उच्चाटन झाले असले तरीही देशाच्या काही भागांत १८४०-४५ पर्यंत अधूनमधून हे प्रकार घडत होते. स्त्रियांना कोणी वालीच नव्हता. स्त्री शिक्षणाचा पूर्ण अभाव होता. कर्मठ अशा पुरुषप्रधान संस्कृतीने तिला चूल आणि मूल यांच्यातच गुंतवून ठेवले होते. बालविवाह आणि बहुपत्नीकत्व या तर रूढ अशा समाजमान्य प्रथाच होत्या. प्रौढ किंवा जरठ वर आणि आठ-दहा वर्षांची बालिकावधू अशा प्रकारचेच बहुसंख्य विवाह होत. परिणामी, बाल विधवांचे प्रमाणही प्रचंड होते. विधवा विवाहास मान्यता नसल्याने अशा स्त्रियांचे आयुष्य अक्षरशः कुजून जात असे. अर्थात यात काहीतरी चुकते आहे, हे समजत असूनही कोणीही आवाज उठवित नव्हते. पण बाळशास्त्रींनी प्रथम याबाबत आवाज उठविला आणि स्त्री शिक्षण, बालविवाह निषेध, विधवा विवाह अशा प्रकारच्या क्रांतिकारक विचारांचे बीजारोपण केले. म्हणूनच असा प्रयत्न करणारे ते आद्य समाजसुधारक होत.

> बिकट काळात सर्व परिस्थितीचा धैर्याने आणि आपल्या दृष्टीने विचार करून समाजास जागृत करणारा आणि मार्ग दाखविणारा एक बुद्धिमान पुरुष जन्माला आला. त्याचे नाव बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर! आपले राज्य का गेले आणि इंग्रजांचे राज्य या देशात का आले त्याचे अचूक निदान करणारा हा महाराष्ट्रातील पहिला पुरुष होय!
>
> **- आचार्य प्र. के. अत्रे**

**जांभेकरांना मिळालेले सन्मान**

✲ १८३१ मध्ये 'रॉयल एशियाटिक सोसायटी'च्या मुंबई शाखेतील भाषांतर समितीचे कार्यमंत्री म्हणून त्यांची निवड झाली होती.

✲ लंडन येथील 'जिऑग्राफीकल सोसायटी'ची मुंबई शाखा सुरू झाली होती. त्याचे सन्माननीय सदस्यत्व व पुढे त्याचे पदाधिकारी म्हणूनही त्यांनी काम पाहिले.

✲ दि बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीचे १८३० मध्ये डेप्युटी नेटीव्ह सेक्रेटरी म्हणून तर पुढे १८३२ पासून पूर्णवेळ नेटिव्ह सेक्रेटरी म्हणून काम पाहिले. त्या काळात हा मान किंवा हे पद फक्त युरोपियन, पार्शी, मुसलमान यांनाच मिळत असे. यावरून आचार्य बाळशास्त्री जांभेकर हे समकालिनात किती लोकप्रिय होते व तत्कालीन ब्रिटिश प्रशासनातही त्यांना किती सन्मान होता याची ही उदाहरणे आहेत.

**जांभेकरांची ग्रंथसंपदा**

बाळशास्त्रींची ग्रंथसंपदा प्रामुख्याने त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील कार्याच्या अनुषंगाने झाली आहे. उपलब्ध माहितीनुसार त्यांची प्रकाशित झालेली ग्रंथसंपदा :- १) नीतिकथा, २) सारसंग्रह, ३) इंग्लंड देशाची बखर (भाग १ व २), ४) भूगोल विद्या गणित भाग, ५) बालव्याकरण, ६) भूगोलविद्येची मूलतत्त्वे (ही दोन्ही पुस्तके त्यांच्या पश्चात सुमारे २५ वर्षे प्राथमिक शाळेतून पाठ्यपुस्तक म्हणून चालू होती.), ७) हिंदुस्थानचा इतिहास, ८) हिंदुस्थानातील इंग्रजांच्या राज्याचा इतिहास, ९) ज्ञानेश्वरी या मौलिक श्रेष्ठ भक्तिग्रंथाचे त्यांनी मराठीत प्रथम शिळा प्रेसवर प्रकाशन केले आहे. याही व्यतिरिक्त अनेक विषयांवर ग्रंथ लिहिले. बाळशास्त्रींनी वयाच्या अवघ्या १६ व्या वर्षापासून ते ३३ व्या वर्षापर्यंत नोकरीचे व इतर व्याप सांभाळून केलेली ग्रंथसंपदा लक्षात घेता त्यांच्या अष्टपैलू प्रतिभेची कल्पना येते.

विषमज्वराने त्यांचा दि.१७ मे १८४६ रोजी मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूनंतर तत्कालीन अनेक वृत्तपत्रांतून त्यांच्यावर अग्रलेख आले होते. हा त्यांचा मरणोत्तर गौरवच होता. तसेच समकालीन विद्वानांना, उच्चपदस्थ इंग्रज अधिकाऱ्यांना त्यांच्याबद्दल किती आदर होता हे मुंबईच्या सुप्रीम कोर्टातील न्यायमूर्ती सर अर्स्किन पेरि यांनी जांभेकरांच्या मृत्यूनंतर व्यक्त केलेल्या शोकसभेतून स्पष्ट होते. ते म्हणतात,

'बाळशास्त्री यांच्या दुःखद मृत्यूने पश्चिम भारतावर जेवढी महान आपत्ती ओढवली आहे, तेवढी आपत्ती मुंबईतील कोणाही पुरुषाच्या मृत्यूने मग तो युरोपियन असो की एतद्देशिय असो, अथवा तो कितीही मोठ्या दर्जाचा असो-ओढवणार नाही.' (न्या. सर अर्स्किन पेरि, सुप्रीम कोर्ट मुंबई यांनी ग्रॅण्ड ज्युरीसमोर केलेल्या उत्स्फूर्त भाषणातून १० जुलै १८४६ च्या बॉम्बे कुरियर वृत्तपत्रातून)

असे हे आचार्य बाळशास्त्री जांभेकर खऱ्या अर्थाने लोकशिक्षणकार तर होतेच; पण महाराष्ट्र भूषण म्हणूनही त्यांचा लौकिक महाराष्ट्राच्या इतिहासात सुवर्णाक्षरानेच लिहिला जाईल हे नक्कीच!

**संपर्क : ९४२२४००३२१**

बाळशास्त्री जांभेकर यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा गौरव म्हणून १९४० मध्ये अत्यंत बहुमानाच्या 'जस्टिस ऑफ दि पीस' या पदावर नेमून त्यांचा गौरव करण्यात आला. जस्टिस ऑफ दि पीस यांना सुप्रीम, हायकोर्टात 'ग्रॅण्ड ज्युरी'मध्ये बसण्याचा अधिकार असे.

बदलती शहरे

# अमरावती तेव्हा आणि आता

मोहन अटाळकर

प्राचीन काळात अमरावतीच्या शहराच्या आजूबाजूला असलेल्या उंबरांच्या घनदाट जंगलामुळे शहराला उंबरावती, उमरावती आणि आताचं अमरावती असं नाव पडलं. अंबादेवीच्या मंदिराचा संबंध पौराणिक काळात रुक्मिणीहरणाशी जोडला जातो. पण, इतिहासात नवव्या शतकापर्यंत अमरावती शहराचा उल्लेख कुठेही आढळत नाही. अमरावतीच्या भाजीबाजारातील आदिनाथ दिगंबर जैन मंदिरातील एका शिलालेखावरून या शहराच्या अस्तित्वाचा अकराव्या शतकातील पुरावा सापडतो.

विदर्भाच्या सांस्कृतिक जडणघडणीत अमरावती शहराचा मोलाचा वाटा आहे. वऱ्हाड प्रांतातील महत्त्वपूर्ण राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक घडामोडींचं हे शहर साक्षीदार ठरलं आहे. नागपूरकर भोसले यांच्या अखेरच्या पर्वात आणि निझामाच्या काळात सत्तेचा सारीपाट अमरावतीतूनच खेळला गेला, ब्रिटिशांनी वऱ्हाड प्रांत निझामाच्या हवाली केल्यानंतर अमरावतीत झपाट्याने बदल झाले. तरी १८ व्या शतकातच अमरावती व्यापार आणि सावकारीच्या बाबतीत अग्रगण्य बनले होते. धर्मगुरूंपासून ते बुद्धिप्रामाण्यवाद्यांपर्यंत, ब्रिटिशांची चाकरी करणाऱ्यापासून ते क्रांतिकारकांपर्यंत आणि सफेदपोषांपासून ते विस्थापितांपर्यंत सर्व विचारांच्या व्यक्ती अमरावतीत सुखनैव वावरत राहिल्या. अमरावतीकरांनी काहींचा स्वीकार केला, काहींना अव्हेरलं, अलीकडे अमरावतीकर 'पूर्वीचं शहर आता राहिलं नाही' अशी खंत व्यक्त करताना दिसतात, इतर विभागीय मुख्यालयांमध्ये सर्व सोयीसुविधा आहेत, पण अमरावतीत नाहीत अशा तक्रारी केल्या जातात, अमरावती शहरातील वैभवाच्या काही खुणा पुसल्या गेल्या, पण जे काही शिल्लक आहे ते जपण्याचा आटोकाट प्रयत्न अमरावतीकर करताना दिसताहेत.

१८०७ मध्ये अमरावती व्यापारपेठ पेंढाऱ्यांनी लुटल्यामुळे तत्कालीन निझाम शिकंदर शहाने शहराभोवती दगडी तटबंदी उभारली, हा 'परकोट' आजही अस्तित्वात आहे. या परकोटाला लागलेला अतिक्रमणाचा विळखा काही वर्षांपूर्वी दूर झाला आणि परकोटाचे सुंदर दर्शन अमरावतीकरांना झाले. एकेकाळी अमरावती कापसाची आंतरराष्ट्रीय बाजारपेठ बनली होती. कोलकात्याहून अमरावतीचा कापूस परदेशात जायचा. अमरावतीच्या तारखेडा येथील 'कॉटन मार्केट'ची ख्याती इंग्लंड, अमेरिकेपर्यंत पोहोचली होती, पण आता अमरावतीच्या कापसाची ओळख हळूहळू पुसली जात आहे, शहरातील जिनिंग प्रेसिंगचे कारखाने बंद पडले. बडनेरा आणि अमरावतीतील दोन सूतगिरण्याही बंद पडल्या. १८५८ मध्ये



अमरावतीच्या भाजीबाजारातील आदिनाथ दिगंबर जैन मंदिरातील एका शिलालेखावरून या शहराच्या अस्तित्वाचा अकराव्या शतकातील पुरावा सापडतो.

अमरावती पूर्व वऱ्हाडची राजधानी बनली, दादासाहेब खापर्डे, मोरोपंत जोशी, रावसाहेब मुधोळकर, वीर वामनराव जोशी, शिवाजीराव पटवर्धन अशा अनेक अमरावतीच्या सुपुत्रांनी स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व केले.

अमरावतीच्या इतिहासात डोकावताना अनेक रंजक बाबीही निदर्शनास येतात. कॅम्प भागात चिलमशहा वली यांचा दर्गा आजही अस्तित्वात आहे. या ठिकाणी पूर्वी उरूसही भरत होता. पण, या भागाला अपभ्रंशाने चिलमछावणी हे नाव केव्हा पडले ते कुणाच्या लक्षातही आले नाही. १८०४ मध्ये परकोटाच्या बांधकामाला सुरुवात झाली आणि ३.६२ कि.मी. लांबीची संरक्षक भिंत उभारण्यासाठी १७ वर्षे लागली. बांधकामावर ४ लाख रुपये खर्च आला. भिंतीला पाच मोठे दरवाजे आहेत. १८१६ मध्ये दोन गटांत संघर्ष झाला आणि सुमारे ७०० जण मारले गेले, ज्या दरवाजाजवळ हा संघर्ष झाला, ती खुनरी खिडकी म्हणून ओळखली गेली.

अमरावतीत अनेक संस्था उदयास आल्या.



या संस्थांचे कार्य वाखाणले गेले. १४ जानेवारी १९२३ ला अमरावतीत झालेली विदर्भ साहित्य संघाची स्थापना ही घटना या प्रांताच्या साहित्यिक चळवळीतला मैलाचा दगड ठरली. व्हाईसरॉय लॉर्ड इर्विन यांच्या हस्ते २८ जुलै १९२८ ला उद्घाटन झालेली इर्विन हॉस्पिटलची इमारत ही वऱ्हाडातील पहिली सिमेंट काँक्रीटची इमारत होती.

जुन्या अमरावतीचा आता कायापालट झालाय, महापालिकेच्या स्थापनेनंतर वेगाने बदल होत गेले. अमरावतीच्या प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रात स्त्रियांचा मोठा वाटा आहे. १८९३ मध्ये स्थापन झालेल्या वनिता समाज या संस्थेने शिक्षणप्रसाराची सुरुवात बालकमंदिरापासून केली. इतर संस्थांचाही

विकास होत गेला. ११ सप्टेंबर १८९७ ला अमरावती नगर वाचनालय सुरू झाले. नगर वाचनालयातील व्याख्यानमाला ही एक स्वतंत्र ओळख बनली. १९१४ मध्ये अंबादासपंत वैद्य आणि अनंत कृष्ण वैद्य यांनी हनुमान व्यायामशाळेची स्थापना केली. एका वटवृक्षात रूपांतरित झालेली ही संस्था सध्या हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ या नावाने ओळखली जाते. १९३१ मध्ये श्री शिवाजी शिक्षण संस्थेची ज्ञानज्योत शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांनी चेतवली. ६० च्या दशकात संस्थेची ८ महाविद्यालये आणि २२ विद्यालये होती, आता संस्थेत २३ महाविद्यालये, ७४ विद्यालये आणि इतर अशा २५८ संस्थांचा डोलारा उभा झाला आहे. पद्मश्री शिवाजीराव पटवर्धन यांनी कुष्ठरोग्यांच्या पुनर्वसनासाठी तपोवन ही संस्था सुरू केली. शारदा उद्योग मंदिर ही महिलांसाठी कार्य करणारी संस्था असो किंवा डॉ. नरेंद्र भिवापूरकर अंध विद्यालय. अमरावतीत अनेक संस्था जन्माला आल्या. त्यांनी आपल्या

कार्याने स्वतंत्र ओळख निर्माण केली. अमरावतीचे हे संचित बनले. नाट्य क्षेत्रातही अमरावतीचे योगदान उल्लेखनीय ठरावे. स्वातंत्र्यपूर्व काळात १८८५ मध्ये बुधवारा परिसरात इंद्रभुवन थिएटर उभारण्यात आले. १२०० आसनक्षमतेच्या या नाट्यगृहाने मनोरंजनासोबतच लोकांमध्ये स्वातंत्र्याचे स्फुल्लिंग चेतवले. वीर वामनराव जोशी यांच्या 'राक्षसी महत्त्वाकांक्षा' या नाटकाचे सर्वाधिक प्रयोग झाले. या थिएटरला नंतर अवकळा आली. त्यानंतर ११० वर्षांनी अमरावतीकरांची नाट्यगृहाची मागणी पूर्ण झाली. संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनाच्या माध्यमातून अमरावतीकरांना ही भेट मिळाली. मराठी रंगभूमीच्या उत्कर्षाच्या काळात अनेक नाटक

मंडळींचा वर्षातून किमान दोन वेळा अमरावतीत मुक्काम होत असे, तिकीट विक्रीची सुरुवात होताच आठवड्याच्या सर्व नाटकांची तिकिटे सोमवारी संपून जात, मग अमरावतीचा रसिक ऐनवेळी जादा पैसे देऊन वादनकाराजवळ किंवा विंगेत बसून आपली हौस भागवून घेत असे. गंधर्व संगीत मंडळींचा अमरावतीशी जिव्हाळ्याचा संबंध आला आहे. या कंपनीवर मधल्या काळात बरेच कर्ज झाले होते. या कर्जाची परतफेड १९२७ च्या अमरावती मुक्कामात बालगंधर्वांनी केली. अमरावतीचा रसिकवर्ग हा गुणग्राही आणि कलासक्त असल्याचे अनेक दाखले मिळतात.

१२ मे १९२८ ला सिमला येथे भरलेल्या रेल्वे बोर्डाच्या सभेत अमरावती-नरखेड रेल्वेमार्गाला मंजुरी मिळाली. १९०६ मध्ये प्रस्तावित रेल्वेमार्गाचा नकाशा तयार करण्यात आला होता. अलीकडेच या मार्गाचे काम पूर्ण झाले आहे. माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या पुढाकारामुळे अमरावती रेल्वे स्थानक बंद होण्यापासून वाचले, अमरावतीहून तीन नवीन रेल्वेगाड्या सुरू झाल्या आणि अमरावती रेल्वे स्थानक मॉडेल रेल्वे स्थानकात रूपांतरित झाले. अलीकडेच अमरावती-नरखेड मार्गावरून पहिली प्रवासी गाडी धावली आणि तीन पिढ्यांचे स्वप्न पूर्ण झाले. शहरातील बेलोरा विमानतळाच्या विस्तारीकरणाचा मार्ग आता मोकळा झाला आहे. रात्रीच्या वेळीही विमाने उतरू शकतील, अशी व्यवस्था त्या ठिकाणी केली जाणार आहे.

अमरावती शहराचा गेल्या दोन दशकांमध्ये झपाट्याने विकास झालाय. शहरात एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम राबवला गेल्यानंतर शहराचा कायापालटच झाला. १९६० च्या दशकात शहरात वाहनांची संख्या अत्यंत कमी होती. अंतर्गत प्रवासी वाहतूक मुख्यत: टांगे आणि सायकलरिक्षांमधून होत होती. त्यावेळी शहरात ९० टांगे आणि ९०० सायकलरिक्षा होत्या, अशी नोंद 'गॅझेटियर'मध्ये आहे. शहरात त्यावेळी ७ हजार सायकली होत्या. आज शहरातील नोंदणीकृत वाहनांची संख्या ३ लाखांवर पोहोचली आहे. त्यापैकी २ लाख ५० हजार दुचाकी आहेत आणि ५०० ऑटोरिक्षा अमरावतीकरांच्या दिमतीला आहेत. २८ सिटीबसेसच्या माध्यमातून प्रवासी वाहतूक होते. कुठल्याही ठिकाणी ऑटोरिक्षाची सेवा हे अमरावतीचे आगळे वैशिष्ट्य बनले आहे.

१९६० पर्यंत अमरावतीचा शैक्षणिक विस्तार

१८५८ मध्ये अमरावती पूर्व वऱ्हाडची राजधानी बनली.



अंबामाता मंदिर

ज्येष्ठ कवी सुरेश भट अमरावतीचेच. प्रख्यात दिग्दर्शक विश्राम बेडेकर, साहित्यिक के.ज. पुरोहित, ज्येष्ठ नाटककार व संपादक विद्याधर गोखले, मधुकर केचे, उद्धव शेळके, श्रच्चंद्र सिन्हा, प्रभा गणोरकर आदींनी साहित्य आणि कलेच्या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले आहे. संगीतविषयक संस्थाही अमरावतीत उदयास आल्या. संगीत विकास मंडळ, संगीत कलोपासक सभा, यासारख्या संस्थांनी अमरावतीत संगीतकला जोपासली. १९५५ मध्ये अमरावतीत संगीत परिषद भरली होती. ती अनेक दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण ठरली. बडे गुलाम अली खॉं, अमीर खॉं, हलीम जाफर, सनई वादक बिस्मिल्ला खॉं, अल्लारखॉं, पंडित रविशंकर आदी घरंदाज गायकीचे संगीतज्ज्ञ एकाच व्यासपीठावर प्रथम जमले होते. नामवंत कलाकारांना अमरावतीत निमंत्रित करण्याची परंपरा अजूनही जोपासली जात आहे. अंबादेवी संस्थानाने अंबादेवी संगीतसेवा समारोहाच्या माध्यमातून ही पर्वणी दिली आहे.

फारसा झाला नव्हता. आज शहरातील शाळा - महाविद्यालयांची संख्या शेकड्यावर पोहोचली आहे. अमरावती विद्यापीठाच्या स्थापनेनंतर शहराच्या शैक्षणिक परंपरेला नवा साज चढला. आज शहरात १७१ प्राथमिक शाळा, ९५ हायस्कूल आणि ३३ महाविद्यालयांमधून विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. ५ वैद्यकीय महाविद्यालये, १० अभियांत्रिकी महाविद्यालये आणि १८ महाविद्यालयांमधून उच्च शिक्षणाची कवाडं खुली झाली आहेत. शहरातील १६१ खाजगी हॉस्पिटलं, ४ शासकीय रुग्णालयांच्या माध्यमातून शहराच्या वैद्यकीय सेवेचाही विस्तार झाला आहे. शहराचे हे स्थित्यंतर टप्प्याटप्प्याने झाले आहे.

गणेश कोल्हटकर यांनी १८६७ मध्ये सुरू केलेले 'वऱ्हाड समाचार' हे अमरावतीचे पहिले वृत्तपत्र. त्यानंतर 'प्रमोदसिंधू' हे साप्ताहिक निघाले. सामाजिक सुधारणेवर या साप्ताहिकाचा भर असे. 'वैदर्भ' या साप्ताहिकानेही लोकजागृतीची भूमिका बजावली. १९२० मध्ये बाबासाहेब खापर्डे यांच्या संपादकत्वाखाली 'उदय' हे साप्ताहिक सुरू करण्यात आले. वीर वामनराव जोशी यांचे 'स्वतंत्र हिंदुस्थान', १९४७ साली गद्रे यांच्या संपादकत्वाखाली 'हिंदुस्थान' अशी अनेक वृत्तपत्रे अमरावतीतून सुरू करण्यात आली. १९५० पासून हिंदुस्थानची मालकी व संपादन बाळासाहेब मराठे यांच्याकडे आली. हे वृत्तपत्र दैनिक स्वरूपात आजही सुरू आहे. अमरावतीतून अनेक वृत्तपत्रे प्रकाशित झाली. काही बंद पडली पण नागपूर येथून प्रकाशित होणाऱ्या वृत्तपत्रांखेरीज अमरावतीतून प्रकाशित होणाऱ्या 'जनमाध्यम', 'विदर्भ', 'मतदार', 'प्रतिदिन', 'वृत्तकेसरी', 'अमरावती मंडल', 'प्रेरणापुंज' अशा अनेक वृत्तपत्रांनी आपला वाचकवर्ग तयार केला आहे.

शहरातील दोन तलावांच्या आणि बगिचांच्या सौंदर्यीकरणामुळे शहराला देखणे स्वरूप मिळाले आहे. पूर्वेकडे असलेली वडाळी आणि छत्री तलाव ही अमरावतीकरांसाठी आणि पाहुण्यांसाठी विरंगुळ्याची ठिकाणे. त्यांचे सौंदर्यीकरण झाले आहे.

औद्योगिक मागासलेपण पुसण्याचा प्रयत्न चालला आहे. नांदगाव पेठ येथील मल्टीपर्पज सेझमुळे औद्योगिक विकासाला चालना मिळू शकेल, अशी अपेक्षा अमरावतीकर करीत होते; सेझ रद्द झाला, पण तरीही इंडिया बूल्स कंपनीचा औष्णिक वीज प्रकल्प, भारत डायनामिक्सचा प्रस्तावित क्षेपणास्त्र निर्मिती प्रकल्प, बडनेरा येथील प्रस्तावित रेल्वे वॅगन दुरुस्ती कारखाना अशा मोठ्या प्रकल्पांमुळे अमरावतीला औद्योगिक नकाशावर स्थान मिळू शकेल. व्यापाऱ्यांची मोठी पेठ म्हणून वऱ्हाडात अमरावतीची ख्याती होती. व्यापाराचे क्षेत्र विस्तारत गेले. आता अनेक मॉल्सनी अमरावतीची खरेदी संस्कृती बदलवली आहे. शहरात सर्वच प्रकारच्या दुकानांचा कायापालट झालाय.

अमरावतीने १९७० च्या दशकात अनेक स्थित्यंतरे अनुभवली आहेत. १९८१ पासून अमरावतीत महसूल विभागीय कार्यालय सुरू झाले. १ मे १९८३ या दिवशी अमरावती विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. १९८३ च्या ऑगस्टमध्ये अमरावती नगरपालिकेचे महापालिकेत रूपांतर झाले. बडनेरा शहर अमरावतीत समाविष्ट झाले. अमरावतीच्या सभोवताली असलेली १७ खेडी शहराचा भाग बनून गेली. याच कालखंडात अमरावतीत १५० कॉलनीज वेगवेगळ्या ठिकाणी उभ्या झाल्या. १९८१ च्या जनगणनेप्रमाणे अमरावतीची लोकसंख्या ३.३५ लाख होती, ती १९८५ पर्यंत चार लाखांवर पोहोचली आणि आता ती ७ लाखांवर पोहोचली आहे. अमरावती पेयजलाच्या बाबतीत समृद्ध बनलेय, पण आधी तशी स्थिती नव्हती. अमरावतीचा विस्तार झाल्यानंतर पाणीटंचाई भेडसावू लागली होती. १९७२ मध्ये पूर्णा आणि पेढी नदीतून पाण्याचा उपसा करून तो जलवाहिन्यांच्या माध्यमातून अमरावतीपर्यंत पोहोचवला जात होता. १९८२ पर्यंत पेढी आणि पूर्णा नद्यांचे प्रवाह आटले. १९९४ पर्यंत अमरावती शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी भूगर्भातील पाण्याचा वापर करावा लागला. लहानमोठ्या कूपनलिकांची संख्या ही चारशेपर्यंत पोहोचली होती. पाणीटंचाईचा सातत्याने सामना करणाऱ्या अमरावतीच्या मदतीसाठी अप्पर वर्धा धरण धावून आले. तत्कालीन लोकप्रतिनिधींच्या पाठपुराव्यामुळे अप्पर वर्धा धरणाचे पाणी अमरावतीला मिळू लागले, आता अमरावतीत सातही दिवस चोवीस तास पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्याची योजना आकार घेत आहे.

सामाजिक एकोपादेखील जपलाय. जातीय विद्वेषाच्या भावना पुसल्या जात आहेत. राजकीय क्षेत्रात नव्या दमाच्या पुढाऱ्यांनी आपलं योगदान दिलंय, विकसनशील टप्प्यावर अमरावतीने आता कात टाकली आहे. इतिहासाच्या पाऊलखुणादेखील जपल्या आहेत. स्त्रीशिक्षणाच्या बाबतीत पुढाकार घेणारं गाव म्हणूनही शहराची ओळख आहे. राजकीय किंवा इतरही क्षेत्रातील महिलांच्या नेतृत्वगुणांना अमरावती शहरानं वाव मिळवून दिला आहे. साहित्यिकांच्या प्रतिभा फुलवणारं, सांस्कृतिक चळवळीला उभारणी देणारं, शिक्षण क्षेत्रातील महत्त्वाचे बदल सहजपणे स्वीकारणारं, संयम ठेवणारं पण एखाद्या क्षणी उत्स्फूर्त प्रतिक्रिया देणारं, हरहुन्नरी लोकांचं हे गाव बाहेरून बदललं असलं, तरी आत्मा हरवू न देण्याची काळजी शहरानं घेतली आहे.

**संपर्क : ९४२२१५७४७८**

अमरावती शहरातील नोंदणीकृत वाहनांची संख्या ३ लाखांवर पोहोचली आहे.






# दुष्काळाचे दुःख हलके करण्यासाठी

**प्रवीण टाके**

भारतासारख्या महाकाय देशात विविध राज्यांतील काही भागांत घडणाऱ्या अघटिताची नेमकी जाणीव केंद्र सरकारला करून देणे अत्यंत जिकिरीचे कार्य ठरते. देशभरातील विविध समस्यांवर एकाच वेळी नेमका इलाज करणे ही तारेवरची कसरत असते. मात्र, सुदैवाने महाराष्ट्राची बाजू भक्कमपणे मांडणारे आणि ती कुठे व कशी मांडायची याचा दीर्घानुभव असणारे नेतृत्व राज्याला लाभले आहे. त्यामुळे महाराष्ट्राचा दुष्काळ दिल्लीच्या नॉर्थ ब्लॉकपासून पंतप्रधानांच्या घरापर्यंत माहिती झाला आहे. त्याची विदारकता १० जनपथपासून ७ रेसकोर्सपर्यंत जाणवली आहे. दिल्लीतील कामकाजाचा अनुभव असणारे मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या नेतृत्वाची ही किमया असून केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार, केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्याशी या विषयावर असणाऱ्या समन्वयाची ही फलनिष्पती आहे. थोडक्यात, केंद्रीय स्तरावर दुष्काळाची दाहकता मांडण्यात राज्याच्या नेतृत्वाला यश आले आहे.

मात्र, हा पूर्णविराम नसून पुढचे सहा महिने याबाबतच्या पाठपुराव्याचे नियोजनही दिल्ली येथे करण्यात आले आहे. नोव्हेंबर महिन्यात मुख्यमंत्र्यांनी राज्यातील मंत्रिमंडळाच्या सदस्यांसह केंद्रातील दुष्काळ निवारण्यासाठी असणाऱ्या उच्चाधिकार समितीपुढे दुष्काळाची नेमकी व्यथा मांडली होती. या उच्चाधिकार समितीचे प्रमुख शरद पवार आहेत. त्यांनी या सादरीकरणानंतर लगेच एक पथक महाराष्ट्रात पाठविले होते. संयुक्त सचिव आर. बी. सिन्हा यांच्या नेतृत्वातील पथकाने दुष्काळी भागाचा दौरा केला. पुढील उन्हाळ्याचे तीन महिने आणि मृगाच्या पावसाच्या आगमनापर्यंतचे नियोजन केंद्र शासन करीत आहे.

मात्र, ही मदत अपुरी असून राज्याला दुष्काळ निवारण्यासाठी २२७० कोटी रुपयांची मदत देण्यात यावी, अशी मागणी ३० जानेवारीला मुख्यमंत्र्यांनी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्याकडे केली आहे. याच भेटीत त्यांनी मच्छीमारांना डिझेलवर पूर्वीप्रमाणे सवलत देण्याची मागणी केली. डिझेलच्या दरात १२ रुपये वाढ झाल्याने मच्छीमारांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला होता. मुख्यमंत्र्यांनी केंद्रीय पेट्रोलियम मंत्री वीरप्पा मोइली यांच्याकडे यासाठी पाठपुरावा केला. पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचेही याकडे लक्ष वेधले. ७ फेब्रुवारीला मुंबईच्या मच्छीमारांना शुभवार्ता मिळाली.. मच्छीमार हे डिझेल खरेदी करणारे किरकोळ खरीददारच आहेत, हे केंद्र सरकारने मान्य केले. मच्छीमारांना डिझेलवर आता पूर्वीप्रमाणेच सवलत दिली जाणार आहे. सातत्यपूर्ण पाठपुराव्याला आलेले हे यश आहे.

**राज्यपालांचा पाठपुरावा**

हा पाठपुरावा केवळ पंतप्रधानांच्या कार्यालयापुरताच नाही, तर महाराष्ट्राच्या दुष्काळाची जाणीव आता राष्ट्रपती भवनालाही झाली आहे. राज्यपालांनी ११ व १२ फेब्रुवारी रोजी झालेल्या राज्यपालांच्या बैठकीत राज्यातील वेगवर्धीत सिंचन प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. ही मागणी करताना सिंचन प्रकल्पाच्या सुरुवातीलाच ७० टक्के निधी उपलब्ध झाल्यास प्रकल्प पूर्ण होण्यास गती मिळेल. यामध्ये वेळ जाणार नाही, अशी सूचना राज्यपालांनी केली आहे. त्यांच्यापुढे राज्यपालांनी विदर्भ व मराठवाडा आदी भागातील सिंचनाचा अनुशेषसुद्धा मांडला आहे. या परिसरातील सिंचन प्रकल्पांना गती देण्याची मागणी त्यांनी केली आहे. दिल्लीच्या रायसीना हिल्सवरचा हा पाठपुरावा नक्कीच काहीतरी राज्याच्या हातात देईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**पूरक व्यवसायांना चालना**

दुष्काळासाठी राजधानीत कृषी मंत्रालयही अनेक उपाययोजना करण्यात प्रयत्नरत आहे. शेतकऱ्याचे दु:ख आणि शेतीची मशागत याचे उत्तम ज्ञान असणारे केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार यांनी दुष्काळात पूरक व्यवसायांना चालना देण्यासाठी ६ फेब्रुवारीला पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय संदर्भातील ५ वी राष्ट्रीय परिषद घेतली. कृषी क्षेत्रात ४ टक्के विकासदर राखण्याचे उद्दिष्ट सध्या त्यांनी हाती

**दुष्काळ निवारणाच्या कामासाठी आतापर्यंत केंद्र सरकारकडून ७७८ कोटीची पायाभूत सुविधा पोहचविणारी मदत महाराष्ट्राला देण्यात आली आहे.**

राज्याच्या साहित्य क्षेत्राला उभारी देणारा एक दमदार पुरस्कारही जाहीर झाला. राज्यातील ज्येष्ठ पत्रकार प्रतिभावंत साहित्यिक, आघाडीचे नाटककार जयंत पवार यांना त्यांच्या 'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर' या लघुकथेसाठी २०१२ चा साहित्य पुरस्कार प्राप्त झाला. दिल्लीतील माध्यमांनी या पुरस्काराचे भरपूर कौतुक केले.



येतले आहे. यासाठी जगातील सर्वाधिक मोठा दूध उत्पादक देश व सर्वाधिक पशुधन असणारा देश या उपलब्धीचा पूरक व्यवसाय म्हणून कसा उपयोग करणार यावर विचार मंथन सुरू आहे. महाराष्ट्राचे पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय मंत्री मधुकर चव्हाण यांनी या परिषदेत भाग घेतला. त्यांनी दुष्काळी काळात चाऱ्याची मागणी करतानाच या काळात आंतरराज्य खरेदी-विक्रीबाबतची अधिकृत नोंद असावी, कृत्रिम रेतनसंदर्भातील नियंत्रण कायदा, प्रजनन नियंत्रण कायदा, पशुपालनाचे प्रशिक्षण यासोबतच शालेय पोषण आहारात दूध भुकटीचा वापर करण्यावर भर दिला.

राज्यातील दुष्काळाची तीव्रता बघता केंद्रीय स्तरावर सर्वच मंत्री यासाठी धावपळ करीत आहेत. या काळात केंद्रीय कोळसा राज्यमंत्री प्रतीक पाटील यांनी केंद्रातील विविध मंत्र्यांच्या भेटीगाठी घेतल्या. सांगली जिल्ह्यातील दुष्काळाबाबत येथील टेंभू उपसा सिंचन प्रकल्पाला पाठबळ देण्यासाठी त्यांनी केंद्रीय जलसंपदा मंत्री हरिश रावत यांना मदतीची विनंती केली.

**विदर्भ ॲडव्हाँटेज २०१३ ची पूर्वतयारी**

दुष्काळाच्या संदर्भात राज्याला मदत व्हावी, नवनवीन उपाययोजना मिळाव्यात, तंत्रज्ञान मिळावे आणि आगामी काळातील परिस्थितीचा सामना करण्याची यंत्रणा निर्माण व्हावी, असा चौफेर प्रयत्न सध्या सुरू आहे. विदर्भातील औद्योगिक विकासासाठी मुख्यमंत्री महोदयांनी विदर्भ ॲडव्हाँटेज २०१३ चे आयोजन नागपूर येथे केले. राष्ट्रीय स्तरावरिल गुंतवणूकदारांना आवाहन करण्यासाठी सामाजिक न्याय मंत्री शिवाजीराव मोघे यांनी माध्यमांशी संपर्क साधला. याशिवाय २० फेब्रुवारिला विज्ञान भवनात अनुसूचित जाती-जमाती प्रतिबंधक कायदा सुधारणा विधेयकावर राष्ट्रव्यापी चर्चा झाली. या चर्चेत सामाजिक न्याय मंत्री शिवाजीराव मोघे यांनी या कायद्याबाबत सामाजिक जागृती निर्माण करण्याचे आवाहन केले. अशा कायद्याची घटनात्मक विशेष तरतूद का करावी लागते, याची जनमाणसाला सकारात्मक माहिती मिळावी, असे आवाहन त्यांनी केले आहे.

**मराठी जनांसाठी पर्वणी**

महाराष्ट्र परिचय केंद्रातर्फे आयोजित मीट द प्रेस या कार्यक्रमात त्यांनी देशपातळीवर विविध भाषेतील साहित्य प्रकाराचे अनुवाद करण्याचे आग्रही प्रतिपादन केले. देशपातळीवरील सांस्कृतिक देवाण-घेवाण होण्यास यामुळे लाभ होईल, असे ते म्हणाले.

संपर्क : ९७१७१४०४९४

सर्व राज्यांच्या ऊर्जा मंत्र्यांच्या ६ व्या वार्षिक परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. राज्याला कोळसा आणि गॅसचा नियमित पुरवठा करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी यावेळी केली. महाराष्ट्र राज्य वीज भारनियमन मुक्तीच्या अंतीम टप्प्यात असून राज्य ८२ टक्के भारनियमनमुक्त झाले आहे; तसेच राज्यातील वीज प्रकल्पांना विलंबाने मिळत असलेल्या इंधनाकडे केंद्राने लक्ष द्यावे, अशी विनंती ऊर्जा राज्यमंत्री राजेंद्र मुळक यांनी केली. यावेळी केंद्रीय राज्य ऊर्जा (स्वतंत्र कार्यभार) मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया, राज्याचे ऊर्जा सचिव अजय मेहता हे उपस्थित होते. राज्याने ऊर्जामध्ये वीजगळती १८ टक्क्यांवरून ३ टक्क्यांवर आणली आहे. राज्य केंद्र शासनाची राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजना (आरजीजीव्हीवाय), तसेच पुनर्गठीत त्वरित ऊर्जा विकास आणि सुधार कार्यक्रम (आर-एपीडीआरपी) प्रभावीपणे राबवित आहे आणि त्याचा सकारात्मक परिणामही राज्यात दिसत आहे. महाराष्ट्र राज्य ऊर्जा क्षेत्रात स्वयंपूर्णतेच्या दिशेने पाऊल टाकत असून काही अडचणी इंधन पुरवठ्याबाबतीत येत आहेत, याकडे त्यांनी या बैठकीत लक्ष वेधले.




फेब्रुवारी महिन्यात प्रगती मैदानावरील जागतिक पुस्तक प्रदर्शनीत या वर्षी मराठी भाषकांना मोठ्या प्रमाणात मराठी पुस्तके उपलब्ध झालीत.

# द्रष्टे निर्णय... अभिनव योजना

**दुष्काळग्रस्तांना दिलासा**

दुष्काळग्रस्त जनतेला दिलासा देण्याच्या दृष्टीने मंत्रिमंडळाच्या सर्व सदस्यांचे एक महिन्याचे वेतन मदत निधीला देण्याचा निर्णय घेण्यात आला. दहावी आणि बारावीच्या परीक्षा लक्षात घेता परीक्षा संपेपर्यंतच्या कालावधीसाठी म्हणजे मार्च अखेरपर्यंत राज्यात कुठेही रात्री भारनियमन केले जाणार नाही.

जिल्हा नियोजन मंडळाच्या निधीपैकी १५ टक्के निधी दुष्काळ कायमस्वरूपी निवारण्याच्या संबंधित कामांसाठी म्हणजे, सिमेंटचे पक्के बंधारे बांधणे इत्यादीसाठी खर्च करण्यात येईल.

दुष्काळामुळे नागरिकांवर स्थलांतर करण्याची पाळी येऊ नये, यासाठी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी पाणीपुरवठा आणि पुरेसा रोजगार उपलब्ध करण्याची दक्षता घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. ज्या गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे, त्या गावांमध्ये टँकरचे पाणी विहिरीत न सोडता सिंटेक्सच्या टाक्यांमध्ये सोडण्याचा निर्णय यापूर्वीच घेण्यात आला आहे. राष्ट्रीयकृत बँका, सहकारी साखर कारखाने आणि विविध उद्योग यटकांकडून अशा प्रकारच्या सिंटेक्स टाक्या सामाजिक दायित्व भावनेतून उपलब्ध करण्यात येत आहेत.

**पाणी पुरवठ्याच्या योजनांच्या दुरुस्तीच्या अधिकारात वाढ**



सांगली जिल्ह्यातील जत येथील बिरनाळ तलावामध्ये टेंभू उपसा सिंचन योजनेचे पाणी आणण्यासाठी करावयाच्या कामासाठी २५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला असून पाणी पुरवठा योजनांच्या बाबतीत तातडीच्या उपाययोजना व योजनांचे विशेष दुरुस्तीचे अधिकार जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांना अनुक्रमे २५ लाख रुपये व एक कोटी रुपयांपर्यंत वाढविण्यात आले. टँकर्स भरुन घेण्यासाठी विद्युतपंप तसेच ऑइल इंजीन भाड्याने घेण्यासाठी टंचाई निधीतून खर्च अनुज्ञेय करण्यात आला आहे. गावांना पाणी पुरवठा करणाऱ्या स्वतंत्र पाणीपुरवठा योजनांच्या वीज देयकात ६७ टक्के सवलत देण्यात येईल. छावणीतील जनावरांसाठी केंद्र शासनाच्या दरापेक्षा अधिक दर निश्चित करण्यात आले आहेत.

**पाणी पुरवठा विभागास ४१४ कोटींचा निधी**

सांगली आणि सातारा जिल्ह्यातील दुष्काळी भागातील गावांना पाणीपुरवठा करणारे जलस्रोत भरून घेण्यासाठी ताकारी, टेंभू, म्हैसाळ तसेच सोलापूर व पुणे जिल्ह्यातील जााई-शिरसाई, पुरंदर, उरमोडी व जळगांव जिल्ह्यातील मुक्ताईनगर या उपसा सिंचन योजनांची वीज देयके शासनामार्फत देण्याचा निर्णय घेण्यात आला. टंचाईअंतर्गत पाणी पुरवठा करण्यासाठी पाणी पुरवठा विभागास राज्य शासनाकडून आतापर्यंत ४१३ कोटी ९८ लाख रुपयांचा निधी देण्यात आला आहे.

**२,०२० टँकरद्वारे पाणी पुरवठा**

राज्यातील १,८८० गावातील ५,१९५ वाड्यात पाणी टंचाई जाणवत असून त्या ठिकाणी २,४०८ टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जात आहे. अद्यापही ज्या ठिकाणी टंचाई जाणवत असेल, त्या ठिकाणी आणखी टँकर्स तातडीने उपलब्ध करून देण्यात येतील.

टंचाई परिस्थितीत लोकांना गावातच रोजगार उपलब्ध व्हावा या दृष्टीने ग्रामीण रोजगार हमी योजनेखाली एकूण २३ हजार ३५५ कामे सुरू असून या कामावर २ लाख २६ हजार ४२३ मजूर काम करीत आहेत. अहमदनगर जिल्ह्यात २३१, पुणे जिल्ह्यात १, सातारा जिल्ह्यात १०६, सांगली जिल्ह्यात ४५, सोलापूर जिल्ह्यात १४९, औरंगाबाद जिह्यामध्ये ४, बीड जिल्ह्यात ३४, उस्मानाबाद ७ आणि जालना जिल्ह्यात २० गुरांच्या



छावण्या उघडण्यात आल्या आहेत. यावर आतापर्यंत ३७५.६६ कोटी रुपये खर्च करण्यात आला आहे.

**पुनर्वसनात बहिणींना मिळणार समान हक्क**

हिंदू वारसा हक्क कायद्यात १९९४ मध्ये झालेल्या दुरूस्तीनुसार बहिणींना वडिलोपार्जित मिळकतीत समान हक्क देण्यात आला आहे. त्यानुसार महाराष्ट्रात प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन करताना भावासोबतच बहिणींना देखील समान हक्क देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे.

या निर्णयानुसार महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तिंचे पुनर्वसन अधिनियम १९९९ मध्ये प्रकल्पग्रस्त व्यक्तिंच्या व्याख्येत सुधारणा करण्यात येईल. अधिनियमात प्रत्येक भावाला या शब्दाच्या पुढे 'तसेच बहिणीला' या शब्दाचा अंतर्भाव करण्यात येईल व मृत भावाचा या शब्दापुढे किंवा 'बहिणींचा' हा शब्द अंतर्भूत करण्यात येईल.

**पामतेलाचा पुरवठा ५० रूपये प्रतिलिटर दराने**



राज्यात सवलतीच्या दराने शिधापत्रिकेवर पामतेलाचा पुरवठा करण्याच्या योजनेस ऑगस्ट २०१३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून ५० रूपये प्रतिलिटर या सवलतीच्या दराने पामतेलाची विक्री करण्यात येईल.

**प्रमाणित बिजोत्पादन कार्यक्रम**

राज्यातील ज्वारी, बाजरी, भात व गहू या तृणधान्य तसेच कडधान्य व गळीत धान्य पिकांच्या प्रमाणित बियाणांची कमतरता भरून काढण्यासाठी ग्राम बिजोत्पादन कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. १०० टक्के शुध्द बियाणे तयार करणारा हा कार्यक्रम पंचवार्षिक योजनेतून राबविण्यात येईल.

या योजनेमध्ये बियाणांवर प्रक्रिया करण्यासाठी बीज प्रक्रिया केंद्रे व बियाणे साठविण्यासाठी गोडावून उभारण्यात येतील.

ज्वारी, बाजरी, भात व गहू या तृणधान्य तसेच कडधान्य व गळीत धान्य पिकांचे वार्षिक ८०,००० क्विंटल बियाणे उत्पादन करण्याचे नियोजन असून त्याकरीता प्रति क्विंटल ५०० रुपये प्रमाणे सुमारे ४ कोटी रुपये इतके

**राज्यात आतापर्यंत ५९७ जनावरांच्या छावण्या उघडण्यात आल्या असून यात ४ लाख ८८ हजार २८९ एवढी जनावरे आहेत. चारा वितरणासाठी ७४९ कोटी २९ लाख एवढा निधी वितरित करण्यात आला आहे.**



अर्थसाहाय्य देण्यात येईल. शेतकरी समूहामार्फत उत्पादित बियाणांवर प्रक्रिया करण्यासाठी ५० टक्के अनुदानावर (२० लाख रुपये प्रति बीज प्रक्रिया केंद्र याप्रमाणे) राज्यात दरवर्षी ३० बीज प्रक्रिया केंद्रांची उभारणी करण्यात येईल.

या प्रक्रिया केंद्रावरील प्रक्रिया केलेले बियाणे साठविण्यासाठी राज्यात दर वर्षी (प्रति गोडावून १० लाख रुपये अनुदान) ३० गोडावून उभारण्यात येतील. या योजनेत शेतकरी/ शेतकरी समूह/ बिजोत्पादक संस्था /महाबीज हे लाभार्थी असतील.

या योजनेसाठी प्रतिवर्षी १३ कोटी रुपये प्रमाणे पंचवार्षिक योजनेंतर्गत ६५ कोटी रुपये इतका निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

**तालुका बिजगुणप्रक्षेत्रावर पायाभूत सुविधा**

उत्तम प्रतीची आणि खात्रीशीर बियाणे शेतकऱ्यांना उपलब्ध व्हावे म्हणून कृषी विभागाकडून तालुका बीजगुण केंद्रे कार्यावित करण्यात आली आहेत. राज्यात एकूण १९४ तालुका बिजगुणकेंद्रे असून या केंद्रांचे परिरक्षण व प्रक्षेत्रांवर सिंचनाची सुविधा वाढविण्यासाठी राज्यस्तरावर 'तालुका बिजगुणाप्रक्षेत्रावर पायाभूत सुविधा वाढविणे' ही योजना राबविण्यास मान्यता देण्यात आली.

ही योजना कार्यालयीन प्रक्षेत्रावर राबविण्यात येणार असून या योजनेत कोणीही वैयक्तिक लाभार्थी नाही. या योजनेसाठी प्रतिवर्षी ५ कोटी रुपये प्रमाणे पंचवार्षिक योजनेंतर्गत २५ कोटी रुपये इतका निधी उपलब्ध करून देण्यात येईल.




**मुलींसाठी १४ नवीन वसतिगृहे**

मुलींची उच्च शिक्षणातील गळती थांबविण्यासाठी तसेच सर्व समाजघटकांच्या समावेशाचा विचार करून त्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी १२ ठिकाणी १४ वसतिगृहे बांधण्यात येतील.


यामध्ये मुंबई, पुणे, औरंगाबाद, जळगाव, नांदेड, सोलापूर, पनवेल, गडचिरोली व जालना याठिकाणी ९ नवीन वसतिगृहे बांधण्यात येणार असून नागपूर येथील २, औरंगाबाद, कोल्हापूर व अमरावती येथील प्रत्येकी १ याप्रमाणे ५ वसतिगृहांचा विस्तार करण्यात येईल.

**नाशिक व अमरावती येथे प्री आयएएस प्रशिक्षण केंद्र**

नाशिक येथे यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठामध्ये व अमरावती येथे शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालयाच्या जागेत प्री आयएएस ट्रेनिंग सेंटर सुरू करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे आता सर्व महसूली विभागांमध्ये अशा स्वरुपाचे ट्रेनिंग सेंटर कार्यरत होऊन ग्रामीण भागातील होतकरू विद्यार्थ्यांना त्याचा लाभ होईल.

**दस्त नोंदणीसाठी नवीन संगणकीय प्रणाली**

सध्याच्या मुद्रांक पेपर, फ्रँकिंग, ई-स्टॅम्पींग



या प्रचलित मुद्रांक शुल्क भरण्याच्या पद्दतीबरोबरच ई-एसबीटीआर (e-Secured Bank cum Treasury Receipt) या नवीन संगणकीय कार्यप्रणालीचा राज्यात अवलंब करण्यास मंत्रिमंडळाने आज मान्यता दिली.


मुद्रांक शुल्क, नोंदणी फी, दस्त नोंदणी करण्यासाठी सेवाशुल्क इत्यादी शासनाकडे जमा करण्यासाठी प्रचलित कार्यपध्दतीनुसार नागरिकांना वेगवेगळ्या माध्यमांचा वापर करावा लागत होता. ई-एसबीटीआर ही कार्यप्रणाली ही प्रचलित पध्दतीपेक्षा सर्वाधिक सुरक्षित असून यामुळे शासानाच्या कमिशन खर्चातही बचत होणार आहे. तसेच रोख रक्कम हाताळणे, डी. डी./ पे ऑर्डरद्वारे रक्कम शासनाकडे / मुद्रांक अधीक्षक, मुंबई जिल्हा व तालुका स्तरावरील कोषागरे या कार्यालयात भरुन त्यांच्याकडून मुद्रांक प्राप्त करून घेणे आदी कामे करून घ्यावी लागत होती. सध्याच्या मुद्रांक शुल्क भरण्याच्या पद्धतीमध्ये नागरिकांच्या व मुद्रांक व नोंदणी विभागाच्या दृष्टीने काही अडचणी असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले होते. त्यामुळे मुद्रांक शुल्क व नोंदणी फी व दस्त हाताळणे शुल्क या महसुली जमा ई-पेमेंटद्वारे भरण्यासाठी आवश्यक असलेल्या काही सुधारणा यापूर्वीच केल्या आहेत.

त्यानुसार प्रचलित मुद्रांक शुल्क भरण्याच्या पध्दतीबरोबरच ई-एसबीटीआर या नवीन प्रणालीचा अवलंब करण्याचा प्रस्ताव विभागाच्या विचाराधीन होता. या प्रणालीत मुद्रांक शुल्क, नोंदणी फी, दस्त नोंदणी करण्यासाठी सेवाशुल्क या विविध बाबींद्वारे शासनाकडे जमा होणारी महसुली रक्कम स्वीकारल्यानंतर पक्षकाराला ई-एसबीटीआर अथवा simple receipt देणे, इत्यादी बाबींचा समावेश आहे.

**शासनमान्य ग्रंथालयांची पडताळणी**

राज्यातील शासनमान्य सार्वजानिक ग्रंथालयांच्या सर्वंकष पडताळणीचा अहवाल मंत्रिमडळाच्या बैठकीमध्ये मान्यतेसाठी सादर करण्यात आला. यावेळी खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

सर्व अटी व शर्तींची पूर्तता करीत असलेली ५,७८४ ग्रंथालये चालू वर्षीच्या नियमित अनुदानासह ५० टक्के वाढीव अनुदानास पात्र राहतील. त्रुटी आढळून आलेल्या ५,७८८



ग्रंथालयांना त्रुटींची पूर्तता करण्याकरिता ३ महिन्याचा कालावधी देण्यात यावा व त्यानंतर फेरतपासणी करून प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करावा. मान्यता रद्द करण्यायोग्य आढळून आलेल्या ९१४ ग्रंथालयांची नियमातील तरतुदींनुसार व विहित पद्धतीने मान्यता रद्द करण्यात यावी. मंत्रिमंडळाचे पुढील आदेश होईपर्यंत कोणत्याही नवीन ग्रंथालयाला मान्यता देऊ नये व दर्जा वाढ करू नये. त्याबाबत नवीन निकष ठरवून सर्वंकष प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करावा.

यापुढे प्रत्येक ग्रंथालयाला यूआयडीचा वापर करणे अनिवार्य राहील.

❑ ❑

उच्च शिक्षणातील मुलींची गळती थांबविण्यासाठी शिक्षण सुविधेच्या ठिकाणी मुलींसाठी १४ नवीन वसतिगृहे बांधण्याचा किंवा विस्तार करण्याचा निर्णय घेण्यात आला. याचा लाभ २२५० विद्यार्थीनींना मिळेल.

# भक्ती आणि संस्कृती

भ्रमंती

महाराष्ट्राचा वैभवशाली, संपन्न, सांस्कृतिक, धार्मिक क्षेत्राबरोबरच पर्यटनदृष्ट्या आघाडीचा जिल्हा म्हणजे जळगाव जिल्हा होय. जळगाव जिल्ह्याच्या उत्तरेस सातपुडा हा पर्वत असून सूर्यकन्या, तापी नदी तसेच गिरणा, वायूर, पूर्णा नदीचा हा भूसंपन्न परिसर पाटणादेवी, मनुदेवी, गरम पाण्याचे झरे, झुलते मनोर, भुईकोट किल्ला, श्री क्षेत्र पद्मालय ही येथील मुख्य आकर्षणे आहेत.

**श्री क्षेत्र पद्मालय**

पद्मालय तीर्थक्षेत्र जळगावपासून ३५ कि.मी. (शिरसोली मार्गे) अंतरावर असून एरंडोल या तालुका मुख्यालयापासून ११ कि.मी. अंतरावर असलेल्या डोंगररांगावरील पठारावर वसलेले आहे. येथील श्री गणेशाची मूर्ती स्वयंभू असून एकाच पीठावर एक उजव्या सोंडेची व दुसरी डाव्या सोंडेची स्वयंभू प्रवळ मूर्ती असलेले पद्मालय हे एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे.

मंदिरासमोर एक नयनरम्य तलाव आहे. त्या तलावात वर्षभर विविध रंगी व मोहक अशी कमळ फुले पाहून भाविक प्रसन्न होतात. मंदिरापासून २ कि.मी. अंतरावर भीमकुंड असून येथे भीमाने बकासुराचा वध केल्याचे म्हटले जाते. तसेच परिसर विविध वृक्षवेलींनी नटलेला असून मंदिरापर्यंत जाण्यासाठी पक्का रस्ता असल्याने भाविक व पर्यटक मोठ्या संख्येने भेट देत असतात. प्रतिवर्षी येथे अंगारखी चतुर्थीला मोठी यात्रा भरते.

**मनुदेवी**

सातपुडा पर्वताच्या पायथ्याशी असलेले मनुदेवी हे एक जागृत स्थळ आहे. हा परिसर निसर्ग सौदर्यांनी नटलेला असून येथील वनांमध्ये विविध प्रकारचे प्राणी आढळतात. मनुदेवींचा उल्लेख सप्तशती पीठ या ग्रंथात मार्कंडेय ऋषींनी केलेला आहे. या मंदिराचा शोध इ.स. १२५१ मध्ये लागला. तत्कालीन गवळी राजा ईश्वरसेन याने हेमाडपंथी मंदिराची स्थापना केली.

**रमणीय धबधबा**



पाटणादेवी मंदिर, चाळीसगाव येथील पितळखोरी लेणी.



मनुदेवी मंदिर, तालुका यावल

मनुदेवी मंदिराच्या समोरील डोंगररांगावरून वर्षातील ६ ते ७ महिने सुंदर, मनमोहक व रमणीय धबधबा कोसळत असतो. त्यामुळे या परिसरातील सौंदर्य अधिकच खुलून दिसत असते. सुमारे ४०० फूट उंचीवरून कोसळणारे धबधब्याचे पाणी सातपुड्याच्या पायथ्याशी येते. येथे शासनाच्या मदतीने पाझर तलाव बांधण्यात आला आहे. तलावाशेजारीच छोटेसे हनुमान मंदिर आहे. त्यामुळे मनुदेवींचा परिसर प्रसन्न वाटतो.

**गवळी वाड्याचे अवशेष**

या मंदिरापासून ४ कि.मी. अंतरावर गवळी वाड्यांचे अवशेष आजही पाहावयास मिळतात. या भागात पूर्वी गवळी राजांचे राज्य होते. वाड्याच्या भोवती असलेल्या विटा या आज वापरात असलेल्या विटांपेक्षा सहापट अधिक मोठ्या आहेत. काही वर्षांपूर्वी येथील काही भागात जुने रांजण, स्वयंपाकाची भांडी सापडत

भास्कराचार्यांचा शून्याचा शोध, तसेच कण्वाश्रमातील वैज्ञानिक प्रयोगांमुळे जळगाव जिल्हा पर्यटकांसाठी नित्य आकर्षण ठरला आहे.

होती.

### वनसंपदा

मनुदेवी मंदिराचा परिसर तिन्ही बाजूंनी उंच कड्यांनी वेढलेला असून आजूबाजूला असलेल्या उंच उंच हिरवीगार वृक्ष वेलींनी हा परिसर नटलेला आहे. मंदिराप्रमाणेच येथील वन परिसर जैव विविधतेसाठी प्रसिद्ध आहे. त्यात २३० प्रकारचे पक्षी तसेच बिबट्या, अस्वल, चिंकारा हे वन्यप्राणी आढळतात. हिमालयातून स्थलांतरित ब्लॅक ईगल हा दुर्मीळ पक्षी येथे रहिवास करतो.

मनुदेवीचा हा परिसर धार्मिक स्थळाबरोबरच एक पर्यटन स्थळ बनलेले आहे. मंदिरापर्यंत जाण्यासाठी शासनाने पक्की सडक बनविली असून पाझर तलावही बांधलेला आहे. हे स्थान जळगावपासून सुमारे ६० कि.मी. अंतरावर चोपडा-यावल रस्त्यावर असून अडावद फाट्यापासून पुढे ५ कि.मी. अंतरावर आहे. मंदिरापर्यंत वाहन जाण्याची सोय झालेली आहे. तसेच मंदिर प्रशासनाने येणारे भाविक व पर्यटकांसाठी राहण्याची सुविधा उपलब्ध केली आहे.

### उनपदेव

उन-अप म्हणजे गरम पाणी, खानदेशातील भाषेत वुना देव म्हणजे ज्याने हे उष्ण पाणी निर्माण केले तो देव. उनपदेव हे जळगाव जिल्ह्यातील चोपडा तालुक्यातील अडावद गावाच्या शिवारात सातपुडा पर्वताच्या पायथ्याशी आहे. सदर ठिकाण प्राचीन काळापासून गणेश उपासक व साधुसंताचे धार्मिक स्थळ म्हणून प्रसिद्ध आहे. हे ठिकाण जळगाव शहराच्या उत्तरेस ८० कि.मी. व चोपडा गावाच्या पूर्वेस २० कि.मी. अंतरावर आहे. या ठिकाणी नैसर्गिक उष्ण पाण्याचे अखंड झरे असून पाणी एका गोमुखाद्वारे पडून कुंडातून सतत वाहते. या पाण्याचे सर्वसाधारण उष्णतामान ६० ते ७० अंश सेल्सियस इतके आहे. उष्ण पाण्यात स्नान केल्याने चर्मरोगाचे निवारण होते अशी भाविकांची श्रद्धा आहे. त्यामुळे सर्व धर्मांचे लोक व पर्यटक वर्षभर येथे उष्ण पाण्यात स्नान करण्यासाठी व निसर्गरम्य वनसृष्टीचा आनंद लुटण्यासाठी मोठ्या प्रमाणात येत असतात. या पवित्र धार्मिक पर्यटन स्थळाचा विकास करण्याच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्र शासनाने सन १९९८-९९ च्या आर्थिक वर्षी बिगर आदिवासी योजनेंतर्गत रक्कम रुपये ४६.१५ लाख इतक्या व्ययास प्रशासकीय मंजुरी देण्यात आलेली आहे. तसेच उनपदेव या पर्यटनस्थळाच्या विकासासाठी केंद्र शासनाकडून रु. २५ लाख केंद्रीय अर्थसाहाय्य व महाराष्ट्र शासनाकडून रु. ५ लाख असा एकूण ३० लाख निधी मंजूर झालेला आहे. २००४-०५ या वर्षात पर्यटन विकास कार्यक्रमाअंतर्गत एकूण रु. ७५ लाखांची मंजूर कामे उनपदेव येथे सुरू आहेत.

### श्रीक्षेत्र चांगदेव

हठयोगी संत श्री चांगदेव यांचे मंदिर मुक्ताईनगरपासून ४ कि.मी.वर पूर्णा व तापी नदीच्या संगमावर आहे. हे हेमाडपंथी मंदिर काळ्या संगमरवरी शिळा एकावर एक रचून बांधलेले आहे. हे मंदिर अहिल्याबाई होळकरांनी बांधले होते. जेथे या दोन नद्यांचा संगम होतो तेथे महादेव मंदिर आहे. चांगदेव मंदिर बरेच प्राचीन असून त्याचा उल्लेख अबुल फजल यांच्या ऐन-ए-अकबरीत आहे. मंदिराच्या प्रवेशद्वारावर बाळबोध लिपीतील काही मजकूर आहे.


### श्रीसंत मुक्ताबाई संस्थान मुक्ताईनगर

जळगाव जिल्ह्यातील भुसावळपासून सुमारे २०



मनुदेवी मंदिर परिसरातील रमणीय धबधबा

**चांगदेव मंदिर अत्यंत प्राचीन असून त्याचा उल्लेख अबुल फजल यांच्या ऐन-ए-अकबरी या ग्रंथात आढळतो.**




श्री. पाटणादेवी मंदिर परिसरातील लेणी व शिल्पे



श्री. पाटणादेवी माता, चाळीसगाव



श्री. पाटणादेवी मंदिर परिसर, चाळीसगाव



श्री. मनुदेवी मंदिर, ता. यावल येथील धबधबा

कि.मी.वर मुक्ताईनगरजवळ कोथळी येथे संत मुक्ताबाईचे मंदिर आहे. तेथूनच जवळ एदलाबादला संत मुक्ताबाईचे नवीन मंदिर बांधण्यात आले आहे. संत मुक्ताबाईभोवती एक अद्‌भुत रम्यतेचे वलय आहे. मुक्ताबाईच्या इतर भावडांनी समाधी घेतली पण संत मुक्ताबाई मात्र नाहीशी झाली असे मानतात. ती फिरत फिरत हठयोगी चांगदेव यांच्या तपोभूमीत आली होती. सन १२९७ मध्ये वैशाख शुद्ध द्वादशीला ती तेथे असताना अचानक भर मध्यान्हीला वीज कडाडली आणि त्या झगमगाटात ती अदृश्य झाली. तेथे तिचे जुने मंदिर होते. मुक्ताबाई या बालयोगिनीचे हे स्मारक म्हणून ओळखले जाते. माघ वद्य दशमी ते द्वादशी असे तीन दिवस येथे मोठी यात्रा भरते.

**पाटणादेवी :**

पाटणादेवी (चंडिकामाता) मंदिराची स्थापना डोंगरी नदीकाठी शके ११२८ मध्ये झाली. हे मंदिर यादवकालीन असून हेमांडपथी कलेचा उत्कृष्ट नमुना आहे. तसेच हे स्थान पार्वतीचे शक्तीपीठ असून गौताळा अभयारण्यात येते. त्यामुळे हे पर्यटकांचे आवडीचे स्थान आहे.

**शिलालेख व शिल्पे**

या मंदिर परिसरात सापडलेल्या काही शिलालेखांचे वाचन इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी करून ते पुस्तकरूपाने प्रसिद्ध केले आहे. उत्खननात सापडलेल्या अनेक मूर्ती, शिलालेख व शिल्पे मंदिर परिसरात भाविक, पर्यटक यांना पाहण्यासाठी ठेवलेली आहेत.

**भास्कराचार्य**

प्रख्यात गणिततज्ज्ञ भास्कराचार्य यांचे जन्मगाव पाटणच आहे. त्यांचा ज्योतिषविद्येचा आश्रम होता व त्यात त्यांनी शून्याचा शोध लावला असे सांगितले जाते. त्यांच्या यज्ञकुंडाचे अवशेष आजही पाहावयास मिळतात.

**पितळखोरी लेणी**

पाटणादेवी मंदिराचा परिसर निसर्ग सौंदर्याने नटलेला असून मंदिरापासून ३ कि.मी. अंतरावर पितळखोरी लेणी पर्यटकांना आकर्षित करून घेतात.

पाटणादेवी स्थान हे चाळीसगावहून ११ कि.मी. अंतरावर तर जळगावपासून सुमारे १०० कि.मी. अंतरावर आहे. हे क्षेत्र जळगाव वन विभागाच्या अंतर्गत येत असून येथे पर्यटकांना निवासाची सोय उपलब्ध आहे. वन विभागाने या भागाचा एक धार्मिक व वन पर्यटन स्थळ म्हणून विकास केलेला आहे.

**वडोदा रेंज**

यावल वन विभागाच्या अंतर्गत वडोदा रेंजचा भाग येतो. या क्षेत्रात वाघाचे अस्तित्व आहे. तसेच येथे महादेवाचे पुरातन मंदिर असून एक नयनरम्य तलावही आहे. यामुळे येथे पर्यटक नेहमी भेट देत असतात. या ठिकाणी जळगाव - यावल मार्गे जावे लागते.

**पारोळा : भुईकोट किल्ला**

पारोळा हे तालुक्याचे ठिकाण असून मुंबई - कोलकाता राष्ट्रीय महामार्गावर वसलेले आहे. जळगावहून ५६ कि.मी. अंतरावर पारोळा असून येथील भुईकोट किल्ला प्रसिद्ध आहे.

**कण्वाश्रम : वैज्ञानिक प्रयोगाचे स्थान**

गिरणा नदीच्या विशाल पात्राजवळ कानळदा गावात कण्वाश्रम आहे. जळगावपासून १४ कि.मी. अंतरावर हे गाव असून आश्रमात प्राचीन शिवालय आहे.

आश्रमातील स्वामी चंद्रकिरण महाराज, महाराणा प्रतापांच्या वंशातील शेवटचे वंशज स्वामींनी आश्रमात बरेच वैज्ञानिक प्रयोग केले. त्यांच्याकडे बाळलिंग शालीग्राम होते. पौर्णिमा ते अमावस्येला त्याचा रंग बलदत जायचा. चंद्राची ऊर्जा वापरून त्या अनुषंगाने होणाऱ्या बदलांचे विश्लेषण दाखविले जाई.

**पाल :**

रावेर तालुक्यात पाल हे प्रसिद्ध थंड हवेचे ठिकाण सातपुडा पर्वताच्या एका पठारावर वसलेले निसर्गरम्य पर्यटनस्थळ आहे. तेथे वनक्षेत्र कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण केंद्र आहे.

**- सुनील सोनटक्के**

संपर्क : ९४२१९७८५४५

**झाशीच्या नेवाळकरांच्या जहागिरीचे गाव म्हणून जळगाव जिल्ह्यातील पारोळा ओळखला जातो. येथील भुईकोट किल्ला इ.स. १७५७ मध्ये बांधलेला आहे.**

# वाचू आनंदे

# असामान्य नेतृत्व


महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई या महाराष्ट्र शासनाच्या अंगीकृत उपक्रमाद्वारे मराठी भाषा व साहित्याच्या प्रांतात मूलभूत विषय ग्रंथ, भाषांतरे, शब्दकोश, विश्वकोश, चरित्रे, समग्र वाङ्मय, गौरव ग्रंथ इ. रूपाने मोलाचे योगदान दिले आहे. या मालिकेत सदर मंडळाने अलीकडच्या काळात

**'थोर महात्मे होऊन गेले, चरित्र त्यांचे पहा जरा त्यांच्यासम आपण व्हावे, हाच सापडे बोध खरा'**

या ओळींना प्रमाण मानून 'महाराष्ट्राचे शिल्पकार' या नावाने चरित्रमाला प्रकाशित केली आहे. त्यात महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी विराजमान झालेल्या व महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासात मोलाची भर घालणाऱ्या सर्वश्री यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक व शंकरराव चव्हाण यांची चरित्रे यापूर्वी प्रकाशित झाली आहेत आणि आता दैनिक लोकमत, सोलापूरचे विद्यमान संपादक राजा माने यांनी लिहिलेल्या 'महाराष्ट्राचे शिल्पकार वसंतदादा' या चरित्राचा समावेश झाला आहे.

वसंतदादा पाटील हे स्वातंत्र्य सैनिक, पक्ष संघटक, सहकारी चळवळीचे खंदे कार्यकर्ते, प्रचंड लोकसंग्रह असलेला नेता म्हणून प्रसिद्ध होते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून 'हॅट्ट्रिक' साधणारे ते एकमेव मुख्यमंत्री. वसंतदादांनी शालिनीताईंशी विवाह करण्याचा निर्णय घेतल्यावर महाराष्ट्रात मोठं वादळ उठलं. त्यावेळी वि. स. खांडेकरांनी दैनिक 'सकाळ'मध्ये 'खरेखुरे बंडखोर व्यक्तिमत्त्व' शीर्षकाचा लेख लिहून समर्थन तर केलंच पण नैतिकतेच्या सार्वजनिक व व्यक्तिगत कसोट्यांची सीमारेषाही स्पष्ट केली होती. अशा वसंतदादांचं हे चरित्र राजा माने यांनी पूर्वदीप्ती शैलीने (Flash Back) लिहिलं आहे. चरित्राच्या सुरुवातीस त्यांनी वसंतदादांच्या स्वातंत्र्य लढ्यातील रोमहर्षक प्रसंगांचे वर्णन करून आपला चरित्र नायक हा 'जीव' धोक्यात घालून स्वातंत्र्यासाठी कसा झटत होता त्याचा प्रत्यय आणून दिला आहे. वसंतदादा तरुण वयातच स्वतंत्रता आंदोलनात उपजत देशप्रेमाच्या वृत्तीमुळे आकर्षित झाले. १९४२ च्या 'भारत छोडो' आंदोलनात त्यांनी सातारा, सांगली परिसरातील भूमिगत लढ्याचं नेतृत्व केलं. त्यात त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. तुरुंग फोडून त्यांनी आपली मर्दुमकी सिद्ध केली. या लढ्याच्या रोमहर्षक नाट्यानं हे चरित्र प्रारंभ करून चरित्रकार माने यांनी मोठं औचित्य साधलं आहे.

वसंतदादांचं घराणं मूळचं सांगली जिल्ह्यातील पन्हाळ्याचं. पण दादांचा जन्म मात्र कोल्हापुरात १३ नोव्हेंबर १९१७ ला झाला. त्यांच्या आई-वडिलांचे निधन प्लेगच्या साथीत झालं नि मग त्यांचा सांभाळ मामा-मामींनी केला. वयाच्या दहाव्या वर्षी ते कागलच्या मामा-मामींकडून पन्हाळ्याला आजीकडे आले. घरी पडवीतच शाळा सुरू झाली नि प्राथमिक शिक्षण तिथंच झालं. बालवयातच त्यांचं मन स्वातंत्र्य आंदोलनाकडे आकर्षित झालं. कुमार वयातच ते सोलापूरच्या 'ताडी सत्याग्रहात' सामील झाले. या आंदोलनात त्यांनी स्वदेशीचा पुरस्कार करत ब्रिटिश पेय चहा वर्ज केला. सन १९२८ मध्ये ते राष्ट्रसेवा दलाचे सैनिक झाले. सायमन कमिशनविरोधात त्यांनी सांगलीत 'बंद' यशस्वी केला. पुढे त्यांनी काँग्रेसच्या अनेक अधिवेशनांत भाग घेऊन सातारा, सांगली परिसरात राष्ट्रीय काँग्रेसचे संघटन कार्य केले. मिठाचा सत्याग्रह, कसेल त्याची जमीन इ. आंदोलनांत सहभागी झाल्याने ते पूर्ण गांधीवादी बनले. सन १९३९ साली खादीच्या पोषाखात मालतीबाईंशी त्यांचा विवाह घरगुती पद्धतीने साध्या वातावरणात झाला. लग्न इतके साधे की खर्च होता रुपये पंधरा! वसंतदादा तुरुंगात असतानाच त्यांच्या एकुलत्या एक मुलीचं निधन झालं. तुरुंगातून सुटून आल्यावर त्यांनी भूमिगत कार्यकर्त्यांचं संघटन करून नेतृत्व केलं.




स्वातंत्र्यानंतर ते 'होमगार्ड'चे कमांडंट झाले. सांगली जिल्हा स्वतंत्र झाल्यावर त्यांनी जिल्हा काँग्रेस स्थापन करून तिचं नेतृत्व केलं. स्वातंत्र्यानंतर त्यांनी पक्ष संघटन व रचनात्मक कार्य करत संस्थांचं जाळं विणलं. त्यांच्या विविध विधायक कार्याची नोंद घेऊन भारत सरकारने त्यांना १९६७ मध्ये 'पद्मविभूषण' किताब देऊन गौरव केला. मंत्री, मुख्यमंत्री, खासदार, राज्यपाल अशा अनेक सन्मानाच्या जागा त्यांना लाभल्या; पण सर्व पदं, प्रतिष्ठांच्या पलीकडे ते 'लोकनेते' म्हणूनच जनमानसात लक्षात राहिले. जिवंतपणी त्यांचा पुतळा उभारून सांगलीच्या जनतेनं आपल्या या आराध्य नेत्याचा गौरव केला. मुख्यमंत्री असतानाही दादा किती साधेपणानं राहत, वागत याचा अनुभव मी घेतला असल्यानं चरित्रकारांनी म्हटल्याप्रमाणे 'जिथे दादा तिथे माणसांचं मोहोळ' हे ठरलेलं असायचं. हे चरित्र त्यांच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंतचा साद्यंत इतिहास आहे खरा; पण तो केवळ सनावळ्यांच्या जंत्रींनं न भरता राजा माने यांनी अनेक दुर्मीळ संदर्भ प्रसंग देऊन चरित्रनायक वसंतदादा पाटील यांचं व्यक्तिमत्त्व उभं केलं आहे.

**- डॉ. सुनीलकुमार लवटे**
**संपर्क : ९८८१२५००९३**

## पुस्तक कुठे मिळेल?

१. संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री, प्रकाशन संचालनालय, नेताजी सुभाष मार्ग, मुंबई – ४००००४. दूरध्वनी : २३६३१४३३, २३६३१७९९.

२. व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार, फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी.पी.ओ.नजीक, पुणे – ४११००१. दूरध्वनी : २६१२५८०८.

३. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, सिव्हिल लाइन्स, नागपूर – ४४०००१. दूरध्वनी : २५६२६१५.

४. सहायक संचालक, शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद – ४३१००१. दूरध्वनी : २३३१५२५.

५. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, ताराबाई पार्क, कोल्हापूर – ४१६००३. दूरध्वनी : २६५०३९५, २६५०४०२.

किंमत : ७८ रुपये

# रक्तदान व युवक

महाराष्ट्रातील युवकवर्ग हा रक्तदानाविषयी जागरुक आहे. त्यामुळेच महाराष्ट्र राज्य रक्तदान चळवळीमध्ये आघाडीचे राज्य ठरले आहे. २०१२ मध्ये महाराष्ट्राने १४.२४ लाख बाटल्या रक्त संकलन केले. त्यामुळे महाराष्ट्रात कधीही कोणत्याही रक्तगटाचा तुटवडा भासणार नाही. तरीही काही जिल्हयांमध्ये रक्तदानाचे प्रमाण वाढवणे आवश्यक आहे. वरील सर्व रक्त संकलनापैकी ९५ टक्के रक्त हे पूर्णतः ऐच्छिक स्वरूपाचे आहे, म्हणजे आपण जागोजागी रक्तदान शिबिरांचे आयोजन केलेले पाहतो. या ठिकाणी एखादा रक्तदाता कोणतीही शंका मनात न बाळगता स्वतःहून स्वेच्छेने रक्तदान करतो. त्यामुळे आज महाराष्ट्रात असे रक्त रुग्णाला देणे अतिशय सुरक्षित आहे. आता असे रक्त सुरक्षित कसे? असे तुम्हाला वाटेल. रक्तातून एचआयव्ही, कावीळ-बी, कावीळ-सी, हिवताप आणि गुप्तरोग यांसारख्या संसर्ग होणाऱ्या रोगांचा प्रादुर्भाव होऊ शकतो. जेव्हा रक्तदाता स्वेच्छेने रक्तदान करतो त्यावेळी त्याला स्वतःबद्दलची सर्व माहिती असते. जसे त्याचे स्वतःचे वर्तन आणि त्याचबरोबर रक्तदात्याला रक्तदानापूर्वी तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासून घेतले जाते. वय १८ ते ६५ आणि कमीत कमी वजन ४५ किलो असल्याशिवाय तो रक्तदानास पात्र नसतो. मात्र तरीही काही रक्तदात्यांमध्ये काही रोगांची लक्षणे दिसून येत नाहीत.



एचआयव्ही संसर्गित रक्त रुग्णांपर्यंत जाण्याची आवश्यकता ही कमीत कमी म्हणजे ०.२९ आहे. ही शक्यता टाळण्यासाठी न्युक्लिक ॲसिड टेस्टिंगसारखे अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरले जाते. अजून एक महत्त्वाची शंका जी युवकांना नेहमीच भेडसावते ती म्हणजे रक्तदान शिबिरांमध्ये रक्तदान केल्यास आपल्याला एचआयव्ही होण्याची शक्यता असते का? असे कधीही होत नाही. कारण प्रत्येक रक्तपिशवीला स्वतंत्र सुई असते. जी निर्जंतूक व एफडीए प्रमाणित असते. या रक्तदान शिबिरांमध्ये देखील एफडीए राज्य रक्त संक्रमण परिषद, राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्था यांसारख्या संस्थाचे निर्बंध असतात. त्याप्रमाणातच रक्ताचे संकलन केले जाते.

रक्तदानापूर्वी रक्तदात्याला एक फॉर्म दिला जातो. ज्यामध्ये रक्तदानाविषयी माहिती दिली जाते सोबत काही प्रश्न विचारून तो सुदृढ असण्याबाबत खात्री केली जाते. याच फॉर्ममध्ये केलेल्या तपासणीची माहिती जाणून घ्यायला तुम्हाला आवडेल का? असा पर्याय उपलब्ध

MSACS महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था

असतो. बऱ्याचदा एचआयव्ही तपासणीचा पॉझिटिव्ह निकाल आला तर या समाजात आपले कसे होईल. पण मनात असा विचार येणे स्वाभाविक असले तरी घाबरण्याची गरज नाही. या चाचण्यांची सर्व माहिती गुप्त ठेवली जाते. माहिती रक्तदात्याच्या इच्छेशिवाय कोणालाही सांगितली जात नाही. संकलन केलेल्या या रक्ताची मुदत फक्त ३५ दिवस असते.

रक्ताचे विघटन करून त्याचे विविध घटक बनविण्यासाठी महाराष्ट्र सरकारने प्रत्येक जिल्हा रुग्णालयात रक्त विघटन केंद्र सुरू करण्याची योजना हाती घेतली आहे. महाराष्ट्रातील जिल्हा रुग्णालय आणि १३ शासकीय महाविद्यालयात अशी केंद्रे सुरू झाली आहेत. श्री. सुरेश शेट्टी (आरोग्य मंत्री, महाराष्ट्र राज्य) यांनी या योजनकडे लक्ष दिले आहे. ''गरज तिथे रक्त'' ही योजना अंमलात आणायचा प्रयत्न केला जात आहे. कुठेही रक्ताची गरज पडली तर टोल फ्री क्रमांक जाहिर केलेल्या फोनवर

**अमृता पाटील**

महाराष्ट्रात कोणत्याही भागात अर्ध्या तासाच्या आत रक्त उपलब्ध करून द्यायचे हा या योजनेचा उद्देश आहे. त्यासाठी महाराष्ट्रातील सर्व रक्त पेढ्यांना एकत्रित आणून, गरजेच्या ठिकाणी सर्वात जवळ असलेल्या रक्तपेढीला परस्पर संपर्क करून रक्त वेळेत पुरविले जाईल. ही सेवा यापेक्षा अधिक सक्षम व तत्पर होण्यासाठी मोटारसायकल रक्तपेढ्यांना पुरविली जातील. केंद्रीय स्वरूपात ही योजना राबविली जात असल्यामुळे कुठे किती साठा उपलब्ध आहे हे लक्षात येईल. गावपातळीवर जिथे जिथे ग्रामीण रुग्णालय, स्त्रीरुग्णालये आहेत त्या स्तरावर रक्त साठवणूक केंद्रांची स्थापना केली गेली आहे. साठवणूक केंद्रांना अधिक सक्षम करणे हा या योजनेचा महत्त्वाचा भाग असेल. सुरक्षित रक्त साठ्याचे मुख्य स्त्रोत आहे.

तरुणांमध्ये रक्तदानांविषयी अधिक जागरुकता असणे आवश्यक आहे. या केलेल्या रक्तदानाचे मोल प्रत्यक्ष कुबेरही देऊ शकणार नाही. रक्ताचे मूल्य आपण कशातही करू शकत नाही याची जाणीव प्रत्येक तरुणाला असायला हवी. १८ ते ६५ असलेला कोणताही सुदृढ नागरिक रक्तदान करू शकतो. त्यासाठी त्याचे कमीत कमी वजन ४५ किलो असले पाहिजे आणि हिमोग्लोबीन प्रमाण १२ ते १४ च्या दरम्यान असले पाहिजे. वैद्यकीदृष्ट्या योग्य ठरलेला रक्तदाताच रक्तदानासाठी ग्राह्य धरला जातो. रक्तदानानंतर कोणत्याही प्रकारचा अशक्तपणा येत नाही. एक आठवड्यात रक्ताची शरीर उणीव भरून काढते. तरीही रक्तदानानंतर १५ ते २० मिनिटे सर्व रक्तदात्यांवर वैद्यकीय अधिकारी वैयक्तिकरीत्या लक्ष ठेवतात. रक्तदानानंतर त्याला चहा आणि बिस्किटसारखे अल्पोपहार दिले जातात. प्रत्येक रक्तदात्याला आभार मानणारे भेटकार्ड दिले जाते. हे भेट कार्ड दाखवून रक्तदात्याला भारतात कोणासाठीही रक्ताची गरज पडली तर विनामूल्य रक्त उपलब्ध होते.

रक्तदानामुळे शरीरात नवीन रक्त तयार होते आणि आपल्या रक्तदानामुळे कोणाचे तरी प्राण वाचविल्याचे समाधान मोठे असते. रक्तदानामुळे आपले कोणतेही नुकसान होत नाही आणि कोणालातरी जीवनदान मिळणार असेल तर आपण रक्तदान का करू नये? ❒❒


**लोकराज्य या प्रकाशनाची मालकी व अन्य माहिती, यासाठी द्यावे लागणारे निवेदन तक्ता - ४ नियम ८ वा**

| | |
|---|---|
| १) प्रकाशन ठिकाण | : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२ |
| २) प्रकाशन काल | : मासिक |
| ३) मुद्रकाचे नाव | : प्रमोद त्र्यं.नलावडे |
| भारताचे नागरिक आहेत का? : होय | |
| ४) प्रकाशकाचे नाव | : प्रमोद त्र्यं.नलावडे |
| भारताचे नागरिक आहेत का? | : होय |
| पत्ता | : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ |
| ५) संपादकाचे नाव | : प्रमोद त्र्यं. नलावडे |
| भारताचे नागरिक आहेत का? | : होय |
| पत्ता | : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ |

मी प्रमोद त्र्यं.नलावडे असे जाहीर करतो की, माझ्या माहितीप्रमाणे वरील तपशील पूर्णपणे खरा आहे.

**प्रमोद त्र्यं. नलावडे**
**मुद्रक व प्रकाशक**

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाची विभागीय कार्यालये

## साधा संपर्क : साधा उन्नती


| अ.क्र. | पद | पत्ता | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १७ | जिल्हा व्यवस्थापक, बीड | डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, पहिला माळा, विश्राम गृहासमोर, ता. बीड, जिल्हा–बीड – ४३१ १२२. | ०२४४२-२२४१७६ |
| १८ | जिल्हा व्यवस्थापक, नांदेड | श्रध्दा कॉम्प्लेक्स, युनिव्हर्सल इंग्लिश शाळेसमोर, उपरावसिंग बिसेन नगर, नव्या मोंढयाजवळ, जिल्हा – नांदेड – ४३१ ६०२. | ०२४६२-२८४२४४ |
| १९ | जिल्हा व्यवस्थापक, परभणी | डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन इमारत, जायकवाडी वसाहत, कोरेगांव रोड, जिल्हा–परभणी–४३१ ४०१. | ०२४५२-२३४५३७ |
| २० | जिल्हा व्यवस्थापक, उस्मानाबाद | गरड बिल्डींग, पोलिस लाईनच्या समोर, मेन रोड, आनंद नक्षर, जिल्हा–उस्मानाबाद ४१३ ५०१. | ०२४७२-२२५१२७ |
| २१ | जिल्हा व्यवस्थापक, लातूर | जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ,प्रशासकीय इमारतीच्या गॅरेजमध्ये, जिल्हा – लातूर – ४१३ ५३१. | ०२३८२-२५६७४० |
| २२ | जिल्हा व्यवस्थापक, जालना | डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, इमारत अ, पहिला मजला, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, जिल्हा – जालना – ४३१ २०३. | ०२४८२-२२५७९० |
| २३ | जिल्हा व्यवस्थापक, हिंगोली | रामाकृष्ण लॉजमागे, नाईक नगर, जिल्हा – हिंगोली – ४३१ ५१३. | ०२४५६-२२३९२१ |
| २४ | जिल्हा व्यवस्थापक, अमरावती | लहानुजी महाराज नगर, डॉ. डफले यांचे समोर, अतुल मंगल कार्यालयाजवळ, जिल्हा – अमरावती–४४४ ६०२ | ०७२१-२६७३७१७ |
| २५ | जिल्हा व्यवस्थापक, अकोला | केडीया प्लॉट, खंडेवाल मारूती शोरूममागे, न्यु भागवत प्लॉट, ओझोन हॉस्पिटलसमोर, मेघदूत अपार्टमेंट, प्लॉट नं. २, जिल्हा – अकोला – ४४४ ००१ | ०७२४-२४२९९३७ |
| २६ | जिल्हा व्यवस्थापक, बुलढाणा | डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, चिखली रोड, जिल्हा – बुलढाणा – ४४३ ००१. | ०७२६२-२४७४३९ |
| २७ | जिल्हा व्यवस्थापक, यवतमाळ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, दक्षता भवन मागे, द्वारका रोड, जिल्हा–यवतमाळ–४४५ ००१. | ०७२३२-२४७८४५ |
| २८ | जिल्हा व्यवस्थापक, वाशिम | डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सिव्हिल लाईन, जिल्हा – वाशिम – ४४४ ५०५. | ०७२५२-२३११०१ |
| २९ | जिल्हा व्यवस्थापक, नागपूर | समाजकल्याण संकुल, धन्नाराम ट्रस्ट इमारत, रिझर्व्ह बँक समोर, जिल्हा –नागपूर – ४४० ०१२. | ०७१२-२५२२०८८ |
| ३० | जिल्हा व्यवस्थापक, भंडारा | विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी कार्यालय, राजगोपालाचार्य वॉर्ड,जिल्हा – भंडारा – ४४० ००१. | ०७१८४-२५५०२८ |
| ३१ | जिल्हा व्यवस्थापक, वर्धा | डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सेवाग्राम रोड, वर्धा, जिल्हा – वर्धा – ४४२ ००१. | ०७१५२-२५५७४५ |
| ३२ | जिल्हा व्यवस्थापक, चंद्रपूर | डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, रयतवाडी रोड, जल नगर, आर. टी. ओ. ऑफीसजवळ, जिल्हा – चंद्रपूर – ४४२ ४०२. | ०७१७२-२७१६६१ |
| ३३ | जिल्हा व्यवस्थापक, गडचिरोली | डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, १ ला मजला, आय. टी. आय. च्या मागे, कॉम्प्लेक्स, जिल्हा – गडचिरोली – ४२२ ६०५. | ०७१३२-२२३०२६ |
| ३४ | जिल्हा व्यवस्थापक, गोंदिया | डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जिल्हाधिकारी कार्यालयामागे, आमगांव रोड, पो. फुलचुर, जिल्हा – गोंदिया – ४४१ ६०१. | ०७१८२-२३४६६५ |


R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MH/MR/South - 210/2012-14
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, March 2013.
Date of Publication : 10th of every Month


# लोकराज्य

## ज्ञानसंपन्नतेचे नवे पर्व वाचा आणि सक्षम व्हा !





















O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ

लोकराज्य LOKRAJYA

प्रति / To :

प्रेषक / From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक प्रमोद त्र्यं. नलावडे, महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीडिया लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई - ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : प्रमोद त्र्यं. नलावडे